**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/४९६५१/अपील क्रमांक ७०४४/२०१०**

**श्री.सुरेश जगदिश सजनावत,**
**हमिद हाऊस, रुम नं.७, तळ मजला,**
**हॉल रोड, हलाव पूल, कुर्ला(प.), मुंबई-४०००७०. .....**
**अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा रजिस्ट्रार (इन्सपेक्शन-१),**
**मुंबई उच्च न्यायालय, उच्च न्यायालय आवार,**
**मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा मास्टर अँड असिस्टंट प्रोथोनोटरी(ॲडमिन.),**
**मुंबई उच्च न्यायालय, उच्च न्यायालय आवार,**
**मुंबई-४०००३२ ......**
**उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : १९.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ३.१.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी उशीराने अनुपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.१५.४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी,मा.उच्च न्यायालय(ओरिजिनल साईड) यांच्याकडे अर्ज करुन त्यांच्या गोपनीय अहवालाच्या संदर्भात एकूण ९ मुद्यांच्या संदर्भात माहिती मागीतलेली दिसून येते. त्यामध्ये पुन्हा त्यांच्या रजेच्या संदर्भातील माहितीसुध्दा मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.११.६.२०१० रोजी अपिलकर्ता यांनी त्यांच्या वार्षिक गोपनीय अहवालाच्या संदर्भात कारणे उपलब्ध करुन देता येणार नाहीत असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.९.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भात दि.२२.७.२०१० रोजी निर्णय झालेला दिसून येतो व जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना त्यांच्या रजेच्या संदर्भातील कागदपत्र पुरविण्यात यावीत असा निर्णय झालेला दिसून येतो. परंतु सदरच्या रजेच्या कागदपत्रांच्या

संदर्भामध्येसुध्दा अपूर्ण माहिती मिळाली या कारणास्तव अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की,प्रतिवेदन अधिका-यांनी अपिलकर्ता यांचे वार्षिक गोपनीय अहवाल लिहितांना जे कारण दिलेले आहे ते कारण व त्या संदर्भातील कागदपत्र मागितली असतांना कारणे पुरविता येत नाहीत असे कळविले. प्रथम अपीलाच्या निर्णयात संबंधित कालावधीतील रजेच्या संदर्भातील कागदपत्र उपलब्ध करुन देण्यात यावीत असा निर्णय दिलेला आहे. त्यांचे वार्षिक गोपनीय अहवाल जर योग्य लिहिले गेले नसतील तर त्याबद्दलची कारणे त्यांना मिळाली पाहिजेत. त्याच कालावधीतील रजेच्या संदर्भातसुध्दा योग्य त्या नोंदी घेतलेल्या असल्या पाहिजेत. त्याकरीता जी माहिती त्यांनी मागीतली परंतु ती नाकारण्यात आली आहे. जन माहिती अधिकारी हे आयोगापुढे सुनावणीस हजर नाहीत. वास्तविक मा. उच्च न्यायालयाचे जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींची सखोल माहिती असणे आवश्यक आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(५)अन्वये माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही किंवा नाकारण्यात आली ते सिध्द करण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी यांच्यावर दिलेली आहे. तसेच माहिती दिली नसेल तर किंवा नाकारण्यात आली असेल तर किंवा अपूर्ण दिली असेल तर त्या संदर्भातसुध्दा अधिनियमाच्या कलम २०(१)च्या दोन्ही परंतुकाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनीच त्यांचे म्हणणे आयोगापुढे मांडणे आवश्यक आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे उपस्थित रहाणे हे सर्वसामान्य ज्ञान आहे. आयोगाच्या नोटीसमध्ये सुध्दा त्याबद्दल स्पष्टपणे नमूद केलेले आहे. तरीसुध्दा मुंबई उच्च न्यायालयाचे जन माहिती अधिकारी हे आयोगापुढे सुनावणीस उपस्थित नाहीत. अधिनियमाच्या कलम ७(१)प्रमाणे माहिती व माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आत माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक असते परंतु या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी दि.११.६.२०१० रोजी माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिली आहे व त्याबद्दलचा कोणताही खुलासा त्यांनी आयोगाकडे केलेला नाही व ते स्वतःही आज उपस्थित नसल्यामुळे त्यांचे म्हणणे आयोगास ऐकून घेता आलेले नाही. मा.उच्च न्यायालयात निर्णय देतांना कायद्याच्या तरतुदींच्या तंतोतंत पालन करुन निर्णय दिला जातो व त्याच उच्च न्यायालयाचे माहिती अधिकारी मात्र अधिनियमाच्या तरतुदींचे पालन करत नाहीत ही बाब योग्य नाही. प्रथम अपीलाच्या निर्णयातसुध्दा वार्षिक गोपनीय अहवालाच्या संदर्भात कारणे उपलब्ध करुन देता येत नाही हे कळवतांना योग्य ती खबरदारी घेतलेली दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी वार्षिक गोपनीय

अहवलाच्या संदर्भात विलंबाने उत्तर दिले. रजेच्या कालावधीच्या संदर्भातील कागदपत्रांच्या संदर्भात काहीही म्हटलेले नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी वार्षिक गोपनीय अहवालाच्या संदर्भात निर्णयात काहीही म्हटलेले नाही. अशाप्रकारे जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे निर्णय दिसून येतात.

असे असले तरी माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम २(१) मधील (त्र ) च्या अनुसार 'माहितीचा अधिकार'या संज्ञेची व्याख्या केलेली आहे तसेच (च) मध्ये 'माहिती' या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व या दोन्ही व्याख्यांप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणात, साहित्याच्या स्वरुपात असलेली कागदपत्रे, अभिलेख इत्यादींच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे असा होतो. त्यामध्ये कोणत्याही प्रकरणात गुणवत्तेच्या संदर्भात कारणे किंवा जन माहिती अधिकारी यांचे मत उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही, माहिती जशी आहे तशीच उपलब्ध होते. त्यामुळे अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य आहे परंतु तो अपूर्ण व विलंबाने दिलेला आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१)अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत अपिलकर्ता यांना त्यांच्या संबंधीत कालावधीतील रजेच्या संदर्भातील कागदपत्रांच्या संदर्भात पूर्ण माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ३.१.२०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०१९५/अपील क्रमांक ७०४५/२०१०**

**श्री. मुनाफ बरमारे,**
**रोम-लुई अपार्टमेंट,३रा मजला, पितांबर लेन,**
**मोहिम, मुंबई-४०००१६. .....**
**अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, मुंबई(१) शहर, मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला,**
**जी.पी.ओ. समोर, फोर्ट, मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,**
**जी/एन विभाग, मल्होत्रा हाऊस, ६वा मजला,**
**जी.पी.ओ. समोर, फोर्ट, मुंबई-४००००१. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : १९.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ३.१.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.१४.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,जी/एन वार्ड यांच्या कार्यालयात अर्ज करुन कागदपत्र जतन करण्याची कार्यपध्दती, कार्यालयातील नियमावलीची माहिती तसेच अपिलकर्ता यांनी उल्लेखित केलेली कागदपत्र ज्या ठिकाणी जतन केलेली असतील त्या संदर्भातील नोंदणी रजिस्टरच्या छायांकित प्रती तसेच कोणत्या अधिका-यांच्या अधिपत्यात सदरची कागदपत्र होती त्यांची नांवे इत्यादी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.२.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भात अपिलकर्ता यांना दि.१६.८.२०१०रोजी माहितीच्या अर्जाचा संदर्भ घेऊन मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२८.८.२०१० रोजी देण्यात आला

असून माहिती अधिकारी यांनी अर्जदाराच्या अर्जातील मुद्दा क्र.१ ते १७ ची माहिती मुद्देनिहाय उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु त्याप्रमाणे माहिती देण्यात आलेली दिसून येत नाही. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी सहकार विभागाकडे १९९५-९६ या कालावधीत त्यांनी पाठविलेल्या पत्रांवर कार्यालयात झालेल्या कार्यवाहीची माहिती मागीतली होती. परंतु त्या संदर्भात त्यांना दि.२४.११.२०१० रोजी सदर गृहनिर्माण संस्थेच्या कामकाजासंबंधी सर्व्हे घेण्यात आला होता व त्या संबंधीची माहिती संबंधीत संस्थेकडून मागविण्यात आली होती. त्या संदर्भातच त्यांनी पूर्वी माहिती मागीतली होती. परंतु सदरची कागदपत्र उपलब्ध नाहीत व ती नष्ट करण्यात आलेली आहेत असे उत्तर दिल्यामुळे त्यांनी त्या सर्व अधिका-यांची माहिती मागितली होती. त्याप्रमाणे त्यांना उत्तर देण्यात आलेले आहे. अपिलकर्ता यांनी तोंडी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, सदरच्या गृहनिर्माण संस्थेमध्ये गैरव्यवहार आहे व त्या गैरव्यवहाराच्या संदर्भात त्यांनी तक्रार केलेली होती. परंतु त्या संदर्भात सहकार विभागाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात येत नसल्यामुळे व कागदपत्रसुध्दा उपलब्ध होत नसल्यामुळे सहकारी संस्थेच्या कामकाजाबाबत सभासदांना कोणतीही माहिती उपलब्ध होऊ शकत नाही व सहकार विभागसुध्दा सहकारी संस्थांच्या पदाधिका-यांविरुध्द कोणत्याही प्रकारची कारवाई करीत नाही. आज सुनावणीस जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा कोणतीही कागदपत्र दाखल केलेली नाहीत. परंतु अपिलकर्ता यांनी जी कागदपत्र दाखल केलेली आहेत त्यावरुन अपिलकर्ता यांचे समाधान झाले नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आयोगास ऐकून घेणे आवश्यक होते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम १९(५) अन्वये जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही किंवा नाकारली असल्यास ते सिध्द करणे ही जन माहिती अधिकारी यांची जबाबदारी आहे. तसेच अधिनियमाच्या कलम २०(१) च्या दोन्हीही परंतुकाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनीच आयोगापुढे त्यांचे म्हणणे मांाडणे बंधनकारक आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी सुनावणीस उपस्थित नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतु तत्पूर्वी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे ऐकून घेणे बंधनकारक आहे व त्याकरीता सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांच्या दि.१४.६.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही तसेच ते आयोगापुढे सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत याबद्दल त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१) प्रमाणे शास्ती का लादण्यात येऊ नये याबद्दल त्यांचे म्हणणे आयोगापुढे समक्ष मांडावे अन्यथा त्यांच्याविरुध्द शास्ती लादण्यात येईल याची त्यांनी नोंद घ्यावी.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई (विलास पाटील)
दिनांक ३.१.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०२०४/अपील क्रमांक ७०४७/२०१०**

**श्री. मारुती बाबुराव नाईकडे,**
**रुम नं.५९, दुसरा मजला, समता कॉलनी ट्रांझिट कँप,**
**पंतनगर, घाटकोपर(पूर्व), मुंबई-४०००७५. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता(इ.प्र.),**
**पूर्व उपनगरे, बृहन्मुंबई महानगरपालिका, पेपर मिल कंपाऊंड,**
**राज लेगसीजवळ, लालबहादूर शास्त्री मार्ग,**
**विक्रोळी(प.), मुंबई-४०००८३.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(इ.प्र.),**
**पूर्व उपनगरे, बृहन्मुंबई महानगरपालिका, पेपर मिल कंपाऊंड,**
**राज लेगसीजवळ, लालबहादूर शास्त्री मार्ग,**
**विक्रोळी(प.), मुंबई-४०००८३. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २७.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ३.१.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२२.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(इमारती व कारखाने),एन वार्ड विभाग, घाटकोपर(पूर्व) यांच्याकडे सी.टी.सर्व्हे क्र.१९४(पार्ट) पंतनगर विश्रांती को.ऑप.हौ.सो.लि., समता कॉलनी, घाटकोपर(पूर्व),मुंबई-७५ येथे ६ इमारती बांधण्यात आल्या असून त्या इमारतीस भोगवटा दाखला नसल्याबाबत विकासकावर केलेल्या दंडात्मक कारवाईच्या प्रती या संदर्भात तसेच भोगवटा दाखला नसतांनाही त्यावर व्होडाफोनचा टॉवर बांधण्यास म.न.पा.ने कोणत्या कायद्यांतर्गत परवानगी दिली त्या कायद्याबाबतचा तपशिल मागितलेला दिसून येतो.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.१६.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(इमारत व प्रस्ताव),पूर्व उपनगरे-२ यांनी कार्यालयात धारिणीची पहाणी करावी व सदर धारिणीमधील कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती कार्यालयाने विहित केलेले शुल्क रु.६०/- प्रति नकाशा व रु.२५/- प्रति प्रत याप्रमाणे भरुन प्राप्त करुन घेता येईल. तसेच ए-४ व ए-३ आकारातील अप्रमाणित छायांकित केलेल्या प्रत्येक प्रतीसाठी रु.२/- प्रमाणे शुल्क भरुन प्राप्त करता येतील अशाप्रकारे कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.३०.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१.९.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांनी सदर इमारतीच्या धारिणीचे निरिक्षण १५ दिवसाच्या आत करुन आवश्यक असलेल्या कागदपत्रांची यादी जन माहिती अधिकारी यांना कळवावी व अपिलकर्ता यांनी शुल्क भरणा केल्यानंतर १५ दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. यामुळे समाधान न झ ााल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी भोगवटा दाखला म.न.पा.ने दिलेला नसल्यामुळे किंवा विकासकाने प्रस्ताव दिला नसल्यास त्या संदर्भात विकासकांवर दंडात्मक कारवाई केली किंवा नाही तसेच व्होडाफोनचा टॉवर बांधण्यास कोणत्या कायद्यांतर्गत परवानगी दिली एवढीच माहिती मागितली होती. त्यांनी कोणत्याही प्रकारचा नकाशा मागितलेला नव्हता किंवा उपरोक्त कागदपत्रसुध्दा मागितलेली नव्हती. भोगवटा दाखल्याच्या संदर्भात विकासकावर कारवाई केली किंवा नाही, केली असल्यास त्याचा अहवाल व केली नसल्यास तसे कळविणे व व्होडाफोनच्या संदर्भात आदेशाची प्रत एवढीच माहिती अपेक्षित होती. त्याकरीता नस्तीचे निरिक्षण देण्याची आवश्यकता नव्हती. त्यामुळे त्यांनी नस्तीचे निरिक्षण घेतलेले नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी प्रश्न विचारले होते व त्याबाबत उत्तर देणे ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५मध्ये अपेक्षित नसल्यामुळे त्यांना नस्तीचे निरिक्षण करावे व कागदपत्र उपलब्ध करुन घ्यावीत अशाप्रकारे कळविले होते. त्यावर जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी (जन माहिती अधिकारी यांनी वैयक्तिकरित्या उपस्थित रहाणे आवश्यक आहे) यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५चा कलम १९(५) अन्वये माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही ते सिध्द करण्याची जबाबदारी ही जन माहिती अधिकारी यांची आहे त्यामुळे आयोगापुढे जन माहिती अधिकारी यांनी उपस्थित रहाणे अनिवार्य आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे अर्जदाराने माहिती ही थोडक्यात मागीतली असली तरी त्याबाबत स्पष्टपणे माहितीची कागदपत्र

उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते व मागितलेल्या माहितीच्या संदर्भात कारवाईच झालेली नसली तर त्याप्रमाणे कळविणे अपेक्षित असते. त्याकरीता संपूर्ण नस्तीचे निरिक्षण करणे असे जे उत्तर देण्यात येते याचा अर्थ माहिती देण्यास टाळाटाळ करणे असा होतो. नस्तीचे निरिक्षण करणे ही अधिनियमात जरी तरतूद असली तरी माहिती व्यापक प्रमाणात असून अनेक पृष्ठे असल्यास सदर नस्तीचे निरिक्षण देणे अपेक्षित असते. सदरच्या प्रकरणात अपिलकर्ता यांनी अतिशय स्पष्टपणे व संक्षिप्त स्वरुपात माहिती मागितलेली आहे व त्यास प्रश्न म्हणता येणार नाही. प्रश्नाचा अर्थ म्हणजे ज्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रकरणातील निर्णयाच्या संदर्भामध्ये गुणवत्तेच्याबाबत मत मागितले असेल तर किंवा अभिप्राय मागितले असतील तर माहितीचा अधिकारामध्ये अशाप्रकारचे मत देणे अपेक्षित नाही व त्यामुळे जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जे उत्तर व निर्णय दिलेले आहेत ते योग्य नाही. त्याकरीता अपिलकर्ता यांना थोडक्यात माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१)अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असूनअपिलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत त्यांच्या दि.२२.६.२०१०च्या अर्जात मागितलेल्या माहितीच्या संदर्भात मुद्देनिहाय माहिती व कागदपत्र उपलब्ध असल्यास किंवा नसल्यास त्याप्रमाणे विनामुल्य रजिस्टर पोस्टाने कळविण्यात यावे.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ३.१.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०२००/अपील क्रमांक ७०४६/२०१०**

**श्री. नितीन तुकाराम गवाणकर,**
**गवाणकर निवास, साईकृपा बिल्डिंग समोर,**
**शिववल्लभ रोड, दहिसर(पूर्व), मुंबई-४०००६८. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा निवासी उप जिल्हाधिकारी(अति./निष्का.),**
**मुंबई उपनगर जिल्हा(पश्चिम उपनगरे), प्रशासकीय इमारत,**
**७वा मजला, सरकारी वसाहत,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार(अति,/निष्का.),**
**मुंबई उपनगर जिल्हा(पश्चिम उपनगरे), प्रशासकीय इमारत,**
**७वा मजला, सरकारी वसाहत,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : १३.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ३.१.२०११**
**जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२३.४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, अप्पर जिल्हाधिकारी(अतिक्रमण)यांच्या कार्यालयामध्येमहानगरपालिकेने मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडील याचिका क्र.WPP-३०५/९९ वर झालेल्या कार्यवाहीची माहिती मागीतलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले आहे.

अर्जाच्या अनुषंगाने दि.१४.५.२०१० रोजी अपिलकर्ता यांच्या संदर्भीय अर्जाची तपासणी केली असता आपण मागीतलेली माहिती या कार्यालयाशी संबंधीत नाही, सदर माहिती बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या कार्यालयाशी संबंधीत असल्याने आपला मूळ अर्ज त्या कार्यालयाकडे पाठविण्यात येत आहे, कृपया आपण त्यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा अशाप्रकारचे उत्तर दिलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.११.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भातसुध्दा दि.२९.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी कळविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या कार्यालयातील अपीलीय अधिकारी

यांच्याकडे अपील दाखल करणे आवश्यक आहे असे कळविण्यात आले. परंतु पुन्हा अपिलकर्ता यांनी महानगरपालिकेतील अपीलीय अधिकारी यांच्याकडे अपील दाखल न करता निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या निर्णयाच्याविरुध्द राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. त्यामुळे आज सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार व अपीलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी हे आयोगापुढे उपस्थित झाले व त्यामुळे ज्या सार्वजनिक प्राधिकरणामधील (बृहन्मुंबई महानगरपालिकेतील) माहिती आहे तेथील माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे सुनावणीस उपस्थित झालेले नसल्यामुळे व अपिलकर्ता गैरहजर असल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध झाली किंवा नाही याबाबत आयोगापुढे कोणतीही कागदपत्र सादर झालेली नाहीत. असे असले तरी जन माहिती अधिकारी तथा नायबतहसिलदार व अपीलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी अपिलकर्ता यांना बृहन्मुंबईमहानगरपालिकेने माहिती दिलेली आहे असे आयोगापुढे सांगितले व त्यामुळेच कदाचित अपिलकर्ता आयोगापुढे हजर झालेले दिसून येत नाहीत. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ३.१.२०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०२००/अपील क्रमांक ७०४३/२०१०**

**श्री. रमेश के.जे. चौहाण,**
**१०४, बी विंग, दीपक ज्योती सोसायटी,**
**जी.डी.ए. मार्ग, परेल, मुंबई-४०००३३. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक,**
**सहकारी संस्था, मुंबई विभाग, मल्होत्रा हाऊस, ६वा मजला,**
**जी.पी.ओ. समोर, फोर्ट, मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहाय्यक निबंधक,**
**सहकारी संस्था, मुंबई विभाग,मल्होत्रा हाऊस, ६वा मजला,**
**जी.पी.ओ. समोर, फोर्ट, मुंबई-४००००१. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २४.९.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ३.१.२०११**

**जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी, अपिलकर्ता अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.१७.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी,विभागीय सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांच्या कार्यालयात दि.१५.६.२०१० रोजी झालेल्या अपिलाच्या सुनावणीच्या संदर्भात दाखल झालेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती इत्यादीबाबत एकूण ८ मुद्यांमध्ये माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.१५.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहाय्यक निबंधक यांनी त्यांच्या १ ते ८ मुद्यांच्या संदर्भात अपील क्र.११५/२०१० हा दावा अद्याप न्याय प्रविष्ठ असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम८(१)(बी)अन्वये याबाबत माहिती देणे योग्य होणार नाही तसेच या संदर्भात आपले काही आक्षेप असल्यास आपण प्रतिवादी असल्याने सदर दाव्याच्यावेळी उपस्थित राहून आपले म्हणणे मांडून दाद लिहून घ्यावी. तसेच संबंधीत अपीलाबाबतच्या दि.१५.६.२०१०च्या रोजनाम्याची प्रत व दि.५.७.२०१०च्या अंतरिम आदेशाची प्रत पाठविण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते.परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.२८.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भात निर्णय झालेला दिसून येत नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

सुनावणीस अपीलकर्ता हजर नाहीत परंतु त्यांनी आयोगापुढे त्यांचे निवेदन दाखल केलेले आहे. त्यामध्ये त्यांनी त्यांचे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६६च्या अंतर्गत जे अपील प्रलंबित आहे त्या अपिलाच्या संदर्भात विरोधी पक्षाने दाखल केलेल्या कागदपत्रांच्या प्रती त्यांना

उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत असे म्हटलेले आहे. तसेच अपिलकर्ता यांची मूळ तक्रार ही सदरच्या अपिलाच्या गुणवत्तेबाबत दिसून येते. अपिलकर्ता यांनी विभागीय सह निबंधक यांच्याकडे माहितीचा अर्ज केलेला असला तरी जे जन माहिती अधिकारी नियुक्त आहेत तेच आयोगापुढे उपस्थित असतात. अर्जदाराने कोणत्याही अधिका-याकडे माहितीचा अर्ज केला असला तरी त्याच अधिका-याने उपस्थित रहावे असा आग्रह त्यांना धरता येणार नाही. त्याचप्रमाणे विभागीय सहाय्यक निबंधक तथा जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांचे जे अपील संस्थेविरुध्द सुरु आहे त्या अपीलाच्या संदर्भात अंतिम निर्णय झालेला नाही व अंतरिम निर्णय झालेला आहे. त्यामुळे सदरचे अपील प्रलंबित असल्यामुळे त्यातील कागदपत्र उपलब्ध करुन देता येणार नाहीत अशाप्रकारे त्यांना कळविण्यात आले होते. असे असले तरी त्यांच्या संस्थेच्या विरुध्द असलेल्या अपीलाच्या संदर्भात संस्थेने जी कागदपत्र दाखल केली असतील त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती या अपील सुनावणीच्या नियमावलीप्रमाणे विरोधी पार्टीस उपलब्ध करुन देणे बंधनकारक असते व ते नैसर्गिक न्यायाच्यादृष्टीनेसुध्दा उचित असते. त्यामुळे संदर्भीय अपीलामध्ये जर विरोधी पक्षाने कागदपत्र दाखल केलेली असतील तर त्या कागदपत्रांच्या किंवा खुलाशांच्या प्रती या अपिलकर्ता यांना अपील प्रलंबित असले तरी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.१७.६.२०१० च्या अर्जात मागितलेल्या माहितीच्या संदर्भात विरोधी पक्षाने दाखल केलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्यात.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ३.१.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/४९८९१/अपील क्रमांक ७०६०/२०१०**

**ॲड.श्री. राजेश बिंद्रा,**
**ऑफीस-१९२, ए, केनी हाऊस,**
**धारावी कोळीवाडा, शिवसेना शाखेसमोर,**
**मुंबई-४०००१७. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा सह सचिव,**
**आदिवासी विकास विभाग,**
**मंत्रालय विस्तार, मंत्रालय, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी(का.१०),**
**आदिवासी विकास विभाग,**
**मंत्रालय विस्तार, मंत्रालय, मुंबई-४०००३२. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २०.९.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ४.१.२०११**
**जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी, अपिलकर्ता उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२७.३.२०१० रोजी जन माहिती अधिकारी,आदिवासी विभाग,मंत्रालय यांच्याकडे Information in connection with streamlining the procedure for issuance of SC/ST/OBC certificates in Maharashtra State च्या संदर्भात एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. मुद्दा क्र.१मध्ये १९८०च्या कालावधीतील समित्यांच्या कामकाजाची माहिती व मुद्दा क्र.४मध्ये नवीन समित्यांच्या गठनाबद्दलची माहिती व अहवालांची माहिती मागीतलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि.२९.४.२०१० रोजी अपिलकर्ता यांनी मुद्दा क्र.१,२,३ च्या संदर्भात मागीतलेली माहिती ही सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडे असल्यामुळे अर्ज त्या विभागाकडे पाठविण्यात आला आहे. तसेच मुद्दा क्र.४च्या संदर्भात सन १९८३ नंतर १९८५मध्ये केवळ अनुसुचित जमातीच्या उमेदवारांची जातीची प्रमाणपत्रे तपासण्यासाठी संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था यांच्या अध्यक्षतेखाली एक स्वतंत्र समिती स्थापन करण्यात आली. त्यानंतर शासन निर्णय दि.३ जून,१९९२अन्वये नाशिक,

नागपूर येथे समित्यांची स्थापना करण्यात आली. त्यानंतर शासन निर्णय दि.६ सप्टेंबर,२००० अन्वये ठाणे औरंगाबाद व अमरावती येथे समित्यांची स्थापना करण्यात आली व दि.८ डिसेंबर,२००६ च्या शासन निर्णयान्वये नंदूरबार व गडचिरोली येथे समित्यांची स्थापना करण्यात आली असे कळविलेले दिसून येते. यामुळे अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि.३०.४.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२.७.२०१० रोजी दिलेला दिसून येतो व मुद्दा क्र.४ ची माहिती कक्ष अधिकारी यांनी दिलेली आहे या कारणास्तव अपील निकाली काढण्यात आले आहे. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी पुन्हा राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना १९८० पासून स्थापन झालेल्या जात पडताळणी समित्यांच्या संदर्भातील माहिती ही आदिवासी विभागाने उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतु त्यांनी तसे न करता त्यांचा अर्ज सामाजिक न्याय विभागाकडे हस्तांतरीत केलेला आहे. त्या अर्जाच्या संदर्भातसुध्दा त्यांना अद्यापपर्यंत कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही. तसेच मुद्दा क्र.४च्या संदर्भात त्यांनी नवीन स्थापन झालेल्या समित्यांच्या संदर्भात कार्यपध्दतीची माहिती मागीतली होती परंतु त्याबाबतही त्यांना समित्या स्थापन झाल्या इथपर्यंतच माहिती दिलेली आहे व कार्यपध्दतीची माहिती दिलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, १९८३ पूर्वी सामाजिक न्याय विभाग व आदिवासी विभाग हा एकच विभाग होता. सामाजिक न्याय विभागातून आदिवासी विभाग हा स्वतंत्र करण्यात आला त्यामुळे १९८०पासून जरी माहिती मागीतली असली तरी जात पडताळणी समित्या या त्यावेळच्या सामाजिक न्याय विभागाकडे होत्या व त्यामुळे ती माहिती सामाजिक न्याय विभागाकडे उपलब्ध होऊ शकेल व म्हणून सदरचा अर्ज त्या विभागास हस्तांतरीत करण्यात आला होता. ७ मार्च,१९६२ मध्ये मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. त्या शासन निर्णयामध्ये जातीचे प्रमाणपत्र निर्गमित करतांना कोणत्या बाबी पहाव्यात याबाबत सक्षम अधिका-यांना सूचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे शासनाने महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती,विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र(देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन)अधिनिमय २०००(२००१चा महा.क्र.२३) दि.१८.१०.२००१ पासून लागू केलेला आहे. त्यानुसार अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र निर्गमित करणारे सक्षम अधिकारी दि.५.६.२००३ च्या शासन राजपत्रात(असाधारण क्र.३९) अधिसूचित करण्यात आलेले आहेत. तसेच वरील अधिनियमांतर्गत महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र(देण्याचे व

त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम,२००३ दि.५.६.२००३ च्या शासन राजपत्रात (असाधारण क्र.१४०) प्रसिध्द करण्यात आले व ते त्याच दिनांकापासून लागू झालेले आहेत. या नियमांमध्ये अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र निर्गमित करण्याची विहित पध्दत नमूद करण्यात आलेली आहे. यावरुन असे दिसून येते की, प्रथम दि.२९.१०.१९८० व दि.७.३.१९९६ च्या शासन निर्णयानुसार जातीची प्रमाणपत्रे निर्गमित करण्यात येत होती. आता महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन)नियम-२००३ यानुसार अनुसूचित जमातीची प्रमाणपत्रे निर्गमित करण्यात येतात व त्यांची तपासणी करण्यात येते. तसेच ७ मार्च चा शासन निर्णय उपलब्ध करुन देता येईल असेही त्यांनी सांगितले. त्यावरुन अधिनियम किंवा नियम यामध्ये जर तरतूद असेल तर तो अधिनियम किंवा नियम हा राजपत्रात प्रसिध्द केलेला असतो व तो अधिनियम व नियम हा जनतेला माहित आहेत असे गृहीत धरलेले असते. शासन निर्णय मात्र उपलब्ध होऊ शकतो. परंतु त्याबाबतही जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की सर्व शासन निर्णय तसेच नियम व अधिनियम त्या विभागाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. त्यावर अपलिकर्ता यांनी सांगितले की, प्रत्येकाला संकेत स्थळावरुन माहिती उपलब्ध करुन घेता येत नाही. असे असले तरी राजपत्रात जो कायदा प्रसिध्द केलेला आहे त्या कायद्याच्या संदर्भात पुन्हा माहिती देणे अपेक्षित नसल्यामुळे अपिलकर्ता यांना त्याबद्दलची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असे दिसून येते. त्यामुळे अपिलकर्ता यांना या संदर्भात माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१) सदरचे अपील निकाली काढण्यणत येत आहे.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**

**दिनांक ४.१.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/४९८८९/अपील क्रमांक ७०५९/२०१०**

**श्री.सुरेश शांताराम साने,**
**अ-१, प्रधान सागर, जिवदया लेन,**
**घाटकोपर(प.), मुंबई-४०००८६. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था,एन विभाग,**
**कक्ष क्र.३११,३रा मजला, कोकण भवन,**
**नवी मुंबई-४००६१४.**

**जन माहिती अधिकारी तथा चेअरमन,**
**मंगलभवन को.ऑप.हौ.सो.लि.,**
**सी.टी.एस.क्र.१७२५ ते १७२९,आर.बी.कदम मार्ग,**
**घाटकोपर(प.), मुंबई-४०००८६. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : १४.९.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ४.१.२०११**
**जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी, अपिलकर्ता उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२.४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव,मंगलभवन को.ऑप.हौ.सो.,जीवदया लेन,घाटकोपर(प.) यांच्याकडे सोसायटीच्या पदाधिका-यांनी सोसायटी रजिस्टर झाल्यापासून दुकानदारांना सोसायटीचे सभासद का बनविण्यात आले नाही व इतर ५ मुद्यांबाबत माहिती मागीतलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.३१.५.२०१० रोजी आपण सोसायटीचे सभासद नसल्यामुळे आपल्याला माहिती उपलब्ध करुन घेण्याचे काहीही अधिकार नाहीत असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी उपनिबंधक,सहकारी संस्था यांच्याकडे दि.१३.५.२०१०रोजी प्रथम अपील दाखल केले. त्या संदर्भात दि.७.६.२०१० रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी चेअरमन/सेक्रेटरी,प्रधान सागर कोऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी यांना श्री.साने यांनी आपल्या संस्थेस दि.२.४.२०१० रोजी माहितीच्या अधिकारान्वये अर्ज केला असता

आपण त्यास अद्यापपर्यंत कोणतीही माहिती दिलेली नाही. त्यावर त्यांनी या कार्यालयाकडे संदर्भाधिन पत्रान्वये अर्ज केलेला आहे. तरी, त्यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ३२ अन्वये संस्थेच्या मंजूर उपविधीतील तरतूदीनुसार जरुर ते शुल्क भरणा करुन आवश्यक ती माहिती व संपूर्ण कागदपत्र उपलब्ध करुन देण्यात यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झालेली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, सोसायटीचे सभासद नसतांनाही त्यांना देखभाल खर्च आकारतात तसेच सोसायटीने मागितल्याप्रमाणे दुकान क्र.१च्या संदर्भात रु.२८,५०० चा चेक १७.७.०९ व रु.३६,१९० चा चेक दिलेला आहे. परंतु त्याची पावती आजपर्यंत उपलब्ध करुन दिलेली नाही. तसेच भवन डेव्हलपर्स यांना नोटीस देऊन रु.५२९६७२ इतकी थकबाकी मागीतली असून सोसायटीच्या सुरुवातीपासून ते ३१.३.२०१० पर्यंत हिशोब मिळाल्यास ग्राहक कंझुमर्स न्यायालयामध्ये त्यांनी दाखल केलेल्या दाव्यामध्ये त्यांना दाखल करता येईल. सुनावणीस मंगलभवन सहकारी संस्थेचे पदाधिकारी हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ त्यांना लागू होतो किंवा नाही याबद्दल त्यांना माहिती नाही परंतु अपिलकर्ता हे सोसायटीचे सभासद नसल्यामुळे त्यांना महाराष्ट्र सहकारी संस्था १९६०च्या अधिनियमाच्या कलम ३२ प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही. असे असले तरी सदरच्या सहकारी संस्थेच्या आवारात अपिलकर्ता यांचे दुकान असल्यामुळे व त्यासंदर्भात सोसायटी मेंटेनन्स घेते व त्यांच्या बिल्डरने सोसायटी दुकानांचे बांधकाम केलेले असल्यामुळे त्यासंदर्भात अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. सहकारी संस्थांवर सहकार विभागाचे नियंत्रण असल्यामुळे अपिलकर्ता यांना सहकार विभागाने माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश देणे आवश्यक आहे व त्या आदेशाची पूर्तता केलेली नसेल तर सोसायटीच्या विरुध्द योग्य ती कारवाई महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०प्रमाणे करणे आवश्यक आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी या सहकारी संस्थांना लागू होतात किंवा नाही याबद्दल सदर गृहनिर्माण संस्थेने आयोगापुढे युक्तीवाद केलेला नाही. तसेच उपनिबंधक,सहकारी संस्था यांनीसुध्दा त्या संदर्भात कोणताही मुद्दा आयोगापुढे मांडलेला नाही. असे असले तरी अपिलकर्ता यांच्याकडून ज्याअर्थी सहकारी संस्था ही देखभाल खर्च वसुल करीत आहे व सोसायटीचे बांधकाम ज्या बिल्डरने केलेले आहे ते बील्डर जर त्या सोसायटीच्या परिसरात असलेल्या दुकानांच्या संदर्भात खर्च वसुल करण्याचा प्रयत्न

करीत असतील तर त्याबद्दलची सर्व माहिती सहकारी गृहनिर्माण संस्थेने अपिलकर्ता यांना देणे संयुक्तीक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१)अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत मंगलभवन कोऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटीच्या सचिवांनी अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.२.४.२०१०च्या अर्जात मागितलेली माहिती मुद्देनिहाय विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी**

**२)उपनिबंधक सहकारी संस्था,एन विभाग, कोकण भवन, नवी मुंबई मुंबई-२१ यांनी मंगलभवन कोऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी यांना अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०च्या तरतुदीप्रमाणे द्यावेत.**

**३)अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**

**दिनांक ४.१.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/४९८९९/अपील क्रमांक ७०६२/२०१०**

**श्री. प्रवीण वीरसी सोळंकी,**
**रुम नं.८, तळमजला, बाहुबली व्यायामशाळेच्या पाठीमागे,**
**न्यु बावन चाळ, वीर तानाजी मालुसरे मार्ग,**
**काळाचौकी, मुंबई-३३. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(विशेष),**
**ई विभाग कार्यालय, म.न.पा.,**
**३रा मजला, १० शेक्ष हाफीजुद्दीन मार्ग,**
**भायखळा(प.), मुंबई-४००००८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(जलकामे),**
**ई विभाग कार्यालय, म.न.पा.,**
**३रा मजला, १० शेक्ष हाफीजुद्दीन मार्ग,**
**भायखळा(प.), मुंबई-४००००८. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २४.९.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ४.१.२०११**
**जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी, अपिलकर्ता उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२९.४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी जल कामे, २रा माळा,१० शेख हफिझुद्दिन मार्ग, भायखळा, मुंबई-८ यांच्या कार्यालयात एप्रिल-२०१० या महिन्यात केलेल्या तक्रारींच्या संदर्भात व झोपडी क्र.१ ,रमेश रावल, बाटलीबॉय कंपाऊंडच्यामध्ये न्यु बावन चाळ,वीर तानाजी मालुसरे मार्ग, काळाचौकी, मुंबई-३३यांच्या संदर्भात एकूण ४ मुद्यांमध्ये माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२६.५.२०१० रोजी त्यांच्या माहितीच्या संदर्भात पत्र

पाठविलेले दिसून येते. त्यामध्ये तक्रारीची प्रत अधिनियमाच्या कलम ८(१)(छ) अन्वये देता येणार नाही असे कळवून पाहणी अहवालाची प्रत प्रतिपृष्ठ रु.२/- भरणा केल्यावर उपलब्ध करुन देण्यात येईल तसेच झोपडी क्र.१ असलेली कोणतीही झोपडी आढळली नसल्यामुळे ४ मुद्यांमध्ये माहिती उपलब्ध करुन देत येणार नाही असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.२९.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांच्याविरुध्द काही तक्रार झालेली असेल तर त्या तक्रारीची प्रत त्यांना उपलबध करुन देणे बंधनकारक आहे. तसेच झोपडी क्र.१च्या संदर्भात माहिती देण्यास टाळाटाळच करण्यात आलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की जल विभागाकडे आपापसातील तक्रारी या येतच असतात. त्या तक्रारींच्या संदर्भात आपापसातील वैमनस्य वाढू नये याकरीता तक्रारदारांची नावे न सांगता चौकशी करण्यात येते व तसे तक्रारदाराला कळविण्यात येते. झोपडी क्र.१असा क्रमांक नाही. परंतु अपिलकर्ता यांनी श्री.रावल म्हणून नाव दिलेले आहे त्या संदर्भात २९ क्रमांक दिलेला आहे, परंतु त्यामध्ये रमेश रावल राहतात किंवा नाही याबद्दलची माहिती नाही. त्यांच्या कार्यालयात असलेल्या मालमत्तेच्या कागदपत्रांप्रमाणे २९ नंबरच्या घराच्या छायांकित प्रती उपलब्ध आहेत मात्र नंबर क्र.१ अशी झोपडी दिसून येत नाही. तक्रारीच्या संदर्भात केलेल्या पहाणी अहवालाची प्रत अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देता येईल परंतु अपिलकर्ता यांनी प्रतिपृष्ठ रु.२/- चा भरणा केलेला नसल्यामुळे अद्यापपर्यंत ती त्यांना देण्यात आलेली नाही. त्यावर पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, तक्रारीची प्रत उपलब्ध करुन द्यावी किंवा नाही याबद्दल न्यू-५२ चाळ कमिटी यांना विचारणा करण्यात आली होती परंतु त्यांनी तक्रारीची प्रत उपलब्ध करुन देऊ नये असे कळविले असल्यामुळे त्यांना ती उपलब्ध करुन दिलेली नाही. असे असले तरी अपिलकर्ता यांना तक्रारीची प्रत उपलब्ध करुन देणे हे नैसर्गिक न्यायाच्या तत्वाप्रमाणे आवश्यक असल्यामुळे त्यांना तक्रारीची प्रत उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. यास्तव अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१)अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांना त्यांनी मागितलेल्या तक्रारीच्या प्रतींच्या संदर्भात**

तक्रारींच्या प्रती विनामुल्य उपलब्ध करुन द्याव्यात व पाहणी अहवालाच्या प्रती प्रतिपृष्ठ रु.२/-चा खर्चाचा भरणा केल्यानंतर उपलब्ध करुन देण्यात याव्या. झोपडी क्र.१ च्या क्रमांकाचा वाद असल्यामुळे प्रत्यक्ष जागेवर जाऊन त्या संदर्भात असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती/माहिती अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात यावी.

२)अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई (विलास पाटील)
दिनांक ४.१.२०११ राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/४९८९८/अपील क्रमांक ७०६३/२०१०**

**श्री. प्रवीण वीरसी सोळंकी,**
**रुम नं.८, तळमजला, बाहुबली व्यायामशाळेच्या पाठीमागे,**
**न्यु बावन चाळ, वीर तानाजी मालुसरे मार्ग,**
**काळाचौकी, मुंबई-३३. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(विशेष)(परि.१),**
**ई विभाग कार्यालय, म.न.पा.,**
**१लाा मजला, १० शेख हाफीजुद्दीन मार्ग,**
**भायखळा(प.), मुंबई-४०००0८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(इ. व का.),**
**ई विभाग कार्यालय, म.न.पा.,**
**३रा मजला, १० शेक्ष हाफीजुद्दीन मार्ग,**
**भायखळा(प.), मुंबई-४०००0८. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २४.९.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ४.१.२०११**
**जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी, अपिलकर्ता उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.३१.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी,ई विभाग यांचे कार्यालय, १० शेख हफिझुद्दिन मार्ग, भायखळा, मुंबई-८ यांच्याकडे त्यांनी दि.२०.४.०९ व १५.२.२०१० रोजी केलेल्या तक्रारीच्या संदर्भात झालेल्या कार्यवाहीची माहिती एकूण ७ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.१०.७.२०१० रोजी एकूण ७ मुद्यांमध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.२७.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२०.८.२०१० रोजी देण्यात आला असून सहाय्यक अभियंता(इ. व का.),ई वार्ड यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन तपासणी करुन मुंबई महानगरपालिका अधिनियम १९८८प्रमाणे कारवाई करुन अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. त्या संदर्भात अपिलकर्ता यांना दि.२८.१२.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी एकूण ६ मुद्यांवर संपूर्ण माहिती उपलब्ध करुन

दिलेली दिसून येते. परंतु तत्पूर्वीच अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले होते.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांच्या तक्रारीच्या संदर्भात झालेल्या चौकशीची माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे परंतु मुद्दा क्र.५च्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. परंतु अपिलकर्ता यांनी न्यु-५२ चाळ,वीर तानाजी मालुसरे मार्ग, काळाचौकी, मुंबई-३३ ही एमआरटीपी खाली विशेष सुधारणा कार्याकरीता घेतलेली आहे काय असे विचारलेले आहे त्याबद्दल जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की हा विषय त्यांच्या कार्यालयाच्या अधिकारात येत नाही. असे असले तरी त्याप्रमाणे अपिलकर्ता यांना कळविणे संयुक्तिक राहील. त्या संदर्भात तसेच अपिल क्र.७०६२/०२/२०१० मध्ये अपिलकर्ता यांना आत्तापर्यंत दि.१६.४.२०१० व २७.४.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलकर्ता व इतर रहिवासी यांच्यामध्ये नेहमीच आपापसात तक्रारी सुरु असतात त्यामुळे तक्रारीची प्रत दिली जात नाही असे पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. असे असले तरी अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून अपिलकर्ता यांच्या दि.३१.५.२०१०च्या अर्जातील मुद्दा क्र.५ च्या संदर्भात योग्य ती माहिती उपलब्ध करुन द्यावी.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ४.१.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/४९८९२/अपील क्रमांक ७०६१/२०१०**

**श्री. हर्षद रणझोड पटेल,**
**१०/१०३४, न्यू एम.एच.बी. कॉलनी,**
**गोराई रोड, बोरीवली(प.),मुंबई-९२. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**आर/दक्षिण विभाग कार्यालय, महानगरपालिका इमारत,**
**महात्मा गांधी छेद रस्ता क्र.२, कांदिवली(प.),मुंबई-४०००६७.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी(शाळा),**
**आर/दक्षिण विभाग कार्यालय, महानगरपालिका इमारत,**
**महात्मा गांधी छेद रस्ता क्र.२, कांदिवली(प.),मुंबई-४०००६७. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २१.९.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ४.१.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.१९.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी,शिक्षण अधिकारी यांचे कार्यालय यांच्याकडे जून-२००० ते जून-२०१० या कालावधीतील ऑक्सफर्ड पब्लिक स्कूल या शाळेतील शिपाई पगार पत्रकाची माहिती व पगार पत्रकाची झेरॉक्स प्रत साक्षांकित करुन मिळणेबाबत तसेच शिपाई वर्गाची सर्व्हीस बुकची झेरॉक्स प्रत साक्षांकित करुन मिळणेबाबत अर्ज केला होता. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने २८.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षण अधिकारी (अनुदानित)यांनी सदरचा अर्ज प्रशासकीय अधिकारी (शाळा), आर/दक्षिण विभाग यांच्याकडे वर्ग करण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि.२८.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भात दि.१६.८.२०१० रोजी निर्णय दिलेला असून त्यात श्रीमती सुषमा गोरे जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी(शाळा), आर/दक्षिण विभाग यांनी सदर शाळा

विनाअनुदानित असल्यामुळे दि.१२.७.२०१० अन्वये अर्जदारास पत्र पाठविले परंतु ते अर्जदाराने घेण्याचे नाकारले. सदर पत्रामध्ये मुख्याध्यापक ऑक्सफर्ड पब्लिक शाळा यांस परस्पर अर्जदारास माहिती देण्यास कळविण्यात आले आहे. त्यावर विनाअनुदानित शाळा जरी महापालिकेच्या थेट नियंत्रणाखाली नसल्या तरी प्रशासकीय बाबी व त्या नियमानुसार काम करीत आहेत हे पाहणे महापालिका शिक्षण विभागाच्या कामाचा भाग आहे व कर्मचा-यांना देण्यात येणारे वेतन हे सुध्दाप्रशासकीय बाबीत अंतर्भूत होते व त्या कारणास्तव अपिलकर्ता यांना मागितलेली माहिती ऑक्सफर्ड पब्लीक स्कुल यांच्याकडून मागवून नि:शुल्क देण्यात यावी असे आदेश देण्यात आलेले दिसून येतात. परंतु त्यानंतरही माहिती मिळाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

आज अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगीतले की, ते ऑक्सफर्ड पब्लीक स्कुलमध्ये शिपाई या पदावर काम करीत आहेत व त्यांनी त्यांच्या वेतनाच्या संदर्भात तसेच सेवापुस्तकाच्या संदर्भात माहिती मागीतली होती व ती त्यांना उपलब्ध झ ालेली नाही. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी आज आयोगापुढे उपस्थित नाहीत. आयोगाच्या कार्यालयातून दि.१०.१२.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी उपस्थित रहाण्याबाबत नोटीस काढण्यात आली होती परंतु तरीही जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित झालेले नाहीत हा आयोगाचा अवमान आहे व त्यामुळे श्रीमती सुषमा गोरे, जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी यांच्याविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतु त्यापूर्वी त्यांचे म्हणणे ऐकून घेणेसुध्दा बंधनकारक आहे व त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी श्रीमती सुषमा गोरे, प्रशासकीय अधिकारी, आर/दक्षिण विभाग यांनी हा निर्णय मिळाल्यापासून अपिलकर्ता यांच्या दि.१९.६.२०१०च्या अर्जात मागितलेली माहिती ऑक्सफर्ड पब्लीक स्कुल या संस्थेकडून उपलब्ध करुन घेऊन अपिलकर्ता यांना पुरवावी.**

**२) श्रीमती सुषमा गोरे, जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी(शाळा), आर/दक्षिण विभाग यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तसेच माहिती आयोगापुढेही त्या सुनावणीसाठी हजर राहिल्या नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये**

रु.५,०००/- ची शास्ती का लादण्यात येऊ नये याबद्दल त्यांचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत आयोगापुढे समक्ष करावा अन्यथा त्यांच्याविरुध्द शास्ती लादण्यात येईल याची त्यांनी नोंद घ्यावी.
३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई (विलास पाटील)
दिनांक ४.१.२०११ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/४९९१२/अपील क्रमांक ७०६४/२०१०**

**श्री. सुदाम सवाईराम चव्हाण,**
**विभाग निरिक्षक(शाळा),एम/पूर्व विभाग,**
**बृहन्मुंबई मनपा इमारत, ३रा माळा, नटराज थिएटरच्या बाजूला,**
**चेंबूर, मुंबई. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी,**
**शिक्षणाधिकारी यांचे कार्यालय,बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**लखमसी नप्पू रोड, हिंदू कॉलनी, दादर, मुंबई-४०००१४.**

**जन माहिती अधिकारी,**
**शिक्षणाधिकारी यांचे कार्यालय,बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**लखमसी नप्पू रोड, हिंदू कॉलनी, दादर, मुंबई-४०००१४. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २३.९.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ५.१.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित**

अपिलकर्ता यांनी दि.१९.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी,शिक्षण अधिकारी यांचे कार्यालय यांच्याकडे मुख्याध्यापक या संवर्गाची सन १९९९ मधील विजा-अ,भज या प्रवर्गात ६१ कर्मचारी परिगणन तक्त्याप्रमाणे आहेत त्याबाबत जात व प्रवर्ग निहाय माहिती इत्यादी २ मुद्यांमध्ये माहिती मागीतलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली नाही म्हणून त्यांनी दि.२०.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भात निर्णय झालेला नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, आत्तापर्यंत त्यांना काहीही माहिती उपलब्ध झालेली नाही. परंतु जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, अपिलकर्ता यांना आत्तापर्यंत सर्व माहिती देण्यात आलेली आहे. तसेच मानीव पदोन्नती देण्याबाबतच्या प्रस्तावावर २३.१२.२०१० रोजी मंजूरी प्राप्त झाली असून

मंजुरीनुसार मानीव पदोन्नती देण्याबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येत आहे असेही त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्यावर अपिलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झाली पण ती अपूर्ण उपलब्ध झाली आहे असे सांगितले. प्रथम अपीलाच्या निर्णयात दि.२८.६.२०१० रोजी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे नमूद करण्यात आले आहे यावर अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे याबद्दलचा पुरावा आयोगाकडे का सादर केला नाही अशी जन माहिती अधिकारी यांना विचारणा केली असता त्यांनी असे सांगितले की माहिती उपलब्ध करुन दिली परंतु त्यांच्याकडून पोच घेण्याचे राहिले आहे. त्यानंतर अपिलकर्ता यांनी सुध्दा वर नमूद केल्याप्रमाणे माहिती मिळाली परंतु अपूर्ण मिळाली असे सांगितले. मात्र अपूर्ण काय मिळाली याबद्दल त्यांनी कोणतेही विश्लेषण केलेले नाही. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** — **(विलास पाटील)**
**दिनांक ५.१.२०११** — **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०२६२/अपील क्रमांक ७०६८/२०१०**

**श्री. भालचंद्र केशव सिंगम,**
**चंदन मेन्शन,३रा माळा, रुम नं.५८,**
**गोपालकृष्ण गोखले मार्ग(नॉर्थ),**
**दादर(प.), मुंबई-४०००२८. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : १३.९.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ५.१.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२.८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,एस.आर.ए. यांच्याकडे घरंदाज बिल्डर्स यांनी बांधलेल्या ९६-ए,९६-बी आणि ९७ गणसिध्दीविनायक को.औप.हौ.सो.च्या संदर्भात ओ.सी.च्या संदर्भात एकूण ४ मुद्यांमध्ये माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२७.८.२०१० रोजी मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.१३.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भात दि.४.१०.२०१० रोजी खर्चाचा भरणा केल्यावर माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असा निर्णय दिलेला दिसून येतो. अपिलकर्ता यांनी दि.२३.११.२०१० रोजी खर्चाचा भरणा केलेला दिसून येतो व त्यानंतर माहिती उपलब्ध झाल्यावरसुध्दा त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, जी माहिती मागीतलेली आहे त्या संदर्भात not seen in the available records असे म्हटलेले आहे व त्यामुळे ओसी दिलेली आहे किंवा नाही याबाबत खुलासा होत नाही. तसेच मुद्दा क्र.४च्या संदर्भात त्यांनी ओसी ६व्या माळयापासून वर मागीतलेली होती परंतु माहिती फक्त १ ते ५ पर्यंत दिलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की नस्तीमध्ये ती माहिती उपलब्ध नाही असे त्यांना कळविलेले आहे. तसेच ६ मजल्यावरील मजल्यांच्या संदर्भात ओसी दिलेली आहे किंवा नाही ते दिसून येत नाही म्हणून तसे त्यांना कळविलेले आहे. परंतु दिसून येत नाही याचा अर्थ ओसी दिलेली नाही असा काढणे आवश्यक आहे असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावर अपिलकर्ता यांनी पुन्हा असे सांगितले की, दिसून येत नाही याचा अर्थ ती दिलेली आहे किंवा नाही असा काढता येणार नाही व त्यामुळे तसे स्पष्टपणे कळविणे आवश्यक होते. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी तसे कळविण्यात येईल असे आयोगापुढे सांगितले व यामुळे सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांना त्यांनी मागितलेल्या मुद्यांच्या संदर्भात अधिक स्पष्टीकरण कळविण्यात यावे.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** — **(विलास पाटील)**
**दिनांक ५.१.२०११** — **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/४९८९७/अपील क्रमांक ७०६७/२०१०**

**श्री. मो.इरफान शरीफ शेख,**
**द्वारा नदीम शेख, ६८१ हेन्स रोड, मुनशी कंपाऊंड,**
**फ्रान्को इंडिया समोर, बी.जे. मार्ग, सात रस्ता,**
**मुंबई-४०००११. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी ,**
**ई वार्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, ३रा माळा,**
**शेख हाफिजुद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई-८.**

**जन माहिती अधिकारी,**
**ई वार्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, ३रा माळा,**
**शेख हाफिजुद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई-८. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २४.९.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ५.१.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी ई वार्ड,बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे प्लॉट नं.११९,सीटीएस क्र.५१७२ हा हिरवा पट्टा आहे किंवा नाही याबद्दलची माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.८.७.२०१० रोजी माहितीच्या संदर्भात खर्चाचा भरणा करावा म्हणून पत्र दिलेले दिसून यते. परंतु अपिलकर्ता यांनी ३०.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२०.१०.२०१० रोजी देण्यात आलेला आहे. त्यानंतर अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहिती मिळाली नाही म्हणून द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी सुनावणीस गैरहजर आहेत. सदरच्या अपीलाच्या सुनावणीची नोटीस आयोगाच्या कार्यालयातून दि.१०.१२.२०१०

रोजी काढण्यात आलेली आहे. तरीसुध्दा जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्याची दखल घेतली नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द प्रशासकीय कारवाई करणे आवश्यक आहे.

अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना संपूर्ण माहिती मिळालेली आहे व त्याकरीता त्यांनी स्वत: सर्व कागदपत्र आयोगास दाखविलेली आहेत. त्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

**१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**२) जन माहिती अधिकारी हे आयोगापुढे सुनावणीस हजर राहिले नसल्यामुळे, त्यांनी आयोगाचा अवमान केला असल्यामुळे त्यांच्याविरुध्द शास्ती का लादण्यात येऊ नये याबद्दलचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत आयोगापुढे समक्ष करावा अन्यथा त्यांच्याविरुध्द शास्ती लादण्यात येईल याची त्यांनी नोंद घ्यावी.**

**मुंबई** — **(विलास पाटील)**
**दिनांक ५.१.२०११** — **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/४९८९५/अपील क्रमांक ७०६६/२०१०**

**श्री. सुदिन रमेश प्रधान,**
**३४/१२३६, सुभाष नगर,**
**चेंबूर, मुंबई-४०००७१. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी ,**
**वरिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ, म्हाडा वास्तुशास्त्रज्ञ विभाग,**
**गृहनिर्माण भवन, म्हाडा, वांद्रा, मुंबई-५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**वरिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ, म्हाडा वास्तुशास्त्रज्ञ विभाग,**
**गृहनिर्माण भवन, म्हाडा, वांद्रा, मुंबई-५१. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २३.९.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ५.१.२०११**
**जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.११.२.२०१० रोजी जन माहिती अधिकारी,वरिष्ठ वास्तु शास्त्रज्ञ, उपाध्यक्ष, म्हाडा यांच्याकडे सुभाषनगर येथे आर.एन.ए. बिल्डर्सने केलेल्या बांधकामाच्या संदर्भात ३ मुद्यांमध्ये माहिती मागीतलेली दिसून येते. माहितीचा कालावधी २००७-२०१० पर्यंतचा आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि.२९.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु प्रथम अपीलाचा विषय हा पुन्हा कारवाईच्या संदर्भात दिसून येतो त्यामुळे या प्रथम अपीलाच्या संदर्भातसुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता सुनावणीस गैरहजर आहेत व त्यांनी कोणत्याही प्रकारचे निवेदन किंवा त्यांचे म्हणणे आयोगाकडे दिलेले नाही. राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपीलामध्ये त्यांनी माहिती मागण्यापेक्षा तक्रारीच्या स्वरुपात व वेगळयाच प्रकारची माहिती मागीतलेली दिसून येते. त्यामुळे त्यांच्या द्वितीय अपीलामध्ये मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात विचार करता येणार

नाही. प्रथम अपीलाच्या मेमोमध्येसुध्दा त्यांनी वेगळाच मुद्दा उपस्थित केला आहे व तो कारवाईच्या संदर्भात आहे व त्या अपिलाच्या संदर्भातसुध्दा विचार करता येणार नाही.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी मागीतलेली माहिती ही काढून ठेवण्यात आली होती परंतु ती माहिती ते व्यक्तीशः घेऊन जाणार असल्यामुळे माहिती घेऊन जाण्यास ते कार्यालयात आलेलेच नाहीत. प्रथम अपील दाखल केल्यानंतर त्यांना दि.१२.८.२०१० रोजी बोलावले व त्यावेळेस त्यांनी अपील नस्तीचे अवलोकन व निरिक्षण करुन मागणी केलेल्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती विनामुल्य पुरविण्यात आल्या आहेत. आत्तापर्यंत त्यांना वेळोवेळी सर्व माहिती शुल्क घेऊनसुध्दा पुरविण्यात आलेली आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये पुरविण्यात आलेल्या माहितीबाबत अर्जदार समाधानी असल्याचे त्यांनी सांगितले असा निष्कर्ष काढण्यात आला असे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना वेळोवेळी त्यांच्या अर्जाच्या संदर्भात खर्चाचा भरणा करावा याबद्दलच्या त्यांच्या अर्जाच्या छायांकित प्रती दाखल केलेल्या आहेत व अपिलकर्ता आज हजर नसल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध झाली आहे असे गृहीत धरुन सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** — **(विलास पाटील)**
**दिनांक ५.१.२०११** — **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/४९८९४/अपील क्रमांक ७०६५/२०१०**

**श्री. सूर्यकांत भिमराव राणे,**
**ए/१२, श्री चैतन्य को.ऑप.हौ.सो.,**
**राम-मंदिर रोड, बाभई स्मशानभूमीजवळ,**
**बोरीवली(प.), मुंबई-४०००९१. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रमुख कर्मचारी अधिकारी(आस्था.),**
**प्रमुख कर्मचारी अधिकारी यांचे कार्यालय,**
**सामान्य प्रशासन विभाग, २रा मजला, जुनी इमारत,**
**बृहन्मुंबई मुख्यालय, महापालिका मार्ग,**
**फोर्ट, मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहप्रमुख कर्मचारी अधिकारी(आस्था.),**
**प्रमुख कर्मचारी अधिकारी यांचे कार्यालय,**
**सामान्य प्रशासन विभाग, २रा मजला, जुनी इमारत,**
**बृहन्मुंबई मुख्यालय, महापालिका मार्ग,**
**फोर्ट, मुंबई-४००००१. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २३.९.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ५.१.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२७.४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी,कर निर्धारक यांच्याकडे सन २००६ ते २००९ मध्ये झालेल्या विभागीय परीक्षेमधील उत्तरपत्रिका पहाणी करण्याकरीता उपलब्ध करुन द्याव्यात अशी माहिती साध्या पोस्टाने मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.१२.५.२०१० रोजी उत्तरपत्रकांच्या छायांकित प्रती देण्याची मागणी प्रचलित धोरणानुसार मान्य करता येत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.९.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपील, अपिलकर्ता सुनावणीस हजर नाहीत म्हणून निकाली काढण्यात

आलेले दिसून येते. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की सन २००८च्या परीक्षेत ते नापास झाले होते व २००९च्या परीक्षेमध्ये त्यांना ५२ गुण मिळालेले आहेत. तरी त्या संदर्भात काय चुक  झाली ते तपासून पहाणे आवश्यक होते म्हणून त्यांनी उत्तरपत्रिकांची माहिती मागीतली होती. परंतु त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी  हे आज सुनावणीस आयोगापुढे हजर नाहीत. आयोगाच्या कार्यालयातून दि.१०.१२.२०१० रोजी सुनावणीची नोटीस काढण्यात आली होती. त्यामुळे जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाचा अवमान केलेला आहे व ते शास्तीस पात्र आहेत. अपिलकर्ता यांच्या अर्जाच्या अनुषंगाने उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती देण्याची मागणी प्रचलित धोरणानुसार मान्य करता येत नाही असे जे उत्तर दिलेले आहे ते मोघम व दिशाभूल करणारे उत्तर आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी किंवा नाही याबाबतची छाननी अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणेच केली पाहिजे व त्याप्रमाणे अधिनियमाच्या कलम ८ मध्ये माहिती प्रकट करण्यास अपवाद करण्यात आलेला आहे व त्या अपवादांमध्ये प्रत्येक माहितीचा अर्ज तपासून तसे अर्जदारास कळविणे आवश्यक असते. परंतु त्याप्रमाणे कळविलेले नाही. तसेच कोणते प्रचलित धोरण आहे तेही कळविलेले नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपिलकर्ता हे गैरहजर आहेत या कारणास्तव त्यांचे म्हणणे समजू शकलेले नाही असे विवेचन करुन अपिल निकाली काढण्यात येत आहे असा निर्णय दिला. अपिलकर्ता यांनी माहितीचा अर्ज व प्रथम अपील मेमोमध्ये मागितलेली माहिती अतिशय स्वच्छ व मुद्देसूद विचारलेली आहे त्यात कळून न येण्यासारखे काहीही नाही. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांना अपीलकर्ता यांचे म्हणणे समजू न शकल्याने अशाप्रकारचे निरर्थक आदेश देणे म्हणजे त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५चे आकलन झालेले नाही असे दिसून येते. अधिनियमाच्या कलम १९(५)प्रमाणे अपील सुनावणीच्या वेळेस माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही याबद्दलची जबाबदारी ही जन माहिती अधिकारी यांची आहे असे स्पष्ट असतांना जन माहिती अधिकारी यांना काहीही न विचारता अपील निकाली काढणे म्हणजे माहिती उपलब्ध करुन देण्यास प्रथम अपीलीय अधिकारी यांनी टाळाटाळ केली आहे असा निष्कर्ष निघू शकतो. असे निरर्थक आदेश पारित करणेबाबत त्यांच्याविरुध्द प्रशासकीय कारवाई करणे आवश्यक आहे. परंतु अपिलकर्ता यांनी पुढे असे सांगितले की त्यांनी पुन्हा दि.३०.७.२०१० रोजी माहितीचा अर्ज याच विषयाच्या संदर्भात केलेला आहे व

त्यात काही माहिती मिळालेली आहे. परंतु त्यामुळे त्यांचे समाधान न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. त्यामुळे त्या द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्यावेळेसच या विषयाच्या संदर्भात संपूर्ण निर्णय देणे योग्य होईल. त्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे**
**२) जन माहिती अधिकारी तथा सहप्रमुख कर्मचारी अधिकारी(आस्थापना) हे आयोगापुढे आज सुनावणीस हजर नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द शास्ती का लादण्यात येऊ नये याबद्दलचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत आयोगाकडे करावा अन्यथा त्यांच्याविरुध्द शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी.**
**३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.**

**मुंबई** — **(विलास पाटील)**
**दिनांक ५.१.२०११** — **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/४९९०२/अपील क्रमांक ६१९१/२०१०**

**श्री. रमेश झाडे,**
**राष्ट्रीय शैक्षणिक गुणवंता मंच,**
**२/७०४, श्री शाश्वत कॉंप्लेक्स प्लेझंट पार्क,**
**मिरा भाईंदर रोड, मिरा रोड, जि.ठाणे. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी,**
**विभागीय शिक्षण सहसंचालक कार्यालय,**
**उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड,जि.नांदेड.**

**जन माहिती अधिकारी ,**
**विभागीय शिक्षण सहसंचालक कार्यालय,**
**उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड,**
**जि.नांदेड. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २२.९.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ७.१.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२६.४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, विभागीय शिक्षण सहसंचालक कार्यालय(उच्चशिक्षण), नांदेड विभाग यांच्याकडे दि.१४ जून,२००६ नंतर झालेल्या एम्.फील. व पीएचडी उमेदवारांच्या अध्यापकपदी झालेल्या नियुक्त्यांबबत, माहिती १४ जून,२००६ ते आजपावेतो अशी मागीतलेली आहे.

१)दि.६.७.२००७ नंतर एम्.फील. व पीएचडी उमेदवारांची अध्यापकपदी नियुक्ती झाल्यामुळे(झाली असल्यास) आपण वेतनापोटी किती रक्कम निर्गमित केली, माहिती उमेदवारांचे नाव, महाविद्यालय, नियुक्तीचा दिनांक व दिलेली रक्कम या स्वरुपात द्यावी.

२)दि.२५ जानेवारी,२०१० च्या शासन पत्रानंतर एम्.फील. व पीएचडी धारकांच्या(१४ जून,२००६ नंतर नियुक्त झालेले)वेतनापोटी किती रक्कम निर्गमित करण्यात आली, माहिती उमेदवाराचे नाव, महाविद्यालय,नियुक्तीचा दिनांक व मासिक वेतन या स्वरुपात द्यावी.

माहिती शिघ्र टपालाने घेणार असे नमूद केले आहे.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.२६.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय

दि.३.८.२०१० रोजी देण्यात आला असून सुनावणीच्या दिवशी अपिलार्थी अनुपस्थित होते तर माहिती अधिकारी उपस्थित होते. माहिती अधिका-यांनी अपिलार्थींचा माहितीच्या अधिकाराखालील अर्ज कार्यालयास प्राप्त झाला नसल्याचे सांगितले. अपिलार्थींनी याबाबत काही स्मरणपत्र पाठविल्याचे दिसून येत नाही व त्यमुळे अपिलार्थींनी पुन्हा रितसर माहिती मागवावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. प्रभारी विभागीय शिक्षण संचालक(उच्च शिक्षण) तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खुलासा पाठविलेला आहे व सोबत कागदपत्र पाठवून प्रकृती अस्वास्थ्यामुळे समक्ष न येता या कार्यालयाचे प्रतिनिधी श्री.दिपक देशपांडे,उच्चश्रेणी लघुलेखक हे सुनावणीस उपस्थित रहाणार आहेत असे कळविलेले आहे. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी कलम १९(५) प्रमाणे सुनावणीस हजर रहाणे आवश्यक होते परंतु शिक्षण सहसंचालक(उच्च शिक्षण)या कार्यालयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदींची माहिती दिसून येत नाही. अधिनियमाच्या कलम १९(५) अन्वये माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही ते सिध्द करण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी यांची आहे. याबाबतची नोंद प्रभारी विभागीय शिक्षण सह संचालक यांनी घेणे आवश्यक आहे.

त्यावर अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्या कार्यालयामध्ये माहितीचा अर्ज प्राप्त झाल्याचा पुरावा त्यांच्याकडे आहे परंतु त्यांना तो दाखवता आलेला नाही. त्यामुळे अपिलकर्ता अर्जदार यांनी प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे पुन्हा जन माहिती अधिकारी,विभागीय शिक्षण सह संचालक कार्यालय(उच्च शिक्षण) नांदेड विभाग, नांदेड यांच्याकडे अर्ज सादर करणे संयुक्तिक राहील. त्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१) अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ७.१.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**
**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/४९९०३/अपील क्रमांक ६१९२/२०१०**

**श्री. रमेश झाडे,**
**राष्ट्रीय शैक्षणिक गुणवंता मंच,**
**२/७०४, श्री शाश्वत कॉंप्लेक्स प्लेझंट पार्क,**
**मिरा भाईंदर रोड, मिरा रोड, जि.ठाणे. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी,**
**सहसंचालक कार्यालय,**
**उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती.**

**जन माहिती अधिकारी ,**
**सहसंचालक कार्यालय,**
**उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २२.९.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ७.१.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२६.४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, विभागीय शिक्षण सहसंचालक कार्यालय(उच्चशिक्षण), अमरावती विभाग यांच्याकडे दि.१४ जून,२००६ नंतर झालेल्या एमफील व पीएचडी उमेदवारांच्या अध्यापकपदी झालेल्या नियुक्त्यांबबत, माहिती १४ जून,२००६ ते आजपावेतो अशी मागीतलेली आहे.

१)दि.६.७.२००७ नंतर एमफील व पीएचडी उमेदवारांची अध्यापकपदी नियुक्ती झाल्यामुळे(झाली असल्यास) आपण वेतनापोटी किती रक्कम निर्गमित केली, माहिती उमेदवारांचे नाव, महाविद्यालय, नियुक्तीचा दिनांक व दिलेली रक्कम या स्वरुपात द्यावी.

२)दि.२५ जानेवारी,२०१० च्या शासन पत्रानंतर एमफील व पीएचडी धारकांच्या(१४ जून,२००६ नंतर नियुक्त झालेले)वेतनापोटी किती रक्कम निर्गमित करण्यात आली, माहिती उमेदवाराचे नाव, महाविद्यालय,नियुक्तीचा दिनांक व मासिक वेतन या स्वरुपात द्यावी.

माहिती शीघ्र टपालाने घेणार असे नमूद केले आहे.

अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दि.२६.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, सदरची माहिती ही सहसंचालक(उच्च शिक्षण)यांच्याच कार्यालयात उपलब्ध असते व अनुदान त्यांच्याकडूनच दिले जाते. त्यावर जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरची माहिती ही प्रत्येक महाविद्यालयात उपलब्ध असते. शासनाकाडून अनुदान पाठविण्यात येते व ते पाठविण्यात आल्यानंतर महाविद्यालयाच्या अधिपत्याखालील प्रत्येक शिक्षकाच्या वेतनाची यादी पाठविण्यात येते. परंतु त्यात एमफील व पीएचडी अशाप्रकारची नोंद केलेली नसते त्यामुळे कार्यालयात अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध होऊ शकत नाही. अपिलकर्ता यांचा अर्ज आल्यानंतर दि.५.५.२०१० रोजी या कार्यालयाने उपकुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ यांच्याकडून माहिती मागविलेली आहे व त्या माहितीच्या आधारे वेतनाची माहिती तयार करुन आपणास पुरविण्यात येईल असे कळविलेले आहे. त्याकरीता टिप्पणीची प्रतसुध्दा त्यांनी आयोगापुढे दाखल केलेली आहे. त्यानंतर दि.२४.१२.२०१० रोजी एमफील,पीएचडी धारक अधिव्याख्यात्यांना देण्यात आलेल्या मान्यतेबाबतची माहिती आपणास पाठविण्यात येत आहे असे उप कुलसचिव संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ यांनी कळविले परंतु विद्यापीठाकडून सदरची माहिती अपूर्ण स्थितीत प्राप्त झालेली नसल्यामुळे अपिलकर्ता यांना विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात दि.५.१.११ रोजी अपिलकर्ता यांना त्या माहितीच्या आधारे वेतनाची माहिती तयार करण्याकरीता महाविद्यालयाने एमफील व पीचडी झालेल्या नियुक्ती दिलेल्या अधिव्याख्यात्यांचे रुजू दिनांक मागविलेले आहेत व प्राप्त होताच आपणास पुरविण्यात येतील असे कळविलेले दिसून येते. असे असले तरी या संदर्भात आज अमरावती, कोल्हापूर,नागपूर,पुणे,नांदेड या सर्व विभागातील माहिती अधिकारी व विभागीय सहसंचालक हजर असल्यामुळे व त्या सर्वांनी ही संपूर्ण माहिती तपशिलवार त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसते असे

सांगितल्यामुळे सदरची माहिती विद्यापीठाकडून घेऊन हा निर्णय मिळाल्यापासून २ महिन्याच्या आत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून २ महिन्याच्या आत अपिलकर्ता यांना मागितलेली संपूर्ण माहिती महाविद्यालयाकडून उपलब्ध करुन घेऊन विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ७.१.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/४९९०२/अपील क्रमांक ६१९५/२०१०**

**श्री. रमेश झाडे,**
**राष्ट्रीय शैक्षणिक गुणवंता मंच,**
**२/७०४, श्री शाश्वत कॉंप्लेक्स प्लेझंट पार्क,**
**मिरा भाईंदर रोड, मिरा रोड, जि.ठाणे. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी,**
**विभागीय शिक्षण सहसंचालक कार्यालय,**
**उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे,**
**जि.पुणे.**

**जन माहिती अधिकारी ,**
**विभागीय शिक्षण सहसंचालक कार्यालय,**
**उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे,**
**जि.पुणे. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २२.८.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ७.१.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२६.४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, विभागीय शिक्षण सहसंचालक कार्यालय(उच्चशिक्षण), पुणे विभाग यांच्याकडे दि.१४ जून,२००६ नंतर झालेल्या एम्.फील. व पीएचडी उमेदवारांच्या अध्यापकपदी झालेल्या नियुक्त्यांबबत, माहिती १४ जून,२००६ ते आजपावेतो अशी मागीतलेली आहे.

१)दि.६.७.२००७ नंतर एम्.फील. व पीएचडी उमेदवारांची अध्यापकपदी नियुक्ती झाल्यामुळे(झाली असल्यास) आपण वेतनापोटी किती रक्कम निर्गमित केली, माहिती उमेदवारांचे नाव, महाविद्यालय, नियुक्तीचा दिनांक व दिलेली रक्कम या स्वरुपात द्यावी.

२)दि.२५ जानेवारी,२०१० च्या शासन पत्रानंतर एम्.फील. व पीएचडी धारकांच्या(१४ जून,२००६ नंतर नियुक्त झालेले)वेतनापोटी किती रक्कम निर्गमित

करण्यात आली, माहिती उमेदवाराचे नाव, महाविद्यालय,नियुक्तीचा दिनांक व मासिक वेतन या स्वरुपात द्यावी.

माहिती शीघ्र टपालाने घेणार असे नमूद केले आहे.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.२६.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरसुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना सदरची माहिती मुंबई कार्यालयाने उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे विभागीय कार्यालयानेसुध्दा त्यांच्याकडून शासनाचे अनुदान महाविद्यालयांना पाठविण्यात येत असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन कळविले पाहिजे होते परंतु अद्यापपर्यंत त्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरची माहिती महाविद्यालयांमध्ये उपलब्ध असते. महाविद्यालयाचे प्राचार्य हे जन माहिती अधिकारी आहेत तसेच प्रत्येक अध्यापकांच्या संदर्भात त्यांच्या सेवा पुस्तकात एम्.फील. किंवा पीएचडी अशी नोंद केलेली नसते त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता महाविद्यालयांना कळविण्यात आले होते. प्रथम अपीलाच्या सुनावणीस अपिलकर्ता हजर नसल्यामुळे त्यांना कोणत्या प्रकारची व कशी माहिती अपेक्षित आहे याबद्दलचा कोणताही निर्णय देता आला नाही. किंवा महाविद्यलयानी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही याबद्दलसुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी यांना काही कळण्यास मार्ग नाही. आज त्यांनी आयोगापुढे सुध्दा महाविद्यालयांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही याबाबत सांगितले नाही. तसेच अपिलकर्ता हे वेगवेगळया नावांनी व पदांनी अर्ज करतात व त्यामुळे त्या पत्त्यावर पत्र पाठविले तर ते पत्र मिळाले नाही असे सांगत असतात त्यामुळे अपिलकर्ता यांनी एक पत्ता व एक पद दिल्यास संयुक्तिक होईल असे आयोगापुढे सांगितले. तसेच पुन्हा महाविद्यालयाचे प्राचार्य हे जन माहिती अधिकारी आहेत त्यामुळे अपिलकर्ता यांनी त्या महाविद्यालयाकडे माहिती मागणे आवश्यक होते असेही त्यांनी आयोगापुढे सांगितले. असे असले तरी मुंबई कार्यालयाने माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे विभागीय कार्यालयानेसुध्दा महाविद्यालयाकडून माहिती प्राप्त करुन घेऊन माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून २ महिन्याच्या आत जन माहिती अधिकारी,सहसंचालक,उच्च**

शिक्षण विभाग, पुणे यांनी त्यांच्या विभागातील अनुदानित महाविद्यालयांकडून सदरची माहिती मागवून अपिलकर्ता यांना विनामुल्य रजिस्टर पोस्टाने ती उपलब्ध करुन द्यावी.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई (विलास पाटील)
दिनांक ७.१.२०११ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/४९९०४/अपील क्रमांक ६१९३/२०१०**

**श्री. रमेश झाडे,**
**राष्ट्रीय शैक्षणिक गुणवंता मंच,**
**२/७०४, श्री शाश्वत कॉंप्लेक्स प्लेझंट पार्क,**
**मिरा भाईंदर रोड, मिरा रोड, जि.ठाणे. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी,**
**विभागीय शिक्षण सहसंचालक कार्यालय,**
**उच्च शिक्षण कोल्हापूर,राजाराम महाविद्यालय परिसर विद्यानगर,**
**कोल्हापूर-४१६००४.**

**जन माहिती अधिकारी ,**
**विभागीय शिक्षण सहसंचालक कार्यालय,**
**उच्च शिक्षण कोल्हापूर,राजाराम महाविद्यालय परिसर विद्यानगर,**
**कोल्हापूर-४१६००४. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २२.९.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ७.१.२०११**
**अपिलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित, जन माहिती अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२६.४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, विभागीय शिक्षण सहसंचालक कार्यालय(उच्चशिक्षण), कोल्हापूर विभाग यांच्याकडे दि.१४ जून,२००६ नंतर झालेल्या एमफील व पीएचडी उमेदवारांच्या अध्यापकपदी झालेल्या नियुक्त्यांबबत, माहिती १४ जून,२००६ ते आजपावेतो अशी मागीतलेली आहे.

१)दि.६.७.२००७ नंतर एमफील व पीएचडी उमेदवारांची अध्यापकपदी नियुक्ती झाल्यामुळे(झाली असल्यास) आपण वेतनापोटी किती रक्कम निर्गमित केली, माहिती उमेदवारांचे नाव, महाविद्यालय, नियुक्तीचा दिनांक व दिलेली रक्कम या स्वरुपात द्यावी.

२)दि.२५ जानेवारी,२०१० च्या शासन पत्रानंतर एमफील व पीएचडी धारकांच्या(१४ जून,२००६ नंतर नियुक्त झालेले)वेतनापोटी किती रक्कम निर्गमित करण्यात आली, माहिती उमेदवाराचे नाव, महाविद्यालय,नियुक्तीचा दिनांक व मासिक वेतन या स्वरुपात द्यावी.

माहिती शीघ्र टपालाने घेणार असे नमूद केले आहे.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.७.५.२०१० रोजी सदरची माहिती या कार्यालयाशी निगडीत असली तरी आपण मागणी केलेली माहिती या कार्यालयामध्ये एकत्रित स्वरुपात नसल्यामुळे सदरची माहिती या विभागातील महाविद्यालयांना सूचना देऊन आपणाकडे पाठविण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.२६.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, सदरची माहिती ही विभागीय कार्यालयात उपलब्ध असते कारण विभागीय कार्यालय शासनाकडून अनुदान पाठवित असते. परंतु त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अनुदान एकत्रितरित्या पाठविले जाते परंतु एम्.फील. व पीएचडी अधिव्याख्याते हे त्या त्या महाविद्यालयात नियुक्त केले जातात त्यामुळे कोणते एम.फील व कोणते पीएचडी अधिव्याख्याते आहेत ही माहिती विभागीय कार्यालयाकडे उपलब्ध असते म्हणून दि.७.५.२०१० रोजी प्रत्येक महाविद्यालयाच्या प्राचार्यांना पत्र देऊन अपिलकर्ता यांच्या अर्जामध्ये मागितलेली माहिती परस्पर त्यांना उपलब्ध करुन देण्यात यावी असे पत्र दिलेले आहे. परंतु त्या पत्राप्रमाणे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली किंवा नाही याबद्दल अपिलकर्ता यांनी आयोगापुढे काहीही सांगितले नाही. त्यामुळे सदरची माहिती त्यांना उपलब्ध झालेली नाही असे गृहीत धरुन विभागीय कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनीच महाविद्यालयांकडून माहिती प्राप्त करुन घेऊन ती अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. कारण अपिलकर्ता यांनी त्यांना मुंबई कार्यालयातून तशी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे त्यांनी आयोगापुढे सांगितले व

आयोगाच्या निदर्शनास आणले. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

**१) अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून विभागीय सह संचालक(उच्च शिक्षण),कोल्हापूर विभाग यांनी सर्व महाविद्यालयांकडून २ महिन्याच्या आत माहिती उपलब्ध करुन घेऊन ती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**

**दिनांक ७.१.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**

**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/४९९०५/अपील क्रमांक ६१९४/२०१०**

**श्री. रमेश झाडे,**
**राष्ट्रीय शैक्षणिक गुणवंता मंच,**
**२/७०४, श्री शाश्वत कॉंप्लेक्स प्लेझंट पार्क,**
**मिरा भाईंदर रोड, मिरा रोड, जि.ठाणे. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी,**
**शिक्षण सहसंचालक(उच्चशिक्षण) नागपूर विभाग,**
**जुने मॉरीस कॉलेज इमारत, सिताबर्डी, नागपूर.**

**जन माहिती अधिकारी ,**
**शिक्षण सहसंचालक(उच्चशिक्षण) नागपूर विभाग,**
**जुने मॉरीस कॉलेज इमारत, सिताबर्डी, नागपूर. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २२.९.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ७.१.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२६.४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, विभागीय शिक्षण सहसंचालक कार्यालय(उच्चशिक्षण), नागपूर विभाग यांच्याकडे दि.१४ जून,२००६ नंतर झालेल्या एम्.फील. व पीएचडी उमेदवारांच्या अध्यापकपदी झालेल्या नियुक्त्यांबबत, माहिती १४ जून,२००६ ते आजपावेतो अशी मागीतलेली आहे.

१)दि.६.७.२००७ नंतर एम्.फील. व पीएचडी उमेदवारांची अध्यापकपदी नियुक्ती झाल्यामुळे(झाली असल्यास) आपण वेतनापोटी किती रक्कम निर्गमित केली, माहिती उमेदवारांचे नाव, महाविद्यालय, नियुक्तीचा दिनांक व दिलेली रक्कम या स्वरुपात द्यावी.

२)दि.२५ जानेवारी,२०१० च्या शासन पत्रानंतर एम्.फील. व पीएचडी धारकांच्या(१४ जून,२००६ नंतर नियुक्त झालेले)वेतनापोटी किती रक्कम निर्गमित करण्यात आली, माहिती उमेदवाराचे नाव, महाविद्यालय,नियुक्तीचा दिनांक व मासिक वेतन या स्वरुपात द्यावी.

माहिती शीघ्र टपालाने घेणार असे नमूद केले आहे.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.११.५.२०१० रोजी या विभागातील अनुदानित महाविद्यालयांतील सर्व प्राचार्यांना अपिलकर्ता अर्जदार यांना योग्य ते शुल्क घेऊन माहिती देण्यासंबंधी माहिती अधिकारी यांच्या पत्रानुसार कळविण्यात आले. परंतु अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.२६.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २०.७.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत त्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात आले असा निर्णय कळविण्यात आलेला दिसून येतो. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरची माहिती विभागीय कार्यालयामध्ये उपलब्ध असते. मुंबई कार्यालयाने ती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, महाविद्यालयातील अध्यापकांच्या सेवा पुस्तकात एम्.फील. व पीएचडी. इत्यादी नोंदी प्राचार्यांच्या स्वाक्षरीने करण्यात येतात. तसेच संबंधित अधिव्याख्यात्यांचे वेतन हे महाविद्यलय स्तरावरुन होत असल्यामुळे अपिलकर्त्यांनी उपस्थित केलेली महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या वेतनासंबंधी माहिती महाविद्यालयाकडूनच प्राप्त करणे क्रमप्राप्त आहे. कारण महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई -३२ यांच्या दि.९.२.२००७ च्या आदेशाप्रमाणे प्राचार्य ॲकॅडमीक स्वरुपाची माहिती देण्यास माहिती अधिकारी आहेत तर प्रादेशिक सहसंचालक हे प्रथम अपीलीय अधिकारी आहेत. त्या अनुषंगाने या विभागातील कार्यरत महाविद्यालयातील सर्व प्राचार्यांनी अपिलकर्ता अर्जदार यांना योग्य ते शुल्क घेऊन माहिती देण्यासंबंधी दि.११.५.२०१० रोजी कळविण्यात आले व तसे अपिलकर्ता यांनाही कळविण्यात आले आहे. मात्र अपिलकर्ता यांनी त्याप्रमाणे शुल्क न भरता प्रथम अपील दाखल केले व प्रथम अपीलाच्या सुनावणीससुध्दा ते हजर राहिले नाहीत. महाविद्यालय स्तरावर माहिती अधिकारी माहिती देण्यासाठी पुरेपुर संधी दिली असतांना अपिलकर्ता

यांनी प्राचार्य म्हणजे माहिती अधिकारी यांनी मागितलेले शुल्क भरले नाही त्यामुळे माहिती देण्यात आलेली नाही असे आयोगापुढे सांगितले. परंतु प्राचार्यांनी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी पत्रव्यवहार केलेला आहे त्याबाबत कोणताही पुरावा आयोगापुढे सादर केलेला नाही. त्यामुळे विभागीय सहसंचालक या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी महाविद्यालयाकडून माहिती उपलब्ध करुन घेऊन अपिलकर्ता यांना पुरविणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून २ महिन्याच्या आत अपिलकर्ता यांना महाविद्यालयाकडून मागितलेली माहिती उपलब्ध करुन घेऊन विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** — **(विलास पाटील)**

**दिनांक ७.१.२०११** — **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०२४८/अपील क्रमांक ६२०१/२०१०**

**श्री. दिलीप सिंह देशमुख,**
**ब्लू ओॲसीस नं.१, बी विंग, ५०४,**
**महावीर नगर, कांदिवली(प.),**
**मुंबई-४०००६७.** ..... **अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी, प्राचार्य श्री एम.डी. शहा महाविद्यालय,**
**श्रीम. टी.एस.बाफना कनिष्ठ महाविद्यालय,**
**बी.जी. पटेल रोड, मालाड(प.),**
**मुंबई-४०००६४.**

**जन माहिती अधिकारी , प्राचार्य श्री एम.डी. शहा महाविद्यालय,**
**श्रीम. टी.एस.बाफना कनिष्ठ महाविद्यालय,**
**बी.जी. पटेल रोड, मालाड(प.),**
**मुंबई-४०००६४.** ...... **उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २५.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १०.१.२०११**
**अपिलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.१२.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य श्री.एम.डी. शहा महिला महाविद्यालय यांच्याकडे अर्ज करुन जनसेवा समितीचे पदाधिकारी व कार्यकारणी सदस्यांची नावे, पत्रव्यवहाराचा पत्ता दूरध्वनी क्रमांक तसेच १९८७ पासून २०१० जून पर्यंतच्या प्रत्येक वर्षाच्या शालेय समितीच्या सदस्यांची नावे इत्यादी एकूण ५ मुद्यांमध्ये माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.१२.८.२०१० रोजी आपण महाविद्यालयामध्ये २६.८.२०१० किंवा २७.८.२०१० रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत व्यक्तीशः उपस्थित उपस्थित राहून माहिती घ्यावी तसेच काही माहितीचे अवलोकन करावे व झेरॉक्स किंवा छापील प्रतीसाठी प्रति पृष्ठ रु.२/- प्रमाणे ३५ पृष्ठांचे रु.७०/- इतकी रक्कम कार्यालयात जमा करावी असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यावर श्री. देशमुख यांनी पत्र स्विकारलेले नाही अशी नोंद दिसून येते. परंतु त्यावर समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.१२.८.२०१० रोजी प्रथम

अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. परंतु २१.१०.२०१० रोजी अपिलकर्ता यांच्या अपिल स्वरुपात आलेल्या अर्जाची सुनावणी करुन त्रयस्थ पक्षाला आपली बाजू मांडण्यासाठी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(४) प्रमाणे वाजवी संधी द्यावी लागते त्यानुसार सुनावणी घेणे उचित आहे. आपल्या मागणीनुसार सुनावणी घेण्याचा प्रश्नच येत नाही असे कळविल्याचे दिसून येते. त्यामुळे दि.१२.८.२०१० रोजीच्या अपिल स्वरुपातील अर्जाप्रमाणे आपणास कळविण्यात येते की, आपण बुधवार दि.२७.१०.२०१० रोजी सकाळी १०.३० वाजता व्यक्तीशः माहिती घेण्यासाठी उपस्थित रहावे. परंतु त्यावर अपिलकर्ता यांनी आक्षेप घेतलेले दिसून येतात. परंतु त्यानंतर पुन्हा दि.३०.१०.२०१० रोजी प्राचार्यांनी अपिलकर्ता यांना सुनावणीस बोलावलेले दिसून येते. त्यानंतर मात्र अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले त्यांना अपूर्ण माहिती देण्यात आलेली आहे व व्यक्तीशः माहिती घेणारे असे कळविले असतांनाही ते घरी नसतांना त्यांच्याकडे एकूण १३५ पृष्ठांची माहिती पाठविण्यात आलेली आहे व उर्वरित माहिती अद्यापपर्यंत उपलबध करुन दिलेली नाही व प्रथम अपीलाचा निर्णयसुध्दा दिलेला नाही.

जन माहिती अधिकारी यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी माहिती मागीतलेली आहे ती १९८० पासूनची आहे व ती अतिशय मोघम व व्यापक प्रमाणात आहे. १९८० मध्ये अपिलकर्ता हे महाविद्यालयात नोकरीस सुध्दा नव्हते व त्यामुळे सदरच्या माहितीचा सार्वजनिक व्यापक हिताचा संबंध आहे असे दिसून येत नाही. अपिलकर्ता यांनी जी माहिती मागीतलेली आहे ती प्रशासनावर मानसिक दबाव आणण्याकरीता व त्रास देण्याकरीता मागितलेली आहे. सदरच्या माहितीचा त्यांना काहीही उपयोग नाही उलटपक्षी कायद्याचा गैरवापर करुन कार्यालयातील कर्मचा-यांचा वेळ फुकट घालविणे यापलिकडे त्यांचा हेतू दिसत नाही. जी माहिती कार्यालयात उपलब्ध आहे ती त्यांना दिलेली आहे. माहितीचा अर्ज आल्यानंतर माहिती घेऊन जाण्याकरीता खर्चाचा भरणा करावा असे सुध्दा पत्र ते स्विकारीत नाहीत. वास्तविक आम्ही एकाच महाविद्यालयात समवेत कार्यरत आहोत. त्यावर आयोगाने अपिलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात सार्वजनिक व्यापक हित काय आहे असे विचारले असता अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, महाविद्यालयामध्ये वेगवेगळया उपक्रमांकसाठी किंवा कार्यासाठी ज्या नियुक्त्या केल्या जातात त्यामध्ये सेवा जेष्ठता पाळली जात नाही व तोच उद्देश आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा आयोगापुढे असे सांगितले की, मागील ४ वर्षाच्या काळातील सेवाजेष्ठता यादी तयार केलेली नाही व एका कर्मचा-याने मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती व त्यामुळे सेवाजेष्ठता यादी केलेली नाही त्यामुळे ती उपलबध करुन देता येऊ शकत नाही. असे असल्यास अपिलकर्ता यांनी मागीतलेल्या माहितीच्या संदर्भातील अभिलेख्यांचे निरिक्षण करणे संयुक्तिक राहील. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २(त्र) प्रमाणे माहितीचा अधिकार या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्यामध्ये सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणात असलेल्या अभिलेखांचे,नस्तीचे,कागदपत्रांचे निरक्षण करुन छायांकित प्रती उपलबध

करुन घेणे असा आहे. त्याकरीता महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या नियम ४(२) अन्वये निरिक्षणाकरीता शुल्क ठरलेले आहे व निरिक्षणा अंती ज्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती हव्या असतील त्या खर्चाचा भरणा करुन उपलबध करुन घेणे असा आहे. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी नस्तीचे निरिक्षण करण्यासाठी कामकाजाच्या दिवसाची तारीख व वेळ कळवून त्या वेळेस उपस्थित राहून संबंधीत नस्तीचे निरिक्षण व्यक्तीशः करावे व ज्या कागदपत्रांची त्यांना आवश्यकता असेल त्याच्या छायांकित प्रती खर्चाचा भरणा करुन उपलब्ध करुन घ्याव्यात. जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना लेखी कळविल्यावर व ते उपस्थित झाल्यावर निरिक्षणासाठी नस्ती उपलब्ध करुन द्याव्यात व त्यांना आवश्यक असतील त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती खर्चाचा भरणा केल्यानंतर उपलब्ध करुन द्याव्यात.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक १०.१.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०२४९/अपील क्रमांक ६२०२/२०१०**

**श्री. गिरीष मिश्रा,**
**सी/१०३, गॉड्स गीफ्ट, एन.एम.जोशी मार्ग,**
**लोअर परेल(प.), मुंबई-१३. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा स्वीय सहाय्यक,**
**विक्रीकर सहआयुक्त(व्यवसायकर) मुंबई,**
**३रा माळा, ब इमारत, उपनगरीय विक्रीकर भवन,**
**बांद्रा-कुर्ला संकुल, वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त विक्रीकर विभाग(पी.टी.)मुंबई,**
**बी विंग, ३रा माळा, उपनगरीय विक्रीकर कार्यालय,**
**बांद्रा-कुर्ला संकुल, वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २६.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १०.१.२०११**
**अपिलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक १३.८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे ६५ केसेसच्या सहाय्यक आयुक्त(व्यवसाय कर) यांनी नोंदणी घेतलेली आहे व ज्यामध्ये कराची कराची जबाबदारी बदलण्यात आलेली आहे अशा २००८-०९या कालावधीतील नस्त्यांची माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दि.९.९.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दि.१५.९.२०१ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१४.१०.२०१० रोजी देण्यात आलेला असून सदरचे अपील निकाली काढण्यात आलले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी ६५ केसेचे निरिक्षण मागीतले होते परंतु त्यांना २३ केसेसचेच निरिक्षण देण्यात आले आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्या ६५ केसेसमध्ये ज्या व्यक्तींच्या त्या केसेस आहे त्याबाबत त्यांनी कलम ११ प्रमाणे हरकत घेतलेली आहे त्या केसेस त्यांना वैयक्तिक माहितीच्या संदर्भात दाखविण्यात आलेल्या नाहीत व ज्यामध्ये हरकत घेतलेली नाही त्या केसेसचे निरिक्षण देण्यात आलेले आहे. त्यावर अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, व्यवसाय कराच्या संदर्भातील ज्या नस्त्या आहेत तो सार्वजनिक अभिलेखांचा भाग होतो त्यातील कोणतीही कागदपत्र ही वैयक्तिक असू शकत नाहीत व त्यामुळे ती गोपनीय आहेत असेही म्हणता येणार नाही. त्यावर पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, अपीलीय अधिकारी यांच्या आदेशान्वये सर्व योग्य ती माहिती अपिलकर्त्यास पुरविण्यात आली तसेच ज्या प्रकरणांशी श्री.मिश्रा यांचा काहीही संबंध नसतांना वारंवार त्रयस्थ व्यक्तीच्या अभिलेखांचे निरिक्षण घेण्याचा तगादा लावला. वरिष्ठांनी किंवा कोणत्याही अधिका-यांनी श्री.मिश्रा यांच्या मनासारखे काम न केल्याने वरिष्ठांच्या व अधिका-यांच्या कामावर ठपका ठेवून त्यांच्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न त्यांनी या कार्यालयात सादर केलेल्या विविध पत्रांवरुन दिसून येते. तसेच मागणीप्रमाणे-

श्री.मिश्रा यांची व्यवसायकर विभागामध्ये वसुलीअभिकर्ता म्हणून वर्षे २००२ मध्ये नेमणुक करण्यात आली. वसुली अभिकर्ता म्हणून व्यवसायकर विभागात अनोंदित व्यवसायीक नोंदित करुन घेणे व त्यांच्याकडुन कर व शास्ती वसुल करण्याचे काम देण्यात आले होते. परंतु श्री.मिश्रा यांनी वर्षे २००२ ते २००९ या कालावधीत त्यांना दिलेल्या नियमावलीचा भंग करुन दस्वत:च्या मर्जीने वाटेल तशी कामे करुन शासनाची महसुली हानी केली. त्या दरम्यान श्री. मिश्रा यांना अनोंदित व्यापा-यांना नोंदित कसे करुन घ्यायचे किंवा करकसुरदार व्यापा-यांकडून कर कसे वसुल करायचे याबाबतची अडचण कधीच जाणवल्याचे दिसून येत नाही किंवा तत्संबंधी श्री.मिश्रा यांची कोणतीही तक्रार नाही.

परंतु वर्षे जुलै २००८ मध्ये व्यवसायकर विभागात अनोंदित व्यवसायीकांना नोांदित करुन घेण्यासाठी स्वतंत्र सर्वेक्षण विभाग नरीमन पॉईंट, व्यवसायकर कार्यालय, मुंबई येथे सुरु करण्यात आला. सर्वेक्षणच्या कामाकरीता सहाय्यक विक्रिकर आयुक्त या पदासाठी माझी नियुक्ती करण्यात आली याच कार्यालयातील श्री.मिश्रा हे “सी ” प्रभागात वसुली अभिकर्ता म्हणून काम करत आहेत.

श्री.मिश्रा यांनी त्यावेळेच्या माझ्या कामाचे व्यापक स्वरुप पाहुन माझ्या कामात हस्तक्षेप करण्यास सुरुवात केली. माझ्याकडु न डॉक्टर्स व एल.आय.सी.एजंटच्या याद्या मागण्याचा तगादा लावला. परंतु त्यांना या विभागातर्फे फक्त कर कसूरदार व्यवसायिकांच्या याद्या देण्याची तरतूद असल्याने गोपनीय याद्या त्यांना देऊ नये असे वरिष्ठांनी सांगितले.

तद्नंतर सदर याद्या मागविण्यासाठी श्री.मिश्रा यांनी मला धमकावण्याचा प्रयत्न केला व या विभागात कार्यरत असलले विक्रीकर सहआयुक्त श्री.भट्टाचार्याजी व व्यवसायकर अधिकारी श्री.पेणदुरकर यांना कशाप्रकारे त्रास दिला यांची त्यांने सविस्तर माहिती देऊन ब्लॅकमेल करण्याचा

प्रयत्न सुरु केला. सदर प्रकरण मा. आयुक्त व सहआयुक्त यांचेकडे गेले असतांना त्यांच्या आदेशानुसार या कार्यालयाकडून "सी " प्रभागांची २०२४ व्यवसायीकांची गुमास्ता यादी १९.३.०९ रोजी सर्वेक्षणाकरीता श्री.मिश्रा यांना देण्यात आली व त्याचा अहवाल वेळोवेळी या कार्यालयात सादर करण्यासंबंधीच्या सूचना त्यांना देण्यात आल्या. परंतु त्यात त्यांचे समाधान न झाल्याने मला वैयक्तिक जबाबदार धरुन बदला घेण्याच्या हेतुने श्री. मिश्रा यांनी माहितीचा अधिकार कायद्यांतर्गत दि.१३.४.२००९ रोजी माझ्या कार्यालयातील व माझ्यासंबंधी माहिती मागविण्यासाठी अर्ज सादर केला. त्या अर्जाच्या अनुषंगाने श्री.मिश्रा यांना माहिती देण्यात आली परंतु श्री.मिश्रा यांनी मागितलेल्या माहितीत श्री.ज.म.राऊत यांच्या वैयक्तिक माहितीसंबंधी काही आक्षेपार्ह बाबी निदर्शनात आल्या, त्या म्हणजे अवध्या ९ महिन्याच्या कालावधभ्त श्री.मिश्रा यांनी प्रशासनावर ठपका ठेऊन माझ्या नियुक्तीबद्दल आक्षेप घेणे. संबंधीत कामकाजाची माहिती न मागता वैयक्तिक स्वरुपाची माहिती मागणे. यात श्री.मिश्रा यांचे समाधान न झाल्याने विभागात कार्यरत असलेले मा.विक्रीकर सहआयुक्त श्री.सय्यद साहेब यांच्यावरसुध्दा ठपका ठेऊन दोघांच्याही संपत्तीची माहिती मागविण्यासाठी सदर कायद्याचा गैरवापर केला.

सदर प्रकरणात मा.मिश्रा यांनी राज्य माहिती आयुक्त, मुंबई यांचेकडे अपील सादर केले व सदर अपील मा.राज्य माहिती आयुक्त श्री.तिवारी साहेब यांनी संपत्तीची माहिती न देता दि.२३.२.२०१० च्या आदेशान्वये फेटाळून लावले.(मा.राज्य माहिती आयुक्त श्री.तिवारी साहेब यांच्या आदेशाची प्रत सोबत जोडलेली आहे.)

तद्नंतर श्री.मिश्रा यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे दि.३.६.२००९ रोजी अपील दाखल केले. त्यामध्ये श्री.मिश्रा यांनी प्रथमच अभिलेखाच्या निरिक्षणाचा मुद्दा उपस्थित केला. अभिलेखाच्या निरिक्षणाचा मुद्दा जन माहिती धिकारी यांच्याकडे दाखल केलेल्या अर्जामध्ये नव्हता. त्यामुळे अभिलेखाचे निरिक्षण हे वैयक्तिक स्वरुपाचे आहे किंवा त्रयस्थ व्यक्तिचे आहे ही बाब प्राथमिकदर्शी स्पष्ट झालेली नाही. तसेच श्री.मिश्रा यांनी प्रथम अपील अधिकारी यांच्याकडेही सदर बाबी स्पष्ट केल्याचे दिसून येत नाही. शिवाय प्रथम अपीलीय अधिकारी यांनी मुळ अर्जामध्ये हा मुद्दा नसल्याने अभिलेखाच्या निरिक्षणासंबंधी सर्वे विभागास माहिती न देता किंवा त्यांची बाजू ऐकून न घेता अभिलेखाचे निरिक्षण देण्यासंबंधीचे दि.१३.७.२००९ रोजी आदेश पारित केले.

जेव्हा अभिलेखाच्या निरिक्षणाचा मुद्दा हा वैयक्तिक नसून त्रयस्थ व्यक्तीचा आहे ही बाब लक्षात आल्यावर कायद्याच्या तरतुदीनुसार त्रयस्थ व्यक्तीकडून ना हरकत प्रमाणपत्र मागविण्यास कार्यालयाने सुरुवात केली ही बाब श्री.मिश्रा यांना कळविण्यात आली. श्री.मिश्रा यांनी ६२० प्रकरणात अभिलेखाचे निरिक्षण मागविले. परंतु एवढया प्रकरणात एवढया व्यक्तींकडुन ना-हरकत प्रमाणपत्र मागविणे शक्य नसल्याने काही निवडक प्रकरणात नाहरकत प्रमाणपत्र मागविण्यात आले. परंतु त्रयस्थ व्यक्तींनी निरिक्षणासंबंधी घेतलेल्या हरकतीबाबत त्यांना कळविण्यात आले.

अभिलेखाच्या निरिक्षणाचा मुद्दा हा आपल्या प्राथमिक अर्जात नसल्याची चुक श्री.मिश्रा यांच्या लक्षात आल्याने श्री.मिश्रा यांनी परत माहितीच्या अधिकाराखाली दि.१३.८.२०१० रोजी

नव्याने अर्ज करुन त्यात इतर मुद्यांच्या माहितीसहीत ६५ प्रकरणात अभिलेखांचे निरिक्षण मागविले.

संबंधीत अर्जानुसार सर्वे विभागाने सदर व्यक्तींचा इतिहास बघता माहिती देण्याचे नाकारले त्यानुसार श्री.मिश्रा यांनी प्रथम अपील अधिकारी यांचेकडे अपील दाखल केले. प्रथम अपील अधिकारी यांचे आदेश दि.१४.१०.२०१० नुसार सर्वे विभागाला सदर ६५ प्रकरणांपैकी ज्या प्रकरणांमध्ये त्रयस्थ व्यक्तींनी अभिलेखांचे निरिक्षण देण्यासंबंधी हरकत घेतली ती प्रकरणे सोडून इतर २३ प्रकरणांमध्ये अभिलेखांचे निरिक्षण देण्यासंबंधीचे आदेश देण्यात आले.

सदर दि.१४.१०.२०१०च्या प्रथम अपील अधिकारी यांच्या आदेशानुसार श्री.मिश्रा यांना २३ प्रकरणातील अभिलेखांचे निरिक्षण दि.२.११.२०१० रोजी देण्यात आले.

विशेष म्हणजे याच कार्यालयात एक अभिकर्ता म्हणून "सी " प्रभागात कार्यरत असलेले श्री.मिश्रा यांनी अवध्या नऊ महिन्याच्या कालावधीत माझ्या कार्यालयाशी कोणतेही संबंध नसतांना प्रशासनावर ठपका ठेऊन माझ्या नियुक्तीवर आक्षेप घेणे, संपत्तीची माहिती मागविणे हे शंकास्पद वाटते. तसेच श्री.मिश्रा यांनी माझी विक्रीकर उपआयुक्त(दक्षता) यांच्याकडे सुध्दा तक्रार करुन दबाव आणण्याचा प्रयत्न केलो आहे. यातही त्यांचे समाधान न झाल्यामुळे कोणत्या ना कोणत्या कारणावरुन कार्यालयात अर्ज सादर करुन माझ्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न करीत आहेत यावरुन श्री.मिश्रा हे वारंवार तक्रार(Habitual Complainant) करणारे आहेत असे दिसून येते.

जे माहिती अधिकार कायद्यात अपेक्षित नाही त्या गोष्टी या कायद्याचा गैरवापर करुन अधिका-यांना ब्लॅकमेल करणे व त्यांना मानसिक छळ करण्याकरीता होत आहे असे श्री.मिश्रा यांच्या वागण्यातून दिसून येते. अधिका-यांनी दिलेल्या कामाचा आढावा न देणे, तद्‌संबंधी विचारणा केल्यास ऑफीसरवर खोटे आरोप लावून शासकीय कामात सहकार्य न करता कामात व्यत्यय आणणे अशी कार्यपध्दती श्री.मिश्रा यांनी अवलंबिलेली आहे. श्री.मिश्रा यांनी ज्या अधिका-यांकडे काम केले अशा प्रत्येक अधिका-याला त्रास देण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते.त्यासाठी माहिती अधिकार कायद्याचा सर्रास गैरवापरद केल्याचे दिसून येते.

तरी वरील सर्व बाबींचा विचार करता व श्री.मिश्रा यांचेकडुन सदर कायद्याचा गैरवापर होत असल्याचे दिसून येत आहे. श्री.मिश्रा यांचा या मागे हेतू शुद्ध नाही तसेच श्री.मिश्रा यांच्यामुळे त्रयस्थ व्यक्तींना शारिरिक, मानसिक,आर्थिक इजा व नुकसान होण्याची शक्यता दिसुन येते. यामुळे त्यांच्या वैयक्तिक स्वातंत्र्याला धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्रयस्थ व्यक्तिंच्या अभिलेखांचे निरिक्षणातून त्यांच्या खाजगी बाबींचे उल्लेघन श्री.मिश्रांसारख्या व्यक्तिंकडून होऊ शकते.(अवलोकनार्थ मा.राज्य माहिती आयुक्त नागपूर खंडपीठ यांचे री.डी.एन.चित्रीव वि.पो.अधिकारी नागपूर यांची न्याय निर्णयाची प्रत.)

श्री.मिश्रा यांनी मागीतलेल्या माहितीत कुठलेही मोठया प्रमाणात जनहित असल्याचे दिसून येत नाही. उलट श्री.मिश्रा यांनी वर्ष-२००२ या कालावधीपासून २००९ पर्यंत केलेल्या कामातील त्रुटी काढून अंदाजे रु.३०,००,०००/- (रुपये ३० लाख) एवढी व्याजाची महसूल हानी केल्याचे

शसनाच्या निदर्शनास आणून दिले. सदर प्रकरणी असे करु नये यासाठी श्री.मिश्रा यांनी माझ्यावर माहितीचा अधिकार कायद्याचा गैरवापर करुन दबाव आणण्याचा प्रयत्न केला.

या कार्यालयाकडून श्री.मिश्रा यांना दिलेल्या गुमास्ता यादीच्या पाठपुराव्यासंबंधी दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. जेणेकरुन त्यांना देण्यात आलेले काम टाळून स्वतःच्या इच्छेने वाटेल तसे काम करता यावे.

यावरुन अपिलकर्ता हे जन हिताकरीता माहिती मागत नसून स्वतःकरीता माहिती मागवित असतात असे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदींचा वापर हा सार्वजनिक व्यापक हिताकरीताच करणे असा उद्देश असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक १०.१.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०२५२/अपील क्रमांक ६२०५/२०१०**

**श्री. पुष्कर माधव दामले,**
**१०३, दत्ततात्रय प्रसन्ना सोसायटी, जोशीवाडी,**
**ऑफ टिळक रोड, डोंबिवली(पूर्व),**
**डोंबिवली. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव,**
**महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग,**
**९,हजारीमल सामानी मार्ग, मुंबई-०१.**

**जन माहिती अधिकारी तथा रजिस्ट्रार,**
**महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग,**
**९,हजारीमल सामानी मार्ग, मुंबई-०१. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २६.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १०.१.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.९.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग यांच्याकडे अर्ज करुन Total number of Orders while disposing off the complaints of Violation of Human rights made before MSHRC in which the section १५ of HR Act is referred or reproduced or written by hand बाबत माहिती मागीतली होती. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.२३.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी अशाप्रकारची माहिती संकलीत करुन ठेवली जात नाही असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.१७.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल

केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२९.९.२०१० रोजी देण्यात आला असून अपील अंशत: मंजूर करण्यात आले असून अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी नोव्हेंबर-०६ ते नोव्हेंबर-०८ या कालावधीतील माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. सदरच्या आदेशाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी दि.१८.१०.२०१० रोजी यांनी मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष व सदस्य यांच्या नस्त्यांचे निरिक्षण घेतले परंतु त्यामध्ये कलम १५ अन्वये आदेश आढळून आले नाहीत असे कळविलेले दिसून येते. त्यावर अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना खोटी व दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्याकरीता त्यांनी त्यांच्या स्वत:च्या प्रकरणातील दि.१५ जानेवारी,२००७ रोजीचा निर्णय आयोगाच्या निदर्शनास आणला. तसेच अपिलकर्ता यांनी केरळ राज्य न्यायालयाचा निर्णय देखील निदर्शनास आणला आहे परंतु सदरचा निर्णय सध्याच्या प्रकरणामध्ये लागू होतो असे दिसून येत नाही. तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या कर्मचा-यांना सेवेत मुदतवाढ/पुर्ननियुक्तीच्या संदर्भातील शासन निर्णयसुध्दा दाखल केलेला आहे. परंतु त्या शासन निर्णयाचीदेखील आवश्यकता नाही. तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाचा निर्णयसुध्दा दाखल केलेला आहे परंतु अपिलकर्ता यांनी दाखल केलेल्या सर्वोच्च न्यायालयाच्या शासन निर्णयाचा तसेच शासन निर्णयाचा संबंध हा माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या द्वितीय अपीलाच्या सुनावणीस गुणवत्तेच्याबाबत लागू होत नाही त्यामुळे काही करता येणार नाही. मात्र अपिलकर्ता यांना दिशाभूल करणारी व खोटी माहिती दिली असल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र रहातील. परंतु त्याबाबत त्यांचे म्हणणे ऐकून घेणे अधिनियमाच्या कलम २०(१) च्या परंतुकाप्रमाणे बंधनकारक असल्यामुळे व तत्कालीन जन माहिती अधिकारी या कार्यालयात येत नसल्यामुळे व आज उपस्थित न झ ाल्यामुळे सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

**१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि.१८.१०.२०१० रोजी खोटी व दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन दिली या कारणास्तव त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये शास्ती का लादण्यात येऊ नये याबद्दलचा खुलासा त्यांनी आयोगापुढे**

हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत समक्ष करावा. अन्यथा त्यांच्याविरुध्द शास्ती लादण्यात येईल याची त्यांनी नोांद घ्यावी.
२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई (विलास पाटील)
दिनांक १०.१.२०११ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०२५१/अपील क्रमांक ६२०४/२०१०**

**डॉ.सविता राठोड,**
**घाडगे नगर, नविन खुंटवली रोड, कमल पॉलीक्लीनीक,**
**अंबरनाथ(प.),जिल्हा-ठाणे ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी,**
**जिल्हा शासकीय रुग्णालय, ३रा माळा,**
**टेंभी नाका, कोर्टाच्या शेजारी,ठाणे(प.),**

**जन माहिती अधिकारी तथा रजिस्ट्रार,**
**जिल्हा शासकीय रुग्णालय, ३रा माळा,**
**टेंभी नाका, कोर्टाच्या शेजारी,ठाणे(प.), ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : १९.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १०.१.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी अनुपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी सदरची माहिती मिळाली आहे असे लेखी निवेदन दिलेले असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक १०.१.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०२६०/अपील क्रमांक ६२३७/२०१०**

**श्री.शम्भू शरण सक्सेना,**
**रुम नं.१०१४, मुळेबाई चाळ, रामगडनगर,**
**गोशाला रोड, मुलुंड(प.), मुंबई-४०००८०. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी,**
**जिल्हाधिकारी(मुंबई पूव उपनगरे),**
**न्यु ॲडमिनिस्ट्रेटीव्ह बिल्डिंग चेतना कॉलेज जवळ,**
**बांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी ,**
**जिल्हाधिकारी(मुंबई पूव उपनगरे),**
**न्यु ॲडमिनिस्ट्रेटीव्ह बिल्डिंग चेतना कॉलेज जवळ,**
**बांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : १८.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १३.१.२०११**
**अपिलकर्ता अनुपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.१२.८.२०१० (१८.८.२०१०) रोजी जन माहिती अधिकारी,जिल्हाधिकारी उपनगरे यांच्याकडे मुलुंड पोलीस स्टेशनमध्ये जे मंदिराचे बांधकाम झालेले आहे त्या संदर्भात कोणत्या प्रकारची परवानगी दिलेली आहे याबाबत एकूण ४ मुद्यांमध्ये माहिती मागीतली असून ती माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील नसल्यामुळे सदरचा अर्ज तहसिलदार कुर्ला-मुलुंड यांच्याकडे माहिती उपलबध करुन देण्यासाठी हस्तांतरीत करण्यात आलेला दिसून येतो व त्या पत्राची पत अपिलकर्ता यांना

दिलेली दिसून येते. तहसिलदार कुर्ला-मुलुंड यांनी दि.९.१२.२०१० रोजी त्यांच्या कार्यालयातून परवानगी दिली गेली नाही मात्र उप-आयुक्त(परिमंडळ-७) मुलुंड पोलीस ठाणे यांना त्याबद्दल विचारणा केलेली दिसून येते. परत उप-आयुक्त परिमंडळ-७ मुलुंड पोलीस ठाणे यांनी त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, मुलुंड-कुर्ला यांनी दि.२७.१२.२०१० रोजी अपिलकर्ता यांना तसे कळविलेले आहे. असे असूनसुध्दा अपिलकर्ता यांनी प्रथम अपील व द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपिलकर्ता यांनी ज्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागीतलेली होती त्यांनी योग्य ती कार्यवाही केलेली असल्यामुळे व वेळोवेळी अपिलकर्ता यांना कळविलेले असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१) अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक १३.१.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०२५९/अपील क्रमांक ६२३६/२०१०**

**श्री.शम्भू शरण सक्सेना,**
**रुम नं.१०१४, मुळेबाई चाळ, रामगडनगर,**
**गोशाला रोड, मुलुंड(प.), मुंबई-४०००८०. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका टी वाड,**
**दिनदयाळ राड, मुलुंड(प.),**
**मुंबई-८०.**

**जन माहिती अधिकारी ,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका टी वार्ड,**
**दिनदयाळ राड, मुलुंड(प.),**
**मुंबई-८०. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : १८.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १३.१.२०११**
**अपिलकर्ता अनुपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.१२.८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी टी-वार्ड यांच्याकडे अर्ज करुन मुळेबाई चाळ, गोशाळा रोड, मुलंड(प.) येथील रस्त्यावरील गटारावर सिमेंट स्लॅब बसविण्यात आल्या संदर्भात कॉंट्रॅक्टर व इतर ४ मुद्यांमध्ये माहिती मागीतलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.६.९.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दि.१९.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलामध्ये अपिलकर्ता यांनी समाधान व्यक्त केल्यामुळे अपिल निकाली

काढण्यात आलेले दिसून येते. परंतु तरीसुध्दा अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. त्यामध्ये अद्यापपर्यंत माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद केलेले आहे.

अपिलकर्ता सुनावणीस गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, अपिलकर्ता यांना माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे सदर कारणास्तव प्रथमअपीलसुध्दा निकाली काढण्यात आलेले आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगतले. अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता व विहित मुदतीत व योग्यरितीने माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपिलकर्ता यांनी प्रथम अपील किंवा द्वितीय अपील करण्याची आवश्यकता नव्हती. माहिती मिळाल्यावरही तसे करणे म्हणजे माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदींचा गैरवापर करणे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१) अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक १३.१.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०२५८/अपील क्रमांक ६२३५/२०१०**

**श्री.शम्भू शरण सक्सेना,**
**रुम नं.१०१४, मुळेबाई चाळ, रामगडनगर,**
**गोशाला रोड, मुलुंड(प.), मुंबई-४०००८०. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका टी वार्ड,**
**दिनदयाळ राड, मुलुंड(प.),**
**मुंबई-८०.**

**जन माहिती अधिकारी ,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका टी वार्ड,**
**दिनदयाळ राड, मुलुंड(प.),**
**मुंबई-८०. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : १८.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १३.१.२०११**
**अपिलकर्ता अनुपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२४.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी,टी वार्ड यांच्याकडे २५.५.२०१० रोजी अवैध बांधकामाच्या संदर्भात केलेल्या तक्रारीच्या संदर्भात झालेल्या कारवाईची माहिती एकूण ४ मुद्यांमध्ये मागीतलेली दिसून येते. अर्जाच्या सोबत दि.२५.५.२०१० रोजीच्या तक्रार अर्जाची प्रत जोडण्यात आली आहे. अर्जाच्या अनुषंगाने
दि.१९.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना त्यांच्या तक्रारीच्या संदर्भात अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन दता येत नाही असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.१६.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२६.१०.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी सहाय्यक अभियंता(परिरक्षण) यांनी पाठविलेल्या वरील संदर्भित पत्राची छायांकित प्रत अपिलकर्त्यास निशुल्क देण्यात यावी व या संदर्भात जी काही माहिती या कार्यालयात उपलब्ध असेल ती १५ दिवसाच्या आत देण्यात यावी असा निर्णय दिलेला

दिसून येतो. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलले आहे. त्यामध्ये अद्यापपर्यंत त्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही असे कारण दिलेले आहे.

अपिलकर्ता सुनावणीस गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे माहिती उपलब्ध करुन दिल्याचे निदर्शनास आणले व अपिलकर्ता यांनी तक्रार केलेली असली तरी त्या तक्रारीवर कार्यवाही झालेली असल्यास त्याबद्दलची माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित होते. परंतु तक्रारीच्या संदर्भात कार्यवाही झालेली नाही त्यामुळे तसे त्यांना कळविण्यात आलेले आहे. कोणत्याही तक्रारीची चौकशी करुन माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांना त्यांच्या माहितीच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**

**दिनांक १३.१.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**

**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**निवड नस्ती.**

F:\jan-11kd.doc-70

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५००८८/अपील क्रमांक ६२३४/२०१०**

**श्री.प्रमोद लक्ष्मण कदम,**
**६/डी ३, श्री साई को.ऑप.हौ.सोसायटी,**
**एस.व्ही.पी. नगर म्हाडा, अंधेरी(प.),**
**मुंबईछ४०००५३. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी,**
**लोक आयुक्त कार्यालय,**
**नवीन प्रशासन भवन,१ला मजला,**
**मादाम कामा रोड, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी ,**
**लोक आयुक्त कार्यालय,**
**नवीन प्रशासन भवन,१ला मजला,**
**मादाम कामा रोड, मुंबई-४०००३२. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ७.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १३.१.२०११**
**अपिलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित**

अपिलकर्ता यांनी दि.१७.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी,उपलोक आयुक्त कार्यालय यांच्याकडे तक्रार क्रमांक १७००/२००८ च्या संदर्भात दि.१.१.२०१० पासून आत्तापर्यंत कार्यालयाने कोणकोणती पत्रे पाठवली त्याबद्दलची माहिती मागीतलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.१०.६.२०१० रोजी एकूण पृष्ठ संख्या ४४ असून प्रति पृष्ठ रु.२/- प्रमाणे रु.८८/- व माहिती पोस्टाने पाठविणे कामी येणारा टपाल खर्च रु.५५/- असे एकूण शुल्क रु.१४३/- चा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. त्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दि.२६.७.२०१० रोजी शुल्क रु.१८३/- भरण्यास तयार आहे व श्री.चंद्रकांत मारुती सुद्रिक यांना ते माहितीपत्रक घेण्यासाठी पाठवित आहे तरी आपण श्री.सुद्रिक यांच्याकडे ते माहितीपत्रक देण्याची कृपा करावी असे पत्र दिलेले दिसून येते. परंतु खर्चाचा भरणा केलेला दिसून यत नाही. मात्र दि.१.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.१७.८.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांचे

प्रथम अपील फेटाळण्यात आलेले आहे. त्या निर्णयाच्याविरुध्द अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

सुनावणीस अपिलकर्ता गैरहजर आहेत. त्यांच्या द्वितीय अपील मेमोमध्ये मागीतलेली खरी माहिती देण्याचे आदेश देण्यात यावेत असे द्वितीय अपील करण्याचे कारण दिलेले आहे. मात्र जन माहिती अधिकारी यांना खर्चाचा भरणा केला किंवा नाही याबद्दल त्यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये कोणताही उल्लेख केलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, अपिलकर्ता यांच्या अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात विहित मुदतीत खर्चाचा भरण करावा असे कळविलेले आहे. अपिलकर्ता यांनी अद्यापपर्यंत खर्चाचा भरणा केलेला नाही मात्र दि.२६.७.२०१० रोजी खर्चाचा भरणा करण्यास तयार असल्याबाबत त्यांनी एक पत्र दिलेले आहे. अपिलकर्ता यांनी व जन माहिती अधिकारी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहितीच्या अर्जाच्या संदर्भात कार्यवाही केलेली आहे. तसेच प्रथम अपीलाचा निर्णयसुध्दा योग्य असल्याने सदरचे अपील फेटाळण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१) सदरचे अपील फेटाळण्यात येत आहे.**

**२)अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक १३.१.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५००८७/अपील क्रमांक ६२३३/२०१०**

**श्री. अनिल वेदव्यास गलगली,**
**२, जुना खारवाला चाळ,**
**काजुपाडा,साकीनाका, मुंबई-४०००७२. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी(आयुक्त),**
**बृहनमुंबई महानगरपालिका,खोली क्र.४६, १ला माळा,**
**जुनी इमारत, मुंबई महानगरपालिका मुख्यालय,**
**महापालिका मार्ग, मुंबई-१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक(एमसीसी),**
**बृहनमुंबई महानगरपालिका,खोली क्र.४६, १ला माळा,**
**जुनी इमारत, मुंबई महानगरपालिका मुख्यालय,**
**महापालिका मार्ग, मुंबई-१. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : १२.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १३.१.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी अनुपस्थित**

अपिलकर्ता यांनी दि.१३.४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय यांच्याकडे अर्ज करुन मा.आयुक्तांनी जनतेच्या घेतलेल्या भेटीगाठीच्या संदर्भात श्री. जॉनी जोसेफ यांच्या नियुक्तीपासून आजमितीपर्यंत एकूण ४ मुद्यांमध्ये श्री.जॉनी जोसेफ तसेच डॉ.फाटक व श्री.स्वाधीन क्षेत्रीय यांच्या कालावधीतील वरील विषयाच्या संदर्भात तसेच त्यांनी दि.२२.३.२०१० रोजी मा.आयुक्तांना लिहिलेल्या पत्राच्या सद्यस्थितीची माहिती, माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.६.५.२०१० रोजी महापालिका आयुक्तांच्या कार्यालयात मा.आयुक्तांना भेटण्यास येणारे अभ्यागत तसेच शिष्टमंडळाचे प्रतिनिधी/अधिकारी यांच्या भेटीच्या केलेल्या तात्पुरत्या नोंदी या अभिलेखात मोडत

नसल्यामुळे अभिलिखित करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही त्यामुळे याबाबत माहिती देता येत नाही व अर्जदाराच्या दि.२२.३.२०१० रोजी दिलेल्या पत्राच्या संदर्भात विषय संदर्भ नमूद केल्यास त्या अनुषंगाने सदर पत्राची सद्यस्थिती कळविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते.त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.१७.५.२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२१.६.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य आहे तसेच अर्जदाराच्या दि.२३.३.२०१० रोजीच्या पत्राच्या संदर्भात आवक-जावक विभागाकडून एमसीजीसी विभागास पत्र पाठविण्यात आले होते व एमसीजीसी विभागात सध्या ते पाप्त होत नसल्याने व श्री.गलगली यांनी सदर पत्राची प्रत देण्याचे मान्य केल्याने त्यांच्या अर्जातील बाब क्र.५ ची माहिती श्री.गलगली यांना १५ दिवसाचे आत पुरविण्यात यावी असे आदेश देण्यात येऊन अपील निकाली काढण्यात आले आहे. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आह. परंतु अपिलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे दि.२२.३.२०१० रोजीच्या पत्राची प्रत दिली याबद्दल कोणताही उल्लेख केलेला नाही.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, महानगरपालिका आयुक्त यांना भेटण्यासाठी जे अभ्यागत येतात त्यांच्या नोंदी ठेवणे आवश्यक आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे माहिती उपलब्ध असल्यास ती पुरविणे अपेक्षित असते. त्याबाबतची माहिती ही जतन करणे आवश्यक आहे किंवा नाही याबद्दलचा निर्णय हा संबंधीत प्राधिकरणाने घेणे आवश्यक असते. मा.आयुक्त,महानगरपालिका यांना दैनंदिन कामकाजाच्या संदर्भात अनेक नागरिक व लोकप्रतिनिधी भेटत असतात त्यामुळे त्या संदर्भात नोंदी ठेवण्याची आवश्यकता आहे असे दिसून येत नाही. मात्र ज्या व्यक्तींनी मा. आयुक्तांची भेट लेखी पत्रानुसार मागीतली असेल तर त्यांच्या लेखी पत्रावर मा.आयुक्तांनी काय आदेश दिलेले आहेत व त्या संदर्भातील कागदपत्र उपलब्ध असतील तर अपिलकर्ता यांना ती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. यास्तव अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

**१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत अभ्यागतांनी मा.आयुक्त महानगरपालिका यांची लेखी स्वरुपात भेट मागितली असल्यास व त्या संदर्भात**

मा.आयुक्तांनी काही आदेश दिलेले असल्यास, ती कागदपत्र उपलब्ध असल्यास त्याच्या छायांकित प्रती टपालाने पुरविण्यात याव्यात व उपलब्ध नसल्यास तसेही कळवावे.
२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई (विलास पाटील)
दिनांक १३.१.२०११ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/४९९६१/अपील क्रमांक ६२४४/२०१०**

**श्रीमती अफताब सिद्दिकी,**
**४-सदानंद क्लासिक, प्लॉट नं.५२८,**
**३३वा रस्ता, खार(प.), मुंबई-४०००५२. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता,**
**इमारत प्रस्ताव(प.उपनगरे),एच विभाग,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, भाभा हॉस्पीटल बिल्डिंग,**
**आर.के.पाटकर मार्ग,बांद्रा(प.),**
**मुंबई-४०००५०.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**इमारत प्रस्ताव(प.उपनगरे),एच विभाग,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, भाभा हॉस्पीटल बिल्डिंग,**
**आर.के.पाटकर मार्ग,बांद्रा(प.),**
**मुंबई-४०००५०. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ४.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १७.१.२०११**
**अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२३.४.२०१० रोजी अर्ज करुन बांद्रा, खार, सांताक्रुझ(प.) (एच-प. विभाग) या भागातील नव्याने पुनर्विकास केलेल्या इमारतींच्या संदर्भात कलम ६४(बी) मधील मंजुरी तसेच ओसीच्या संदर्भात रकान्यांमध्ये माहिती उपलब्ध करुन द्यावी अशी माहिती मागीतलेली दिसते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२१.५.२०१० रोजी उत्तर देण्यात आले असून नवीन प्रस्तावांच्या संदर्भात इमारतींच्या रजिस्टर फाईलमध्ये अभिलेखे भागामध्ये माहिती उपलब्ध आहे परंतु

डीसीआर १९९१च्या कलम ६४(बी) संदर्भात स्वतंत्र अशी माहिती ठेवण्यात आलेली नाही. तसेच ओसी दिलेली नाही अशाप्रकारच्या इमारतींचे प्रस्ताव स्वतंत्रपणे यादी ठेवण्यात आलेली नाही व अशाप्रकारे एकत्रित यादी करुन देणे हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदींप्रमाणे अपेक्षित नाही व त्यामुळे आपणास तशी माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही. एखाद्या विशिष्ट नस्तीच्या संदर्भात माहिती हवी असल्यास ती आपणास उपलब्ध करुन देता येईल असे कळविण्यात आले आहे. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.१४.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भात दि.९.७.२०१० रोजी निर्णय देण्यात आला असून स्वतंत्र असे कोणतेही रजिस्टर नाही तसेच अभिलेखेसुध्दा स्वतंत्र ठेवण्यात आले नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. विशिष्ट इमारतीच्याबाबत माहिती उपलब्ध करुन देता येईल तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना नंतर दि.२९.५.२०१० रोजी प्लॉट न.४९७,७०४, १४वा रस्ता,लिंकिंग रोडच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयागापुढे असे सांगितले की, मुंबईमध्ये ज्या इमारतींचा पुनर्विकास केला जातो त्या इमारतींच्या संदर्भात अद्यापपर्यंत ओसी दिल्या गेलेल्या नाहीत व त्यामुळे त्या पुनर्विकासामध्ये किती एफएसआय दिलेला आहे व किती इमारतींच्या संदर्भात अवैध बांधकाम केलेले आहे ते कळून यत नाही व वर्षानुवर्षे अशाप्रकारची परिस्थिती राहिल्यानंतर त्यांना नियमित करण्याचा प्रयत्न केला जातो व त्यामुळे ओसी दिली जात नाही व त्याबद्दलची माहिती ही महानगरपालिकेमध्ये उपलब्ध नसणे याचा अर्थ विकासकांना मदत करणे असा होतो व त्याबाबत अधिका-यांचासुध्दा सहभाग आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी माहिती मागीतलेली आहे ती अतिशय जुनी आहे. ३०-३५ वर्षांपूर्वीच्या माहितीचासुध्दा त्यात समावेश आहे व त्या संदर्भात संपूर्ण नस्तीमधून माहिती काढून उपलब्ध करुन देणे सर्वस्वी अशक्य आहे व कोणत्या इमारतींना ओसी दिली व कोणत्या इमारतींना ओसी दिली गेली नाही अशाप्रकारचे विवरण हे विभागामध्ये ठेवण्यात येत नाही. ओसी दिल्यावर फाईल बंद केली जाते व ओसी दिली गेली नसेल तर ती नस्ती खुली असते. परंतु जे आराखडा रजिस्टर आहे त्या आराखडा रजिस्टरमध्ये संपूर्ण रकान्याप्रमाणे प्रस्ताव आल्यापासून त्यात कोणकोणत्या प्रकारची कारवाई झाली आहे उदा.आयओडी,एनओसी,सीसी व ओसी अशाप्रकारच्या नोंदी त्यात केल्या जातात व त्या संदर्भातील नोंदी संबंधीत

रजिस्टरच्या छायांकित प्रती अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देता येतील व त्यावरुनच त्यांना किती इमारतींना ओसी दिली गेली किंवा दिली गेली नाही ही माहिती उपलब्ध होऊ शकेल. परंतु सदरचे रजिस्टर हे नेहमीच्या आकाराचे नसून मोठया आकाराचे आहे व त्या सर्व रजिस्टरच्या संदर्भात छायांकित प्रति काढावयाचे झाल्यास ते अतिशय खर्चिक होईल. परंतु अपिलकर्ता यांनी ज्या नमुन्यात माहिती उपलब्ध करुन द्यावी असा आग्रह धरलेला आहे त्या नमुन्यात माहिती उपलब्ध करुन द्यावयाचे झाल्यास ती माहिती तयार करुन द्यावी लागेल व माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदींप्रमाणे माहिती तयार करुन देणे अपेक्ष्ति नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम २(च)मधील माहिती या संज्ञेची व्याख्या त्यांच्या निदर्शनास आणली आहे.त्याच अधिनियमाच्या कलम २(त्र) मध्ये माहितीचा अधिकार या संज्ञेची व्याख्या करण्यात आली असून त्यात सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणात असलेली व या अधिनियमान्वये मिळवता येण्याजोगी माहिती मिळविण्याचा अधिकार त्यामध्ये एखादे काम,दस्तऐवज,अभिलेखे यांची पहाणी करणे,दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखांच्या टिप्पण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रती घेणे, सामग्रीचे प्रमाणित नमुने घेणे,डिस्केट,फ्लॉपी,टेप,व्हिडीओकॅसेट या स्वरुपातील किंवा कोणत्याही अन्य इलेक्ट्रॉनिक प्रकारातील किंवा जेव्हा अशी माहिती संगणकात किंवा अन्य कोणत्याही उपकरणात साठवलेली असेल त्याबाबत मुद्रित प्रति मिळविणे याबाबतच्या अधिकाराचा समावेश होतो व त्याप्रमाणे त्यांनी निरिक्षण घेऊन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. तसेही अधिनियमाच्या कलम ७(९) अन्वये माहिती तयार करुन द्यावयाची असल्यास सार्वजनिक प्राधिकरणाची यंत्रणा प्रमाणाबाहेर वळवावी लागत नसल्यास माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक असते परंतु अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही अतिशय व्यापक प्रमाणात असल्यामुळे रकान्यांमध्ये उपलब्ध करुन देता येणार नाही. त्याकरीता संबंधित रजिस्टरच्या छायांकित प्रती घेणे किंवा निरिक्षण घेणे संयुक्तिक राहील त्यातून त्यांना अपेक्षित माहिती काढून घेता येईल.

जन माहिती अधिकारी यांनी वरीलप्रमाणे ज्या तरतुदींचा उल्लेख केलेला आहे त्या तरतुदींप्रमाणेच माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या अंमजबजावणीची कार्यवाही करता येईल. विभागामध्ये ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध असेल त्या स्वरुपातच ती उपलब्ध करुन देणे अपेक्षितअसते त्यामुळे ज्या रजिस्टरमध्ये इमारतीच्या बांधकामाच्या संदर्भात प्रत्येक रकान्यात प्रत्येक स्तरावरील कार्यवाहीच्या संदर्भात जर नोंदी केलेल्या असतील तर त्या रजिस्टरच्या पृष्ठांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक

राहील किंवा निरिक्षण घेऊन अपिलकर्ता यांनी नोंदी करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१) अपिलकर्ता यांचे अपिल अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसाच्या आत अपिलकर्ता यांना संबंधित रजिस्टरचे निरिक्षण करुन त्यांना आवश्यक वाटतीलअशा पृष्ठांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घ्याव्यात. त्याकरीता अपिलकर्ता यांनी कामकाजाच्या दिवसाची तारीख व वेळ जन माहिती अधिकारी यांना लेखी कळवून संबंधीन नस्तीचे/रजिस्टरचे निरिक्षण करुन आवश्यक त्या पृष्ठांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घ्याव्यात.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक १७.१.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०२२६/अपील क्रमांक ६२४३/२०१०**

**श्री.विजय नारायण भांबुरे,**
**७/१७, जवाहर सोसायटी, गोविंद नगर,**
**सोडावाला लेन, बोरीवली(प.), मुंबई-४०००९२. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/सेंट्रल वाड, २रा मजला,**
**म्युनिसिपल मार्केट बिल्डिंग, एस.व्ही.रोड,**
**बोरीवली(प.),मुंबई-४०००९२.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इ.वका.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/सेंट्रल वाड, २रा मजला,**
**म्युनिसिपल मार्केट बिल्डिंग, एस.व्ही.रोड,**
**बोरीवली(प.),मुंबई-४०००९२. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २८.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १७.१.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२२.७.२०१० रोजी गोविंद नगर निवासी भागामध्ये अवैध वाहनतळ राणा सामन या व्यक्तीकडून वापरला जात असल्याबाबत त्यांनी दि.२०.६.२०१० रोजी आर वार्ड ऑफीसर यांच्याकडे दि.२१.६.२०१० रोजी तारीख असलेली तक्रार कली होती. सदरच्या तक्रारीच्या संदर्भात राणा समन यांच्या संदर्भात काय कार्यवाही केली याबद्दलची माहिती त्यांनी मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.२१.८.२०१० रोजी अपिलकर्ता यांना राणा समन यांच्याविरुध्द

कोणत्याही प्रकारची कारवाई केलेली नाही असे कळविण्यात आले कारण त्यांच्या कार्यालयामध्ये अशाप्रकारच्या अवैध वाहनतळाच्या संदर्भात कोणतीही कागदपत्र उपलब्ध नाहीत. परंतु सदरच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.६.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२०.९.२०१० रोजी देण्यात आला असून त्यामध्ये अपिलकर्ता यांनी जी माहिती मागीतलेली आहे त्या माहितीचा संबंध हा सहाय्यक अभियंता(इमारत व कारखाने) आर-मध्य यांच्याशी नाही. तसेचअवैध वाहनतळ असेल तर सह आयुक्त(वाहतुक) यांच्याशी संबंधीत असल्यामुळे अपिलकर्ता यांनी त्यांच्याकडे संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी असा निर्णय झालेला दिसून येतो. त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, जवाहर सोसायटी गृह निर्माण संस्थेनेही दि.११.११.०५ रोजीसुध्दा अवैध वाहनतळाच्या संदर्भात तक्रार केली होती. त्यानंतर दि.२५.१०.०६ रोजीसुध्दा एक तक्रार करण्यात आली परंतु त्या तक्रारीच्या संदर्भात अद्यापपर्यंत कारवाई झालेली नसल्यामुळे त्यांनी माहितीच्या अधिकारात त्या तक्रारीवर  झालेल्या कार्यवाहीची माहिती मागीतलेली होती. परंत त्यांना दिशाभूल करणारे उत्तर दिलले आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा महानगरपालिकेचा संबंध नाही असा निर्णय दिलेला आहे. परंतु जी खुली जागा आहे व त्या खुल्या जागेचे महानगरपालिकेने संरक्षण करणे आवश्यक आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलकर्ता यांनी ज्या खुल्या जागेच्या संदर्भात तक्रार केलेली आहे ती खुली जागा खाजगी आराखडयाचा भाग आहे व त्या खाजगी लेआऊटच्या जागेच्या संदर्भात संबंधीत सहकारी गृहनिर्माण संस्थेनेच संरक्षण करणे आवश्यक आहे. पोलीस विभागसुध्दा रस्त्यावर अवैध वाहन पार्कींग केले असेल तर कारवाई करु शकतील परंतु खाजगी लेआऊटच्या जागेवर पोलीससुध्दा कोणत्याही प्रकारची कारवाई करणार नाहीत. असे असले तरी महानगरपालिकेचा संबंध नसल्यामुळे किंवा महानगरपालिकेची खाजगी लेआऊटच्या संदर्भात कोणतीही जबाबदारी नसल्यामुळे महानगरपालिकेत त्याबाबत कोणतीही कागदपत्र उपलब्ध नाहीत असे कळविलेले होते. त्यामुळेच त्यांच्या तक्रारीवर अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई झालेली नाही व तसे कळविण्यात आले आहे. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पुन्हा आयोगापुढे असे सांगितले की, सदरच्या खुल्या जागेच्या संदर्भात अतिक्रमण होत असल्यास सहकारी गृहनिर्माण संस्थेने त्याबाबत योग्य ती कारवाई करणे अपेक्षित असल्यामुळे सदरचे अपील निकाली

काढण्यास विनंती आहे. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे योग्य असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

**१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक १७.१.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/४९९६२/अपील क्रमांक ६२४५/२०१०**

**श्रीमती अफताब सिद्दिकी,**
**४-सदानंद क्लासिक, प्लॉट नं.५२८,**
**३३वा रस्ता, खार(प.), मुंबई-४०००५२. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता,**
**इमारत प्रस्ताव(प.उपनगरे), एच विभाग,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, भाभा हॉस्पीटल बिल्डिंग,**
**आर.के.पाटकर मार्ग, बांद्रा(प.),**
**मंबई-४०००५०.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**इमारत प्रस्ताव(प.उपनगरे), एच विभाग,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, भाभा हॉस्पीटल बिल्डिंग,**
**आर.के.पाटकर मार्ग, बांद्रा(प.),**
**मंबई-४०००५०. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ४.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १७.१.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी ९.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी(इमारत प्रस्ताव),भाभा हॉस्पीटलच्या शेजारी,बांद्रा(प.) यांच्याकडे गहाळ नस्त्या व नवीन नस्त्या या संगणकामध्ये(Auto DCR Software) समाविष्ट केल्या असतील तर त्याबाबत फाईल क्रमांक,तारीख,सीटीएस नंबर व एसआयसी ऑर्डरप्रमाणे नावे द्यावीत तसेच रेकॉर्डची स्वतंत्र यादी द्यावी,नवीन पुर्नविकासाच्या संदर्भातील नस्त्यांची संगणकामध्ये असलेली स्वतंत्र यादी द्यावी व ५००० इमारतींचे सीटीएस

नंबर, ओसी दिलेल्या इमारती व एकूण ६४(बी) प्रमाणे मान्यतेच्या संदर्भातही स्वतंत्र यादी द्यावी, माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद करुन माहिती मागीतलेली दिसून येते.

सदर अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना ३.८.२०१० रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम २(फ)प्रमाणे मागीतलेली माहिती ही कागदपत्रांच्या स्वरुपात व नकाशांच्या स्वरुपात आवश्यक तो खर्चाचा भरणा केल्यानंतर मिळू शकते. त्यात झेरॉक्स कॉपीज व डॉक्युमेंट्स-ॲक्च्युअल एक्सपेन्सेस ऑफ झेरॉक्स,झेरॉक्स कॉपीज ऑफ प्लॅन-ॲक्च्युअल एक्सपेन्सेस ऑफ झेरॉक्स,सर्टिफाईड कॉपीज ऑफ डॉक्युमेंट्स-ॲडीशनल रु.२५/- पर कॉपी,सर्टिफाईड कॉपीज ऑफ प्लॅन-ॲडीशनल रु.६०/- पर कॉपी तसेच मा.मुख्य आयुक्त यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे गहाळ झालेल्या नस्त्यांच्या संबंधात संबंधीत कनिष्ठ अभियंता हे यादी तयार करीत आहेत, सदरची यादी त्यांच्याकाडून उपलब्ध होऊ शकेल. तसेच नवीन प्रस्तावांच्या संदर्भात प्रस्ताव ऑटो डीसीआर सॉफ्टवेअरने स्विकारले जातात व इमारत फाईल रजिस्टरमध्ये ठेवले जातात व त्यामुळे आपण सदरच्या रेकॉर्डचे निरिक्षण ३ ते ५ या वेळेच्या दरम्यान घ्यावे व त्यामध्ये आवश्यक असतील त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती मिळतील असे नमूद केलेले आहे. निरिक्षणाची फी त्यांनी त्यात दिलली आहे परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.१२.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय १७.९.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांनी व्यक्तीश: माहिती मागीतली असल्यामुळे त्यांनी स्वत: हजर राहून माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे व जन माहिती अधिकारी यांनी असलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारचा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना अद्यापपर्यंत कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही. तसेच निरिक्षण घेण्याची आवश्यकता नाही व त्यांनी मागीतलेली माहिती त्यांना उपलब्ध करन देणे आवश्यक आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, मुख्य माहिती आयुक्त यांच्या दि.५.६.०९च्या आदेशाप्रमाणे गहाळ झालेल्या नस्त्यांच्याबाबत यादी तयार करणे सुरु आहे व ती यादी तयार केल्यावर ती अपिलकर्ता यांना पुरविण्यात आली आहे.तसेच गहाळ झालेल्या नस्त्यांचे एक स्वतंत्र रजिस्टर तयार करण्यात आले आहे व ते सुध्दा त्यांना उपलब्ध करुन देण्यात आले आहे. गहाळ झालेल्या नस्त्यांच्या संदर्भात आयुक्त, महानगरपालिका यांना सर्व इमारत प्रस्ताव हे स्कॅन करुन घेण्याकरीता मान्यता दिलेली आहे. त्याप्रमाणे टेंडर मागविण्यात आले आहे व एक टेंडर मंजूर करण्यात आलेआहे. नस्त्यांचे स्कॅनींग करण्याचे काम कांदिवली बिल्डिंग येथील इमारत प्रस्ताव विभागात सुरु आहे व तसेच इतर इमारत प्रस्ताव विभागातसुध्दा सुरु होतील असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. यावरुन अपिलकर्ता यांच्या प्रयत्नांमुळे व आयोगाच्या आदेशाप्रमाणे महानगरपालिकेमध्ये गहाळ नस्त्यांच्या संदर्भात यादी तयार करण्याचे काम सुरु झालेले दिसून येते. अपिलकर्ता यांनी ही माहिती उपलब्ध करुन दिली असे जरी आयोगापुढे सांगितले असले तरी ती कोणत्या कालावधीतील माहिती उपलब्ध करुन दिली ते सांगितले नाही त्यामुळे अपिलकर्ता यांना

गहाळ नस्त्यांची यादी सुरु करण्याचे कामकाज जेव्हापासून सुरु झालेले आहे तेव्हापासून आजपर्यंतची जी यादी तयार झाली असेल ती यादी, तसेच बांद्रा कार्यालयात जर तशी यादी तयार करण्याचे काम सुरु झाले असेल तर ती यादी तसेच संगणकामध्ये जर सांख्यिकी माहिती समाविष्ट केली असेल तर त्याबाबतची फ्लॉपी अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात यत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत अपिलकर्ता यांना गहाळ नस्त्यांच्या संदर्भात जे यादी तयार करण्याचे काम सुरु आहे त्याप्रमाणे आजपर्यंत जी यादी तयार झालेली आहे त्या यादीच्या छायांकित प्रती तसेच संगणकामध्ये जर सदरची माहिती समाविष्ट करण्यात आली असेल तर त्याबाबत फ्लॉपी किंवा सीडी या अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन द्याव्यात.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** — **(विलास पाटील)**

**दिनांक १७.१.२०११** — **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/४९९६३/अपील क्रमांक ६२४६/२०१०**

**श्रीमती अफताब सिद्दिकी,**
**४-सदानंद क्लासिक, प्लॉट नं.५२८,**
**३३वा रस्ता, खार(प.), मुंबई-४०००५२. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता,**
**इमारत प्रस्ताव(प.उपनगरे), एच विभाग,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, भाभा हॉस्पीटल बिल्डिंग,**
**आर.के.पाटकर मार्ग, बांद्रा(प.),**
**मंबई-४०००५०.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**इमारत प्रस्ताव(प.उपनगरे), एच विभाग,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, भाभा हॉस्पीटल बिल्डिंग,**
**आर.के.पाटकर मार्ग, बांद्रा(प.),**
**मंबई-४०००५०. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ४.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १७.१.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.१३.४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी (इमारत प्रस्ताव),बांद्रा(प.) यांच्याकडे अर्ज करुन बांद्रा,खार,सांताक्रुझ(प.)(एच-वेस्ट वार्ड) या भागात जुन्या इमारतींच्या पुर्नविकासाच्या संदर्भात कलम ६४(बी) ची मान्यता आहे त्याबद्दलची माहिती आजपर्यंत द्यावी अशाप्रकारे माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.११.५.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिली परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी १४.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.९.७.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती कार्यालयात कागदपत्र,

रजिस्टर किंवा बूक या माध्यमातून उपलब्ध नाही व त्यामुळे त्यांना प्रती उपलब्ध करुन देता येत नाहीत. Information regarding the sanction under Sec.६४-B for any specific case should be given to the Appellant तसेच प्लॉट नं.४९७,७०४ ऑन २४th road & linking Rd.ची माहिती त्यांना उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की कोणत्याही इमारतीच्या पुर्नविकासाच्या संदर्भात कलम ६४(बी)च्या संदर्भात मा.आयुक्तांची परवानगी घ्यावी लागते व अशा किती इमारतींच्या संदर्भात परवानगी घेण्यात आली आहे त्या सर्वांची यादी कागदपत्रांच्या स्वरुपात त्यांनी मागीतली होती परंतु जन माहिती अधिकारी यांनी असे कळविले आहे की, कलम ६४(बी) ऑफ डीसीआर १९९१च्या संदर्भात कोणत्याही प्रकारची स्वतंत्र अशी यादी किंवा रजिस्टर ठेवण्यात आलेले नाही. ज्या ज्या वेळेस मा. आयुक्त यांच्याकडे कलम ६४(बी)अन्वये प्रस्ताव मान्यतेसाठी पाठवले जातात त्यावेळेस त्या नस्तीमध्ये त्याचे वर्णन असते परंतु निर्गमित करण्याच्या रजिस्टरमध्ये त्याबाबत कोणताही उल्लेख केलेला नसतो व मा.आयुक्तांकडे ज्या ज्या नस्त्या पाठविल्या जातात त्या नस्त्या वेगवेगळया विषयाच्या असतात परंतु विषयाची नोंद न घेता सदरच्या वेगवेगळया विषयाच्या नस्त्या एकत्रितरित्या मा. आयुक्त यांच्याकडे निर्गमित केल्या एवढीच नोंद असते. त्यामुळे एखादी विशिष्ट नस्ती कलम ६४(बी)च्या मंजुरीकरीता पाठविण्यात आली आहे अशी माहिती उपलब्ध होऊ शकत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम त्र मध्ये माहितीचा अधिकार या संज्ञेची व्याख्या केलेली असून त्यामध्ये सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणात असलेल्या व या अधिनियमान्वये मिळविता येण्याजोगी माहिती मिळविण्याचा अधिकार व माहिती या शब्दाची व्याख्या कलम २(च)प्रमाणे केलेली आहे त्यामध्ये कार्यालयाच्या साहित्याच्या स्वरुपात उदा.कागदपत्र,अभिलेख,दस्तऐवज,परिपत्रके,संविदा इत्यादीच्या स्वरुपात जी कागदपत्र उपलब्ध असतात त्याचा समावेश होतो व त्या माहितीचे म्हणजेच अभिलेख्यांचे,दस्तऐवजांचे निरिक्षण करुन छायांकित प्रती घेणे असा माहितीचा अधिकार आहे व त्याप्रमाणे त्यांना कळविलेले असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही केलेली आहे. परंतु अपिलकर्ता यांची तक्रार अशी आहे की, इमारत बांधकाम व प्रस्ताव या विभागामध्ये माहिती लपविण्याची जास्त प्रवृत्ती असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन दिली जात नाही. परंतु माहिती संकलीत केलेली असेल तरच ती उपलब्ध होते, माहिती संकलीत करुन उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही. माहिती संकलीत करणे आवश्यक आहे हे अपिलकर्ता यांचे म्हणणे मान्य आहे परंतु जर ती संकलीत केलेली नसेल तर ती उपलब्ध करुन देता येणार नाही कारण जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की ती संपूर्ण माहिती वेगवेगळया नोंदवहयांमध्ये असते व त्यातही जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले की सर्व माहिती जर संकलीत करुन द्यावयाची असेल तर त्याकरीता शासकीय यंत्रणा प्रमाणाबाहेर वळवावी लागेल व तसे अधिनियमाच्या कलम ७(९) प्रमाणे अपेक्षित नाही. अपिलकर्ता यांनी बिल्डिंग

नं.४९७,७०४,२४वा रस्ता, लिंकिंग रोडच्या संदर्भात त्यांना माहिती हवी आहे असे जे प्रथम अपीलाच्या संदर्भात म्हटलेले आहे ते त्यांच्या मूळ अर्जात नाही. त्यांनी प्रथम अपीलासोबत स्वतंत्र अर्ज देऊन ती माहिती मागीतलेली दिसून येते. त्याप्रमाणे त्यांना ती मााहिती उपलब्ध करुन देण्याकरीता कळविलेले आहे. सदर माहिती त्यांना ज्या नमुन्यात अपेक्षित आहे त्या नमुन्यात संकलीत केलेली नसल्यामुळे ती त्यांना  उपलब्ध करुन देता येणार नाही असे त्यांनी आयोगापुढे पुन्हा सांगितले व ती आता पुन्हा संकलीत करुन देणेसुध्दा शक्य होणार नाही. परंतु संगणकात जर ती माहिती समाविष्ट केलेली असेल तर त्या संदर्भातील फ्लॉपी किंवा सीडी त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांनी कळविण्याप्रमाणे निरिक्षण करावे व माहिती उपलब्ध करुन घ्यावी किंवा विशिष्ट इमारतींच्या संदर्भात माहिती मागीतलेली आहे ती माहिती त्यांना व्यक्तीशः उपलब्ध करुन द्यावी. त्याकरीता अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क साधून त्यांना अपेक्षित असलेली माहिती छायांकित प्रतींच्या स्वरुपात उपलब्ध करुन घ्यावी. सदरची माहिती फ्लॉपी किंवा सीडीच्या स्वरुपात उपलब्ध असेल तर त्याप्रमाणे ती अपिलकर्ता यांना देण्यात यावी.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक १७.१.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**
**क्रमांक-मुमाआ/४९९६४/अपील क्रमांक ६२४७/२०१०**

**श्रीमती अफताब सिद्दिकी,**
**४-सदानंद क्लासिक, प्लॉट नं.५२८,**
**३३वा रस्ता, खार(प.), मुंबई-४०००५२. ..... अपिलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता,**
**इमारत प्रस्ताव(प.उपनगरे), एच विभाग,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, भाभा हॉस्पीटल बिल्डिंग,**
**आर.के.पाटकर मार्ग, बांद्रा(प.),**
**मंबई-४०००५०.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**इमारत प्रस्ताव(प.उपनगरे), एच विभाग,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, भाभा हॉस्पीटल बिल्डिंग,**
**आर.के.पाटकर मार्ग, बांद्रा(प.),**
**मंबई-४०००५०. ...... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ४.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १७.१.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२७.४.२०१० राजी जन माहिती अधिकारी इमारती व प्रस्ताव या विभागाकडे अर्ज करुन List of buildings proposed/Developed by HICONS DEVELOPER बाबतची माहिती आजपर्यंत द्यावी अशी मागणी केली आहे. या संदर्भात सर्व इमारतींचा नवीन सीटीएस नंबर,फाईल नंबर, आर्किटेक्टची नावे, ओसी च्या संदर्भात माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने

दि.१७.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना It is expected that as per section २(f) of RTI Act,२००५, desired information can be made available to you in the form of copies of documents and plans on payment of necessary charges as prescribed by this office in addition to actual Xerox charges which shall be borne by you. However it is to inform you that developerwise separate file register is not maintained by this office and hence, it is regretted that the desired information cannot be furnished to you at this stage असे कळविले आहे. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.१४.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.९.७.२०१० रोजी देण्यात आला असून त्यात अपिलकर्ता यांनी ज्या स्वरुपात माहिती मागीतलेली आहे त्या स्वरपात ती उपलब्ध करुन देता येणार नाही. परंतु विशिष्ट प्रकरणामध्ये जर माहिती मागीतली असेल तर ती त्यांना उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, विकासक हायकॉन डेव्हलपर यांनी ज्या ज्या इमारतींचा विकास केलेला आहे त्याबाबतची माहिती उपलब्ध करुन दिली पाहिजे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, विकासकाच्या नावाप्रमाणे माहितीची नस्ती जतन केली जात नाही. नस्ती जतन करण्याचे एक विशिष्ट असे तंत्र असते व त्याप्रमाणे नस्त्या जतन केल्या जातात व कोणत्याही व्यक्तीच्या कल्पनेप्रमाणे माहिती उपलब्ध होऊ शकत नाही. एखाद्या इमारतीच्या संदर्भात विकासक बदलत असतात,आर्कीटेक्टही बदलत असतात त्यामुळे त्याप्रमाणे यादी तयार करणे किंवा नस्ती जतन करणे हे सर्वस्वी अशक्य आहे. विकासक मुंबईमध्ये कोणत्याही भागात अनेक ठिकाणी विकासाची कामे करीत असतात त्यामुळे तशा पध्दतीने माहिती जतन करणे हे व्यवहार्य नाही. त्यामुळे अपिलकर्ता यांना ज्या विशिष्ट प्रकरणामध्ये माहिती उपलब्ध करुन हवी असेल त्याचा तपशील दिल्यास त्यांना माहिती उपलब्ध करुन देता येईल व तसे प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा आदेश दिलेले आहेत. सदरच्या माहितीच्या अर्जामध्ये अपिलकर्ता यांनी विशिष्ट प्रकरणाची माहिती मागितली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.
२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई (विलास पाटील)
दिनांक १७.१.२०११ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक-मुमाआ/५०१०७/अपील क्रमांक ६२४८/२०१०**

**श्री.दिगंबर शंकर गायकवाड,**
**ई-१-१-बी-९, वृंदावन सोसायटी,**
**सेक्टर-१०, नेरुळ, नवी मुंबई-४००७०६. ..... अपिलकर्ता**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य अधिकारी/सं.गा.,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मडळ,**
**गृहनिमाण भवन, वांद्रे(पूर्व),**
**मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक/सं.गा.,**
**कक्ष क्र.३०७,२रा मजला,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मडळ,**
**गृहनिमाण भवन, वांद्रे(पूर्व),**
**मुंबई-४०००५१. ...... उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : १५.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक : १७.१.२०११**
**अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दि.२२.३.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ अभियंता,म्हाडा,बांद्रा(पूर्व) यांच्याकडे इमारत क्र.१५,खोली क्र.११६४,एम.एच.बी. कॉलनी,गोराई रोड,बोरीवली या रुमधारकास कधी व कोणत्या इमारतीमधून ट्रान्सफर केले त्याची तारीख व ट्रान्सफर करण्याचे कारण,पूर्वीच्या इमारतीचा संपूर्ण पत्ता,खोली पूर्वी कोणाच्या नावावर होती,त्यात पोटभाडेकरु होते काय, अन्य कोणाचे रेशनींग कार्ड होते काय याबद्दलची माहिती देण्यात यावी अशी विनंती केली आहे. सदरच्या अर्जाच्या

अनुषंगाने दि.४.८.२०१० रोजी संबंधित कार्यकारी अभियंता ग(उत्तर) यांच्याकडून कार्यालयीन दफ्तर शोधले असता त्याची नोंद या कार्यालयात उपलब्ध नसल्याचे सांगितले. तसेच या कार्यालयात शोध घेतला असता त्या संबंधित दस्तावेज उपलब्ध नाहीत असे कळविल्याचे दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी ६.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२४.९.२०१० रोजी देण्यात आला असून संक्रमण गाळयाचा वापर हा उपकर प्राप्त इमारतीमधील रहिवाशांचे तात्पुरते स्थलांतरासाठी केला जातो. त्यामुळे तेथील रहिवाशांची वास्तव्य स्थिती बदलत असते. अर्जदारास जन माहिती अधिकारी यांनी १९७१ ते १९८१ या कालावधीची माहिती उपलब्ध नसल्याचे कळविले आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, सदरची माहिती जुनी असली तरी त्यांना ती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. सदरची माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे असे श्री.टंकसाळे यांनी सांगितले. परंतु श्री. कांबळे यांनी ती माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही असे सांगितले. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, मुंबईमध्ये दुरुस्ती मंडळ हे १९७७ पर्यंत स्वतंत्र होते. १९७७च्या अधिसुचनेप्रमाणे ते म्हाडामध्ये विलिन करण्यात आले तसेच नस्ती/अभिलेखे १९८१ पर्यंत आलेले आहेत व त्यानंतर ते आलेले नाहीत. असे असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने सदरची माहिती ही कार्यकारी अभियंता ग(उत्तर) यांच्या कार्यकक्षेतील असल्यामुळे त्यांनी दि.१६.४.२०१० चा अर्ज वर्ग केला होता. त्याप्रमाणे दि.११.५.२०१० रोजी कार्यकारी अभियता ग(उत्तर) यांनी मिळकत व्यवस्थापक यांच्याकडे सदर गोराई संक्रमण शिबीर या कार्यालयाकडे सप्टेंबर-२००९ मध्ये वर्ग करण्यात आलेले आहे. संदर्भ क्रमांक २ मध्ये अर्जदाराने मागितलेली माहिती ही सन १९७१ ते १९८१ या कालावधीतील आहे. या कालावधीतील दफ्तर या कार्यालयात उपलब्ध नाही. संदर्भ क्रमांक १ नुसार भाडेवसुलीकाराकडील सध्याची क्षेत्र नोंदवही सन २००८-०९ तील नोंदी व प्रत्यक्ष गाळयाच्या पाहणीतील कागदपत्रानुसार सदर इमारत क्रमांक १५ गाळा कमांक ११६४ हा श्री.बाबुराव एस.हळदे(भा)/सुमित्रा बा.हळदे(रहि) यांना दि.१३.४.२००० रोजी वितरित केल्याचे निदर्शनास येते. तरी सदर अर्जदाराने मागीतलेली माहिती १९७१ ते १९८१ या दरम्यानची असल्याने त्याबाबतच्या नोंदी आपल्या कार्यालयात असणे आवश्यक आहे. तरी त्याबाबतची माहिती अर्जदारास परस्पर देण्यात यावी असे कळविलेले दिसून येते व तसे अपिलकर्ता यांनाही कळविलेले

आहे. सहमुख्य अधिकारी यांनीसुध्दा आयोगापुढे खुलासा करतांना सन १९७१ ते १९८१ या कालावधीतील ती माहिती असून ती संक्रमण शिबीराच्या संदर्भातील असल्यामुळे व ती माहिती कायम स्वरुपी जतन करण्याची आवश्यकता नसल्यामुळे संपूर्ण कागदपत्र उपलब्ध होऊ शकत नाहीत असे सांगितले. असे असले तरी जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक यांनी पुन्हा एकवार सदर माहितीचा शोध घेऊन ती उपलब्ध झ ााल्यास अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.२२.३.२०१० च्या अर्जात मागितलेली माहिती पुन्हा एकवार शोध घेऊन ती उपलब्ध झाल्यास पुरविण्यात यावी.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक १७.१.२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्रमांक-मुमाआ/२०१०/तक्रार क्र. १५७७/का.१**

**श्री. प्रविण दत्तात्रय तळेकर,**
**ब्लॉक नं.१, साफल्य बिल्डिंग,**
**पांडुरंगवाडी मार्ग क्रमांक २, गोरेगाव(पूर्व),**
**मुंबई-४०००६३.** .... **तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,**
**नियंत्रक, गुरांचा बाजार,**
**नियंत्रक गुरे नियंत्रण योजना यांचे कार्यालय,**
**गोरेगाव(पूर्व), मुंबई-४०००६३.** .... **उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : १७.८.२००९**
**तक्रारीचा दिनांक : १८.१०.२०१०**
**तक्रारदार,तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित**

तक्रारदार हजर, तत्कालीन जन माहिती अधिकारी हजर, विद्यमान जन माहिती अधिकारी गैरहजर.

तक्रारदार यांनी दि.१८.१०.२०१० रोजी त्यांच्या अपिल क्र.२०१०/४६७५३/अपिल क्र.४७७३/०२ च्या दि.७.५.२०१० च्या निर्णयाप्रमाणे मााहिती मिळाली नाही व जी माहिती मिळाली ती चुकीची व दिशाभूल करणारी आहे

त्याकरीता त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८(१) प्रमाणे तक्रार दाखल केलेली आहे.

तक्रारदार यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांनी त्यांच्या मूळ अर्जात जी माहिती मागीतलेली आहे त्या माहितीच्या संदर्भात उत्तरेकडच्या दिशेने येणा-या पादचा-यांच्या मार्गात लोखंडी छोटे बार लावण्यात आले आहेत ते कोणाच्या आदेशावरुन लावण्यात आले आहेत त्याबद्दलच्या आदेशाची प्रत देण्यात यावी आणि सदरहु लोखंडी बार बेकायदेशीररित्या अन्यत्र कोणी लावले असतील तर ज्यांनी लोखंडी बार लावलेले आहे त्यांच्याविरुध्द कोणत्या प्रकारची कारवाई केलेली आहे त्याबद्दलची माहिती व आजपर्यंत अनेक तक्रारी केलेल्या आहेत त्या संदर्भातील माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. तत्कालीन जन माहिती अधिकारी हे आज उपस्थित झाले व त्यांनी विद्यमान जन माहिती अधिकारी आजारी असल्यामुळे व सदरची नस्ती त्यांच्याकडे असल्याने आज कागदपत्र उपलब्ध नाहीत व त्याबद्दल आयोगापुढे काहीही सांगता येत नाही असे सांगितले. यावरुन तक्रारदार यांनी मागीतलेली माहिती देण्यास तत्कालीन माहिती अधिकारी व विद्यमान माहिती अधिकारी यांनी टाळाटाळ केलेली आहे अशी आयोगाची खात्री झालेली आहे. आयोगाने संधी देऊनसुध्दा आयोगापुढे सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी किंवा त्या कार्यालयातील अधिकारी गंभीरपणे उपस्थित होत नाहीत त्यामुळे अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये तत्कालीन माहिती अधिकारी व विद्यमान माहिती अधिकारी यांच्याविरुध्द प्रत्येकी १००००/- रुपये शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१) तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांच्या दि.१७.८.०९ च्या अर्जात मागीतलेली माहिती तसेच दि.७.५.२०१० च्या आयोगाच्या निर्णयात आदेशित केल्याप्रमाणे माहिती दिलेली नसल्यामुळे व आजही आयोगापुढे तत्कालीन माहिती अधिकारी व विद्यमान माहिती अधिकारी यांनी समाधानकारक कागदपत्र दाखल केलेली नसल्यामुळे व तोंडी युक्तीवादही योग्यरित्या केलेला नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द प्रत्येकी रु.१०,०००/-ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरची शास्तीची वसुली त्यांच्या दरमहाच्या वेतनातून करण्यात यावी व ती लेखाशीर्ष क्र.००७-इतर**

प्रशासनिक सेवा ६०,इतर सेवा,८००,इतर जमा रकमा(१८) माहितीचा अधिकार(००७०० १६-१)खाली जमा करण्यात यावी.

२) सदर आदेशाची एक प्रत स्वतंत्रपणे आयुक्त,दुग्धव्यवसाय विकास विभाग,प्रशासकीय इमारत,अब्दुल गफारखान मार्ग, वरळी, मुंबई-१८ यांच्याकडे पाठविण्यात यावी.

३) सदर आदेशाची प्रत तकारदार व गैरतक्रारदार यांना पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई (विलास पाटील)
दिनांक ३१जानेवारी,२०११ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी

प्रत,
निवड नस्ती.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल**
**झालेली तक्रार**

**क्रमांक-मुमाआ/२०१०/४४३७०/तक्रार क्र. १२४९ व १२५०/का.१**

**श्री. विनोद आब्रोळ,**
**फ्लॅट नं.३/ए,दुर्गानिवास,**
**खारपाली रोड,खार(प.),**
**मुंबई-४०००५२.** .... **तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, आर.के.पाटकर माग,**
**वाद्रे, मुंबई-४०००५१.** .... **उत्तरवादी**

**<u>निर्णय</u>**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : ८.४.२००९**
**तक्रारीचा दिनांक : ८.२.२०१०**
**जन माहिती अधिकारी, तक्रारदार उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित**

तक्रारदार यांनी दि.८.२.२०१० रोजी मुमाआ/अपिल क्र.४३४९/२००९ मधील दि.९.६.२००९ च्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम १८(१) प्रमाणे आयोगाकाडे तक्रार दाखल केलेली आहे. सदरच्या तक्रारीच्या संदर्भातसुध्दा अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध झालेली नाही असे त्यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना सांगितले. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, दि.९.६.२००९ रोजी महापालिका आयुक्त यांनी नस्तीचे पुर्नगठन करण्यात येईल असे निवेदन आयोगासमोर केलेले होते. त्याप्रमाणे दोन महिन्यांच्या कालावधीत ते करावे असेही आदेश दिलेले आहेत. त्यापमाणे दोन नस्त्यांचे पुनर्गठन केलेले आहे व ती माहिती तक्रारदार यांना दिलेली आहे. परंतु तक्रारदार यांनी मागीतलेली माहिती ही अतिशय जुनी म्हणजे साधारणतः १९६० या वर्षातील असल्यामुळे व सदरच्या नस्त्या उपलब्ध होत नसल्यामुळे संबंधीत वास्तुशास्त्रज्ञ यांच्याशी संपर्क साधूनसुध्दा सदरच्या नस्त्या पुर्नगठीत करता आलेल्या नाहीत. मात्र तक्रारदार यांना त्यांनी युक्तीवाद केल्याप्रमाणे त्यांना त्यांच्या इमारतीमध्ये निवासी वापराच्या ऐवजी व्यापारी वापराच्या संदर्भात बदल करण्यात आल्याच्या

संदर्भात परवानगीची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. इतर सदनिकांच्या संदर्भात तशी परवानगी झालेली आहे किंवा नाही ते आढळून येत नाही व त्या संदर्भात तक्रारदार यांनी तपशीलात माहिती मागीतली असती किंवा स्वतंत्रपणे तक्रार केली असती तर त्या तक्रारीच्या संदर्भात चौकशी करुन योग्य ती कारवाई करता आली असती. माहिती अतिशय जुनी असल्यामुळे व प्रयत्न करुनही ती पुर्नगठीत करता येत नसल्यामुळेच माहिती देता आलेली नाही. परंतु जे आराखडे उपलब्ध आहेत ते त्यांना दिलेले आहेत. त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यास मुद्दाम टाळाटाळ होत आहे असे नाही. त्यावर तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की जर नस्त्या पुर्नगठीत करता येत नसतील तर तसे त्यांना लेखी स्पष्टपणे कळवावे तसेच नस्त्या गहाळ झाल्याबद्दल पोलीसांकडे एफआयआर दाखल करावा. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१)तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना नस्ती पुर्नगठीत झाल्या असतील तर तशी माहिती द्यावी अन्यथा प्रयत्न करुनही नस्त्या पुर्नगठीत करता येत नाहीत असे स्पष्टपणे कळवावे व गहाळ नस्त्यांसंबंधी पोलीसांकडे एफआयआर दाखल करावा.**

**२) सदर आदेशाची प्रत तक्रारदार व गैरतक्रारदार यांना पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** | **(विलास पाटील)**
**दिनांक ३१जानेवारी,२०११** | **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्रमांक-मुमाआ/२०१०/तक्रार क्र. १६३२/का.१**

**श्री. अनिल अग्रवाल,**
**डी-४०३, वीणा नगर,एस.बी.आय.समोर,**
**एस.व्ही.रोड, मालाड(प.),**
**मुंबई-४०००६४. .... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव(का.३),**
**विधी व न्याय विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२. .... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक :**
**तक्रारीचा दिनांक : ३१.१०.२०१०**
**जन माहिती अधिकारी उपस्थित, तक्रारदार, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित**

सुनावणीसाठी तक्रारदार गैरहजर असून जन माहिती अधिकारी हजर आहेत. तक्रारदार यांनी दि.१५.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी विधी व न्याय विभाग यांच्याकडे मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि.१.२.२००५ रोजीच्या Ksl and Industries Ltd., विरुध्द मन्नालाल खंडेलवार अँड द स्टेट ऑफ महाराष्ट्र या प्रकरणी दिलेल्या निर्णयाप्रमाणे केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाची प्रत मागितलेली दिसून येते. त्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे खुलासा करतांना सदरहु आदेश न्यायाधिशांच्या नेमणुकीसंदभात होते. त्या संदर्भात तक्रारदार यांनी याचिका क्रमांक व वर्ष दिलेले नव्हते. विभागाकडून व विविध कार्यासनांकडुन न्यायाधिशांच्या नेमणुकांचे आदेश काढण्यात येतात व त्याकरीता यचिका क्रमांक तसेच वर्ष व शक्य असल्यास न्याय निर्णयाची प्रत उपलब्ध करुन देण्यात यावी जेणेकरुन त्यांना जी माहिती हवी आहे ती उपलब्ध करुन देता येइल असे दि.९.७.२०१० च्या पत्राद्वारे तक्रारदारास कळविण्यात आले होते. परंतु तक्रारदार यांनी पुन्हा दि.१५.६.२०१० च्या पत्राप्रमाणेच माहिती दिली व त्यानंतर २८.९.२०१० च्या पत्राद्वारे दि.१०.१०.२०१० रोजी दुपारी ३.०० वाजता प्रत्यक्ष भेटून माहिती घेण्याबाबत

कळविण्यात आले. परंतु त्यांनी २२.७.२०१० (कार्यासनास दि.१२.१०.२०१० रोजी प्राप्त)रोजीच्या पत्राद्वारे सदर याचिकेचा क्रमांक क्रिमिलर याचिका क्र.११२८/२००४ असा कळविला. सदर क्रमांकावरुन इंटरनेटवरुन निकालाची प्रत उपलब्ध करुन घेण्यात आली असता मा.मुख्य सचिव तथा महाप्रबंधक यांना परक्राम्य लेख अधिनियम १९८१च्या कलम १३८ खाली दाखल झालेले व प्रलंबित असलेले खटले निकालात काढण्यासाठी दिवाणी न्यायाधीश(कनिष्ठ स्तर)व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांची १०० पदे,सहाय्यभूत कर्मचारी वर्गासह निर्माण करण्याबाबत आदेश देण्यात आले होते. सदर विषय हा या कार्यासनाशी संबंधीत नव्हता. सदर माहिती त्या कार्यासनाकडून प्राप्त झाल्यावर तक्रारदार यांना दि.१०.११.२०१० च्या पत्राद्वारे विनाशुल्क देण्यात आलेली आहे. परंतु तक्रारदाराच्या दि.१५.६.२०१० च्या अर्जाप्रमाणे याचिका क्रमांक व वर्ष न दिल्यामुळे त्यांना ती माहिती मुदतीत देता आली नव्हती. त्यामुळे माहिती देण्यास टाळाटाळ केली किंवा मुद्दाम दिली नाही असा हेतू नसल्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्यात यावी अशी त्यांनी विनंती केली.

माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ३१जानेवारी,२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

## मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

**क्रमांक-मुमाआ/२००९/तक्रार क्र. ७१५/का.१**

**श्री. प्रद्योत गोविंद नवाथे,**
**राजबाग ब्लॉक नं.२०५,**
**दौलचंद सी.एच.एस.लि.भालचंद्र रोड,**
**माटुंगा, मुंबई-४०००१९ .... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**उपमुख्य अभियंत नॉर्थ विभाग,**
**एम.बी.आर आँड आर बोर्ड,**
**दादर यांचे कार्यालय, मुंबई-१९. .... उत्तरवादी**

**निर्णय**

**द्वितीय अपीलाचा दिनांक :**
**तक्रारीचा दिनांक : १२.१०.२०१०**
**तक्रारदार उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित**

तक्रारदार यांनी दि.१२.१०.२००९ रोजी तसेच दि.६.१.२०१० रोजी अपील क्र.मुमाआ-३७३०९ व अपिल क्रमांक ३८९९/०२ दि.४.३.२००९ च्या आयोगाच्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८(१) प्रमाणे तक्रार दाखल केलेली आहे.

सदरच्या तक्रारीच्या संदर्भात आयोगाच्या कार्यालयातून दि.२९.१२.२०१० रोजी सुनावणीची नोटीस काढण्यात आली होती परंतु जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियता, उपमुख्य अभियंता नॉर्थ विभाग एम.बी.आर ॲड आर बोर्ड, दादर हे आज गैरहजर आहेत. तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी दि.५.३.०९ रोजी जी माहिती मागीतली होती त्या माहितीच्या संदर्भात तपशीलसुध्दा त्यांनी उपलब्ध करुन दिलेला होता परंतु त्यानंतरही अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध झालेली नाही.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,उपमुख्य अभियंता,नॉर्थ विभाग हे आज गैरहजर असून त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही या संदर्भात त्यांचा खुलासासुध्दा सादर केलेला नाही व व्यतीशः सुध्दा ते हजर झालेले नाहीत. त्यामुळे त्यांच्याविरुध्द रु,१००००/- ची शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१) तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांच्या तक्रारीप्रमाणे तसेच अपील क्रमांक मुमाआ-३७३०९/ अपील क्रमांक ३८९९/०२ च्या दि.४.३.०९ च्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम १८(१) च्या तक्रारीच्या चौकशी संदर्भात कलम२०(१) प्रमाणे रु.१००००/- ची शास्ती का लादण्यात येऊ नये याबद्दलचा खुलासा व त्यांचे म्हणणे प्रत्यक्ष आयोगापुढे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत मांडावा अन्यथा रु.१००००/-ची शास्ती कायम करण्यात येईल.**

**२) तक्रार यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जाप्रमाणे माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**३) सदर आदेशाची प्रत तक्रारदार व गैरतक्रारदार यांना पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**मुंबई** **(विलास पाटील)**
**दिनांक ३१जानेवारी,२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**

**प्रत,**
**निवड नस्ती.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्र-मुमाआ/नोंदणी क्र.४९५२९/अपील क्र.६११०/२०१०**

**श्री.नरेंद्र भिकाजी सावंत** **अपीलार्थी**
**११/३४५,सहकार नगर-३**
**चेंबूर, मुंबई ४०० ०७१**

**विरुध्द**

**१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अवर सचिव,**
**नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई ४०००३२**

**२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी** **उत्तरवादी**
**नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई ४०००३२**

***---निर्णय---***

**व्दितीय अपीलाचा दिनांक २४.०८.२०१०**
**सुनावणीचा दिनांक ६/१/२०११.**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित. अपिलीय अधिकारी अनुपस्थित.**

२. अपिलकर्ता यांनी दि.२२.५.२०१० रोजी (११.३.२०१०)रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग यांचेकडे संघमित्रा सामाजिक संस्था रजि.नं.२९२२९ व साईकृपा संस्था रजि.नं.एफ-२३१०१ यांना समाजकल्याण मंदिर बनविण्यासाठी दलित सुधार वस्ती अंतर्गत नगर विकास विभागाकडून रु.१०,३९,०००/- (अक्षरी रुपये दहा लाख एकोणचाळीस हजार मात्र) चा फंड(निधी)मंजूर करण्यांत आला त्या संदर्भामध्ये मंजूर निधी फंडामधील किती रक्कम खर्च झाली, संबंधित कामासाठी मंजूर निधी इतरत्र कामासाठी वळविण्यांत आला आहे का तसेच सदर निधी खर्च झाला नसल्यास तो कोणत्या विभागाच्या खात्यात जमा केला आहे. संबंधित कामासाठी सुरुवात करताना वापरण्यांत आलेली रेती, खडी, विटा व मजूरांची मजुरी यांचा खर्च कोणी केला, याबाबतची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.३०.६.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये सुध्दा निर्णय झालेला दिसून येत नाही व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

४. अपिलकर्ता यांचा अर्ज हा जिल्हाधिकारी कार्यालयाकडे हस्तांतरीत करण्यांत आला होता व त्याप्रमाणे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे. त्या संदर्भात सुध्दा अपिलकर्ता यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रथम अपिल दाखल केलेले होते. अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयागाकडे तक्रार क्र.२०१०/६३५/०२ दाखल केलेली होती. त्या तक्रारीचा निर्णय सुध्दा इि.२६.५.२०१० रोजी दिलेला आहे व या संपूर्ण प्रकरणामध्ये अपिलकर्ता यांना दि.९.३.२०१० रोजी कार्यकारी अभियंता, घाटकोपर विभाग/मुंबई मंडळ, म्हाडा यांनी सुध्दा माहिती दिलेली आहे. त्यानंतर दि.१६.१०.२००९ रोजी जिल्हाधिकारी,मुंबई यांनी माहिती दिलेली आहे. तसेच दि.१४.१०.२००९ रोजी जिल्हा नियोजन अधिकारी,मुंबई उपनगर जिल्हा यांनी सुध्दा पत्र दिलेले आहे. दि.९.९.२०१० रोजी पत्रव्यवहार केलेला आहे. तसेच दि.२५.५.२०१० रोजी जन माहिती

अधिकारी, जिल्हा नियोजन अधिकारी(प्रभारी) यांनी सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू तरीही अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना मुद्दा क्र.३ ची माहिती अद्यापही प्राप्त झालेली नाही. मुद्दा क्र.३ मध्ये संबंधित निधी खर्च झालेला नसल्यास तो कोणत्या विभागात/खात्यात जमा आहे याबाबतची माहिती अद्यापही उपलब्ध झालेली नाही. त्यावर म्हाडाचे अधिकारी उपस्थित आहे व त्यांनी असे सांगितले की, सदरच्या निधीच्या संदर्भामध्ये माहिती ही जिल्हाधिकारी,मुंबई यांचेशी संबंधित असल्यामुळे त्यांना दि.२१.८.२०१० रोजी पत्र देण्यांत आले होते व त्याप्रमाणे त्यांना माहिती पुरविण्यासही कळविण्यांत आलेले होते. परंतू त्यांच्याकडून अद्याप माहिती उपलब्ध झालेली नाही. परंतू त्यांच्याकडून माहिती उपलब्ध करुन देता येईल असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपिलकर्ता यांचे अपिल अंशतः मंजूर करण्यांत येत असून म्हाडाचे माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत जिल्हा नियोजन अधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांच्याकडून दि.२१.८.२०१० रोजी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन घेऊन अपिलार्थी यांना ती विनामूल्य रजिस्टर पोस्टाने पाठवावी.

२. मुख्य लेखा अधिकारी/मुंबई मंडळ, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,गृहनिर्माण भवन, बांद्रा निर्णयाची प्रत पोस्टाने पाठविण्यांत यावी.

३. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई
दि.६/१/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्र-मुमाआ/नों.क्र.४९६८३अपील क्र.६१२६/२०१०**

**श्री.प्रशांत मुकुंद पाटील** **अपीलार्थी**
**व्दारा- श्री. मुकुंद शं. पाटील, ४ तेरेजा अपार्टमेंट,**
**जीवदानी रोड, विरार पूर्व, जि.ठाणे ३४०१० ३०५**

**विरुध्द**

**१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सचिव,**
**मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय,मुंबई ४०००३२**

**२. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव** **उत्तरवादी**
**मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय,मुंबई ४०००३२**

***---निर्णय---***

**व्दितीय अपीलाचा दिनांक १०.०९.२०१०**
**सुनावणीचा दिनांक ६/१/२०११.**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित. जन माहिती अधिकारी, नगर विकास विभाग उपस्थित. अपिलीय अधिकारी अनुपस्थित.**

**२.** अपिलार्थीचे सदरचे अपील हे दि.६.१२.२०१० रोजी सुनावणीसाठी ठेवण्यांत आले होते त्यावेळी अपिलकर्ता उपस्थित होते परंतू मुख्य सचिव यांचे कार्यालयात अवर सचिव हे महाराष्ट्र विधानसभा अधिवेशनासाठी नागपूर येथे असल्यामुळे उपस्थित राहू शकलेले नव्हते. त्यावेळी अपिलकर्ता यांचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले होते व आज जन माहिती अधिकारी यांचे म्हणण ऐकून घेतले. अपिलकर्ता यांनी दि.७.३.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, मुख्य सचिव यांचे कार्यालयात म्हाडा फ्लॅटसाठी पाणी पुरवठा करण्याचे वसई-विरार महापालिकेच्या अखत्यारित असून सुध्दा पाणी पुरवठा होत नाही या बद्दलच्या माहितीच्या संदर्भामध्ये मा.राष्ट्रपतीमहोदयांकडून दि.२५.७.२०१० रोजी पाठविण्यांत आलेल्या पत्राची प्रत आणि त्यावर झालेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी सदरचा अर्ज हा नगर विकास विभागाकडे वर्ग केल्याबाबत कळविण्यांत आलेले होते. परंतू अपिलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि.१९.४.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि.१५.५.२०१० रोजी देण्यांत आला असून मुळ अर्जावरील कार्यवाहीसंबंधी नगर विकास विभागाच्या माहिती अधिकारी यांचेकडे परस्पर संपर्क करण्याच्या विनंतीसह निकाली काढण्यांत येत आहे व त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकार्ता यांनी राज्य माहिती आयोगकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपिलकर्ता यांनी दि.६.१२.२०१० रोजी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना माहितीच्या संदर्भामध्ये काहीही माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यावर नगर विकास विभागाच्या जन माहिती अधिाकरी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, मा.मुख्य सचिव यांच्या कार्यालयातून दि.१२.३.२०१० रोजी हस्तांतर केलेले पत्र हे त्यांच्या कोणत्याही कार्यालयात उपलब्ध झालेले आढळून आलेले नाही. त्यामुळे त्यावर कार्यवाही करता आलेली नाही. सर्व नोंदणीवहयातील नोंदीची तपासणी केलेली आहे परंतू सदरील प्रकरण

आढळून येत नाही. परंतू सदरच्या विषयाच्या संदर्भामध्ये झालेल्या कार्यवाहीची माहिती ही अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देता येईल. सदरच्या विषयाच्या संदर्भामध्ये राज्य माहिती आयुक्त,बृहन्मुंबई यांचेकडे सदर अपिलावर दि.७.१०.२०१० रोजी सुनावणी घेण्यांत आली होती. सदर सुनावणीमध्ये ' सचिव स्तरावर याबाबत बैठक घेऊन निर्णय घ्यावा ' असे निर्देश राज्य माहिती आयुक्त,बृहन्मुंबई यांनी दिलेले आहेत. त्या अनुषंगाने विरार-बोळींज येथील कोकण गृहनिर्माण मंडळाच्या गृह प्रकल्पातील वसई विरार शहर महानगरपालिका यांचेकडून पाणी पुरवठा होणेबाबत आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना मुंबई प्राधिकरण महानगरपालिका १९४९ मधील कलम ४४८ मधील तरतूदीच्या अनुषंगाने अधिकारानुसार एक महिन्यात कार्यवाही करण्यांत यावी असे आदेश देण्यांत आलेले आहेत. सदर प्रकरणी अर्जदारास अपेक्षित असलेली कार्यवाही शासनामार्फत पूर्ण करण्यांत आलेली आहे असे असल्यास अपिलकर्ता यांना सदरच्या दि.६.१.२०११,दि.५.१.२०११ तसेच दि.८.१२.२०१० आयुक्त व वसई विरार तसेच नगर विकास विभाग या पत्राच्या प्रती उपलब्ध करुन देण्यांत याव्यात. मात्र **मुख्य सचिव यांच्या कार्यालयातून दि.१२.३.२०१० रोजी सचिव (२)नगर विकास विभाग यांच्याकडे ज्या अर्जाचे हस्तांतरण करण्यांत आलेले आहे त्याचा पुन्हा शोध घेऊन ती ज्या कर्मचारी किंवा अधिकारी यांच्याकडे प्रलंबित असेल त्याची नोंदणी केलेली नसेल त्याबाबतची जबाबदारी निश्चित करुन त्यांचे विरुध्द योग्यती प्रशासकिय कारवाई करणे आवश्यक आहे. अन्यथा मा.मुख्य सचिव यांचे कार्यालयाला देण्यांत आलेल्या पत्राची सुध्दा दखल नगर विकास विभाग घेत नाही असे चित्र निर्माण झालेले आहे**. त्यामुळे सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१. अपिलकर्ता यांचे अपिल अंशतः मंजूर करण्यांत येत असून जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत राज्य माहिती आयुक्त (बृहन्मुंबई)यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे तसेच अपिलकर्ता यांचे अर्जातील मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये झालेल्या कार्यवाहीची माहिती कागदपत्राच्या स्वरुपात अपिलार्थी यांना विनामुल्य उपलब्ध करुन देण्यांत याव्यात. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम कलम २० अन्वये शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.**

**२. प्रत, सचिव (२) नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई यांना निर्णयाची प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यांत यावी.**

**३. प्रत, जन माहिती अधिकारी, नवि-२३,नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई यांना निर्णयाची प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यांत यावी.**

**४. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

**मुंबई**
**दि.६/१/२०११**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८अन्वये दाखल झालेली तक्रार**

**तक्रार क्र.रामामब्रृ/१५९१/२०१०**

**श्री.वैभव चंद्रकांत कोरगांवकर** **तक्रारदार**
**४८/३,राधाकृष्ण निवास, डॉ.आंबेडकर रोड,**
**दादर पूर्व, मुंबई ४०००१४**

**विरुध्द**

**१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा,**
**पोलिस उपआयुक्त (म.रा.)पोलिस आयुक्त कार्यालय,**
**क्रॉर्फड मार्केट, मुंबई ०१**
**२. जन माहिती अधिकारी तथा** **उत्तरवादी**
**पोलिस उपआयुक्त (म.रा.)पोलिस आयुक्त कार्यालय,**
**क्रॉर्फड मार्केट, मुंबई ०१**

***---निर्णय---***

**तक्रारीचा दिनांक २०.०४.२०१०**
**सुनावणीचा दिनांक ६/१/२०११.**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित. अपिलीय अधिकारी अनुपस्थित.**

२. अपिलार्थी यांनी दि.२७.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, गृह विभाग यांच्याकडे मुंबई पोलिस आयुक्त यांचेकडे असलेल्या खाजगी इमारतीतील जागाबाबत भारत सरंक्षण कायद्याखाली (इंडिया डिफेन्स रुल्स १९४४)अंतर्गत अधिग्रहीत केलेल्या खाजगी इमारतीतील जागाबात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची प्रत मिळणे. भारत सरंक्षण कायदयातील मुदत संपल्यानंतर इतर कोणत्या कायदयाने सदर जागाचे अधिग्रहण सुरु ठेवणेबाबतचा शासन आदेश प्रत मिळणे. वरील विषयाबाबत संबंधित न्यायालयात सुरु असलेल्या तसेच संपलेल्या मा.न्यायालयीन प्रकरणाचा सविस्तर तपशील मिळणे. सदर खाजगी इमारतीमधी खोल्या या सदर जागेत राहत असणा-या पोलिस कर्मचारी यांस सदर जागेच्या मालकांचे थेट भाडेकरू करणेबाबत शासनाचा विचार असल्यास शासनास सादर करण्यांत आलेला संबंधितांच्या प्रस्तावाची प्रत मिळणे इ. माहिती मागितली होती.

३. अपिलकर्ता यांनी दि.१२.३.२०१०अनुषंगाने अर्जाच्या संदर्भ क्र.मुमाआ/२००९/४५४०५/अपील क्र.५३१५/०२/२०१० या अपिलाचा निर्णय दि.६.२.२०१० रोजी दिलेला असून अर्जदाराच्या अपिलाचा संदर्भ आहे तो सोबत जोडलेल्या कागदपत्राची प्रत हे आदेश जन माहिती अधिकारी, गृह विभाग यांना पाठविण्यात येत आहे, त्यावर १५ दिवसांत कार्यवाही करावी. याबाबतच्या कार्यवाहीच्या संदर्भामध्ये गृह विभाग यांच्या माहिती अधिकारी यांनी दि.१२.३.२०१० रोजी कार्यालयातील संबंधित प्रकरणांची/नस्तीचा शोध घेतला असता संबंधित प्रकरणामध्ये नस्ती आढळून येत नाही. अपिल अर्जामध्ये विचारलेली माहिती नियंत्रक निवास व्यवस्था, सामान्य प्रशासन विभाग यांच्याकडे सुध्दा उपलब्ध नसल्याचे त्यांनी कळविले आहे. त्याचप्रमाणे संबंधित प्रकरणाची नस्ती मंत्रालयीन अभिलेख कक्षात सुध्दा दाखल झालेली नाही. आपण मागितलेली माहिती या कार्यालयातील अभिलेखावर उपलब्ध नसल्यामुळे आपणांस उपलब्ध करुन देता येत नाही. त्या प्रकरणी मात्र गृह विभाग यांनी नियंत्रक निवास व्यवस्था यांना जी टिप्पणी दिलेली आहे त्याची प्रत अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरिता तक्रारकर्ता यांची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यांत येत असून हा निर्णय मिळाल्यापासून तक्रारदार यांना सामान्य प्रशासन विभागाकडून गृह विभागाकडे आलेल्या टिप्पणीची छायांकित प्रत विनामूल्य उपलब्ध करुन देण्यांत यावी.

२. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई
दि.६/१/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८अन्वये दाखल झालेली तक्रार

तक्रार क्र.रामाम/१६१४/२०१०

श्री.चेतन कोठारी तक्रारदार
५२, ओसीनिक अपार्टमेंट
डॉ.राजाबली पटेललेन च्या समोर, बी.देसाई रोड, मुंबई ४०००२६

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक उपायुक्त
३ रा मजला ई वॉर्ड म्युनिसिपल ऑफि, १०हाफिजुद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई १८

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत व प्रस्ताव) उत्तरवादी
३ रा मजला ई वॉर्ड म्युनिसिपल ऑफि, १०हाफिजुद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई १८०१

---*निर्णय*---

तक्रारीचा दिनांक १०.१२.२०१०
सुनावणीचा दिनांक ६/१/२०११.
तक्रारदार व जन माहिती अधिकारी उपस्थित. अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

तक्रारदार यांनी दि.१९.१०.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता (इमारत व प्रस्ताव) ' ई ' वॉर्ड यांचेकडे ' Certified copy of original approved plan of the entire building name of Oceanic Apatments co-operative Housing society Ltd.(Reg.No.Mom/HSG-3887 dt. 29.1.1972) (C.S. No.762 of Malbar &Cumballa hill Division) मध्ये काही बदल करण्यास अर्ज आलेले आहेत का? याबद्दलची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या माहितीच्या संदर्भामध्ये अपिलकर्ता यांनी दि.२३.११.२०१० रोजी निरिक्षण करुनच 'I.O.D./C.C./Approval letter per page Rs.25/- and For Approved Plan per side per plan Rs.60/-xerosing & conveyance to make zeroxing will have to be borne by you ' असे कळविण्यांत आलेले आहे.

तक्रारदार यांनी दि.१०.१२.२०१० रोजी उपरोक्त शुल्काबाबत आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे. राज्य माहिती आयोगाचे आदेश असून सुध्दा जास्तचा खर्च आक्षरण्यांत आलेला आहे तसेच झेरॉक्स करण्यासाठीचा ये-जा टॅक्सी प्रवासखर्च सुध्दा आकारण्यांत येतो, याबद्दल तक्रार केलेली आहे.

सदरच्या तक्रारीच्या संदर्भामध्ये तक्रारदार यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीप्रमाणे तसेच महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीप्रमाणे कोणताही प्रवासखर्च (conveyance)घेता येत नाही परंतू तो मागितला जातो. संबधित कागदपत्र उपलब्ध होण्याकरिता जो नियमानुसार खर्च आहे तो देण्यास तयार आहे परंतू conveyance खर्च मात्र जन माहिती अधिकारी यांना घेता येणार नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, Approved Plan च्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली जाते तेव्हा त्या Approved Plan sheet मोठया असतात त्याच्या फोटाकॉपी करण्यासाठी कार्यालयाच्या बाहेर जाताना संपूर्ण नस्ती घेऊन पाठवावे लागते त्या नस्ती मोठया असल्याने त्याची टॅक्सीनेच ने-आण करावी लागते. अशा प्रकारे टॅक्सीचा ये-जा खर्च हा त्यांना करावा लागतो.

परंतू त्याबाबत सुध्दा तक्रार यांनी पुन्हा हरकत घेतलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, या प्रकरणामध्ये तक्रारदार यांना संपूर्ण कागदपत्र विनामूल्य दिलेले आहेत. परंतू प्रवास खर्चाबाबतची त्यांची तक्रार कायम आहे असे त्यांचे म्हणणे आहे त्याकरिता श्री.भास्कर प्रभू यांनी आयोगापुढे जी तक्रार केलेली आहे त्या तक्रारीची सुनावणी महापालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाच्या वरिष्ठ अधिका-याबरोबर घेऊन त्यातून निर्णय घेण्यांत येईल. परंतू तूर्त माहिती विनामूल्य व्यक्तिश: उपलब्ध करुन द्यावी. त्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

३. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

४. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई
दि.१०/१/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०२५६/अपील क्र.६२०९/२०१०**

**श्री.शंभूशरण सक्सेना** **अपीलार्थी**
**रु.न.१०१४ सुलेबाई चाळ, रायगड नगर,**
**गोशाला रोड, मुलूंड पश्चिम, मुंबई ४०**

**विरुध्द**

**१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.आयुक्त, टी वॉर्ड**
**मुंमनपा लाला,देवीदयाल मार्ग, मुलूंड पश्चिम, मुंबई -८०**

**२. जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(बी/एफ)टी वॉर्ड** **उत्तरवादी**
**मुंमनपा लाला,देवीदयाल मार्ग, मुलूंड पश्चिम, मुंबई -८०**

***---निर्णय---***

**व्दितीय अपीलाचा दिनांक १८.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक १०/१/२०११.**
**अपीलार्थी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित. जन माहिती अधिकारी उपस्थित.**

२. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी टी वॉर्ड यांच्याकडे सन २०००-२०१० या कालावधीतील ३५१ कलमाप्रमाणे दिलेल्या नोटीशीची माहिती व नोंदणीकृत उपक्रमाच्या संदर्भामध्ये व त्यावरील कार्यवाहीच्या संदर्भामध्ये एकूण ५ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते.

३. अर्जाच्या अनुषंगाने दि.१३.९.२०१० रोजी अपिलकर्ता यांना माहितीकरिता निरिक्षण करावे व निरिक्षणअंती प्रती पेज रु.२/-प्रमाणे खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले असल्याचे दिसून येते. परंतू अपिलकर्ता यांनी दि.१६.९.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दि.२६.१०.२०१० रोजी देण्यांत आला असून, अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी, सहा.अभियंता(इमारत व कारखाने)यांनी एक महिन्यात विहित शुल्क भरुन माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी, असे कळविलेले असल्याचे दिसून येते. परंतू त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सुनावणीच्या वेळी अपीलकर्ता गैरहजर होते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी १० वर्षातील माहिती मागितलेली आहे व ती अतिशय व्यापक व मोघम स्वरुपाची माहिती आहे व त्यामुळे अनावश्यक कागदपत्र उपलब्ध करुन देण्यापेक्षा अपिलकर्ता यांना आवश्यकते कागदपत्र उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने त्यांनी निरिक्षण करावे व खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे अपिलार्थी यांना कळविलेले होते**.**

**४. माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २ (त्र)प्रमाणे माहितीचा अधिकार या संज्ञेची व्याख्या केलेली आहे त्यामध्ये "सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणात असलेली कागदपत्रे,अभिलेख, दस्तऐवज यांचे निरिक्षण करुन त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे "** अशी तरतूद आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना कळविलेले योग्य असल्यामुळे अपिलार्थी यांनी निरिक्षण करुनच माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक झाले असते. त्याकरिता अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी

यांचेकडे संपर्क साधून व संबंधित नस्तीचे निरिक्षण करुन विहित शुल्क भरुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी. त्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

**१. अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यांत येते.**

**२. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

**मुंबई**

**दि.१०/१/२०११**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०२५३/अपील क्र.६२०६/२०१०**

**श्री.शंभूशरण सक्सेना** **अपीलार्थी**
**रु.न.१०१४ सुलेबाई चाळ, रायगड नगर,**
**गोशाला रोड, मुलूंड पश्चिम, मुंबई ४०**

**विरुध्द**

**१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता-एस-विभाग**
**महानगर पालिका कार्यालय,एल बी.एस.मार्ग, भांडूप(पश्चिम) मुंबई ७८**

**२. जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(बी/एफ)टी वॉर्ड** **उत्तरवादी**
**महानगर पालिका कार्यालय,एल बी.एस.मार्ग, भांडूप(पश्चिम) मुंबई ७८**

***---निर्णय---***

**व्दितीय अपीलाचा दिनांक २७.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक १०/१/२०११.**
**अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित**

**२.** अपिलकर्ता यांनी दि.१४.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, एस-विभाग,भांडुप यांच्याकडे त्यांच्या दि.२४.५.२०१० च्या पत्रावर झालेल्या कार्यवाहीची माहिती एकूण ३ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. माहिती पोष्टाने किंवा व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने दि.२.८.२०१० रोजी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये माहितीच्या संदर्भामध्ये निरिक्षणाकरिता उपस्थित होते असे कळविलेले असल्याचे दिसून येते. परंतू त्याने समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.२१.८.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दि.१.१०.२०१० रोजी देण्यांत आला असून अर्जदारास माहिती उपलब्ध करुन द्यावी, असा निर्णय दिलेला आहे. परंतू त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.७.१०.२०१०रोजी पुन्हा स्मरणपत्र दिलेले दिसून येते. परंतू त्यांनतरही माहिती मिळालेली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल केलेले आहे.

४. अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही त्यांच्या दि.२४.५.२०१० च्या अर्जावर झालेल्या कार्यवाहीबद्दलची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता यांनी निरिक्षणकरिता कार्यालयात उपस्थित व्हावे असे जे कळविलेले आहे ते कोणत्याही प्रकारे माहिती अधिकारी अधिनियम २००५ च्या तरतूदीत आहे हे माहिती नाही किंवा त्यांना माहिती उपलब्ध करुन द्यावयाची नाही याकरिता कळविलेले असल्याचे दिसून येते. कोणत्याही अधिका-यावर कार्यवाही झालेली असेल त्याबाबतची जी टिप्पणी असेल किंवा जो निर्णय असेल त्याबद्दलची कागदपत्रे देण्याकरिता निरिक्षण देण्याची आवश्यकता नाही व त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाचे उल्लंघन केलेले दिसून येते व त्यामुळे जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र आहेत.

५.  आयोगाच्या कार्यालयाने दि.१३.१२.२०१० रोजी सुनावणीची नोटीस काढलेली असून सुध्दा जन माहिती अधिकारी हे हजर झालेले नाहीत व माहिती सुध्दा उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांच्या विरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतू शास्ती लादण्यापूर्वी अधिनियमाच्या कलम २०(१)च्या परंतुकाप्रमाणे त्यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक असल्यामुळे सदरचे अपिल हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१. अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यांत येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत अपिलकर्ता यांना त्यांनी मागितलेली माहिती विनामूल्य रजिस्टर पोस्टानी उपलब्ध करुन द्यावी.**

**२. अपिलकर्ता यांचे दि.१४.६.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे व अधिनियमाच्या तरतूदींचे उल्लंघन केलेले असल्यामुळे तसेच प्रथम अपिलाच्या आदेशानंतरही माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१)अन्वये शास्ती कां लादण्यांत येऊ नये, याबद्दलचे त्यांचे म्हणणे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत आयोगाकडे समक्ष येऊन मांडावे अन्यथा त्यांच्या विरुध्द शास्ती लादण्यांत येईल याची नोंद घ्यावी.**

**५. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

**मुंबई**
**दि.१०/१/२०११**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०२५७/अपील क्र.६२१०/२०१०**

**श्री.शंभूशरण सक्सेना** **अपीलार्थी**
**रु.न.१०१४ सुलेबाई चाळ, रायगड नगर,**
**गोशाला रोड, मुलूंड पश्चिम, मुंबई ४०**

**विरुध्द**

**१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.आयुक्त, टी वॉर्ड**
**मुंमनपा लाला,देवीदयाल मार्ग, मुलूंड पश्चिम, मुंबई -८०**

**२. जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(बी/एफ)टी वॉर्ड** **उत्तरवादी**
**मुंमनपा लाला,देवीदयाल मार्ग, मुलूंड पश्चिम, मुंबई -८०**

***---निर्णय---***

**व्दितीय अपीलाचा दिनांक १८.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक १०/१/२०११.**
**अपीलार्थी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित. जन माहिती अधिकारी उपस्थित.**

२. अपिलकर्ता यांनी दि.१६.८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, टी वॉर्ड यांच्याकडे सन २००९-२०१० या कालावधीतील टी- वॉर्ड च्या इमारतीच्या दुरुस्तीचे व नोंदणीकरण झालेल्या कॉन्ट्रक्टच्या संदर्भात ५मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते.

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.१४.९.२०१०रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू तरी सुध्दा अपिलकर्ता यांनी दि.१६.९.२०१०रोजी कोणतेही आदेश मिळालेले नाहीत म्हणून प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे व्दितीय अपील दाखल केले आहे.

४. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे हे अपिलार्थी यांनी प्रथम अपिलाच्या सुनवणी मान्य केलेले आहे व त्यामुळे प्रथम अपिल निकाली काढण्यांत आलेले आहे.

५. जन माहिती अधिकारी यांनी दि.१४.९.२०१० रोजी माहितीचे अवलोकन केले असता,अपिलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती दिलेली आहे. त्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

**१. अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यांत येते.**
**२. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

**मुंबई**
**दि.१०/१/२०११** **(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०२५५/अपील क्र.६२०८/२०१०**

**श्रीमती अंजना दोशी** **अपीलार्थी**
**सी-४०, १ ला मजला, मोतीशाजैन पार्क,**
**मोतीशा लेन, भायखळा, मुंबई २७**

**विरुध्द**

**१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.आयुक्त, (स्पेशल इंजिनिअरिंग)**
**मुंबई महानगरपालिका, विस्तार इमारत, ३ रा मजला, महापालिका मार्ग,मुंबई-१**

**२. जन माहिती अधिकारी तथा हायड्रोक्लोरिक इंजिनिअर** **उत्तरवादी**
**मुंबई महानगरपालिका, विस्तार इमारत, ३ रा मजला, महापालिका मार्ग,मुंबई-१**

***---निर्णय---***

**व्दितीय अपीलाचा दिनांक २३.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक १०/१/२०११.**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित. अपिलीय अधिकारी अनुपस्थित.**

**२.** अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी, जल अभियंता,मुंबई महानगर पालिका, यांच्याकडे बिल्डिंग नं. सी ॲन्ड डी किंवा १ व २ शेट मोतिशा जैन पार्क (लॅन्डलॉर्ड-शेट मोतीशा रिलिजिस चॅरिटेबल ट्रस्ट) शेठ मोतिशा लेन भायखळा, मंबई च्या संदर्भात दि.२.११.१९९२ पासून केलेल्या तक्रारीच्या संदर्भामध्ये झालेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येत`. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे.

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दि.२४.६.२०१० रोजी सदाची माहिती ही सह-अभियंता पाणीपुरवठा 'ई'-वॉर्ड च्या संदर्भात असल्यामुळे अपिल अर्ज 'ई' वॉर्डच्या माहिती अधिकारी यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यांत आलेली आहे. त्यामुळे आपण त्यांच्यशी संपर्क साधावा असे कळविलेले असल्याचे दिसून येते. सदरच्या पत्राप्रमाणे दि.१७.७.२०१० रोजी (प्राप्त दि.१.६.२०१०) रोजी माहितीच्या संदर्भामध्ये उत्तर दिलेले दिसून येते. परंतू अपिलकर्ता यांनी खर्चाचा भरणा न केल्यामुळे माहिती उपलब्ध झालेली नसली तरी दि.१०.८.२०१० रोजी प्रथम **अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि.२०.८.२०१० रोजी देण्यांत आलेला दिसून येतो व त्यामुळे अभिलेख्यामध्ये जी माहिती उपलब्ध आहे ती उपलब्ध करुन द्यावी व त्यांच्या तक्रारीबाबत योग्यती कार्यवाही करावी असा निर्णय दिलेला दिसून येतो.** परंतू त्यानंतर माहिती प्राप्त झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल केलेले आहे.

**४.** अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, दि.१७.९.२०१० रोजी ज्या पत्रात संपूर्ण माहिती उपलब्ध नाही कळविलेले असल्यामुळे त्यांनी माहितीच्या खर्चाचा भरणा केलेले नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही मुख्य कार्यालयाच्या तसेच 'ई 'वॉर्डची आहे. सदर माहिती 'ई '- वॉर्डच्या संदर्भात असे अपिलार्थी यांना आधीच कळविलेले आहे. मात्र मुख्य कार्यालयाच्या संदर्भातील माहिती ही त्यांना उपलब्ध करुन देता येणार नाही व त्यावर अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी अनेक तक्रारी केल्या त्या तक्रारीतील संदर्भामध्ये कोणतीही कार्यवाही

झालेली नाही. परंतू माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणामध्ये कार्यवाही करुन मिळत नाही. मात्र झालेल्या तक्रारीच्या संदर्भामध्ये जी जी कार्यवाही झालेली असेल त्या त्या कार्यवाहीचे कागदपत्र जास्तीत जास्त उपलब्ध होऊ शकतात व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कार्यवाही केलेली असली तरी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक राहिल म्हणून अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१. अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यांत येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी, ई- वॉर्ड यांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रामधील मागितलेली माहितीच्या छायांकित प्रती विनामूल्य रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात.**

**२. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

**मुंबई**

**दि.१०/१/२०११**

**(विलास पाटील)**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**

**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्र-मुमाआ/नोंदणी क्र.४९४३५/अपील क्र.७००१/२०१०**

**श्री.डॉ.संजय पुरुषोत्तम पै,** **अपीलार्थी**
**१४-ए लक्ष्मीनारायण ट्रस्ट बिल्डिंग, तारा टेंपल लेन,**
**डी.बी.मार्ग, पोलिस स्टेशनसमोर, लॅमिग्टंन रोड, मुंबई ४०० ००७**

**विरुध्द**

**१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सचिव**
**मुख्य सचिवांचे कार्यालय,मंत्रालय,मुंबई**

**२. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव** **उत्तरवादी**
**मुख्य सचिवांचे कार्यालय,मंत्रालय,मुंबई १**

***---निर्णय---***

**व्दितीय अपीलाचा दिनांक १२.०८.२०१०**
**सुनावणीचा दिनांक १५/१/२०११.**
**अपीलार्थी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

अपिलार्थी यांनी दि.२४.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, मुख्य सचिवांचे कार्यालय यांच्याकडे **आय.ए.एस./आय.पी.एस. अधिका-याचे वैयक्तिक ई-मेल आयडी, मोबाईल क्रमांक याबाबतची माहिती** मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जामध्ये त्यांनी सदरची माहिती माझ्या वैयक्तिक कामाकरिता मागितलेली असून त्याचा कार्यालयीन कामकाजासाठीच उपयोग करीन. कार्यालयीन इमेल/दुरध्वनी उपलब्ध असले तरी त्याचे कामकाज होण्याचे दृष्टीने काहीही उपयोग होत नाही व मिळालेल्या माहितीचा मी गैरवापर करणार नाही किंवा विनाकारण कोणालाही त्रास देणार नाही व कोणालाही ती देणार नाही असा त्यांनी अर्जात उल्लेख केलेला आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.२९.५.२०१० रोजी अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय व सामान्य प्रशासन विभाग (सेवा)मंत्रालय,मुबई हस्तांतरीत करण्यांत आलेला दिसून येतो. त्याप्रमाणे दि.२१.६.२०१० रोजी सामान्य प्रशासन विभागाचे माहिती अधिकारी तथा अवर सचिव यांनी भाप्रसे महाराष्ट्र संवर्गात कार्यरत अधिका-यांची अद्ययावत यादीच्या करिता रुपये १०८ व अधिक पोस्टल खर्च रु.६५ एकूण रुपये १७३ रुपयाचे शुल्क भरणा करावे असे कळविलेले दिसून येते. **परंतू सदरची माहिती वेबसाईटवर आहे व ती घेण्याकरिता रुपये १७४ भरणा करावा ही बाब योग्य नाही असे त्यांनी अर्जावर नोंद केलेली असल्याचे दिसून येते.** व त्यानंतर दि.१७.७.२०१० रोजी मुख्य सचिव यांचे कार्यालयातील माहिती अधिकारी यांनी त्यांना पूर्ण माहिती दिली परंतू सामान्य प्रशासन विभागातून माहिती मिळाली मात्र अप्पर मुख्य सचिव,गृह विभाग व माहिती अधिकारी डी.जी.पी., महाराष्ट्र यांनी अद्यापपर्यंत माहिती दिली नाही म्हणून सामान्य प्रशासन विभाग व मुख्य सचिव यांच्या कार्यालयाकडे प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि.२४.७.२०१० रोजी देण्यांत आला असून 'अपिल फेटाळण्यांत आलेले आहे 'व त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपिल दाखल करुन आय.पी.एस. अधिकारी यांची माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कारण दिलेले आहे.

अपिलकर्ता यांना माहिती ही मुख्य सचिव यांचे कार्यालयात मागितलेली असल्यामुळे व प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून प्रथम अपिल सुध्दा मुख्य सचिव यांचे कार्यालयात केलेले असल्यामुळे व्दितीय

अपिल मेमोमध्ये मुख्य सचिव कार्यालयातील जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वर्णन केलेले असल्यामुळे राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयातून मुख्य सचिव यांचे कार्यालयातील जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांना नोटीस काढण्यांत आलेली होती. त्याप्रमाणे मुख्य सचिव कार्यालयातील जन माहिती अधिकारी सुनावणीस उपस्थित आहेत व प्रथम अपिलीय अधिकारी हे सुनावणीस गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, मुख्य सचिव कार्यालय जरी संपूर्ण महाराष्ट्र राज्याचे प्रशासनाचे प्रमुख कार्यालय जरी असले तरी मुख्य सचिव यांचे कार्यालयामध्ये सर्व प्रशासनाची सर्वच माहिती उपलब्ध असते असे नाही, महाराष्ट्र शासनाच्या शासन कार्य नियमावलीनुसार शासनाच्या प्रत्येक विभागाचे काम व त्यांच्याकडे सोपविलेले विषय मा.राज्यपाल महोदयांनी नेमून दिलेले आहेत व प्रत्येक मंत्रालयीन विभागासाठी स्वतंत्र सचिव वत्यांच्या अंतर्गत क्षेत्रीय कार्यालय अशी मंत्रालयीन प्रशासकिय विभागाची यंत्रणा आहे व त्याप्रमाणे सर्व भाप्रसे अधिका-यांची माहिती ही सामान्य प्रशासन विभागाच्या स्वतंत्र कार्यासनाकडे असते व त्यामुळे अधिनियमाच्या कलम ६(१)प्रमाणे ज्या माहिती अधिका-याकडे माहिती असते त्या माहिती अधिका-याकडे किंवा सार्वजनिक प्राधिकरणाकडे अर्जदाराचा अर्ज हा हस्तांतर केलेला आहे. तसाच तो आयपीएस अधिका-यांच्या संदर्भामध्ये माहिती ही अप्पर मुख्य सचिव,गृह व डीजीपी यांच्या कार्यालयात असल्यामुळे त्यांच्याकडे सुध्दा तो अर्ज हस्तांतर केलेला आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६(३)प्रमाणे जी माहिती अन्य सार्वजनिक प्राधिकरणाकडे असेल किंवा ज्या माहिती विषयी अन्य सार्वजनिक प्राधिकारणाच्या कामकाजाशी अधिक संबंध असेल अशी माहिती मिळविण्यासाठी एखाद्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे अर्ज करण्यांत आला असेल त्याबाबत ज्यांच्याकडे असा अर्ज करण्यांत आला आहे ते सार्वजनिक प्राधिकरण असा अर्ज किंवा त्यास योग्य वाटेल असा त्याचा भाग त्या अन्य सार्वजनिक प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करील आणि त्या हस्तांतरणाबाबत अर्जदारास देखील माहिती देईल अशी तरतूद असल्यामुळे सदरील अर्ज हा त्या त्या प्राधिकरणाच्या सामान्य प्रशासन विभाग / गृह विभागास हस्तांतरीत करण्यांत आला होता त्याप्रमाणे सामान्य प्रशासन विभागाने माहिती दिलेली आहे व अपिलार्थीने हे मान्यही केलेले आहे. गृह विभागाने माहिती दिली नाही तरी मुळ अर्ज हा गृह विभागाच्या माहिती अधिकारी यांच्याकडे आहे असे समजून त्या विभागाच्या प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे अर्ज करणे आवश्यक होते. जेणेकरुन त्यांना ती माहिती उपलब्ध झाली असती व प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये त्यांचे जरी समाधान झाले नसले तरी त्यांनी गृह विभागाच्या प्रथम अपिलाच्या निर्णयानंतर राज्य माहिती आयोगकडे व्दितीय अपिल करणे आवश्यक झाले असते. परंतू त्यांनी प्रथम अपिल हे मुख्य सचिव यांचे कार्यालयातील प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दाखल केले व त्यानंतर व्दितीय अपील सुध्दा दाखल करताना त्यांनी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी, मुख्य सचिव यांचे कार्यालय यांचेकडे अर्ज केलेला आहे. त्यामुळे सुनावणीस गृह विभागाचे अधिकारी उपस्थित नाहीत व मुख्य सचिव कार्यालयातील कार्यवाही ही पूर्ण झालेली आहे. ही बाब अपिलकर्ता यांचे प्रथम अपिलावरील आदेशामध्ये सुध्दा योग्य नाही असे विवेचन करुन अपिल फेटाळण्यांत आलेले होते.

वरील सर्व वस्तुस्थितीवरुन असे दिसून येते की, अपिलकर्ता यांनी जरी आयपीएस अधिका-यांच्या संदर्भात माहिती उपलब्ध झालेली नसली तरी आज व्दितीयअपिल हे गृह विभागातील माहिती अधिकारी किंवा प्रथम अपिलीय अधिकारी यांना पक्षकार करुन दाखल केलेले नसल्यामुळे गृह विभागाचे माहिती अधिकारी किंवा प्रथम अपिलीय अधिकारी यांना आदेश देता येत नाहीत. त्याकरिता अपिलकर्ता यांनी गृह विभागातील अधिका-यांच्या संदर्भात प्रथम अपिल व व्दितीयअपील दाखल करणे हे अधिनियमाच्या तरतूदीशी सुसंगत झाले असते.

**अधिनियमाच्या कलम २(ज)मध्ये 'माहितीचा अधिकार' या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्या व्याख्येमध्ये कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्यांच्या नियंत्रणात असलेली व ती**

**अधिनियमान्वये मिळविता येण्याजोगी माहिती मिळविण्याचा अधिकार,** अशी तरतूद आहे व त्यामुळेच संपूर्ण माहिती जर मुख्य सचिव यांचे कार्यालयात जतन केली जात नाही त्याप्रमाणे अपिलार्थी यांना कळविलेले सुध्दा आहे. परंतू ती त्याच कार्यालयाने उपलब्ध करुन द्यावी असा आग्रह अपिलार्थी यांना करता येणार नाही अधिनियमाचे प्रस्तावनेत सुध्दा समतोल साधण्यासाठी मेळ ठेवावा अशी तरतूद आहे. व त्यामुळे प्रथम अपिल निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

## आदेश

**१. अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यांत येते.**

**२. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

**मुंबई**
**दि.१४/१/२०११**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५००८१/अपील क्र.६२३८/२०१०**

**श्री.रमेश नागनाथ कदम** **अपीलार्थी**
**ए/१, नागनाथ कपाऊंड गणेश चौक,**
**काजूपाडा. बोरीवली पूर्व, मुंबई -६६**

**विरुध्द**

**१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव**
**सामाजिक न्याय,मंत्रालय,मुंबई**

**२. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव(मावक-२)** **उत्तरवादी**
**सामाजिक न्याय,मंत्रालय,मुंबई -**

***---निर्णय---***

**व्दितीय अपीलाचा दिनांक ११.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक १३/१/२०११.**
**अपीलार्थी व व जन माहिती अधिकारी तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित. अपिलीय अधिकारी अनुपस्थित**

**अपील क्र.६२३८/**

२. अपिलकर्ता यांनी दि.५.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, सामाजिक न्याय विभाग यांच्याकडे डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (सामाजिक न्याय विभाग महाराष्ट्र शासन अंतर्गत), पुणे यांनी शासनाकडे सादर केलेल्या अहवालावर विभागाकडून करण्यांत आलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती तसेच या संस्थेने सामाजिक न्याय, विद्ययो अंतर्गत मंजूर केलेल्या घरकुल योजनेबाबत २०८ मागासवर्गी सहकारी संस्थेची सखोल चौकशी करुन शासनाकडे दि.१५.३.२०१० च्या पत्रावर प्रधान सचिव, सामाजिक न्याय यांना उपसचिव,श्री.वठोड यांना तात्काळ सादर करण्यासंदर्भात दि.१७.३.२०१० रोजी लेखी आदेश दिले. त्या आदेशाच्या अनुषंगाने उपसचिव, सामाजिक न्याय यांच्याकडून प्रधान सचिव, सामाजिक न्याय यांच्याकडे उपरोक्त संदर्भात सादर केलेल्या नस्तीच्या छायाकित प्रती हवी आहे. सदरची माहिती व्यक्तिश घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.९.७.२०१० च्या पत्रान्वये अर्जदारास माहितीची एकूण १३ पृष्ठासाठी रुपये २/-प्रमाणे मूल्य रु.२६/- इतकी रक्कम संबंधित विभागाच्या लेखाशिर्षातर्गत चलनाव्दारे जमा करण्याबाबत कळविण्यांत आले होते. दि.३.८.२०१० रोजी अपिलार्थी यांनी शुल्क अदा करुन पावती दि.३.८.२०१० रोजी विभागास सादर केली होती. तथापि माहिती अधिकारी यांनी या संदर्भातील नस्ती मा.मुख्य सचिव यांचेकडे सादर केलेली असल्याने वरील माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे अर्जदारास दि.१०.८.२०१० रोजी कळविले होते व त्यामुळेच अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिली नाही. दि.६.९.२०१० रोजीच्या अर्जान्वये अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाच्या सुनावणीसाठी

अपिलार्थी उपस्थित न राहिल्यामुळे अपिलीय अधिकारी यांनी त्यावर कोणतीही कार्यवाही केलेली नाही व त्यामुळेच अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलार्थी यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, जन माहिती अधिकारी यांचेकडे जी माहिती मागितलेली आहे त्याचे शुल्क भरुन सुध्दा त्यांना माहिती प्राप्त झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरची नस्ती ही अपिलार्थी यांना पुर्वीच कळविल्याप्रमाणे मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचेकडे सादर केली होती व त्यानंर सदरची नस्ती आता दि.२९.११.२०१० रोजी मा.मुख्य सचिव यांचेकडे सादर केलेली आहे. सदरची नस्ती या विभागाकडे प्राप्त झालेली नाही ती प्राप्त होताच अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देण्यांत येईल. अर्जदारास माहिती उपलब्ध करुन न देण्याचा कोणताही हेतू नाही. केवळ जी माहिती उपलब्ध करुन द्यावयाची आहे ती माहिती वरिष्ठ पातळीवर व धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने सादर केलेली असल्याने ती अर्जदारास उपलब्ध करुन देता आलेली नाही असे आयोगाच्या निदर्शनास आणले. कोणतीही नस्ती मुख्य सचिव, प्रधानसचिव, मा.मंत्रीमहोदया यांचेकडे सादर झालेली असल्यास ती प्राप्त होईपर्यत जन माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध देता येत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी जे उत्तर दिलेले आहे ते योग्य आहे परंतू नस्ती परत प्राप्त होताच सदरील माहिती अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१. अपिलकर्ता यांचे अपिल क्र.६२३८/०२ हे मंजूर करण्यांत येत असून अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी, सामाजिक न्याय यांनी मा.मुख्य सचिव यांचेकडून नस्ती उपलब्ध झाल्यानंतर त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रामधील मागितलेली माहितीच्या छायांकित प्रती विनामूल्य रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात.**

**२. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

**मुंबई**
**दि.१७/१/२०११**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५००८२/अपील क्र.६२३९/२०१०**

**श्री.रमेश नागनाथ कदम** **अपीलार्थी**
**ए/१, नागनाथ कपाऊंड गणेश चौक,**
**काजूपाडा. बोरीवली पूर्व, मुंबई -६६**

**विरुध्द**

**१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव**
**सामाजिक न्याय,मंत्रालय,मुंबई**

**२. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव(मावक-२)** **उत्तरवादी**
**सामाजिक न्याय,मंत्रालय,मुंबई -**

***---निर्णय---***

**व्दितीय अपीलाचा दिनांक ११.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक १३/१/२०११.**
**अपीलार्थी उपस्थित. जन माहिती अधिकारी तसेच अपिलीय अधिकारी अनुपस्थित**

**१.** अपिलकर्ता यांनी दि.१२.४.२०१० रोजी (१९-४-२०१०) यवतमाळ जिल्हयातील वणी येथे नुकतेच मा.मुख्यमंत्री महोदयांनी घरकुल योजनेचा शुभारंभ केला त्या सदर घरकुल योजनेचे उद्दिष्टये व अर्थसंकल्पात केलेल्या निधीची तरतूदीची तपशिलवार माहिती हवी आहे, ती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे.
२. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दि.२३.४.२०१० रोजी सदरची माहिती ही गृहनिर्माण विभागाशी संबंधित असल्यामुळे गृहनिर्माण विभागाकडे हस्तांतरीत केला व तसे अपिलकर्ता यांना कळविलेले असल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी तथा विभाग यांनी दि.६.५.२०१० रोजी अपिलकर्ता यांनी सदर अर्जातंर्गत अपेक्षिलेली घरकूल योजनेसंदर्भात या कार्यासनाची माहिती निरंक आहे. परंतू या संदर्भात जन माहिती अधिकारी,ग्राम विकास विभाग, मंत्रालय,मंबई सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय,मुंबई आणि कार्यासन गृनिधा-१ गृहनिर्माण विभाग,मंत्रालय,मुंबई कार्यासनाकडे माहिती उपलब्ध असल्यास ती पाठविण्याची संबंधितांना विनंती करण्यांत आलेली आहे. तेव्हा याबाबतचा पुढील पत्रव्यवहार त्यांच्याशी करण्याची विनंती अपिलार्थीना केलेली आहे. परंतू त्यानंतर कोणतीही माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध झाली नाही म्हणून दि.६.९.२०१० रोजी प्रथम अपिलीय अधिकारी, सामाजिक न्याय विभाग यांच्याकडे प्रथम अपिल दाखल केलेले आहे. प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये निर्णय झालेला दिसून येत नाही व त्यासाठी अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगकडे व्दितीय अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यासाठी अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगकडे व्दितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

अपिलार्थी यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, राज्य माहिती आयोगाचे कार्यालयात दि.२१.१२.२०१० रोजी व्दितीय अपिलाची सुनावणीची नोटीस काढल्यानंतर दि.२७.१२.२०१० रोजी माहिती

संदर्भात पत्र जन माहिती अधिकारी यांनी दिलेले आहे. संबंधित जन माहिती अधिकारी सुनावणीस उपस्थित नाहीत व त्यानी त्या संदर्भातील कोणतेही कागदपत्र दाखल केलेले नाहीत. त्यामुळे अपिल क्र.६२३८च्या अपिलातील उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अद्यापपर्यंत कागदपत्र प्राप्त झालेले नाही व त्यावर अपिलकर्ता यांनी आयोगपुढे असे सांगितले की, अद्यापपर्यंत माहिती देण्यांत टाळाटाळ करण्यांत आलेली आहे परंतू पुन्हा संबंधित अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, घरकूल योजनेचे उद्दिष्टबाबतचा शासन निर्णय उपलब्ध करुन दिलेला आहे. परंतू अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, घरकूल योजनेचे उद्दिष्टांचा शासन निर्णय मिळाला परंतू अर्थसंकल्पामध्ये केलेल्या निधीची तपशिलवार माहिती ही दिलेली नाही. त्यावर उपस्थित अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, मंत्रालयाच्या स्तरावर कोणत्याही प्रकल्पाची अंमलबजावणी होत नाही तर मंत्रालयीन स्तरावर धोरण ठरविले जाते. त्या अनुषंगाने संबंधित जिल्हयाच्या स्तरावर त्या योजनेची अंमलबजावणीची सर्व प्रक्रिया केली जाते व त्यामुळे फक्त यवतमाळ जिल्हातील वणी येथील घरकूल योजनेच्या संदर्भामध्ये आर्थिक तरतूदीच्या प्रकल्पाची माहिती हवी असल्यास ती त्या स्तरावर मागणे उचित झाले असते. त्यावर अपिलकर्ता यांनी पुन्हा आयोगापुढे असे सांगितले की, अर्थसंकल्पामध्ये त्याबाबत तरतूद करण्यांत असेल ती मंत्रालयीन स्तरावर उपलब्ध होणे अपेक्षित आहे. परंतू पुन्हा संबंधित अधिकारी यांनी ती मंत्रालयीन स्तरावर उपलब्ध असल्यास उपलब्ध करुन देता येईल असे सांगितले परंतू या संपूर्ण प्रकरणाबाबत ज्या अधिका-यांना याबाबत माहिती आहे त्यांनी आयोगापुढे उपस्थित राहणे जरुरीचे झाले असते.त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे ते शास्तीस पात्र आहे. परंतू शास्ती लादण्यापूर्वी संबधित जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे अधिनियमाच्या कलम २०(१)च्या परंतूका नुसार बंधनकारक असल्यामुळे सदरचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१. अपिलकर्ता यांचे अपिल क्र.६२३९/०२ यांचे अपिल मंजूर करण्यांत येत असून, अपिलकर्ता यांनी त्यांच्या दि.१२.४.२०१० च्या (१९.४.२०१०)च्या अर्जापमाणे मागितलेली माहिती अर्थसंकल्पात केलेल्या निधीच्या तरतूदीच्या संदर्भात हे निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत विनामूल्य पोष्टाने पाठवावी.**

**२. जन माहिती अधिकारी, सामाजिक न्याय विभाग यांनी अपिलकर्ता यांना त्यांच्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अधिनियमाच्या कलम २०(१)अन्वये शास्ती कां करण्यांत येऊ नये याबाबतचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसाचे आत आयोगासमोर समक्ष येऊन करावा. अन्यथा त्यांचे विरुध्द शास्ती लादण्यांत येईल याची नोंद घ्यावी.**

**३. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

**मुंबई**
**दि.१७/१/२०११** **(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**
**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५००८३/अपील क्र.६२४०/२०१०**
**क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५००८४/अपील क्र.६२४१/२०१०**
**क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५००८५/अपील क्र.६२४२/२०१०**

**श्री.गुलाम वारीश शेख (पत्रकार)** **अपीलार्थी**
**रुम नं.२, घनश्याम दास, कि चाल,**
**कालाकिल्ला, धारावी, मंबई -१७**

**विरुध्द**

**१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य अभियंता**
**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे पूर्व**
**मुंबई -४०००५१**

**२. जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य अभियंता** **उत्तरवादी**
**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे पूर्व**
**मुंबई -४०००५१**

***---निर्णय---***

**व्दितीय तिन्ही अपीलाचा दिनांक १२.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक १३/१/२०११.**
**अपीलार्थी व व जन माहिती अधिकारी उपस्थित. अपिलीय अधिकारी अनुपस्थित**

**अपिल क्र. ६३४०/०२**

२. अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य अभियंता सहाय्यक माहिती अधिकारी, कार्यकारी अभियंता झोसु मंडळ म्हाडा भवन, बांद्रा पूर्व मुंबई यांच्याकडे आमदार वर्षा गायकवाड या आमदार झाल्यानंतर धारावी मतदार संघातील सन २००४-२००९ पर्यत विकास कामे करण्यांत आली आहेत त्या विकास कामाच्या संदर्भामध्ये एकूण ७ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे.

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२२.६.२०१० रोजीच्या पत्राने मागितलेली माहिती जुनी असून ती देण्याकरिता या कार्यालयात उपलब्ध असलेली साधनसामुग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागणार आहे. त्यामुळे माहिती अधिकारी अधिनियमातील कलम ७(९)अन्वये आपण मागितलेली माहिती ही त्या स्वरुपात सादर करता येत नाही म्हणून कार्यकारी अभियंता तथा माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील दुरध्वनी क्र.६६४०५४८४वर संपर्क साधुन आगाऊ सूचना देऊन ठरविलेल्या वेळेत कार्यालयीन कामाचे दिवशी हजर राहिल्यास कार्यालयातील नस्ती/दस्तऐवज आपणास पाहणीकरिता उपलब्ध करुन देण्यांत येईल. आपण पाहणी केल्यानंतर नस्तीतील आपणांस आवश्यक असलेल्या पृष्ठक्रमांकाची यादी आपण तयार करुन संबंधित सहाय्यक माहिती अधिकारी आपणास पत्राव्दारे देण्यात येणा-या माहिती पोटी भरावयाच्या रक्कमेचा

भरणा करण्या संदर्भात ७ दिवसांत कळवितील. सदर रक्कमेचा भरणा आपल्याकडून झाल्यानंतर आपण मागणी केलेल्या पृष्ठांच्या छायाकित प्रती आपणास देण्यांत येतील असे कळविलेले असल्याचे दिसून येते.

अपिलकर्ता यांनी दि.३१.७.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले व त्यामध्ये दस्तऐवजाची नक्कल प्रत मिळाली नाही म्हणून सदरची अपील माहिती अधिकारी यांच्या विरोधात माहिती विनाशुल्क माहिती देण्याबाबत प्रथम दाखल केलेले आहे. परंतू अपिलकर्ता सुनावणीस उपस्थित राहिले नाही म्हणून अपील निकाली काढण्यांत आलेले असल्याचे दिसून येते व त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

४. अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागितलेली आहे. त्या माहितीमध्ये भ्रष्टाचार झालेला असल्यामुळे ती माहिती उपलब्ध करुन देणे जरुरीचे आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी सन २००४-२००९ या कालावधीतील आमदार निधी विकास कामाच्या संदर्भात तपशिलवार माहिती मागितलेली आहे. ती कोणत्या एका विकास कामासंदर्भात मागितलेली नाही . त्यामुळे माहिती उपलब्ध होण्यापूर्वी त्यांनी भ्रष्टाचार झाल्याचा साक्षात्कार झाल्याचे दिसून येते. यावरुन अपिलकर्ता यांनी सदर माहिती जन हिताकरिता मागितलेली नसून माहिती मागण्याचा अधिकार आहे म्हणून कशाही प्रकारे ही माहिती मागितलेली आहे व त्याबाबत त्यांना विहित मुदतीत म्हणजे दि.२२.६.२०१० रोजी कळविण्यांत आलेले आहे. अपिलकर्ता यांना दि.२२.६.२०१० रोजी माहिती अधिकारी यांनी कळविलेले असल्यामुळे ते योग्य असल्यामुळे अपिलकर्ता यांनी त्याप्रमाणे नस्तीची पाहणी करुन आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित प्रतीचे शुल्क भरुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहिले असते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २ ((त्र)प्रमाणे 'माहिती अधिकारी' या संदर्भात व्याख्या केलेली आहे. त्यामुळे सार्वजनिक प्राधिकरणामध्ये उपलब्ध असलेली व नियंत्रणात असलेले कागदपत्रे व दस्तऐवज यांचे निरिक्षण करुन त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे अशी तरतूद आहे व त्यामुळे महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या नियम ४ प्रमाणे निरिक्षणाच्या संदर्भातमध्ये जी फी भरावयाची आहे ती भरणे आवश्यक राहिल त्याकरिता अपिलकर्ता यांनी कामकाजाच्या दिवसाची तारीख व वेळ जन माहिती अधिकारी यांना कळवून त्यावेळी उपस्थित राहून कळविल्याप्रमाणे कार्यवाही करुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्यामुळे सदरची अपील निकाली कास्ण्यास पात्र आहे.

**अपिल क्र. ६३४१/०२**

२. अपिलकर्ता यांनी दि.८.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, उपमुख्य अभियंता, झोपडपट्टी पुनर्वसन मंडळ, बांद्रा यांच्याकडे २००४-२००९ या कालावधीतील खासदार फंडातून वापर केलेल्या निधीच्या कामाबाबत माहिती मागितलेली दिसून येते सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले आहे.

३. दि.२२.६.२०१० रोजी अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही त्यांच्या अर्जाप्रमाणे मागणी केलेली माहिती जूनी असून ती देण्याकरिता कार्यालयात उपलब्ध असलेली साधन सामुग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागणार आहे. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम ७(९)अन्वये आपण मागितलेली माहिती ही त्या स्वरुपात सादर करता येत नाही व त्यामुळे कार्यकारी अभियंता शहर यांचे कार्यालयात दूरध्वनी क्र.६६४०५४८४ वर संपर्क साधून सूचना देऊन ठरविलेल्या वेळेत कार्यालयीन कामाचे दिवशी हजर राहिल्यास कार्यालयातील नस्ती/दस्तऐवज आपणांस पाहणीकरिता उपलब्ध करुन देण्यांत येईल.आपण पाहणी केल्यानंतर नस्तीतील पाहणीकरिता उपलब्ध करुन देण्यांत येईल. आपण पाहणी केल्यानंतर नस्तीतील आवश्यक असलेल्या पृष्ठ क्रमांकाची यादी आपण तयार करुन संबंधित सहाय्यक माहिती अधिकारी यांच्याकडे लेखी स्वरुपात सादर करावी. जेणेकरुन त्यानंतर संबंधित सहाय्यक माहिती अधिकारी आपणांस पत्राव्दारे देण्यात येणा-या माहितीपोटी भरावयाच्या रक्कमेचा भरणा करण्यासंदर्भात ७ दिवसांत कळवतील. सदर

रक्कमेचा भरणा आपल्याकडून झाल्यानंतर आपण मागणी केलेल्या पृष्ठांची छायांकित प्रती आपणांस देण्यांत येतील असे कळविलेले असल्याचे दिसून येते.

४. तसेच प्रथम अपिलाच्या निर्णयाशिवाय अपिलकर्ता यांनी त्याचप्रमाणे कार्यकारी अभियंता, माहिती अधिकारी यांनी दि.२२.६.२०१० रोजी कळविण्यांत आलेले दिसून येते. परंतू अपिलार्थी यांनी तशा प्रकारची कार्यपध्दती न करता दि.३१.७.२०१० रोजी प्रथम अपील करुन सदरची माहिती विनामूल्य उपलब्ध व्हावी अशी विनंती केली. परंतू अपिलाच्या सुनावणीस उपस्थित न राहिल्यामुळे सदरील अपिल निकाली काढले. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

४. **अपिल क्रमांक ६२४०/०२** मध्ये विवेचन केल्याप्रमाणे अपिलकर्ता यांना विहित मुदतीत कळविलेले असल्यामुळे अपिलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील व सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**<u>अपिल क्र. ६३४२/०२</u>**

२. अपिलार्थी यांनी दि.२१.२.२०१० रोजी व दि.२२.२.२०१० रोजी जन माहिती अधिक ारी उपमुख्य अभियंता, झोपडपट्टी पुनर्वसन मंडळ यांच्याकडे जिल्हाधिकारी,मुंबई हस्तांतरण टेबल नं.४ नियोजन दि.१३.५.२०१० रोजी कार्यकारी अभियंता, झोपडपट्टी सुधार मंडळ, म्हाडा भवन, यांना पत्र दिले. आमदार एकनाथ गायकवाड राज्यमंत्री सार्वजनिक आरोग्य व वैद्यक्यि शिक्षण यांच्या दि.१५.४.२००२ नुसार अशोक मिल कपाऊंड येथील ' अ ' बालवाडी 'क'समाजकल्याण या सर्व समाजउपायोगी प्रकल्पाकरिता आमदार निधीमधून जी कार्यवाही झालेली आहे त्या कार्यवाहीच्या संदर्भामध्ये जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये जमा झाले सर्व दस्तएवेज, रक्कम व सर्व अटी विषयी अहवाल इत्यादि सर्व माहितीच्या सांक्षाकित प्रती मागितलेल्या दिसून येत आहे. सदर माहिती व्यक्तिशः घेणार आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून दि.३१.७.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती अर्धवट व खोटी आहे. दस्तऐवज प्रती दिल्या नाहीत व सदरील माहिती ही त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना दि.२२.६.२०१० रोजी त्यांच्या अर्जाप्रमाणे मागणी केलेली माहिती जूनी असून ती देण्याकरिता कार्यालयात उपलब्ध असलेली साधन सामुग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागणार आहे. त्यामुळे माहिती अधिकारी अधिनियमाच्या कलम ७(९)अन्वये आपण मागितलेली माहिती ही त्या स्वरुपात सादर करता येत नाही व त्यामुळे कार्यकारी अभियंता शहर यांचे कार्यालयात दूरध्वनी क्र.६६४०५४८४ वर संपर्क साधून सूचना देऊन ठरविलेल्या वेळेत कार्यालयीन कामाचे दिवशी हजर राहिल्यास कार्यालयातील नस्ती/दस्तऐवज आपणांस पाहणीकरिता उपलब्ध करुन देण्यांत येईल.आपण पाहणी केल्यानंतर नस्तीतील पाहणीकरिता उपलब्ध करुन देण्यांत येईल. आपण पाहणी केल्यानंतर नस्तीतील आवश्यक असलेल्या पृष्ठ क्रमांकाची यादी आपण तयार करुन संबंधित सहाय्यक माहिती अधिकारी यांच्याकडे लेखी स्वरुपात सादर करावी. जेणेकरुन त्यानंतर संबंधित सहाय्यक माहिती अधिकारी आपणांस पत्राव्दारे देण्यात येणा-या माहितीपोटी भरावयाच्या रक्कमेचा भरणा करण्यासंदर्भात ७ दिवसांत कळवतील. सदर रक्कमेचा भरणा आपल्याकडून झाल्यानंतर आपण मागणी केलेल्या पृष्ठांची छायांकित प्रती आपणांस देण्यांत येतील असे कळविलेले असल्याचे दिसून येते. तसेच प्रथम अपिलाच्या निर्णयाशिवाय अपिलकर्ता यांनी त्याचप्रमाणे कार्यकारी अभियंता, माहिती अधिकारी यांनी दि.२२.६.२०१० रोजी

कळविण्यांत आलेले दिसून येते. प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये अपिलकर्ता हजर राहिले नाहीत म्हणून अपिल निकाली काढण्यांत आलेले आहे असे दिसून येते.

४. अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही विस्तृत व व्यापक प्रमाणात जरी असली तरी अपिलकर्ता यांना दि.२९.३.२०१० रोजी ३० दिवसाची मुदत संपल्यानंतर कळविण्यांत आलेले आहे व त्यामुळे अपिलकर्ता यांनी निरिक्षण केल्यानंतर आवश्यक असलेल्या छायांकित कागदपत्राच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याची प्रक्रिया ही ३० दिवसामध्ये पूर्ण करावयाची असते. परंतू जन माहिती अधिकारी यांनी त्याबाबतची काहीही कल्पना दिसून येत नाही. तसेच माहिती ३० दिवसामध्ये उपलब्ध करुन दिलेली नसेल तर ती कलम ७(३)प्रमाणे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी लागते. तसेच अपिलकर्ता गैरहजर होते या कारणास्तव प्रथम अपिल हे निकाली काढणे योग्य नाही. माहिती दिली किंवा नाही हे सिध्द करण्याची जबाबदारी अधिनियमाच्या कलम १९(५) अन्वये जन माहिती अधिकारी याचीच आहे व त्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली किंवा नाही याबाबत चौकशी करुन प्रथम अपिलाचा निर्णय देणे आवश्यक असते व त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नसल्याने विनामूल्य माहिती पुरवावी व खर्च माहिती अधिकारी यांनी स्वतः करणे संयुक्तिक राहील त्यामुळे सदरचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१. अपिलकर्ता यांचे अपिल क्र.६२४०/०२ वस अपिल क्र.६२४१/०२ ही निकाली काढण्यांत येत आहेत.**

**२. अपिल क्र.६२४२/०२ हे अपिल मंजूर करण्यांत येत असून अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती निरिक्षण करुन विनामूल्य उपलब्ध करुन घ्यावी अपिलकर्ता उपस्थित झाल्यावर जन माहिती अधिकारी यांनी सदरची संबंधित नस्ती उपलब्ध करुन देऊन निरिक्षणाअंती आवश्यकत्या माहितीचे कागदपत्र विनामूल्य उपलब्ध करुन द्यावेत. माहितीचा खर्च सर्व जन माहिती अधिकारी यांनी स्वतः करावयाचा आहे.**

**३. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

**मुंबई**
**दि.१७/१/२०११**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

ाहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

**क्र-मुमाआ/नोंदणी क्र.४९५२९/अपील क्र.६११०/२०१०**

**श्री.नरेंद्र भिकाजी सावंत** **अपीलार्थी**
**११/३४५,सहकार नगर-३**
**चेंबूर, मुंबई ४०० ०७१**

**विरुध्द**

**१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अवर सचिव,**
**नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई ४०००३२**

**२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी** **उत्तरवादी**
**नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई ४०००३२**

***---निर्णय---***

**व्दितीय अपीलाचा दिनांक २४.०८.२०१०**
**सुनावणीचा दिनांक ६/१/२०११.**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित. अपिलीय अधिकारी अनुपस्थित.**

२. अपिलकर्ता यांनी दि.२२.५.२०१० रोजी (११.३.२०१०)रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग यांचेकडे संघमित्रा सामाजिक संस्था रजि.नं.२९२२९ व साईकृपा संस्था रजि.नं.एफ-२३१०१ यांना समाजकल्याण मंदिर बनविण्यासाठी दलित सुधार वस्ती अंतर्गत नगर विकास विभागाकडून रु.१०,३९,०००/- (अक्षरी रुपये दहा लाख एकोणचाळीस हजार मात्र) चा फंड(निधी)मंजूर करण्यांत आला त्या संदर्भामध्ये मंजूर निधी फंडामधील किती रक्कम खर्च झाली, संबंधित कामासाठी मंजूर निधी इतरत्र कामासाठी वळविण्यांत आला आहे का तसेच सदर निधी खर्च झाला नसल्यास तो कोणत्या विभागाच्या खात्यात जमा केला आहे. संबंधित कामासाठी सुरुवात करताना वापरण्यांत आलेली रेती, खडी, विटा व मजूरांची मजूरी यांचा खर्च कोणी केला, याबाबतची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.३०.६.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये सुध्दा निर्णय झालेला दिसून येत नाही व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

४. अपिलकर्ता यांचा अर्ज हा जिल्हाधिकारी कार्यालयाकडे हस्तांतरीत करण्यांत आला होता व त्याप्रमाणे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे. त्या संदर्भात सुध्दा अपिलकर्ता यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रथम अपिल दाखल केलेले होते. अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयागाकडे तक्रार क्र.२०१०/६३५/०२ दाखल केलेली होती. त्या तक्रारीचा निर्णय सुध्दा इि.२६.५.२०१० रोजी दिलेला आहे व या संपूर्ण प्रकरणामध्ये अपिलकर्ता यांना दि.९.३.२०१० रोजी कार्यकारी अभियंता, घाटकोपर विभाग/मुंबई मंडळ, म्हाडा यांनी सुध्दा माहिती दिलेली आहे. त्यानंतर दि.१६.१०.२००९ रोजी जिल्हाधिकारी,मुंबई यांनी माहिती दिलेली आहे. तसेच दि.१४.१०.२००९ रोजी जिल्हा नियोजन अधिकारी,मुंबई उपनगर जिल्हा यांनी सुध्दा पत्र

दिलेले आहे. दि.९.९.२०१० रोजी पत्रव्यवहार केलेला आहे. तसेच दि.२५.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, जिल्हा नियोजन अधिकारी(प्रभारी) यांनी सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू तरीही अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना मुद्दा क्र.३ ची माहिती अद्यापही प्राप्त झालेली नाही. मुद्दा क्र.३ मध्ये संबंधित निधी खर्च झालेला नसल्यास तो कोणत्या विभागात/खात्यात जमा आहे याबाबतची माहिती अद्यापही उपलब्ध झालेली नाही. त्यावर म्हाडाचे अधिकारी उपस्थित आहे व त्यांनी असे सांगितले की, सदरच्या निधीच्या संदर्भामध्ये माहिती ही जिल्हाधिकारी,मुंबई यांचेशी संबंधित असल्यामुळे त्यांना दि.२१.८.२०१० रोजी पत्र देण्यांत आले होते व त्याप्रमाणे त्यांना माहिती पुरविण्यासही कळविण्यांत आलेले होते. परंतू त्यांच्याकडून अद्याप माहिती उपलब्ध झालेली नाही. परंतू त्यांच्याकडून माहिती उपलब्ध करुन देता येईल असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

४. अपिलकर्ता यांचे अपिल अंशतः मंजूर करण्यांत येत असून म्हाडाचे माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत जिल्हा नियोजन अधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांच्याकडून दि.२१.८.२०१० रोजी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन घेऊन अपिलार्थी यांना ती विनामूल्य रजिस्टर पोस्टाने पाठवावी.

५. मुख्य लेखा अधिकारी/मुंबई मंडळ, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,गृहनिर्माण भवन, बांद्रा निर्णयाची प्रत पोस्टाने पाठविण्यांत यावी.

६. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई
दि.६/१/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्र-मुमाआ/नों.क्र.४९६८३अपील क्र.६१२६/२०१०**

**श्री.प्रशांत मुकूंद पाटील** **अपीलार्थी**
**व्दारा- श्री. मुकूंद शं. पाटील, ४ तेरेजा अपार्टमेंट,**
**जीवदानी रोड, विरार पूर्व, जि.ठाणे ३४०१० ३०५**

**विरुध्द**

**१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सचिव,**
**मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय,मुंबई ४०००३२**

**२. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव** **उत्तरवादी**
**मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय,मुंबई ४०००३२**

***---निर्णय---***

**व्दितीय अपीलाचा दिनांक १०.०९.२०१०**

**सुनावणीचा दिनांक ६/१/२०११.**

**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित. जन माहिती अधिकारी, नगर विकास विभाग उपस्थित. अपिलीय अधिकारी अनुपस्थित.**

**२.** अपिलार्थीचे सदरचे अपील हे दि.६.१२.२०१० रोजी सुनावणीसाठी ठेवण्यांत आले होते त्यावेळी अपिलकर्ता उपस्थित होते परंतू मुख्य सचिव यांचे कार्यालयात अवर सचिव हे महाराष्ट्र विधानसभा अधिवेशनासाठी नागपूर येथे असल्यामुळे उपस्थित राहू शकलेले नव्हते. त्यावेळी अपिलकर्ता यांचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले होते व आज जन माहिती अधिकारी यांचे म्हणण ऐकून घेतले. अपिलकर्ता यांनी दि.७.३.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, मुख्य सचिव यांचे कार्यालयात म्हाडा फ्लॅटसाठी पाणी पुरवठा करण्याचे वसई-विरार महापालिक्ेच्या अखत्यारित असून सुध्दा पाणी पुरवठा होत नाही या बद्दलच्या माहितीच्या संदर्भामध्ये मा.राष्ट्रपतीमहोदयांकडून दि.२५.७.२०१० रोजी पाठविण्यांत आलेल्या पत्राची प्रत आणि त्यावर झ ाालेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी सदरचा अर्ज हा नगर विकास विभागाकडे वर्ग केल्याबाबत कळविण्यांत आलेले होते. परंतू अपिलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि.१९.४.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि.१५.५.२०१० रोजी देण्यांत आला असून मुळ अर्जावरील कार्यवाहीसंबंधी नगर विकास विभागाच्या माहिती अधिकारी यांचेकडे परस्पर संपर्क करण्याच्या विनंतीसह निकाली काढण्यांत येत आहे व त्यामुळे समाधान न झ ाल्याने अपिलकार्ता यांनी राज्य माहिती आयोगकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपिलकर्ता यांनी दि.६.१२.२०१० रोजी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना माहितीच्या संदर्भामध्ये काहीही माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यावर नगर विकास विभागाच्या जन माहिती अधिाकरी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, मा.मुख्य सचिव यांच्या कार्यालयातून दि.१२.३.२०१० रोजी हस्तांतर केलेले पत्र हे त्यांच्या कोणत्याही कार्यालयात उपलब्ध झालेले आढळून आलेले नाही. त्यामुळे त्यावर कार्यवाही करता आलेली नाही. सर्व नोंदणीवहयातील नोंदीची तपासणी केलेली आहे परंतू सदरील प्रकरण

आढळून येत नाही. परंतू सदरच्या विषयाच्या संदर्भामध्ये झालेल्या कार्यवाहीची माहिती ही अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देता येईल. सदरच्या विषयाच्या संदर्भामध्ये राज्य माहिती आयुक्त,बृहन्मुंबई यांचेकडे सदर अपिलावर दि.७.१०.२०१० रोजी सुनावणी घेण्यांत आली होती. सदर सुनावणीमध्ये ' सचिव स्तरावर याबाबत बैठक घेऊन निर्णय घ्यावा ' असे निर्देश राज्य माहिती आयुक्त,बृहन्मुंबई यांनी दिलेले आहेत. त्या अनुषंगाने विरार-बोळींज येथील कोकण गृहनिर्माण मंडळाच्या गृह प्रकल्पातील वसई विरार शहर महानगरपालिका यांचेकडून पाणी पुरवठा होणेबाबत आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना मुंबई प्राधिकरण महानगरपालिका १९४९ मधील कलम ४४८ मधील तरतूदीच्या अनुषंगाने अधिकारानुसार एक महिन्यात कार्यवाही करण्यांत यावी असे आदेश देण्यांत आलेले आहेत. सदर प्रकरणी अर्जदारास अपेक्षित असलेली कार्यवाही शासनामार्फत पूर्ण करण्यांत आलेली आहे असे असल्यास अपिलकर्ता यांना सदरच्या दि.६.१.२०११,दि.५.१.२०११ तसेच दि.८.१२.२०१० आयुक्त व वसई विरार तसेच नगर विकास विभाग या पत्राच्या प्रती उपलब्ध करुन देण्यांत याव्यात. मात्र **मुख्य सचिव यांच्या कार्यालयातून दि.१२.३.२०१० रोजी सचिव (२)नगर विकास विभाग यांच्याकडे ज्या अर्जाचे हस्तांतरण करण्यांत आलेले आहे त्याचा पुन्हा शोध घेऊन ती ज्या कर्मचारी किंवा अधिकारी यांच्याकडे प्रलंबित असेल त्याची नोंदणी केलेली नसेल त्याबाबतची जबाबदारी निश्चित करुन त्यांचे विरुध्द योग्यती प्रशासकिय कारवाई करणे आवश्यक आहे. अन्यथा मा.मुख्य सचिव यांचे कार्यालयाला देण्यांत आलेल्या पत्राची सुध्दा दखल नगर विकास विभाग घेत नाही असे चित्र निर्माण झालेले आहे**. त्यामुळे सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**६. अपिलकर्ता यांचे अपिल अंशतः मंजूर करण्यांत येत असून जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत राज्य माहिती आयुक्त (बृहन्मुंबई)यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे तसेच अपिलकर्ता यांचे अर्जातील मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये झालेल्या कार्यवाहीची माहिती कागदपत्राच्या स्वरुपात अपिलार्थी यांना विनामुल्य उपलब्ध करुन देण्यांत याव्यात. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम कलम २० अन्वये शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.**

**७. प्रत, सचिव (२) नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई यांना निर्णयाची प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यांत यावी.**

**८. प्रत, जन माहिती अधिकारी, नवि-२३,नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई यांना निर्णयाची प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यांत यावी.**

**९. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

**मुंबई**
**दि.६/१/२०११**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८अन्वये दाखल झालेली तक्रार**

**तक्रार क्र.रामामबृ/१५९१/२०१०**

**श्री.वैभव चंद्रकांत कोरगांवकर** **तक्रारदार**
**४८/३,राधाकृष्ण निवास, डॉ.आंबेडकर रोड,**
**दादर पूर्व, मुंबई ४०००१४**

**विरुध्द**

**१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा,**
**पोलिस उपआयुक्त (म.रा.)पोलिस आयुक्त कार्यालय,**
**क्रॉर्फड मार्केट, मुंबई ०१**
**२. जन माहिती अधिकारी तथा** **उत्तरवादी**
**पोलिस उपआयुक्त (म.रा.)पोलिस आयुक्त कार्यालय,**
**क्रॉर्फड मार्केट, मुंबई ०१**

***---निर्णय---***

**तक्रारीचा दिनांक २०.०४.२०१०**
**सुनावणीचा दिनांक ६/१/२०११.**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित. अपिलीय अधिकारी अनुपस्थित.**

२. अपिलार्थी यांनी दि.२७.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, गृह विभाग यांच्याकडे मुंबई पोलिस आयुक्त यांचेकडे असलेल्या खाजगी इमारतीतील जागाबाबत भारत सरंक्षण कायद्याखाली (इंडिया डिफेन्स रुल्स १९४४)अंतर्गत अधिग्रहीत केलेल्या खाजगी इमारतीतील जागाबात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची प्रत मिळणे. भारत सरंक्षण कायदयातील मुदत संपल्यानंतर इतर कोणत्या कायदयाने सदर जागाचे अधिग्रहण सुरु ठेवणेबाबतचा शासन आदेश प्रत मिळणे. वरील विषयाबाबत संबंधित न्यायालयात सुरु असलेल्या तसेच संपलेल्या मा.न्यायालयीन प्रकरणाचा सविस्तर तपशील मिळणे. सदर खाजगी इमारतीमधी खोल्या या सदर जागेत राहत असणा-या पोलिस कर्मचारी यांस सदर जागेच्या मालकांचे थेट भाडेकरु करणेबाबत शासनाचा विचार असल्यास शासनास सादर करण्यांत आलेला संबंधितांच्या प्रस्तावाची प्रत मिळणे इ. माहिती मागितली होती.

३. अपिलकर्ता यांनी दि.१२.३.२०१०अनुषंगाने अर्जाच्या संदर्भ क्र.मुमाआ/२००९/४५४०५/अपील क्र.५३१५/०२/२०१० या अपिलाचा निर्णय दि.६.२.२०१० रोजी दिलेला असून अर्जदाराच्या अपिलाचा संदर्भ आहे तो सोबत जोडलेल्या कागदपत्राची प्रत हे आदेश जन माहिती अधिकारी, गृह विभाग यांना पाठविण्यात येत आहे, त्यावर १५ दिवसांत कार्यवाही करावी. याबाबतच्या कार्यवाहीच्या संदर्भामध्ये गृह विभाग यांच्या माहिती अधिकारी यांनी दि.१२.३.२०१० रोजी कार्यालयातील संबंधित प्रकरणांची/नस्तीचा शोध घेतला असता संबंधित प्रकरणामध्ये नस्ती आढळून येत नाही. अपिल अर्जामध्ये विचारलेली माहिती नियंत्रक निवास व्यवस्था, सामान्य प्रशासन विभाग यांच्याकडे सुध्दा उपलब्ध नसल्याचे त्यांनी कळविले आहे. त्याचप्रमाणे संबंधित प्रकरणाची नस्ती मंत्रालयीन अभिलेख कक्षात सुध्दा दाखल झालेली नाही. आपण मागितलेली माहिती या कार्यालयातील अभिलेखावर उपलब्ध नसल्यामुळे आपणांस उपलब्ध करुन देता येत नाही. त्या प्रकरणी मात्र गृह विभाग यांनी नियंत्रक निवास व्यवस्था यांना जी टिप्पणी दिलेली आहे त्याची प्रत अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरिता तक्रारकर्ता यांची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

# <u>आदेश</u>

५. तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यांत येत असून हा निर्णय मिळाल्यापासून तक्रारदार यांना सामान्य प्रशासन विभागाकडून गृह विभागाकडे आलेल्या टिप्पणीची छायांकित प्रत विनामूल्य उपलब्ध करुन देण्यांत यावी.

६. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई
दि.६/१/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८अन्वये दाखल झालेली तक्रार

तक्रार क्र.रामाम/१६१४/२०१०

श्री.चेतन कोठारी तक्रारदार
५२, ओसीनिक अपार्टमेंट
डॉ.राजाबली पटेललेन च्या समोर, बी.देसाई रोड, मुंबई ४०००२६

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक उपायुक्त
३ रा मजला ई वॉर्ड म्युनिसिपल ऑफि, १०हाफिजुद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई १८

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत व प्रस्ताव) उत्तरवादी
३ रा मजला ई वॉर्ड म्युनिसिपल ऑफि, १०हाफिजुद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई १८०१

***---निर्णय---***

तक्रारीचा दिनांक १०.१२.२०१०
सुनावणीचा दिनांक ६/१/२०११.
तक्रारदार व जन माहिती अधिकारी उपस्थित. अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

तक्रारदार यांनी दि.१९.१०.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता (इमारत व प्रस्ताव) ' ई ' वॉर्ड यांचेकडे ' Certified copy of original approved plan of the entire building name of Oceanic Apatments co-operative Housing society Ltd.(Reg.No.Mom/HSG-3887 dt. 29.1.1972) (C.S. No.762 of Malbar &Cumballa hill Division) मध्ये काही बदल करण्यास अर्ज आलेले आहेत का? याबद्दलची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या माहितीच्या संदर्भामध्ये अपिलकर्ता यांनी दि.२३.११.२०१० रोजी निरिक्षण करुनच 'I.O.D./C.C./Approval letter per page Rs.25/- and For Approved Plan per side per plan Rs.60/-xerosing & conveyance to make zeroxing will have to be borne by you ' असे कळविण्यांत आलेले आहे.

तक्रारदार यांनी दि.१०.१२.२०१० रोजी उपरोक्त शुल्काबाबत आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे. राज्य माहिती आयोगाचे आदेश असून सुध्दा जास्तचा खर्च आक्ारण्यांत आलेला आहे तसेच झेरॉक्स करण्यासाठीचा ये-जा टॅक्सी प्रवासखर्च सुध्दा आकारण्यांत येतो, याबद्दल तक्रार केलेली आहे.

सदरच्या तक्रारीच्या संदर्भामध्ये तक्रारदार यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीप्रमाणे तसेच महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीप्रमाणे कोणताही प्रवासखर्च (conveyance)घेता येत नाही परंतू तो मागितला जातो. संबधित कागदपत्र उपलब्ध होण्याकरिता जो नियमानुसार खर्च आहे तो देण्यास तयार आहे परंतू conveyance खर्च मात्र जन माहिती अधिकारी यांना घेता येणार नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, Approved Plan च्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली जाते तेव्हा त्या Approved Plan sheet मोठया असतात त्याच्या फोटाकॉपी करण्यासाठी कार्यालयाच्या बाहेर जाताना संपूर्ण नस्ती घेऊन पाठवावे लागते त्या नस्ती मोठया असल्याने त्याची टॅक्सीनेच ने-आण करावी लागते. अशा प्रकारे टॅक्सीचा ये-जा खर्च हा त्यांना करावा लागतो.

परंतू त्याबाबत सुध्दा तक्रार यांनी पुन्हा हरकत घेतलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, या प्रकरणामध्ये तक्रारदार यांना संपूर्ण कागदपत्र विनामूल्य दिलेले आहेत. परंतू प्रवास खर्चाबाबतची त्यांची तक्रार कायम आहे असे त्यांचे म्हणणे आहे त्याकरिता श्री.भास्कर प्रभू यांनी आयोगापुढे जी तक्रार केलेली आहे त्या तक्रारीची सुनावणी महापालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाच्या वरिष्ठ अधिका-याबरोबर घेऊन त्यातून निर्णय घेण्यांत येईल. परंतू तूर्त माहिती विनामूल्य व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. त्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

७. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.
८. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई
दि.१०/१/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०२५६/अपील क्र.६२०९/२०१०**

**श्री.शंभूशरण सक्सेना** **अपीलार्थी**
**रु.न.१०१४ सुलेबाई चाळ, रायगड नगर,**
**गोशाला रोड, मुलूंड पश्चिम, मुंबई ४०**

**विरुध्द**

**१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.आयुक्त, टी वॉर्ड**
**मुंमनपा लाला,देवीदयाल मार्ग, मुलूंड पश्चिम, मुंबई -८०**

**२. जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(बी/एफ)टी वॉर्ड** **उत्तरवादी**
**मुंमनपा लाला,देवीदयाल मार्ग, मुलूंड पश्चिम, मुंबई -८०**

***---निर्णय---***

**व्दितीय अपीलाचा दिनांक १८.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक १०/१/२०११.**
**अपीलार्थी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित. जन माहिती अधिकारी उपस्थित.**

२. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी टी वॉर्ड यांच्याकडे सन २०००-२०१० या कालावधीतील ३५१ कलमाप्रमाणे दिलेल्या नोटीशीची माहिती व नोंदणीकृत उपक्रमाच्या संदर्भामध्ये व त्यावरील कार्यवाहीच्या संदर्भामध्ये एकूण ५ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते.

३. अर्जाच्या अनुषंगाने दि.१३.९.२०१० रोजी अपिलकर्ता यांना माहितीकरिता निरिक्षण करावे व निरिक्षणअंती प्रती पेज रु.२/-प्रमाणे खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले असल्याचे दिसून येते. परंतू अपिलकर्ता यांनी दि.१६.९.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दि.२६.१०.२०१० रोजी देण्यांत आला असून, अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी, सहा.अभियंता(इमारत व कारखाने)यांनी एक महिन्यात विहित शुल्क भरुन माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी, असे कळविलेले असल्याचे दिसून येते. परंतू त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सुनावणीच्या वेळी अपीलकर्ता गैरहजर होते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी १० वर्षातील माहिती मागितलेली आहे व ती अतिशय व्यापक व मोघम स्वरुपाची माहिती आहे व त्यामुळे अनावश्यक कागदपत्र उपलब्ध करुन देण्यापेक्षा अपिलकर्ता यांना आवश्यकते कागदपत्र उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने त्यांनी निरिक्षण करावे व खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे अपिलार्थी यांना कळविलेले होते**.**

४. **माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २ (त्र)प्रमाणे माहितीचा अधिकार या संज्ञेची व्याख्या केलेली आहे त्यामध्ये "सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणात असलेली कागदपत्रे,अभिलेख, दस्तऐवज यांचे निरिक्षण करुन त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे "** अशी तरतूद आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना कळविलेले योग्य असल्यामुळे अपिलार्थी यांनी निरिक्षण करुनच माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक झाले असते. त्याकरिता अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी

यांचेकडे संपर्क साधून व संबंधित नस्तीचे निरिक्षण करुन विहित शुल्क भरुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी. त्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

**१. अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यांत येते.**
**२. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

**मुंबई**
**दि.१०/१/२०११**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०२५३/अपील क्र.६२०६/२०१०**

**श्री.शंभूशरण सक्सेना** **अपीलार्थी**
**रु.न.१०१४ सुलेबाई चाळ, रायगड नगर,**
**गोशाला रोड, मुलूंड पश्चिम, मुंबई ४०**

**विरुध्द**

**१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता-एस-विभाग**
**महानगर पालिका कार्यालय,एल बी.एस.मार्ग, भांडूप(पश्चिम) मुंबई ७८**

**२. जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(बी/एफ)टी वॉर्ड** **उत्तरवादी**
**महानगर पालिका कार्यालय,एल बी.एस.मार्ग, भांडूप(पश्चिम) मुंबई ७८**

***---निर्णय---***

**व्दितीय अपीलाचा दिनांक २७.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक १०/१/२०११.**
**अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित**

**२.** अपिलकर्ता यांनी दि.१४.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, एस-विभाग,भांडुप यांच्याकडे त्यांच्या दि.२४.५.२०१० च्या पत्रावर झालेल्या कार्यवाहीची माहिती एकूण ३ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. माहिती पोष्टाने किंवा व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने दि.२.८.२०१० रोजी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये माहितीच्या संदर्भामध्ये निरिक्षणाकरिता उपस्थित होते असे कळविलेले असल्याचे दिसून येते. परंतू त्याने समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.२१.८.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दि.१.१०.२०१० रोजी देण्यांत आला असून अर्जदारास माहिती उपलब्ध करुन द्यावी, असा निर्णय दिलेला आहे. परंतू त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.७.१०.२०१०रोजी पुन्हा स्मरणपत्र दिलेले दिसून येते. परंतू त्यांनतरही माहिती मिळालेली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल केलेले आहे.

४. अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही त्यांच्या दि.२४.५.२०१० च्या अर्जावर झालेल्या कार्यवाहीबद्दलची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता यांनी निरिक्षणकरिता कार्यालयात उपस्थित व्हावे असे जे कळविलेले आहे ते कोणत्याही प्रकारे माहिती अधिकारी अधिनियम २००५ च्या तरतूदीत आहे हे माहिती नाही किंवा त्यांना माहिती उपलब्ध करुन द्यावयाची नाही याकरिता कळविलेले असल्याचे दिसून येते. कोणत्याही अधिका-यावर कार्यवाही झालेली असेल त्याबाबतची जी टिप्पणी असेल किंवा जो निर्णय असेल त्याबद्दलची कागदपत्रे देण्याकरिता निरिक्षण देण्याची आवश्यकता नाही व त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या

निर्णयानंतर सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाचे उल्लंघन केलेले दिसून येते व त्यामुळे जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र आहेत.

५. आयोगाच्या कार्यालयाने दि.१३.१२.२०१० रोजी सुनावणीची नोटीस काढलेली असून सुध्दा जन माहिती अधिकारी हे हजर झालेले नाहीत व माहिती सुध्दा उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांच्या विरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतू शास्ती लादण्यापूर्वी अधिनियमाच्या कलम २०(१)च्या परंतुकाप्रमाणे त्यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक असल्यामुळे सदरचे अपिल हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**३. अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यांत येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत अपिलकर्ता यांना त्यांनी मागितलेली माहिती विनामूल्य रजिस्टर पोस्टानी उपलब्ध करुन द्यावी.**

**२. अपिलकर्ता यांचे दि.१४.६.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे व अधिनियमाच्या तरतूदींचे उल्लंघन केलेले असल्यामुळे तसेच प्रथम अपिलाच्या आदेशानंतरही माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१)अन्वये शास्ती कां लादण्यांत येऊ नये, याबद्दलचे त्यांचे म्हणणे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत आयोगाकडे समक्ष येऊन मांडावे अन्यथा त्यांच्या विरुध्द शास्ती लादण्यांत येईल याची नोंद घ्यावी.**

**१०. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

**मुंबई**
**दि.१०/१/२०११**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०२५७/अपील क्र.६२१०/२०१०**

**श्री.शंभूशरण सक्सेना** **अपीलार्थी**
**रु.न.१०१४ सुलेबाई चाळ, रायगड नगर,**
**गोशाला रोड, मुलूंड पश्चिम, मुंबई ४०**

**विरुध्द**

**१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.आयुक्त, टी वॉर्ड**
**मुंमनपा लाला,देवीदयाल मार्ग, मुलूंड पश्चिम, मुंबई -८०**

**२. जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(बी/एफ)टी वॉर्ड** **उत्तरवादी**
**मुंमनपा लाला,देवीदयाल मार्ग, मुलूंड पश्चिम, मुंबई -८०**

***---निर्णय---***

**व्दितीय अपीलाचा दिनांक १८.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक १०/१/२०११.**
**अपीलार्थी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित. जन माहिती अधिकारी उपस्थित.**

२. अपिलकर्ता यांनी दि.१६.८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, टी वॉर्ड यांच्याकडे सन २००९-२०१० या कालावधीतील टी- वॉर्ड च्या इमारतीच्या दुरुस्तीचे व नोंदणीकरण झालेल्या कॉन्ट्रक्टच्या संदर्भात ५मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते.

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.१४.९.२०१०रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू तरी सुध्दा अपिलकर्ता यांनी दि.१६.९.२०१०रोजी कोणतेही आदेश मिळालेले नाहीत म्हणून प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे व्दितीय अपील दाखल केले आहे.

४. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे हे अपिलार्थी यांनी प्रथम अपिलाच्या सुनवणी मान्य केलेले आहे व त्यामुळे प्रथम अपिल निकाली काढण्यांत आलेले आहे.

५. जन माहिती अधिकारी यांनी दि.१४.९.२०१० रोजी माहितीचे अवलोकन केले असता,अपिलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती दिलेली आहे. त्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

**१. अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यांत येते.**

**२. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

**मुंबई**
**दि.१०/१/२०११** **(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०२५५/अपील क्र.६२०८/२०१०**

**श्रीमती अंजना दोशी** **अपीलार्थी**
**सी-४०, १ ला मजला, मोतीशाजैन पार्क,**
**मोतीशा लेन, भायखळा, मुंबई २७**

**विरुध्द**

**१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.आयुक्त, (स्पेशल इंजिनिअरिंग)**
**मुंबई महानगरपालिका, विस्तार इमारत, ३ रा मजला, महापालिका मार्ग,मुंबई-१**

**२. जन माहिती अधिकारी तथा हायड्रोक्लोरिक इंजिनिअर** **उत्तरवादी**
**मुंबई महानगरपालिका, विस्तार इमारत, ३ रा मजला, महापालिका मार्ग,मुंबई-१**

***---निर्णय---***

**व्दितीय अपीलाचा दिनांक २३.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक १०/१/२०११.**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित. अपिलीय अधिकारी अनुपस्थित.**

**२.** अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी, जल अभियंता,मुंबई महानगर पालिका, यांच्याकडे बिल्डिंग नं. सी अॅन्ड डी किंवा १ व २ शेट मोतिशा जैन पार्क (लॅन्डलॉर्ड-शेट मोतीशा रिलिजिस चॅरिटेबल ट्रस्ट) शेठ मोतिशा लेन भायखळा, मंबई च्या संदर्भात दि.२.११.१९९२ पासून केलेल्या तक्रारीच्या संदर्भामध्ये झालेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येत`. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे.

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दि.२४.६.२०१० रोजी सदाची माहिती ही सह-अभियंता पाणीपुरवठा 'ई'-वॉर्ड च्या संदर्भात असल्यामुळे अपिल अर्ज 'ई' वॉर्डच्या माहिती अधिकारी यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यांत आलेली आहे. त्यामुळे आपण त्यांच्यशी संपर्क साधावा असे कळविलेले असल्याचे दिसून येते. सदरच्या पत्राप्रमाणे दि.१७.७.२०१० रोजी (प्राप्त दि.१.६.२०१०) रोजी माहितीच्या संदर्भामध्ये उत्तर दिलेले दिसून येते. परंतू अपिलकर्ता यांनी खर्चाचा भरणा न केल्यामुळे माहिती उपलब्ध झालेली नसली तरी दि.१०.८.२०१० रोजी प्रथम **अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि.२०.८.२०१० रोजी देण्यांत आलेला दिसून येतो व त्यामुळे अभिलेख्यामध्ये जी माहिती उपलब्ध आहे ती उपलब्ध करुन द्यावी व त्यांच्या तक्रारीबाबत योग्यती कार्यवाही करावी असा निर्णय दिलेला दिसून येतो.** परंतू त्यानंतर माहिती प्राप्त झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल केलेले आहे.

**४.** अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, दि.१७.९.२०१० रोजी ज्या पत्रात संपूर्ण माहिती उपलब्ध नाही कळविलेले असल्यामुळे त्यांनी माहितीच्या खर्चाचा भरणा केलेले नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही मुख्य कार्यालयाच्या तसेच 'ई 'वॉर्डची आहे. सदर माहिती 'ई '- वॉर्डच्या संदर्भात असे अपिलार्थी यांना आधीच कळविलेले आहे. मात्र मुख्य कार्यालयाच्या संदर्भातील माहिती ही त्यांना उपलब्ध करुन देता येणार नाही व त्यावर अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी अनेक तक्रारी केल्या त्या तक्रारीतील संदर्भामध्ये कोणतीही कार्यवाही

झालेली नाही. परंतू माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणामध्ये कार्यवाही करुन मिळत नाही. मात्र झालेल्या तक्रारीच्या संदर्भामध्ये जी जी कार्यवाही झालेली असेल त्या त्या कार्यवाहीचे कागदपत्र जास्तीत जास्त उपलब्ध होऊ शकतात व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कार्यवाही केलेली असली तरी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक राहिल म्हणून अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१. अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यांत येत असून  हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी, ई- वॉर्ड यांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रामधील मागितलेली माहितीच्या छायांकित प्रती विनामूल्य रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात.**

**४. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

**मुंबई**
**दि.१०/१/२०११**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्र-मुमाआ/नोंदणी क्र.४९४३५/अपील क्र.७००१/२०१०**

**श्री.डॉ.संजय पुरुषोत्तम पै,** **अपीलार्थी**
**१४-ए लक्ष्मीनारायण ट्रस्ट बिल्डिंग, तारा टेंपल लेन,**
**डी.बी.मार्ग, पोलिस स्टेशनसमोर, लॅमिग्टंन रोड, मुंबई ४०० ००७**

**विरुध्द**

**१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सचिव**
**मुख्य सचिवांचे कार्यालय,मंत्रालय,मुंबई**

**२. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव** **उत्तरवादी**
**मुख्य सचिवांचे कार्यालय,मंत्रालय,मुंबई १**

***---निर्णय---***

**व्दितीय अपीलाचा दिनांक १२.०८.२०१०**
**सुनावणीचा दिनांक १५/१/२०११.**
**अपीलार्थी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

अपिलार्थी यांनी दि.२४.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, मुख्य सचिवांचे कार्यालय यांच्याकडे **आय.ए.एस./आय.पी.एस. अधिका-याचे वैयक्तिक ई-मेल आयडी, मोबाईल क्रमांक याबाबतची माहिती** मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जामध्ये त्यांनी सदरची माहिती माझ्या वैयक्तिक कामाकरिता मागितलेली असून त्याचा कार्यालयीन कामकाजासाठीच उपयोग करीन. कार्यालयीन इमेल/दुरध्वनी उपलब्ध असले तरी त्याचे कामकाज होण्याचे दृष्टीने काहीही उपयोग होत नाही व मिळालेल्या माहितीचा मी गैरवापर करणार नाही किंवा विनाकारण कोणालाही त्रास देणार नाही व कोणालाही ती देणार नाही असा त्यांनी अर्जात उल्लेख केलेला आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.२९.५.२०१० रोजी अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय व सामान्य प्रशासन विभाग (सेवा)मंत्रालय,मुबई हस्तांतरीत करण्यांत आलेला दिसून येतो. त्याप्रमाणे दि.२१.६.२०१० रोजी सामान्य प्रशासन विभागाचे माहिती अधिकारी तथा अवर सचिव यांनी भाप्रसे महाराष्ट्र संवर्गात कार्यरत अधिका-यांची अद्ययावत यादीच्या करिता रुपये १०८ व अधिक पोस्टल खर्च रु.६५ एकूण रुपये १७३ रुपयाचे शुल्क भरणा करावे असे कळविलेले दिसून येते. **परंतू सदरची माहिती वेबसाईटवर आहे व ती घेण्याकरिता रुपये १७४ भरणा करावा ही बाब योग्य नाही असे त्यांनी अर्जावर नोंद केलेली असल्याचे दिसून येते.** व त्यानंतर दि.१७.७.२०१० रोजी मुख्य सचिव यांचे कार्यालयातील माहिती अधिकारी यांनी त्यांना पूर्ण माहिती दिली परंतू सामान्य प्रशासन विभागातून माहिती मिळाली मात्र अप्पर मुख्य सचिव,गृह विभाग व माहिती अधिकारी डी.जी.पी., महाराष्ट्र यांनी अद्यापपर्यत माहिती दिली नाही म्हणून सामान्य प्रशासन विभाग व मुख्य सचिव यांच्या कार्यालयाकडे प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि.२४.७.२०१० रोजी देण्यांत आला असून 'अपिल फेटाळण्यांत आलेले आहे 'व त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपिल दाखल करुन आय.पी.एस. अधिकारी यांची माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कारण दिलेले आहे.

अपिलकर्ता यांना माहिती ही मुख्य सचिव यांचे कार्यालयात मागितलेली असल्यामुळे व प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून प्रथम अपिल सुध्दा मुख्य सचिव यांचे कार्यालयात केलेले असल्यामुळे व्दितीय अपिल मेमोमध्ये मुख्य सचिव कार्यालयातील जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वर्णन केलेले असल्यामुळे राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयातून मुख्य सचिव यांचे कार्यालयातील जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांना नोटीस काढण्यांत आलेली होती. त्याप्रमाणे मुख्य सचिव कार्यालयातील जन माहिती अधिकारी सुनावणीस उपस्थित आहेत व प्रथम अपिलीय अधिकारी हे सुनावणीस गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, मुख्य सचिव कार्यालय जरी संपूर्ण महाराष्ट्र राज्याचे प्रशासनाचे प्रमुख कार्यालय जरी असले तरी मुख्य सचिव यांचे कार्यालयामध्ये सर्व प्रशासनाची सर्वच माहिती उपलब्ध असते असे नाही, महाराष्ट्र शासनाच्या शासन कार्य नियमावलीनुसार शासनाच्या प्रत्येक विभागाचे काम व त्यांच्याकडे सोपविलेले विषय मा.राज्यपाल महोदयांनी नेमून दिलेले आहेत व प्रत्येक मंत्रालयीन विभागासाठी स्वतंत्र सचिव वत्यांच्या अंतर्गत क्षेत्रीय कार्यालय अशी मंत्रालयीन प्रशासकिय विभागाची यंत्रणा आहे व त्याप्रमाणे सर्व भाप्रसे अधिका-यांची माहिती ही सामान्य प्रशासन विभागाच्या स्वतंत्र कार्यासनाकडे असते व त्यामुळे अधिनियमाच्या कलम ६(१)प्रमाणे ज्या माहिती अधिका-याकडे माहिती असते त्या माहिती अधिका-याकडे किंवा सार्वजनिक प्राधिकरणाकडे अर्जदाराचा अर्ज हा हस्तांतर केलेला आहे. तसाच तो आयपीएस अधिका-यांच्या संदर्भामध्ये माहिती ही अप्पर मुख्य सचिव,गृह व डीजीपी यांच्या कार्यालयात असल्यामुळे त्यांच्याकडे सुध्दा तो अर्ज हस्तांतर केलेला आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६(३)प्रमाणे जी माहिती अन्य सार्वजनिक प्राधिकरणाकडे असेल किंवा ज्या माहिती विषयी अन्य सार्वजनिक प्राधिकारणाच्या कामकाजाशी अधिक संबंध असेल अशी माहिती मिळविण्यासाठी एखाद्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे अर्ज करण्यांत आला असेल त्याबाबत ज्यांच्याकडे असा अर्ज करण्यांत आला आहे ते सार्वजनिक प्राधिकरण असा अर्ज किंवा त्यास योग्य वाटेल असा त्याचा भाग त्या अन्य सार्वजनिक प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करील आणि त्या हस्तांतरणाबाबत अर्जदारास देखील माहिती देईल अशी तरतूद असल्यामुळे सदरील अर्ज हा त्या त्या प्राधिकरणाच्या सामान्य प्रशासन विभाग / गृह विभागास हस्तांतरीत करण्यांत आला होता त्याप्रमाणे सामान्य प्रशासन विभागाने माहिती दिलेली आहे व अपिलार्थीने हे मान्यही केलेले आहे. गृह विभागाने माहिती दिली नाही तरी मुळ अर्ज हा गृह विभागाच्या माहिती अधिकारी यांच्याकडे आहे असे समजून त्या विभागाच्या प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे अर्ज करणे आवश्यक होते. जेणेकरुन त्यांना ती माहिती उपलब्ध झाली असती व प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये त्यांचे जरी समाधान झाले नसले तरी त्यांनी गृह विभागाच्या प्रथम अपिलाच्या निर्णयानंतर राज्य माहिती आयोगकडे व्दितीय अपिल करणे आवश्यक झाले असते. परंतू त्यांनी प्रथम अपिल हे मुख्य सचिव यांचे कार्यालयातील प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दाखल केले व त्यानंतर व्दितीय अपील सुध्दा दाखल करताना त्यांनी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी, मुख्य सचिव यांचे कार्यालय यांचेकडे अर्ज केलेला आहे. त्यामुळे सुनावणीस गृह विभागाचे अधिकारी उपस्थित नाहीत व मुख्य सचिव कार्यालयातील कार्यवाही ही पूर्ण झालेली आहे. ही बाब अपिलकर्ता यांचे प्रथम अपिलावरील आदेशामध्ये सुध्दा योग्य नाही असे विवेचन करुन अपिल फेटाळण्यांत आलेले होते.

वरील सर्व वस्तुस्थितीवरुन असे दिसून येते की, अपिलकर्ता यांनी जरी आयपीएस अधिका-यांच्या संदर्भात माहिती उपलब्ध झालेली नसली तरी आज व्दितीयअपिल हे गृह विभागातील माहिती अधिकारी किंवा प्रथम अपिलीय अधिकारी यांना पक्षकार करुन दाखल केलेले नसल्यामुळे गृह विभागाचे माहिती अधिकारी किंवा प्रथम अपिलीय अधिकारी यांना आदेश देता येत नाहीत. त्याकरिता अपिलकर्ता यांनी गृह विभागातील अधिका-यांच्या संदर्भात प्रथम अपिल व व्दितीयअपील दाखल करणे हे अधिनियमाच्या तरतूदीशी सुसंगत झाले असते.

**अधिनियमाच्या कलम २(ज)मध्ये 'माहितीचा अधिकार' या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्या व्याख्येमध्ये कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्यांच्या नियंत्रणात असलेली व ती अधिनियमान्वये मिळविता येण्याजोगी माहिती मिळविण्याचा अधिकार,** अशी तरतूद आहे व त्यामुळेच संपूर्ण माहिती जर मुख्य सचिव यांचे कार्यालयात जतन केली जात नाही त्याप्रमाणे अपिलार्थी यांना कळविलेले सुध्दा आहे. परंतू ती त्याच कार्यालयाने उपलब्ध करुन द्यावी असा आग्रह अपिलार्थी यांना करता येणार नाही अधिनियमाचे प्रस्तावनेत सुध्दा समतोल साधण्यासाठी मेळ ठेवावा अशी तरतूद आहे. व त्यामुळे प्रथम अपिल निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

## आदेश

**१. अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यांत येते.**

**२. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

**मुंबई**
**दि.१४/१/२०११**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५००८१/अपील क्र.६२३८/२०१०**

**श्री.रमेश नागनाथ कदम** **अपीलार्थी**
**ए/१, नागनाथ कपाऊंड गणेश चौक,**
**काजूपाडा. बोरीवली पूर्व, मुंबई -६६**

**विरुध्द**

**१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव**
**सामाजिक न्याय,मंत्रालय,मुंबई**

**२. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव(मावक-२)** **उत्तरवादी**
**सामाजिक न्याय,मंत्रालय,मुंबई -**

***---निर्णय---***

**व्दितीय अपीलाचा दिनांक ११.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक १३/१/२०११.**
**अपीलार्थी व व जन माहिती अधिकारी तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित. अपिलीय अधिकारी अनुपस्थित**

**अपील क्र.६२३८/**

२. अपिलकर्ता यांनी दि.५.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, सामाजिक न्याय विभाग यांच्याकडे डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (सामाजिक न्याय विभाग महाराष्ट्र शासन अंतर्गत), पुणे यांनी शासनाकडे सादर केलेल्या अहवालावर विभागाकडून करण्यांत आलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती तसेच या संस्थेने सामाजिक न्याय, विद्ययो अंतर्गत मंजूर केलेल्या घरकुल योजनेबाबत २०८ मागासवर्गी सहकारी संस्थेची सखोल चौकशी करुन शासनाकडे दि.१५.३.२०१० च्या पत्रावर प्रधान सचिव, सामाजिक न्याय यांना उपसचिव,श्री.वठोड यांना तात्काळ सादर करण्यासंदर्भात दि.१७.३.२०१० रोजी लेखी आदेश दिले. त्या आदेशाच्या अनुषंगाने उपसचिव, सामाजिक न्याय यांच्याकडून प्रधान सचिव, सामाजिक न्याय यांच्याकडे उपरोक्त संदर्भात सादर केलेल्या नस्तीच्या छायाकित प्रती हवी आहे. सदरची माहिती व्यक्तिश घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.९.७.२०१० च्या पत्रान्वये अर्जदारास माहितीची एकूण १३ पृष्ठासाठी रुपये २/-प्रमाणे मूल्य रु.२६/- इतकी रक्कम संबंधित विभागाच्या लेखाशिर्षातर्गत चलनाव्दारे जमा करण्याबाबत कळविण्यांत आले होते. दि.३.८.२०१० रोजी अपिलार्थी यांनी शुल्क अदा करुन पावती दि.३.८.२०१० रोजी विभागास सादर केली होती. तथापि माहिती अधिकारी यांनी या संदर्भातील नस्ती मा.मुख्य सचिव यांचेकडे सादर केलेली असल्याने वरील माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे अर्जदारास दि.१०.८.२०१० रोजी कळविले होते व त्यामुळेच अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिली नाही. दि.६.९.२०१० रोजीच्या अर्जान्वये अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाच्या सुनावणीसाठी

अपिलार्थी उपस्थित न राहिल्यामुळे अपिलीय अधिकारी यांनी त्यावर कोणतीही कार्यवाही केलेली नाही व त्यामुळेच अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलार्थी यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, जन माहिती अधिकारी यांचेकडे जी माहिती मागितलेली आहे त्याचे शुल्क भरुन सुध्दा त्यांना माहिती प्राप्त झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरची नस्ती ही अपिलार्थी यांना पुर्वीच कळविल्याप्रमाणे मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचेकडे सादर केली होती व त्यानंर सदरची नस्ती आता दि.२९.११.२०१० रोजी मा.मुख्य सचिव यांचेकडे सादर केलेली आहे. सदरची नस्ती या विभागाकडे प्राप्त झालेली नाही ती प्राप्त होताच अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देण्यांत येईल. अर्जदारास माहिती उपलब्ध करुन न देण्याचा कोणताही हेतू नाही. केवळ जी माहिती उपलब्ध करुन द्यावयाची आहे ती माहिती वरिष्ठ पातळीवर व धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने सादर केलेली असल्याने ती अर्जदारास उपलब्ध करुन देता आलेली नाही असे आयोगाच्या निदर्शनास आणले. कोणतीही नस्ती मुख्य सचिव, प्रधानसचिव, मा.मंत्रीमहोदया यांचेकडे सादर झालेली असल्यास ती प्राप्त होईपर्यत जन माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध देता येत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी जे उत्तर दिलेले आहे ते योग्य आहे परंतू नस्ती परत प्राप्त होताच सदरील माहिती अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**३. अपिलकर्ता यांचे अपिल क्र.६२३८/०२ हे मंजूर करण्यांत येत असून अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी, सामाजिक न्याय यांनी मा.मुख्य सचिव यांचेकडून नस्ती उपलब्ध झाल्यानंतर त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रामधील मागितलेली माहितीच्या छायांकित प्रती विनामूल्य रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात.**

**४. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

**मुंबई**
**दि.१७/१/२०११**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५००८२/अपील क्र.६२३९/२०१०**

**श्री.रमेश नागनाथ कदम** **अपीलार्थी**
**ए/१, नागनाथ कपाऊंड गणेश चौक,**
**काजूपाडा. बोरीवली पूर्व, मुंबई -६६**

**विरुध्द**

**१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव**
**सामाजिक न्याय,मंत्रालय,मुंबई**

**२. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव(मावक-२)** **उत्तरवादी**
**सामाजिक न्याय,मंत्रालय,मुंबई -**

***---निर्णय---***

**व्दितीय अपीलाचा दिनांक ११.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक १३/१/२०११.**
**अपीलार्थी उपस्थित. जन माहिती अधिकारी तसेच अपिलीय अधिकारी अनुपस्थित**

**१.** अपिलकर्ता यांनी दि.१२.४.२०१० रोजी (१९-४-२०१०) यवतमाळ जिल्हयातील वणी येथे नुकतेच मा.मुख्यमंत्री महोदयांनी घरकुल योजनेचा शुभारंभ केला त्या सदर घरकुल योजनेचे उद्दिष्टये व अर्थसंकल्पात केलेल्या निधीची तरतूदीची तपशिलवार माहिती हवी आहे, ती व्यक्तिश: घेणार असे नमूद केलेले आहे.

२. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दि.२३.४.२०१० रोजी सदरची माहिती ही गृहनिर्माण विभागाशी संबंधित असल्यामुळे गृहनिर्माण विभागाकडे हस्तांतरीत केला व तसे अपिलकर्ता यांना कळविलेले असल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी तथा विभाग यांनी दि.६.५.२०१० रोजी अपिलकर्ता यांनी सदर अर्जातंर्गत अपेक्षिलेली घरकूल योजनेसंदर्भात या कार्यासनाची माहिती निरंक आहे. परंतू या संदर्भात जन माहिती अधिकारी,ग्राम विकास विभाग, मंत्रालय,मंबई सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय,मुंबई आणि कार्यासन गृनिधा-१ गृहनिर्माण विभाग,मंत्रालय,मुंबई कार्यासनाकडे माहिती उपलब्ध असल्यास ती पाठविण्याची संबंधितांना विनंती करण्यांत आलेली आहे. तेव्हा याबाबतचा पुढील पत्रव्यवहार त्यांच्याशी करण्याची विनंती अपिलार्थीना केलेली आहे. परंतू त्यानंतर कोणतीही माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध झाली नाही म्हणून दि.६.९.२०१० रोजी प्रथम अपिलीय अधिकारी, सामाजिक न्याय विभाग यांच्याकडे प्रथम अपिल दाखल केलेले आहे. प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये निर्णय झालेला दिसून येत नाही व त्यासाठी अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगकडे व्दितीय अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यासाठी अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगकडे व्दितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

अपिलार्थी यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, राज्य माहिती आयोगाचे कार्यालयात दि.२१.१२.२०१० रोजी व्दितीय अपिलाची सुनावणीची नोटीस काढल्यानंतर दि.२७.१२.२०१० रोजी माहिती

संदर्भात पत्र जन माहिती अधिकारी यांनी दिलेले आहे. संबंधित जन माहिती अधिकारी सुनावणीस उपस्थित नाहीत व त्यानी त्या संदर्भातील कोणतेही कागदपत्र दाखल केलेले नाहीत. त्यामुळे अपिल क्र.६२३८च्या अपिलातील उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अद्यापपर्यंत कागदपत्र प्राप्त झालेले नाही व त्यावर अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अद्यापपर्यंत माहिती देण्यांत टाळाटाळ करण्यांत आलेली आहे परंतू पुन्हा संबंधित अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, घरकूल योजनेचे उद्दिष्टबाबतचा शासन निर्णय उपलब्ध करुन दिलेला आहे. परंतू अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, घरकूल योजनेचे उद्दिष्टांचा शासन निर्णय मिळाला परंतू अर्थसंकल्पामध्ये केलेल्या निधीची तपशिलवार माहिती ही दिलेली नाही. त्यावर उपस्थित अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, मंत्रालयाच्या स्तरावर कोणत्याही प्रकल्पाची अंमलबजावणी होत नाही तर मंत्रालयीन स्तरावर धोरण ठरविले जाते. त्या अनुषंगाने संबंधित जिल्हयाच्या स्तरावर त्या योजनेची अंमलबजावणीची सर्व प्रक्रिया केली जाते व त्यामुळे फक्त यवतमाळ जिल्हातील वणी येथील घरकूल योजनेच्या संदर्भामध्ये आर्थिक तरतूदीच्या प्रकल्पाची माहिती हवी असल्यास ती त्या स्तरावर मागणे उचित झाले असते. त्यावर अपिलकर्ता यांनी पुन्हा आयोगापुढे असे सांगितले की, अर्थसंकल्पामध्ये त्याबाबत तरतूद करण्यांत असेल ती मंत्रालयीन स्तरावर उपलब्ध होणे अपेक्षित आहे. परंतू पुन्हा संबंधित अधिकारी यांनी ती मंत्रालयीन स्तरावर उपलब्ध असल्यास उपलब्ध करुन देता येईल असे सांगितले परंतू या संपूर्ण प्रकरणाबाबत ज्या अधिका-यांना याबाबत माहिती आहे त्यांनी आयोगापुढे उपस्थित राहणे जरुरीचे झाले असते.त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे ते शास्तीस पात्र आहे. परंतू शास्ती लादण्यापूर्वी संबधित जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे अधिनियमाच्या कलम २०(१)च्या परंतूका नुसार बंधनकारक असल्यामुळे सदरचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

**५. अपिलकर्ता यांचे अपिल क्र.६२३९/०२ यांचे अपिल मंजूर करण्यांत येत असून, अपिलकर्ता यांनी त्यांच्या दि.१२.४.२०१० च्या (१९.४.२०१०)च्या अर्जापमाणे मागितलेली माहिती अर्थसंकल्पात केलेल्या निधीच्या तरतूदीच्या संदर्भात हे निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत विनामूल्य पोष्टाने पाठवावी.**

**६. जन माहिती अधिकारी, सामाजिक न्याय विभाग यांनी अपिलकर्ता यांना त्यांच्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अधिनियमाच्या कलम २०(१)अन्वये शास्ती कां करण्यांत येऊ नये याबाबतचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसाचे आत आयोगासमोर समक्ष येऊन करावा. अन्यथा त्यांचे विरुध्द शास्ती लादण्यांत येईल याची नोंद घ्यावी.**

**७. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

**मुंबई**
**दि.१७/१/२०११**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५००८३/अपील क्र.६२४०/२०१०**
**क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५००८४/अपील क्र.६२४१/२०१०**
**क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५००८५/अपील क्र.६२४२/२०१०**

**श्री.गुलाम वारीश शेख (पत्रकार)** **अपीलार्थी**
**रुम नं.२, घनश्याम दास, कि चाल,**
**कालाकिल्ला, धारावी, मंबई -१७**

**विरुध्द**

**१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य अभियंता**
**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे पूर्व**
**मुंबई -४०००५१**

**२. जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य अभियंता** **उत्तरवादी**
**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे पूर्व**
**मुंबई -४०००५१**

***---निर्णय---***

**व्दितीय तिन्ही अपीलाचा दिनांक १२.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक १३/१/२०११.**
**अपीलार्थी व व जन माहिती अधिकारी उपस्थित. अपिलीय अधिकारी अनुपस्थित**

**अपिल क्र. ६३४०/०२**

२. अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य अभियंता सहाय्यक माहिती अधिकारी, कार्यकारी अभियंता झोसु मंडळ म्हाडा भवन, बांद्रा पूर्व मुंबई यांच्याकडे आमदार वर्षा गायकवाड या आमदार झाल्यानंतर धारावी मतदार संघातील सन २००४-२००९ पर्यत विकास कामे करण्यांत आली आहेत त्या विकास कामाच्या संदर्भामध्ये एकूण ७ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे.

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२२.६.२०१० रोजीच्या पत्राने मागितलेली माहिती जुनी असून ती देण्याकरिता या कार्यालयात उपलब्ध असलेली साधनसामुग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागणार आहे. त्यामुळे माहिती अधिकारी अधिनियमातील कलम ७(९)अन्वये आपण मागितलेली माहिती ही त्या स्वरुपात सादर करता येत नाही म्हणून कार्यकारी अभियंता तथा माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील दुरध्वनी क्र.६६४०५४८४वर संपर्क साधुन आगाऊ सूचना देऊन ठरविलेल्या वेळेत कार्यालयीन कामाचे दिवशी हजर राहिल्यास कार्यालयातील नस्ती/दस्तऐवज आपणास पाहणीकरिता उपलब्ध करुन देण्यांत येईल. आपण पाहणी केल्यानंतर नस्तीतील आपणांस आवश्यक असलेल्या पृष्ठक्रमांकाची यादी आपण तयार करुन

संबंधित सहाय्यक माहिती अधिकारी आपणास पत्राव्दारे देण्यात येणा-या माहिती पोटी भरावयाच्या रक्कमेचा भरणा करण्या संदर्भात ७ दिवसांत कळवितील. सदर रक्कमेचा भरणा आपल्याकडून झाल्यानंतर आपण मागणी केलेल्या पृष्ठांच्या छायाकित प्रती आपणास देण्यांत येतील असे कळविलेले असल्याचे दिसून येते.

अपिलकर्ता यांनी दि.३१.७.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले व त्यामध्ये दस्तऐवजाची नक्कल प्रत मिळाली नाही म्हणून सदरची अपील माहिती अधिकारी यांच्या विरोधात माहिती विनाशुल्क माहिती देण्याबाबत प्रथम दाखल केलेले आहे. परंतू अपिलकर्ता सुनावणीस उपस्थित राहिले नाही म्हणून अपील निकाली काढण्यांत आलेले असल्याचे दिसून येते व त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

**४.** अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागितलेली आहे. त्या माहितीमध्ये भ्रष्टाचार झालेला असल्यामुळे ती माहिती उपलब्ध करुन देणे जरुरीचे आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी सन २००४-२००९ या कालावधीतील आमदार निधी विकास कामाच्या संदर्भात तपशिलवार माहिती मागितलेली आहे. ती कोणत्या एका विकास कामासंदर्भात मागितलेली नाही . त्यामुळे माहिती उपलब्ध होण्यापूर्वी त्यांनी भ्रष्टाचार झाल्याचा साक्षात्कार झाल्याचे दिसून येते. यावरुन अपिलकर्ता यांनी सदर माहिती जन हिताकरिता मागितलेली नसून माहिती मागण्याचा अधिकार आहे म्हणून कशाही प्रकारे ही माहिती मागितलेली आहे व त्याबाबत त्यांना विहित मुदतीत म्हणजे दि.२२.६.२०१० रोजी कळविण्यांत आलेले आहे. अपिलकर्ता यांना दि.२२.६.२०१० रोजी माहिती अधिकारी यांनी कळविलेले असल्यामुळे ते योग्य असल्यामुळे अपिलकर्ता यांनी त्याप्रमाणे नस्तीची पाहणी करुन आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित प्रतीचे शुल्क भरुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहिले असते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २ ((त्र)प्रमाणे 'माहिती अधिकारी' या संदर्भात व्याख्या केलेली आहे. त्यामुळे सार्वजनिक प्राधिकरणामध्ये उपलब्ध असलेली व नियंत्रणात असलेले कागदपत्रे व दस्तऐवज यांचे निरिक्षण करुन त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे अशी तरतूद आहे व त्यामुळे महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या नियम ४ प्रमाणे निरिक्षणाच्या संदर्भातमध्ये जी फी भरावयाची आहे ती भरणे आवश्यक राहिल त्याकरिता अपिलकर्ता यांनी कामकाजाच्या दिवसाची तारीख व वेळ जन माहिती अधिकारी यांना कळवून त्यावेळी उपस्थित राहून कळविल्याप्रमाणे कार्यवाही करुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्यामुळे सदरची अपील निकाली कास्ण्यास पात्र आहे.

**<u>अपिल क्र. ६३४१/०२</u>**

२. अपिलकर्ता यांनी दि.८.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, उपमुख्य अभियंता, झोपडपट्टी पुनर्वसन मंडळ, बांद्रा यांच्याकडे २००४-२००९ या कालावधीतील खासदार फंडातून वापर केलेल्या निधीच्या कामाबाबत माहिती मागितलेली दिसून येते सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले आहे.

३. दि.२२.६.२०१० रोजी अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही त्यांच्या अर्जाप्रमाणे मागणी केलेली माहिती जूनी असून ती देण्याकरिता कार्यालयात उपलब्ध असलेली साधन सामुग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागणार आहे. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम ७(९)अन्वये आपण मागितलेली माहिती ही त्या स्वरुपात सादर करता येत नाही व त्यामुळे कार्यकारी अभियंता शहर यांचे कार्यालयात दूरध्वनी क्र.६६४०५४८४ वर संपर्क साधून सूचना देऊन ठरविलेल्या वेळेत कार्यालयीन कामाचे दिवशी हजर राहिल्यास कार्यालयातील नस्ती/दस्तऐवज आपणांस पाहणीकरिता उपलब्ध करुन देण्यांत येईल.आपण पाहणी केल्यानंतर नस्तीतील पाहणीकरिता उपलब्ध करुन देण्यांत येईल. आपण पाहणी केल्यानंतर नस्तीतील आवश्यक असलेल्या पृष्ठ क्रमांकाची यादी आपण तयार करुन संबंधित सहाय्यक माहिती अधिकारी यांच्याकडे लेखी स्वरुपात सादर करावी. जेणेकरुन त्यानंतर संबंधित सहाय्यक माहिती अधिकारी आपणांस पत्राव्दारे

देण्यात येणा-या माहितीपोटी भरावयाच्या रक्क्रमेचा भरणा करण्यासंदर्भात ७ दिवसांत कळवतील. सदर रक्कमेचा भरणा आपल्याकडून झाल्यानंतर आपण मागणी केलेल्या पृष्ठांची छायांकित प्रती आपणांस देण्यांत येतील असे कळविलेले असल्याचे दिसून येते.

४. तसेच प्रथम अपिलाच्या निर्णयाशिवाय अपिलकर्ता यांनी त्याचप्रमाणे कार्यकारी अभियंता, माहिती अधिकारी यांनी दि.२२.६.२०१० रोजी कळविण्यांत आलेले दिसून येते. परंतू अपिलार्थी यांनी तशा प्रकारची कार्यपध्दती न करता दि.३१.७.२०१० रोजी प्रथम अपील करुन सदरची माहिती विनामूल्य उपलब्ध व्हावी अशी विनंती केली. परंतू अपिलाच्या सुनावणीस उपस्थित न राहिल्यामुळे सदरील अपिल निकाली काढले. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

८. **अपिल क्रमांक ६२४०/०२** मध्ये विवेचन केल्याप्रमाणे अपिलकर्ता यांना विहित मुदतीत कळविलेले असल्यामुळे अपिलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील व सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**<u>अपिल क्र. ६३४२/०२</u>**

२. अपिलार्थी यांनी दि.२१.२.२०१० रोजी व दि.२२.२.२०१० रोजी जन माहिती अधिक ारी उपमुख्य अभियंता, झोपडपट्टी पुनर्वसन मंडळ यांच्याकडे जिल्हाधिकारी,मुंबई हस्तांतरण टेबल नं.४ नियोजन दि.१३.५.२०१० रोजी कार्यकारी अभियंता, झोपडपट्टी सुधार मंडळ, म्हाडा भवन, यांना पत्र दिले. आमदार एकनाथ गायकवाड राज्यमंत्री सार्वजनिक आरोग्य व वैद्यक्रिय शिक्षण यांच्या दि.१५.४.२००२ नुसार अशोक मिल कपाऊंड येथील ' अ ' बालवाडी 'क'समाजकल्याण या सर्व समाजउपायोगी प्रकल्पाकरिता आमदार निधीमधून जी कार्यवाही झालेली आहे त्या कार्यवाहीच्या संदर्भामध्ये जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये जमा झाले सर्व दस्तएवेज, रक्कम व सर्व अटी विषयी अहवाल इत्यादि सर्व माहितीच्या सांक्षाकित प्रती मागितलेल्या दिसून येत आहे. सदर माहिती व्यक्तिश: घेणार आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून दि.३१.७.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती अर्धवट व खोटी आहे. दस्तऐवज प्रती दिल्या नाहीत व सदरील माहिती ही त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना दि.२२.६.२०१० रोजी त्यांच्या अर्जाप्रमाणे मागणी केलेली माहिती जूनी असून ती देण्याकरिता कार्यालयात उपलब्ध असलेली साधन सामुग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागणार आहे. त्यामुळे माहिती अधिकारी अधिनियमाच्या कलम ७(९)अन्वये आपण मागितलेली माहिती ही त्या स्वरुपात सादर करता येत नाही व त्यामुळे कार्यकारी अभियंता शहर यांचे कार्यालयात दूरध्वनी क्र.६६४०५४८४ वर संपर्क साधून सूचना देऊन ठरविलेल्या वेळेत कार्यालयीन कामाचे दिवशी हजर राहिल्यास कार्यालयातील नस्ती/दस्तऐवज आपणांस पाहणीकरिता उपलब्ध करुन देण्यांत येईल.आपण पाहणी केल्यानंतर नस्तीतील पाहणीकरिता उपलब्ध करुन देण्यांत येईल. आपण पाहणी केल्यानंतर नस्तीतील आवश्यक असलेल्या पृष्ठ क्रमांकाची यादी आपण तयार करुन संबंधित सहाय्यक माहिती अधिकारी यांच्याकडे लेखी स्वरुपात सादर करावी. जेणेकरुन त्यानंतर संबंधित सहाय्यक माहिती अधिकारी आपणांस पत्राव्दारे देण्यात येणा-या माहितीपोटी भरावयाच्या रक्क्रमेचा भरणा करण्यासंदर्भात ७ दिवसांत कळवतील. सदर रक्कमेचा भरणा आपल्याकडून झाल्यानंतर आपण मागणी केलेल्या पृष्ठांची छायांकित प्रती आपणांस देण्यांत येतील असे कळविलेले असल्याचे दिसून येते. तसेच प्रथम अपिलाच्या

निर्णयाशिवाय अपिलकर्ता यांनी त्याचप्रमाणे कार्यकारी अभियंता, माहिती अधिकारी यांनी दि.२२.६.२०१० रोजी कळविण्यांत आलेले दिसून येते. प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये अपिलकर्ता हजर राहिले नाहीत म्हणून अपिल निकाली काढण्यांत आलेले आहे असे दिसून येते.

४. अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही विस्तृत व व्यापक प्रमाणात जरी असली तरी अपिलकर्ता यांना दि.२९.३.२०१० रोजी ३० दिवसाची मुदत संपल्यानंतर कळविण्यांत आलेले आहे व त्यामुळे अपिलकर्ता यांनी निरिक्षण केल्यानंतर आवश्यक असलेल्या छायांकित कागदपत्राच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याची प्रक्रिया ही ३० दिवसामध्ये पूर्ण करावयाची असते. परंतू जन माहिती अधिकारी यांनी त्याबाबतची काहीही कल्पना दिसून येत नाही. तसेच माहिती ३० दिवसामध्ये उपलब्ध करुन दिलेली नसेल तर ती कलम ७(३)प्रमाणे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी लागते. तसेच अपिलकर्ता गैरहजर होते या कारणास्तव प्रथम अपिल हे निकाली काढणे योग्य नाही. माहिती दिली किंवा नाही हे सिध्द करण्याची जबाबदारी अधिनियमाच्या कलम १९(५) अन्वये जन माहिती अधिकारी याचीच आहे व त्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली किंवा नाही याबाबत चौकशी करुन प्रथम अपिलाचा निर्णय देणे आवश्यक असते व त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नसल्याने विनामूल्य माहिती पुरवावी व खर्च माहिती अधिकारी यांनी स्वतः करणे संयुक्तिक राहील त्यामुळे सदरचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

**४. अपिलकर्ता यांचे अपिल क्र.६२४०/०२ वस अपिल क्र.६२४१/०२ ही निकाली काढण्यांत येत आहेत.**

**५. अपिल क्र.६२४२/०२ हे अपिल मंजूर करण्यांत येत असून अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती निरिक्षण करुन विनामूल्य उपलब्ध करुन घ्यावी अपिलकर्ता उपस्थित झाल्यावर जन माहिती अधिकारी यांनी सदरची संबंधित नस्ती उपलब्ध करुन देऊन निरिक्षणाअंती आवश्यकत्या माहितीचे कागदपत्र विनामूल्य उपलब्ध करुन द्यावेत. माहितीचा खर्च सर्व जन माहिती अधिकारी यांनी स्वतः करावयाचा आहे.**

**६. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

**मुंबई**
**दि.१७/१/२०११**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त,राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणीक्रं./५०२०७/अपील क्रं.७०४९/२०१०**

**श्री.सुनिल एच.पवार**
**१०,सीता निवास, डॉ.आंबेडकर रोड,**
**सेंट्रल रेल्वे वर्कशॉप समोर,**
**परेल,मुंबई-४०००१२. ...अपीलकर्ता**

**----*विरुध्द*-----**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य दक्षता अधिकारी,**
**दक्षता (विद्युत पुरवठा) विभाग,**
**बेस्ट भवन, बेस्ट मार्ग,**
**पोस्ट बॉक्स नं.१९२,**
**मुंबई-४००००१.**
**जन माहिती अधिकारी तथा विभागीय अभियंता,**
**दक्षता (विद्युत पुरवठा) विभाग,**
**बेस्ट भवन, बेस्ट मार्ग,**
**पोस्ट बॉक्स नं.१९२,**
**मुंबई-४००००१. ...उत्तरवादी**

**-----*निर्णय*-----**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : १२-१०-२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ०३-०१-२०११**
**अपिलकर्ता - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी दिनांक २१-०६-२०१० रोजी जन माहिती अधिकारी विभागीय अभियंता दक्षता (विद्युत पुरवठा) विभाग, बेस्ट इलेक्ट्रिक हाऊस यांच्याकडे, च From the Establishment of the Vigiliance Department of the Undertaking for the Detection of cases which comes under theft of Electricity Unauthorized use of Electricity till date.छ Details of Sec.१३५, १३८, १५२, १२६, & १२७ of The Electricity Act २००३. च्या संदर्भामध्ये सन २००४ पासून एकूण १२ मुद्दांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दिनांक

२०-०७-२०१० रोजी मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक २४-०८-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक २४-०९-२०१० देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती पुरेशी आहे. परंतु आवश्यक ती नोंदणी रजिस्टर आपण दिनांक २७-०९-२०१० रोजी पाहू शकता असा निर्णय प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला आहे. परंतु अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही, या कारणास्तव राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी जी उत्तरे दिलेली आहे ती जवळजवळ माहिती न देण्यासारखे आहे. एकतर मुद्देनिहाय काही माहिती उपलब्ध नाही असे उत्तर दिलेले आहे व जी माहिती उपलब्ध आहे ती अतिशय विस्तृत प्रमाणात मागितलेली असल्यामुळे व मागितलेल्या नमुन्यामध्ये नसल्यामुळे ती उपलब्ध करुन देता येत नाहीत. तसेच काही मुद्दांमध्ये जन माहिती अधिकारी यांचा अभिप्राय मागितलेला आहे असे कळविलेले आहे. प्रथम अपिलामध्ये सुद्धा जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती योग्य आहे, परंतु आवश्यक वाटल्यास नोंदणी वही आहे, त्या नोंदणी वहीचे निरिक्षण घ्यावे असा निर्णय देवून अपिल निकाली काढण्यात आले.

जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत. त्यांनी कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे ही दाखल केलेले नाहीत. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(५) अन्वंये जन माहिती अधिकारी यांनी माहिती नाकारली असली तर ती सिद्ध करण्याची त्यांची जबाबदारी आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांच्या म्हणण्यानुसार संपूर्ण माहिती दिलेली नाही. यावरुन काही माहिती नाकारलेली दिसून येते व त्यामुळे जर अपुर्ण माहिती दिली असली तर शास्ती लादण्याची गरज आहे व शास्ती लादण्यापूर्वी स्वत: जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) च्या परंतु का प्रमाणे शास्ती का लादण्यात येवू नये याबद्दल त्यांचे म्हणणे आयोगापुढे मांडणे आवश्यक आहे. आयोग त्या वेळेस माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे अपिलांच्या सुनावणी करीता नोटीस काढतात. त्यांचा अर्थ जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे झालेल्या कार्यवाहीची माहिती व त्या संदर्भातील त्यांचे समर्थन देणे आवश्यक असते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुद्धा त्याच कार्यालयातील असल्याने प्रथम अपिलाचा निर्णय देताना जन माहिती अधिकारी यांना विचारुन निर्णय त्यावेळी माहिती उपलब्ध होईल अशाप्रकारे निर्णय देणे आवश्यक असते. निरर्थक असा निर्णय अपेक्षित नाही. परंतु प्रथम अपिलीय अधिकारी हे असेच निरर्थक असे निर्णय देत असल्यामुळे अपिलकर्ता हे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल करतात सदरच्या प्रकरणामध्ये मुद्देनिहाय उत्तर दिले असले तरी कागदपत्र किंवा इतर माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. माहितीचा अधिकार २००५ चे **कलम २(त्र)** प्रमाणे **घ्माहिती अधिकारङ** या संज्ञेचा अर्थ **घ्सार्वजनिक प्राधिकरणाच्याङ** नियत्रंणात असलेली माहिती (**घ्माहितीङ**या संज्ञेचा अर्थ

सार्वजनिक प्राधिकरणात साहित्याच्या स्वरुपात कागदपत्रे, अभिलेखे, परिपत्रके, दस्तऐवज अभिप्रायाच्या प्रती यांचा समावेश होतो.) कागदपत्रे व अभिलेखेचे निरिक्षण करुन व त्यांच्या छांयाकित प्रती उपलब्ध करुन घेणे असा आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांनी त्यांच्या काही संदर्भात जी माहिती मागितलेली आहे ती कागदपत्र स्वरुपात उपलब्ध असल्यास ती त्यांना छांयाकित प्रतीच्या स्वरुपात म्हणजे विहित मुदतीत म्हणजे **३०** दिवसांच्या आत उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. माहिती ३० दिवसांच्या आत उपलब्ध करुन दिली असल्यास खर्चाचा भरणा अपिलकर्ता अर्जदार यांनी करावा लागतो व माहिती **३०** दिवसांच्या नंतर दिलेली असेल तर खर्चाचा भरणा हा न करता विनामुल्य माहिती उपलब्ध करुन दयावी लागते. त्यामुळे सदरच्या प्रकरणात अपिलकर्ता यांचे त्या मुद्दांमध्ये कागदपत्राची मागणी केलेली आहे त्या सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

----आदेश---

**१) अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत कामकाजच्या दिवसाची तारीख व वेळ जन माहिती अधिकारी यांना कळवून, त्यावेळेस जन माहिती अधिकारी यांच्या कडे उपस्थित होवून मागितलेली संबंधित अभिलेखेच्या नस्तीचे निरिक्षण अपिलकर्ता यांनी करणे आवश्यक आहे. कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन घ्याव्यात.**

**२) जन माहिती अधिकारी हे आज आयोगाच्या सुनावणीस हजर राहिलेले नसल्यामुळे कोणतेही कागदपत्रे व अर्ज दिलेला नसल्यामुळे, तसेच अपिलकर्ता यांना अपुर्ण माहिती दिलेली असल्यामुळे त्यांच्या विरुद्ध माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) अन्वंये शास्ती कां लादण्यात येवू नये या बद्दलचा खुलासा त्यांनी १० दिवसांच्या आत आयोगाकडे करावा. तसे न केल्यास त्यांच्या विरुद्ध शास्ती लादण्यांत येईल यांची नोंद घ्यावी.**

**३) अपिलकर्ता यांनी तारीख व वेळ कळवून, जन माहिती अधिकारी यांनी नस्ती उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे उपलब्ध करुन न दिल्यास त्यांच्या विरुद्ध रु.५०००/- ची शास्ती लादण्यात येईल यांची नोंद घ्यावी.**

**४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**. (विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०३-०१-२०११.**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव / कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग , मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त,राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांकःमुमाआ/नोंदणीक्रं./५०२११/अपील क्रं.७०५३/२०१०**

**श्री. महम्मद हमीद शेख**
**नेहरु नगर, चाळ क्र.५, शॉप नं.११,**
**संत ज्ञानेश्वर नगर, बांद्रा (पूर्व),**
**मुंबई-४०००५१.** **...अपीलकर्ता**

**----*विरुध्द*-----**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त(प्रतिबंधक),**
**गु.शा.गु.अ.वि.,छ.शिवाजी मंडई,**
**३रा मजला, एम.आर.ए.मार्ग,**
**मुंबई-४००००१.**
**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त(गुन्हे),**
**पोलीस आयुक्त यांचे कार्यालय, क्रॉफर्ड मार्केट समोर,**
**डी.एन. रोड,मुंबई-४००००१.** **...उत्तरवादी**

**-----*निर्णय*-----**

**द्वितीय अपीलाचा दिनांक :२७ -१०-२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ०३-०१-२०११**
**अपिलकर्ता व जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपीलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, पोलीस कार्यालय, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई यांच्याकडे दिनांक २९-०५-२०१० रोजी मुख्य कार्यालयामध्ये महिला व मुलांकरीता सहाय्य कक्ष जे आहे हे सहाय्यक कक्ष कोणाच्या तक्रारी घेतात. पुरुषांच्या किंवा मुलांच्या किंवा महिलांच्या आणि त्यांचे निवारण कशा प्रकारे करतात. यांना कायदेशीर कोणती कारवाई करण्याचे आदेश आहेत. स्वतः हाताळतात किंवा पोलीस स्टेशनला प्रकरण पाठवितात. या कक्षेवरी वरिष्ठ अधिकारी कोण

कोण आहेत आणि ते काठे बसतात त्यांचाी संपुर्ण माहिती मिळावी. तसेच हे दोन कक्ष आहेत या दोन कक्षातील महिला अधिकारी व पुरुष अधिकारी जे हे प्रकरण हाताळतात त्यांची नावासह माहिती देण्यात यावी. खाजगी किंवा पोलीस खात्यातर्फे असणारे कक्ष यांची शुध्द मराठीत माहिती देण्यात यावी. माहिती टपालद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १६-०७-२०१० रोजी अर्जात मागणी केलेली माहिती पोलीस निरिक्षक, समुपदेशन कक्ष, समाजसेवा शाखा, गुन्हे शाखा, गु.अ.वि.मुंबई यांचे कार्यालयाकडून संदर्भ क्र.२ अन्वंये प्राप्त झालेली असुन ती या पत्रा सोबत जोडून दिलेली आहे. सहपत्र दोन सहाय्यक पोलीस आयुक्त, शासकीय माहिती अधिकारी, पोलीस आयुक्तांचे कार्यालय,मुंबई यांना केलेले दिसून येते. परंतु महिला व मुलांकरीता सहाय्य कक्ष हे महिला व बालविकास विभाग, नवीन प्रशासकीय भवन, तिसरा मजला, मंत्रालया समोर,मुंबई यांच्या अंतर्गत काम करीत आहे. तसेच या कक्षाची स्थापना महिला व बालविकास विभागातर्फे झालेली असल्यामुळे या कक्षाबाबतचे सर्व दस्तऐवज त्या विभागाकडे असल्याने अर्जदारास हवी असलेली माहिती देणे आमच्या कक्षाच्या अधिकार कक्षेत येत नाही असे विशेष शाखा महिला व मुलांकरीता पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा,गु.अ.वि. मुंबई २ यांच्या कार्यालयात कळविण्यात आलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २०-०७-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिलेला असून माहिती पुरविण्यात आलेली असल्यामुळे सदरचे अपिल हे निकाली काढले असून मुंबई पोलीस यांची कार्यरत असलेल्या वेब साईट वरील माहिती युजर आय.डी.(www.mumbaipolice.org.in) आहे त्यावर संपर्क करणे अशी विनंती कळविलेली आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले आहे की, त्यांना एक कक्षची माहिती मिळाली. परंतु महिला व मुलांकरीता त्यांना सहाय्य कक्ष या संदर्भातील माहिती त्यांना उपलब्ध झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना पोलीस कक्षाची जी माहिती दिलेली आहे व महिला व मुलांची कक्षाची माहिती NGO यांच्याशी संबधित असल्यामुळे श्रीमती शितल कांबळे, महिला व बालविकास कार्यालय यांच्याशी संर्पक साधुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले आहे. त्याबाबत स्पष्टिकरण करताना जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, दिनांक ०६-०८-२०१० रोजी सहाय्यक पोलीस आयुक्त, वरिष्ठ पोलीस निरिक्षक ,समुनदेशन कक्ष, समाजसेवा शाखा,मुंबई यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास पत्र दिलेले होते. त्यानंतर दिनांक ०१-०७-२०१० रोजी स्मरणपत्र दिलेले दिसून येते व त्यामुळे ही माहिती वरिष्ठ पोलीस निरिक्षक,समुपदेशन कक्ष, समाजसेवा शाखा

यांच्याकडून माहिती विलंबाने उपलब्ध झाली व ते विलंबास कारणीभूत आहेत. पोलीस निरिक्षक, समाजसेवा शाखा हे आयोगापुढे हजर नाहीत व त्यांचे म्हणणे ऐकूण घेता येत नाही. मात्र महिला व बाल विकासाच्या संदर्भामध्ये अपिल महिलांचे व बाल विकास अधिक्षक यांची माहिती मागणे संयुक्तिक राहील व तसे कळविण्यात सुद्धा आलेले आहे. मात्र विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे वरिष्ठ पोलीस अधिक्षक यांच्या विरुद्ध शास्ती का लादण्यात येवू नये याबद्दल त्यांचे म्हणणे ऐकूण घेणे बंधनकारक असल्यामुळे त्यांचे सदरचे अपिल हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**----आदेश-----**

**१) अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत वरिष्ठ पोलीस निरिक्षक, समुपदेशन कक्ष,समाजसेवा शाखा,गुन्हे शाखा,गु.अ.वि.मुंबई यांनी आयोगापुढे त्यांच्या विरुद्ध शास्ती का लादण्यात येऊ नये त्याबद्दलचा खुलासा आयोगापुढे समक्ष करावा अन्यथा त्यांच्या विरुद्ध विलंबाबाबत शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

**२) अपिलकर्ता यांनी दुसरे कक्ष, महिला व मुंलाकरीता सहाय्य कक्ष, या बाबतची माहिती महिला व बाल विकास विभाग, नवीन प्रशासकीय भवन, तिसरा मजला, मंत्रालय समोर,मुंबई यांच्याकडून उपलब्ध करुन घ्यावी.**

**३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०३-०१-२०११.**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव / कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग , मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त,राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणीक्रं./४९८७७/अपील क्रं.७०५४/२०१०**
**क्रमांक:मुमाआ/नोंदणीक्रं./४९८७८/अपील क्रं.७०५५/२०१०**
**क्रमांक:मुमाआ/नोंदणीक्रं./४९८८०/अपील क्रं.७०५७/२०१०**

**श्री. प्रकाश गोविंद नवाथे**
**२०४,राजबाग,दलुचंद को.हौ.सो.लि.,**
**२७१, सर भालचंद्र मार्ग,**
**मांटुगा,मुंबई-४०००५१. ...अपीलकर्ता**

**----*विरुध्द*-----**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**१) सहाय्यक आयुक्त,**
**बृमनपा,एफ उत्तर विभाग,**
**९३,भाऊ दाजी मार्ग,**
**मुंबई-४०००१९.**
**२) उप प्रमुख अभियंता,इ.प्र.शहर,**
**बृमनपा, ई विभाग, भायखळा,**
**मुंबई-४००००८.**
**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,इ.प्र.शहर, ...उत्तरवादी**
**बृमनपा, ई विभाग, भायखळा,**
**मुंबई-४००००८.**

**-----*निर्णय*-----**

**द्वितीय अपीलाचा दिनांक :२२ -०९-२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ०४-०१-२०११**
**अपिलकर्ता व जन माहिती अधिकारी - उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी वरील तीनही अपिलाच्या सुनावणीच्या वेळेस माहिती उपलब्ध झालेली आहे. त्यामुळे तीनही अपिले बंद करावी असे लेखी दिलेले असल्यामुळे सदरचे तीनही अपिले ही निकाली काढण्यात येते.

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०३-०१-२०११.**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव / कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग , मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त,राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणीक्रं./४९८७७/अपील क्रं.७०५४/२०१०**
**क्रमांक:मुमाआ/नोंदणीक्रं./४९८७८/अपील क्रं.७०५५/२०१०**
**क्रमांक:मुमाआ/नोंदणीक्रं./४९८८०/अपील क्रं.७०५७/२०१०**

**श्री. प्रकाश गोविंद नवाथे**
**२०४,राजबाग,दलुचंद को.हौ.सो.लि.,**
**२७१, सर भालचंद्र मार्ग,**
**मांटुगा,मुंबई-४०००५१.** **...अपीलकर्ता**

**----*विरुध्द*-----**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता,**
**बृमनपा,कार्यकारी अभियंता(इ.प्र.),**
**शहर-१,२ यांचे कार्यालय घ्ईङविभाग,**
**३रा मजला, शेख हाफिजुद्दीन मार्ग,**
**भायखळा,मुंबई-४००००८.**
**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,(इ.प्र.),**
**बृमनपा,कार्यकारी अभियंता(इ.प्र.),**
**शहर-१,२ यांचे कार्यालय घ्ईङविभाग,**
**३रा मजला, शेख हाफिजुद्दीन मार्ग,**
**भायखळा,मुंबई-४००००८.** **...उत्तरवादी**

**-----*निर्णय*-----**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २१ -०९-२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ०४-०१-२०११**
**अपिलकर्ता व जन माहिती अधिकारी - उपस्थित,**

**प्रथम अपीलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी वरील तीनही अपिलाच्या सुनावणीच्या वेळेस माहिती उपलब्ध झालेली आहे. त्यामुळे तीनही अपिले बंद करावी असे लेखी दिलेले असल्यामुळे सदरचे तीनही अपिले ही निकाली काढण्यात येते.

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०३-०१-२०११.**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव / कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग , मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त,राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणीक्रं./४९८७७/अपील क्रं.७०५४/२०१०**
**क्रमांक:मुमाआ/नोंदणीक्रं./४९८७८/अपील क्रं.७०५५/२०१०**
**क्रमांक:मुमाआ/नोंदणीक्रं./४९८८०/अपील क्रं.७०५७/२०१०**

**श्री. प्रकाश गोविंद नवाथे**
**२०४,राजबाग,दलुचंद को.हौ.सो.लि.,**
**२७१, सर भालचंद्र मार्ग,**
**मांटुगा,मुंबई-४०००५१.** **...अपीलकर्ता**

**----*विरुध्द*-----**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता (इ.प्र.)शहर,**
**बृमनपा, घ्ईड्विभाग कार्यालय,**
**शेख हाफिजुद्दीन मार्ग,**
**भायखळा,मुंबई-४००००८.**
**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,(इ.प्र.)शहर,**
**बृमनपा, घ्ईड्विभाग कार्यालय,**
**शेख हाफिजुद्दीन मार्ग,**
**भायखळा,मुंबई-४००००८.** **...उत्तरवादी**

**-----*निर्णय*-----**

**द्वितीय अपीलाचा दिनांक : २३ -०९-२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ०४-०१-२०११**
**अपिलकर्ता व जन माहिती अधिकारी - उपस्थित,**
**प्रथम अपीलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी वरील तीनही अपिलाच्या सुनावणीच्या वेळेस माहिती उपलब्ध झालेली आहे. त्यामुळे तीनही अपिले बंद करावी असे लेखी दिलेले असल्यामुळे सदरचे तीनही अपिले ही निकाली काढण्यात येते.

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०३-०१-२०११.**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव / कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग , मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त,राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणीक्रं./५०२१०/अपील क्रं.७०५२/२०१०**

**श्री. महम्मद हमीद शेख**
**नेहरु नगर, चाळ क्र.५, शॉप नं.११,**
**संत ज्ञानेश्वर नगर, बांद्रा (पूर्व),**
**मुंबई-४०००५१.** **...अपीलकर्ता**

**----*विरुध्द*-----**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एफ/उत्तर विभाग कार्यालय,**
**९६,भाऊ दाजी रोड,**
**माटुंगा,मुंबई-४०००१९.**
**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परिरक्षण),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एफ/उत्तर विभाग कार्यालय,**
**९६,भाऊ दाजी रोड,**
**माटुंगा,मुंबई-४०००१९.** **...उत्तरवादी**

**-----*निर्णय*-----**

**द्वितीय अपीलाचा दिनांक :२७ -१०-२०१०**
**सुनावणीचा दिनांक : ०३-०१-२०११**
**अपिलकर्ता व जन माहिती अधिकारी - उपस्थित.**
**प्रथम अपीलीय अधिकारी - अनुपस्थित.**

अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता परिरक्षण विभाग, एफ नॉर्थ विभाग कार्यालय, मांटुगा यांच्याकडे, आपला मांटुगा विभाग कार्यालयामध्ये परिरक्षण खाते संबंधित सहाय्यक अभियंता श्री.हेरलेकेर यांच्या केबिनमध्ये कोणकोणत्या महापुरुषांचे फोटो लावलेले आहेत याबद्दलची माहिती दयावी. तसेच त्याबद्दल जी.आर. किंवा परिपत्रक दयावे अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती रजिस्टर टपालाने घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ३०-०७-२०१० रोजी अपिलकर्ता यांनी शासन नियमाप्रमाणे महनीय व्यक्ती/राष्ट्रपुरुषांची छायाचित्रे/प्रतिमा हया शासकीय/निमशासकीय कार्यालयात प्रदेर्शित करावयाच्या असतात. त्याप्रमाणे सदर प्रतिमा सहाय्यक

आयुक्त(एफ/उत्तर) यांच्या दालनामध्ये प्रदर्शित केलेल्या आहेत. त्यामुळे श्री. हेर्लेकर किंवा अन्य खातेप्रमुखांच्या दालनामध्ये तसे छायाचित्रे प्रदर्शित करण्याचा प्रश्न येत नाही व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे  अपिलकर्ता यांनी दिनांक १०-०८-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक २७-०८-२०१० रोजी देण्यात आला असून परिपत्रक उपलब्ध करुन दयावे. याप्रमाणे निर्णय देवून प्रथम अपिल हे निकाली काढण्यात येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी शासन निर्णयांची छायांकित प्रत मागितलेली होती. परंतु महानगरपालिका परिपत्रक उपलब्ध करुन दिलेले आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, शासन निर्णयांची प्रत दिलेली नाही कारण शासन निर्णयाची प्रत ही त्यांच्या कार्यालयात कागदपत्रे नाहीत व परिपत्रकामध्ये प्रत्येक शासन निर्णयाचा संदर्भ दिलेला आहे. परंतु त्यांचे कार्यालय हे महानगरपालिका अंतर्गत येत असल्यामुळे महानगरपालिकेने परिपत्रक प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे. शासन निर्णयाची प्रत ती शासनाकडून उपलब्ध करुन घेणे आवश्यक राहील. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या **कलम २(त्र)** मध्ये माहितीचा अधिकार या संज्ञेची व्याख्या आहे व त्यामध्ये **घ्सार्वजनिक प्राधिकरणाचेङ** नियंत्रणात असलेली माहिती उपलब्ध करुन देता येते अशी तरतूद असल्याने शासन निर्णयाची प्रत संदर्भात माहिती शासनाकडे मागणे आवश्यक आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपिल हे निकाली काढण्यात यावे अशी विनंती केलेली आहे. त्यामुळे सदरचे अपिल हे निकाली काढण्यास पात्र आहे.

**----आदेश---**

**१)  अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यात येते.**

**२)  अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०३-०१-२०११.**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव / कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग , मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त,राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणीक्रं./५०२०६/अपील क्रं.७०४८/२०१०**

**श्री. रामशंकर गुप्ता**
**१४-१६,तळ मजला, पूनावाला चाळ,**
**कल्याणवाडी, धारावी मेन रोड,**
**धारावी, मुंबई-४०००१७. ...अपीलकर्ता**

**----*विरुध्द*-----**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता ग्राहक संरक्षण(उत्तर/पश्चिम),**
**बी.ई.एस.टी. (ग्राहक संरक्षण(उत्तर/पश्चिम)),**
**ट्रांस्पोर्टेशन इंजिनिअरींग बिल्डींग,**
**२ रा मजला, गेट नं.३,**
**लोकमान्य टिळक रोड,दादर(पूर्व),**
**मुंबई-४०००१४.**
**जन माहिती अधिकारी तथा ग्राहक संरक्षण(जी/उत्तर),**
**बी.ई.एस.टी. (ग्राहक संरक्षण(उत्तर/पश्चिम)),**
**ट्रांस्पोर्टेशन इंजिनिअरींग बिल्डींग,**
**२ रा मजला, गेट नं.३,**
**लोकमान्य टिळक रोड,दादर(पूर्व),**
**मुंबई-४०००१४. ...उत्तरवादी**

**-----*निर्णय*-----**

| | |
|---|---|
| **द्वितीय अपीलाचा दिनांक** | **: २५ -१०-२०१०** |
| **सुनावणीचा दिनांक** | **: ०३-०१-२०११** |
| **अपिलकर्ता** | **- उपस्थित.** |
| **जन माहिती अधिकारी** | **- उपस्थित.** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | **- उपस्थित.** |

अपिलकर्ता यांनी दिनांक २६-०७-२०१० रोजी जन माहिती अधिकारी विभागीय अभियंता ग्राहक संरक्षण, जी/नॉर्थ वॉर्ड बी.ई.एस.टी. यांच्याकडे, च Restoration/Reconnection of the premises as per Hon'ble Ombudsman order in the representation NO.६१ of २००९.छ माहितीचा

कालावधी २००८ आहे. त्या संदर्भात त्यांनी एकूण ७ मुद्दांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दिनांक २२-०९-२०१० रोजी माहिती एकूण ५ मुद्दांमध्ये उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक २२-०९-२०१० प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक १०-११-२०१० रोजी देण्यात आला असून दक्षता विभाग यांच्याकडे त्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन घ्यावी व **ESL**४ letter is avialable same can be collected. अशा प्रकारचे निर्णय दिलेला दिसून येतो व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती त्रोटक, अपुर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. प्रथम अपिलाचा निर्णय सुद्धा माहिती द्यावी असा दिलेला आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांच्या कार्यालयात जी माहिती उपलब्ध आहे, त्यांना त्याबद्दल कळविलेले आहे. तसे जन माहिती अधिकारी यांचा अभिप्राय मागितलेला आहे व अभिप्राय अपेक्षित नाही हेही कळविलेले आहे असे असलेतरी अपिलकर्ता यांनी मुद्देनिहाय मागितलेली माहितीच्या संदर्भात ज्या कागदपत्रांच्या प्रती उपलब्ध असतील तर त्यांना त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**----आदेश----**

**१) अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत अपिलकर्ता यांनी त्यांचे दिनांक २६-०७-२०१० रोजीच्या अर्जामधील मुद्दांच्या संदर्भामध्ये प्रथम अपिलाचा निर्णयाप्रमाणे जी कागदपत्रे उपलब्ध असतील त्यांच्या छायांकित प्रती विनामुल्य व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यात याव्यात. त्याकरीता अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांच्याशी संर्पक साधुन माहितीचे कागदपत्रांची छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन घ्याव्यात. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील. याची नोंद घ्यावी.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०३-०१-२०११.**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव / कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग , मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त,राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणीक्रं./५०२०९/अपील क्रं.७०५०/२०१०**

**श्री. रामशंकर गुप्ता**
**१४-१६,तळ मजला, पूनावाला चाळ,**
**कल्याणवाडी, धारावी मेन रोड,**
**धारावी, मुंबई-४०००१७.** **...अपीलकर्ता**

**----*विरुध्द*-----**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता ग्राहक संरक्षण(उत्तर/पश्चिम),**
**बी.ई.एस.टी. (ग्राहक संरक्षण(उत्तर/पश्चिम)),**
**ट्रांस्पोर्टेशन इंजिनिअरींग बिल्डींग,**
**२ रा मजला, गेट नं.३,**
**लोकमान्य टिळक रोड,दादर(पूर्व),**
**मुंबई-४०००१४.**
**जन माहिती अधिकारी तथा ग्राहक संरक्षण(जी/उत्तर),**
**बी.ई.एस.टी. (ग्राहक संरक्षण(उत्तर/पश्चिम)),**
**ट्रांस्पोर्टेशन इंजिनिअरींग बिल्डींग,**
**२ रा मजला, गेट नं.३,**
**लोकमान्य टिळक रोड,दादर(पूर्व),**
**मुंबई-४०००१४.** **...उत्तरवादी**

**-----*निर्णय*-----**

| | |
|---|---|
| **द्वितीय अपीलाचा दिनांक** | **: २५ -१०-२०१०** |
| **सुनावणीचा दिनांक** | **: ०३-०१-२०११** |
| **अपिलकर्ता** | **- उपस्थित.** |
| **जन माहिती अधिकारी** | **- उपस्थित.** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | **- उपस्थित.** |

अपिलकर्ता यांनी दिनांक २६-०७-२०१० रोजी जन माहिती अधिकारी विभागीय अभियंता ग्राहक संरक्षण, जी/नॉर्थ वॉर्ड बी.ई.एस.टी. यांच्याकडे, च Complete information of A/c No.७८१-३९९-०४१छ च्या संदर्भामध्ये एकूण ८ मुद्दांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दिनांक २७-०८-२०१० रोजी माहिती उपलब्ध आहे व ती प्रती भरणा रु.२ प्रमाणे २० प्रती प्राप्त करुन घ्याव्यात असे त्यांनी कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक २२-०९-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले.

प्रथम अपिलांचा निर्णय हा दिनांक १०-११-२००९ रोजी देण्यात आला असून मुद्दा क्र. १ संदर्भात माहिती उपलब्ध नाही. मुद्दा क्र. २ च्या संदर्भामध्ये चुकीचा नंबर दिला असल्यामुळे योग्य नंबर देवून माहिती उपलब्ध करुन घ्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यामुळे समाधान न झ ाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, सदरच्या माहितीच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध नाही असे उत्तर देण्यात आलेले आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, माहिती उपलब्ध नाही याचे कारण संबधित नस्ती ही आढळून येत नाही व त्यामुळे माहिती उपलब्ध नाही असा निर्णय देण्यात आलेला आहे. अपिलकर्ता यांनी संदर्भातील वीज जोडणी धारावी क्षेत्र दिले आहे. धारावी या क्षेत्रातील घर नंबर तसेच वीज जोडणी या संदर्भामध्ये काहीही माहिती पडताळून पाहणे शक्य नसते. व्यक्ती ही इथे ओळखणे किंवा विशिष्ट व्यक्तीचे घर आहे असे ओळखणे कठीण आहे व त्यामुळे अपिलकर्ता रामशंकर गुप्ता या नावाच्या सदृश आणखी अर्ज वेगवेगळे फोटो, वीज जोडणी अर्ज दाखल केले आहेत. आयोगापुढे या १) रामशंकर गुप्ता २) सत्यप्रकाश नारायण ३) मिर्जा अन्वरअली हक्. अशा प्रकारचे फोटो असलेले अर्ज आयोगाच्या निर्देशनात आणले आहे. अर्जात आयोगाच्या संबधित प्रकारचे गुणवत्तेबाबत चौकशी करण्याची आवश्यकता नाही. मागितलेली माहिती ही कागदपत्रे,अभिलेखे या स्वरुपात उपलब्ध असल्याने, त्या उपलब्ध करुन देण्याचे आदेश आयोग देवू शकतात व उपलब्ध नसेलतर त्याबाबत स्पष्टिकरण देणे आवश्यक आहे व त्यामुळे नस्ती गहाळ झाल्यास माहितीचा अधिकार २००५ या अधिनियमाप्रमाणे नस्ती नष्ट केल्यास त्याप्रमाणे उत्तर देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**----आदेश----**

**१) अपिलकर्ता यांचे अपिल अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत अपिलकर्ता यांनी त्यांचे दिनांक २६-०७-२०१० अर्जामध्ये जी मुद्देनिहाय माहिती मागितलेली आहे, त्याप्रमाणे मुद्देनिहाय उत्तर देवून कागदपत्र किंवा नस्ती उपलब्ध असल्यास छायांकित प्रती देवून किंवा उपलब्ध नसल्यास त्याचे स्पष्टिकरण स्पष्टपणे कळवावे.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०३-०१-२०११.**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव / कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग , मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त,राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणीक्रं./५०२०९/अपील क्रं.७०५१/२०१०**

**श्री. राजू कारभारी अहिरे**
**नवीन रेशनिंग दुकानाजवळ, सर्वोदय हॉस्पिटलच्यामागे,**
**भीमनगर,घाटकोपर(प.),**
**मुंबई-४०००८६.** **...अपीलकर्ता**

----*विरुध्द*-----

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**पी/उत्तर विभाग कार्यालय,**
**लिबर्टी गार्डन,मालाड,मुंबई-४०००६४.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परिरक्षण),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**पी/उत्तर विभाग कार्यालय,**
**लिबर्टी गार्डन,मालाड,मुंबई-४०००६४.** **...उत्तरवादी**

-----*निर्णय*-----

| | |
|---|---|
| **द्वितीय अपीलाचा दिनांक** | **: २७ -१०-२०१०** |
| **सुनावणीचा दिनांक** | **: ०३-०१-२०११** |
| **अपिलकर्ता** | **- उपस्थित.** |
| **जन माहिती अधिकारी** | **- उपस्थित.** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | **- उपस्थित.** |

अपिलकर्ता यांनी दिनांक ०४-०८-२०१० रोजी जन माहिती अधिकारी सहाय्यक अभियंता परिरक्षण, पी/उत्तर विभाग, मालाड,मुंबई यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील कामकाजाविषयी दिनांक **०१-०५-२०१० ते ३१-०५-२०१०** या कालावधीतील नगरसेवक विकास निधीमधून होणाऱ्या कामाकरिता किती कार्यादेश देण्यात आले आहेत. त्या कार्यादेशाच्या छायांकित प्रती व त्या कामाच्या कार्यादेशाच्या प्रती, मोजमापन पुस्तिका, नकाशा आराखडा इ. एकूण ६ मुद्दांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिश: घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दिनांक २४-०८-२०१० रोजी माहिती खर्च रु.११८२/- चा भरणा करावा व मोजमापण पुस्तिका, नकाशा, आराखडे यांच्या प्रती देयके पास झाल्यानंतर सदर

कार्यालयात उपलब्ध होतील असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक १५-०९-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. मात्र त्यांनी दिनांक २३-०८-२०१० रोजी खर्च भरणा केलेले आहे व त्यानंतर त्यांना कार्यादेशाच्या प्रती देण्यात आलेले आहे. मात्र प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक १५-१०-२०१० रोजी देण्यात आला असून **मुद्दा क्र. १** च्या संदर्भामध्ये सर्व माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपिल हे निकाली काढलेले आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना कार्यादेशाच्या छायांकित प्रती मिळाली. मोजमापण पुस्तिका, नकाशा आराखडा यांच्या छायांकित प्रती मिळाली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, मोजमापण पुस्तिका, नकाशा आराखडा वैगेरे ही देयके अजून पर्यंत तयार केलेली नाहीत, कारण मार्च २०११ अखेर वर्ष पूर्ण व्हावयाचे आहे. मार्च पर्यंत देयके पुर्ण सादर होतील व माहिती पुर्ण तयार होईल. त्यामुळे मोजमापण पुस्तिका, नकाशा आराखडा हे अंतिम नसल्यामुळे तसे त्यांना कळविलेले होते. परंतु मार्च २०११ नंतर मोजमापण पुस्तिका, नकाशा आराखडा यांचे प्रती देयके पास झाल्यानंतर अपिलकर्ता यांनी सदर देण्यात येतील. अपिलकर्ता यांनी मार्च २०११ नंतर एक स्मरणपत्र, अपिलाचा निर्णया संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांना पाठविणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**----आदेश----**

**१) अपिलकर्ता यांचे अपिल अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांचे दिनांक ०४-०८-२०१० रोजीच्या अर्जात मागितलेली नगरसेवक विकास निधी च्या संदर्भामधील कामकाज मोजमापण पुस्तिका, नकाशा आराखडा यांच्या प्रती मार्च २०११ नंतर देयके पास झाल्यानंतर त्यांच्या छायांकित प्रती अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात याव्यात. परंतु त्याकरीता अपिलकर्ता यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी असतील त्यांना एक स्मरणपत्र या निर्णयांच्या संदर्भात देण्यात यावी.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०३-०१-२०११.**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव / कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग , मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त,राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांकःमुमाआ/नोंदणीक्रं./४९८८८/अपील क्रं.७०५८/२०१०**

**श्री. शेखर काशिनाथ एल. कापुरे**
**५९,आंबेडकर सदन,करी रोड,**
**मुंबई-४०००१३.** **...अपीलकर्ता**

**----*विरुध्द*-----**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**सहाय्यक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एन विभाग, दुसरा मजला,**
**जवाहर मार्ग,घाटकोपर(पूर्व),**
**मुंबई-४०००७७.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
**सहाय्यक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एन विभाग, दुसरा मजला,**
**जवाहर मार्ग,घाटकोपर(पूर्व),**
**मुंबई-४०००७७.** **...उत्तरवादी**

**-----*निर्णय*-----**

| | |
|---|---|
| **द्वितीय अपीलाचा दिनांक** | **: २३ -०९-२०१०** |
| **सुनावणीचा दिनांक** | **: ०४-०१-२०११** |
| **अपिलकर्ता** | **- उपस्थित.** |
| **जन माहिती अधिकारी** | **- उपस्थित.** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | **- उपस्थित.** |

अपिलकर्ता यांनी दिनांक २९-१२-२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, इमारती व कारखाने, एन विभाग यांच्याकडे मे.युनिटी मॅन्युफॅक्चरींग कंपनी/मे. जाज इंटरनॅशनल/मे.जाज क्रियेशन इम्पेक्सं (प्रा.लि.)/मे.पी.डी. फॅशन व इतर विविध नावांनी ११-बी, नारायण नगर(आझाद नगर), कुर्ला इंन्डस्ट्रियल एरिया, घाटकोपर(वेस्ट) मुंबई-७० सदर पत्त्यावर चालू असलेल्या गारमेंट कंपनीच्या फॅक्टरी परमिट संबधी माहिती ,कंपनी अस्तित्वात असल्या पासून ते आज पर्यंतची माहिती त्यामध्ये परमिट साठी जो अर्ज केलेला आहे व परवानगी देताना जी जी कागदपत्रे कंपनीने दाखल केलेली आहेत त्या सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती मागितलेली दिसून येते. सदर माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे.

अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १३-०१-२०१० रोजी मागितलेली माहिती सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने) घ्एनङ विभागाशी संबंधीत असल्याने आपला अर्ज घ्एनङ विभाग कार्यालयात अग्रषित केलेला आहे असे कळविलेले दिसून येते. दिनांक ०२-०८-२०१० रोजी घ्एनङ विभागाने आपण मागितलेली माहिती पुरविण्यात आलेली आहे. या कार्यालयाकडून जी पत्रव्यवहार केलेला आहे, त्यांच्या छायांकित प्रती देण्यात आले. त्रयस्थ पक्षाचा या कार्यालयास प्राप्त झालेल्या उत्तराप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे **कलम ८(छ)** च्या अधिन राहून आपणास देता येत नाही असे दिनांक ०९-०७-२०१० रोजीच्या अर्जात कळविलेले दिसून येते. अपिलकर्ता यांनी त्यांच्या सुरवातीच्या अर्जाच्या संदर्भात माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २६-०२-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये दिनांक १५-०२-२०१० रोजी अपिलकर्ता यांनी माहिती पुरविण्यासाठी रु.४/- चा भरणा करावा व माहिती व्यक्तिशः प्राप्त करुन घ्यावी असे सविस्तर त्यांना कळविण्यात आलेले होते. त्याचप्रमाणे वर नमुद केलेला पत्रव्यवहाराच्या संदर्भामध्ये कार्यवाही झालेली दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी सदर कंपनीचे दिनांक २६-०२-२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दयावी किंवा नाही याबद्दल विचारणा केलेली होती व कंपनीने कागदपत्रे देण्यास नकार दिला होता. त्यामुळे प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये कागदपत्रे पाहणी करुन आवश्यक असलेली कागदपत्रांची सांक्षाकित प्रत दयावी असा आदेश दिलेला असल्यामुळे दिनांक १३-०४-२०१० रोजी पडताळणी केली. त्याप्रमाणे दिनांक २१-०४-२०१० रोजी पत्र दिले व दिनांक २१-०६-२०१० रोजी अपिलकर्ता यांचे प्रतिनिधी श्री.प्रल्हाद डकंडा गवळी यांस कागदपत्रे देण्यास पाठविले. दिनांक २४-०६-२०१० रोजी १ ते १३५ पाने कागदपत्रांची सांक्षाकित प्रती उपलब्ध करुन देण्यात आले. त्यावरुन अपिलकर्ता यांनी दिनांक ०९-०७-२०१० रोजी पत्र दिले. त्या संदर्भामध्ये वर नमुद केलेले आहे. तरी सुद्धा अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, कंपनी ही ज्या वेळेस प्राधिकरणाकडे नियमानुसार परवानगी मागते. त्यावेळेस परवानगी देताना अटि/शर्ती प्रमाणे सर्व कागदपत्रांची ही आवश्यक असतात. त्यापैकी एकही कागदपत्रे सादर केली नाही तर परवानगी नाकारली जाते. याचा अर्थ परवानगी करीता आवश्यक असलेली कागदपत्रे सार्वजनिक अभिलेखे आहेत व ती सार्वजनिक अभिलेखे असतात. सदरची कंपनीच्या परवानगी करीता शासनाची जमीन दिलेली आहे. त्यामुळे शासनास केलेला भाडेपट्टी करार हा परवानगी देण्याकरीता आवश्यक बाब असते व त्यामुळे अशाप्रकारे भाडेपट्टी कराराची प्रत उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. परंतु कंपनीने त्यांना कागदपत्रे उपलब्ध करुन देवू नये असे जी हरकत घेतलेली आहे त्याबाबत ते सुद्धा जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने त्यांना विचारणा केलेली आहे. **माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ११** प्रमाणे अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्रयस्थ पक्षाची माहिती असेल तर सुरुवातीलाच ५ दिवसांमध्ये त्र्ययस्थ पक्षाला माहिती दयावी किंवा नाही हे जन माहिती अधिकारी यांनी विचारावयाचे असते. ती सर्व प्रक्रिया १० दिवसामध्ये पुर्ण करावयाची असते. त्यातही त्रयस्थ पक्षाने ती माहिती गोपनीय आहे व ती देण्यात येवू नये असे जरी कळविलेले असेलतरी माहिती प्रकट करण्याने त्र्ययस्थ पक्षाचे किती नुकसान होईल, त्या पेक्षा माहिती प्रकट करण्याने मोठया प्रमाणात सार्वजनिक हित साधणार असल्यास माहिती प्रकट करणे आवश्यक असते. सदरच्या प्रकरणांमध्ये कंपनी सुरु असताना सुद्धा व सर्व सोयी सवलती उपलब्ध करुन घेतलेले असताना कामगाराचे देणे दयावयाचे किंवा नाही, कंपनी बंद करावयाची असे जर होणार असेल तर कामगार न्यायालयामध्ये दाद मागणे आवश्यक आहे. कामगारांनी न्याय मागण्याकरीता जर कागदपत्रांची आवश्यकता असलीतर गोपनियतेपेक्षा कामगाराचे व्यापक प्रमाणात हित जास्त महत्वाचे आहे. त्यामुळे सदर कागदपत्रे ही सार्वजनिक करणे हे जन माहिती अधिकारी यांचे कर्तव्य असते. परंतु सदरच्या प्रकरणांमध्ये कंपनीच्या हिताचा विचार करुन कागदपत्र देण्यात टाळाटाळ करण्यात येते असे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविण्याच्या दृष्टिने जी कारवाई करावयाची आहे ती संपुर्ण कारवाई ही **३०** दिवसांच्या आत करावयाची आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यास **६-७** महिन्याचा कालावधी घेतलेला आहे व तरीही अपुर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे ते शास्तीस पात्र आहे. परंतु शास्तीपेक्षा माहिती मिळणे महत्वाचे असते. जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व तसा आयोगाने आदेश करावा असे त्यांनी आयोगाकडे विनंती केलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे तसा विलंब झालेला आहे व त्यानंतरही अपिलकर्ता यांना काही कागदपत्रे म्हणजे **१ ते १३५** कागदपत्रे नस्ती मधुन उपलब्ध करुन दिलेली आहेत. परंतु अपिलकर्ता यांनी पुन्हा भाडे कराराचे करारपत्र व इतर कागदपत्रे उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे असे सांगितले आहे. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद केला त्यात तथ्य आहे. कोणत्याही प्राधिकरणाकडे परवानगी मागताना आवश्यक त्या अटी व शर्तीची पुर्तता करणे बंधनकारक असते व त्याकरीता कागदपत्रे दाखल करणे बंधनकारक असते. त्यामुळे अशी दाखल झालेली सर्व कागदपत्रे ही सार्वजनिक अभिलेखांचे भाग होते. त्यामुळे ती त्या त्र्ययस्थ पक्षाची किंवा व्यक्तीची खाजगी कागदपत्रे आहे असे म्हणता येत नाही. त्यामुळे ही सर्व कागदपत्रे अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

**----आदेश----**

**१) अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांना कामकाजाच्या दिवशीची तारीख व वेळ दुपारी ३.०० ते ५.०० या वेळेत कळवावी. त्या दिवशी उपस्थित राहुन संबधित नस्तीतील १ ते १३५ कागदपत्रांचा तपशील देवून उर्वरित कागदपत्रांची छायांकित प्रती विनामुल्य व्यक्तिशः उपलब्ध करुन घ्यावीत.**

२) **अपिलकर्ता हे दिलेल्या तारखेस व वेळेस उपस्थित राहिल्यास संपुर्ण नस्तीचे निरिक्षण दयावे व त्यातुन १३५ कागदपत्रे वगळून इतर सर्व कागदपत्रांची छायांकित प्रती विनामुल्य व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र राहतील. याची नोंद घ्यावी.**

**३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०४-०१-२०११.**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव / कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग , मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त,राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणीक्रं./४९८७९/अपील क्रं.७०५६/२०१०**

**श्री. प्रकाश गोविंद नवाथे**
**२०४,राजबाग,दलुचंद को.हौ.सो.लि.,**
**२७१, सर भालचंद्र मार्ग,**
**मांटुगा,मुंबई-४०००५१.** **...अपीलकर्ता**

----*विरुध्द*-----

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, एफ.एन.विभाग,मुंबई,**
**मल्होत्रा हाऊस,६ वा माळा, जी.पी.ओ. समोर,**
**मुंबई-४००००१.**
**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक,**
**सहकारी संस्था, एफ.एन.विभाग,मुंबई,**
**मल्होत्रा हाऊस,६ वा माळा, जी.पी.ओ. समोर,**
**मुंबई-४००००१.** **...उत्तरवादी**

-----*निर्णय*-----

| | |
|---|---|
| **द्वितीय अपीलाचा दिनांक** | **: २३ -०९-२०१०** |
| **सुनावणीचा दिनांक** | **: ०४-०१-२०११** |
| **अपिलकर्ता** | **- उपस्थित.** |
| **जन माहिती अधिकारी** | **- अनुपस्थित.** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | **- अनुपस्थित.** |

अपिलकर्ता यांनी दिनांक २९-०६-२०१० रोजी जन माहिती अधिकारी सहाय्यक उपनिबधंक, सहकारी संस्था, एफ. एन. विभाग यांच्याकडे प्रशासकाचे अधिकाराची माहिती मागितलेली दिसून येते. प्रशासकाची नेमणुक रद्द कसे होते त्या प्रकारची माहिती देण्यात यावी. जर बाँड दिलेला नाही त्यामागची माहिती, तसे प्रशासकाने योग्य काम केले नसल्यास कारलिफ्ट चे काम थांबविलेले आहे त्याची माहिती उपलब्ध करुन दयावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दिनांक २१-०७-२०१० रोजी आपण अर्जात मागणी केलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची आहे व उपलब्ध असलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वंये माहिती तरतूदीप्रमाणे माहिती देता येत नाही असे कळविलेले आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक **३१-०७-२०१०** रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक **२९-०४-२०१०** रोजी देण्यात आला असून, अपिल अंशतः मंजूर करण्यात येत असून **मुद्दा क्र. १** मध्ये प्रशासकाचे कशा प्रकारचे अधिकार आहे या बाबतची माहिती

त्यांना देण्यात यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांना प्रशासक असलेले अधिकाऱ्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना माहिती ही उपलब्ध झालेली नाही. तसेच राज्य माहिती आयोगाच्या आदेशाप्रमाणे सुद्धा कारवाई झालेली नाही. जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी सुद्धा गैरहजर आहेत. त्यांनी कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे ही दाखल केलेले नाही. यावरुन जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगाचा अवमान केलेला आहे. माहितीचा अधिकार २००५ चे कलम १९(५) अन्वंये माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही हे सिद्ध करण्याची तरतूद जन माहिती अधिकारी यांची जबाबदारी असते. माहितीचा अधिकार २००५ चे कलम २०(१) परंतु का प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक असते. राज्य माहिती आयोगाच्या नोटिस मध्ये सुद्धा त्या दृष्टिने जन माहिती अधिकारी यांनी उपस्थित राहणे व खुलासा दाखल करण्यासाठी नमुद केलेले आहेत. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या नोटिसाची दखल घेतली नसल्यामुळे त्यांच्या विरुद्ध शास्ती का लादण्यात येवू नये याबद्दलचा खुलासा आयोगापुढे करणे आवश्यक आहे अन्यथा त्यांच्या विरुद्ध शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे **कलम २(च)** अन्वंये **घ्माहितीड**संज्ञेची व्याख्या केलेली आहे. त्यामध्ये सार्वजनिक प्राधिकरणामध्ये त्या साहित्याचे स्वरुपात कागदपत्रे, अभिलेखे, परिपत्रक, शासन निर्णय इत्यादीचा समावेश होतो व माहितीचा अधिकार या संज्ञे मध्ये सार्वजनिक प्राधिकरण नाकरण्यात असलेली माहिती म्हणजेच कागदपत्रे, अभिलेखे यांचे निरिक्षण करुन व छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे असा माहितीचा अधिकार आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जामध्ये काही मुद्दांच्या संदर्भामध्ये कारवाईची अपेक्षा केलेली आहे. कोणत्याही प्रकरणामध्ये गुणवत्तेबाबत कारवाई करण्याचा अधिकार आयोगास नाही व त्यामुळे त्याप्रकारचा आदेश सुद्धा देता येत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

**----आदेश----**

**१) अपिल निकाली काढण्यात येते.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०४-०१-२०११.**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त,राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांकःमुमाआ/नोंदणीक्रं./४९९००/अपील क्रं.७०७२/२०१०**

**श्री. रमेश नत्थुजी झाडे**
**राष्ट्रीय शैक्षणिक गुणवत्ता मंच,**
**२/७०४, श्री शाश्वत कॉम्पलेक्स प्लेझंट पार्क,**
**मिरा भाईंदर रोड,**
**मिरा रोड, जि.ठाणे-४०११०७.** **...अपीलकर्ता**

**----*विरुध्द*-----**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**
**जन माहिती अधिकारी तथा**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.** **...उत्तरवादी**

**-----*निर्णय*-----**

| | |
|---|---|
| **द्वितीय अपीलाचा दिनांक** | **: २२ -०९-२०१०** |
| **सुनावणीचा दिनांक** | **: ०५-०१-२०११** |
| **अपिलकर्ता** | **- उपस्थित.** |
| **जन माहिती अधिकारी** | **- उपस्थित.** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | **- अनुपस्थित.** |

अपिलकर्ता यांनी दिनांक ३०-०३-२०१० रोजी जन माहिती अधिकारी उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय यांच्याकडे, **१) W.P. ९६२९/२००९, या याचिके संदर्भात आपल्या विभागाने काही प्रतिज्ञापत्र सादर केले आहे काय किंवा कसे? २) C.A. in W.P. २८५/२०१० व C.A. in W.P.२८७/२०१० संदर्भात आपल्या विभागाने काही प्रतिज्ञापत्र सादर केले आहे काय किंवा कसे?** केले असल्यास त्या प्रतिज्ञापत्राची प्रत देण्यात यावी. माहिती शीघ्र टपालाने घेणार असे नमुद केलेले आहे. माहितीचा कालावधी **१९९२-२०१०** आहे. माहितीचा विषय **विधी व न्याय** असा दिलेला आहे. अर्जाच्या अनुषंगाने विहीत मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दिनांक २५-०६-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. त्यानंतर दिनांक ०९-०६-२०१० रोजी आपण अर्जात उल्लेख केलेले रिट पिटीशन क्र.९६२९/२००९ अवमान याचिका क्रमांक २८५/२०१० व याचिका क्रमांक २८७/२०१० हे नेमक्या कोणत्या विषयाबाबत आहेत हे स्पष्ट होत नसल्यामुळे आपणांस हवी असलेली माहिती उपलब्ध करुन देणे शक्य होत नाही. तरी याबाबत आपण सविस्तर खुलासा

केल्यास माहिती देणे शक्य होईल. त्यानंतर प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये दिनांक ०९-०७-२०१० रोजी पत्र पाठवून दिनांक २३-०७-२०१० रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. परंतु सुनावणीस अपिलकर्ता हे उपस्थित राहीले नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे. अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, रिट पिटीशन क्र.९६२९/२००९ दिल्यावर माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित होते व जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, उच्च व तंत्र शिक्षण विभागामध्ये **३०** कार्यासने आहेत व प्रत्येक कार्यासनाकडे वेगवेगळे विषय असतात. त्या त्या वेगवेगळया विषयांच्या संदर्भामध्ये जर न्यायालयामध्ये दावे किंवा याचिका दाखल झाल्यास त्याबद्दल माहिती फक्त त्या संबधित कार्यासनाकडेचअसते व त्यामुळे अपिलकर्ता यांनी याचिका संदर्भातील विषय जर दिला असता तर त्यांना त्या याचिका संदर्भातील माहिती उपलब्ध करुन देता आले नसती. प्रथम अपिलाची सुनावणीला सुद्धा ते उपस्थित राहीले नाही. त्यामुळे त्या याचिकाच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही. अद्यापही त्यांनी विषय सांगितलेला नाही. परंतु अपिलार्थी यांनी सांगितले की, संबंधित विषयाची त्यांना माहिती आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीचा एकवेळ आधार घेतल्यावर, त्यासंदर्भामध्ये माहिती सुलभरीतीने उपलब्ध होण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये समजून घेण्याकरीता खुलासा किंवा स्पष्टिकरण मागु शकतात. माहितीचा अधिकार २००५ च्या अधिनियमाची तरतूद जसे जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपिलीय अधिकारी यांना लागू आहेत, तसे ते अपिलकर्ता यांनी सुद्धा लागू आहेत. अपिलकर्ता यांनी माहितीचे वर्णन अपूर्ण करुन माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून तक्रार करणे हे योग्य नव्हे. माहिती उपलब्ध करुन घ्यावयाची असल्यास व अपिलकर्ता यांची कल्पना स्पष्ट नसल्यास त्या स्पष्ट करुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक आहे. अपिलकर्ता यांनी आयोगाने विचारले असताना सुद्धा विषय सांगण्याची टाळाटाळ केली. बरेच चर्चे अंती त्यांनी विषय सांगितला व तो **U.C.G. व M.PHIL** विदयार्थ्यांच्या संदर्भामध्ये विषय येतो. तशाप्रकारे माहिती घेवून अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**----आदेश----**

**१) अपिलकर्ता यांचे अपिल अंशतः मान्य करण्यात येत असून अपिलकर्ता यांनी त्यांच्या सुनावणीमध्ये खुलासा केल्याप्रमाणे याचिका क्रमांक ९६२९/२००९ च्या संदर्भामध्ये व याचिका क्रमांक २८५/२०१० व २८७/२०१० च्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दयावी.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०५-०१-२०११.**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव / कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग , मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त,राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणीक्रं./४९९०१/अपील क्रं.७०७३/२०१०**

**श्री. रमेश नत्थुजी झाडे**
**राष्ट्रीय शैक्षणिक गुणवत्ता मंच,**
**२/७०४, श्री शाश्वत कॉम्पलेक्स प्लेझंट पार्क,**
**मिरा भाईंदर रोड,**
**मिरा रोड, जि.ठाणे-४०११०७.** **...अपीलकर्ता**

**----*विरुध्द*-----**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**
**जन माहिती अधिकारी तथा**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.** **...उत्तरवादी**

**-----*निर्णय*-----**

| | |
|---|---|
| **द्वितीय अपीलाचा दिनांक** | **: ०५ -१०-२०१०** |
| **सुनावणीचा दिनांक** | **: ०५-०१-२०११** |
| **अपिलकर्ता** | **- उपस्थित.** |
| **जन माहिती अधिकारी** | **- उपस्थित.** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | **- अनुपस्थित.** |

अपिलकर्ता यांनी दिनांक ०५-१०-२०१० रोजी जन माहिती अधिकारी उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय यांच्याकडे, **दिनांक ०७-०४-२०१० रोजी आपल्या विभागाचे दिनांक १८-१२-२००९ रोजी शासन निर्णय क्र.एससीपी २००९/(२०७/०९)/मशि-१ हा प्रधान सचिव श्री.ज.स.सहारीया यांच्या संमतीने निर्गमीत झाला आहे का? असल्यास त्यांचा शेरा देण्यात यावा अशी माहिती मागितलेली दिसून येते.** माहिती शीघ्र टपालाने घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दिनांक ०३-०५-२०१० रोजी जे पत्र दिलेले आहे व जावक नोंदवहीची छायाप्रत जोडलेली आहे, असे खुलाशा मध्ये म्हटले आहे. परंतु प्रत्याक्षात पत्राची प्रत व जावक नोंदवहीची छायाप्रत जोडलेली नाही. त्यामुळे माहिती विहीत मुदतीत मिळाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दिनांक २२-०६-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा नंतर सुद्धा माहिती मिळाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी मागितलेली माहिती मिळाली नाही. त्यावर अवर सचिव यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी खर्चाचा भरणा करावा असे पत्र दिलेले होते त्यांनी ते आयोगाला पत्र दाखवले. परंतु कोणतेही पत्र पाठविलेले नाही. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, अवर सचिव काम करणाऱ्या व्यक्तिस आयोगाची नोटिस वाचता येत नाही, तर इतर कामे ते कसे करीत असतील हे एक आश्चर्यच आहे. ज्या अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही ही सुद्धा जबाबदारी जन माहिती अधिकारी यांची आहे व दिली नसल्यास त्यांच्या विरुद्ध शास्ती लादण्यात येते असे असून सुद्धा आयोगापुढे कागदपत्रे जमा न करणे ही एक प्रकारची अवज्ञा आहे. आयोगचे कामकाज अर्ध-न्यायिक पद्धतीने चालते. त्याकरीता कागदपत्रांचे पुरावे सादर करावे लागतात हे सामान्याज्ञान आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुद्धा अपिलाची दखल घेतलेली नाही व त्यामुळे त्यांना सुद्धा प्रशिक्षणाची आवश्यक आहे हे दिसून येते. एकूणच उच्च व तंत्रज्ञान शिक्षण विभाग माहितीचा अधिकाराच्या संदर्भात उदासिन आहे असे दिसून येते. असे असलेतरी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**----आदेश----**

**१) अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना त्यांचे दिनांक ०७-०४-२०१० अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दयावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०५-०१-२०११.**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव / कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग , मुंबई**

**प्रत,**

**१. निवडनस्ती ,**
**२. निवडनस्ती,**
**३. श्री. चौरे, सहाय्यक**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त,राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणीक्रं./५०२६३/अपील क्रं.७०६९/२०१०**

**श्रीमती अर्चना श्रीवास्तव.**
**रु.नं.२, घनश्याम दासची चाळ,** **...अपीलकर्ता**
**काळा किल्ला,धारावी,मुंबई-४०००१७.**

**-----*विरुध्द*-----**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**सहा.आयुक्त(एम/पूर्व विभाग),बृमनपा,**
**एम विभाग कार्यालय, २रा माळा,**
**खोली क्र.२०८,कै.शरदभाऊ आचार्य मार्ग,**
**चेंबूर,मुंबई-४०००७१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(परि-१),**
**सहा.आयुक्त(एम/पूर्व विभाग),बृमनपा,**
**एम विभाग कार्यालय, २रा माळा,**
**खोली क्र.२०८,कै.शरदभाऊ आचार्य मार्ग,**
**चेंबूर,मुंबई-४०००७१.** **...उत्तरवादी**

**-----*निर्णय*-----**

| | |
|---|---|
| **द्वितीय अपीलाचा दिनांक** | **: निरंक** |
| **सुनावणीचा दिनांक** | **: ०५-०१-२०११** |
| **अपिलकर्ता** | **- उपस्थित.** |
| **जन माहिती अधिकारी** | **- अनुपस्थित.** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | **- अनुपस्थित.** |

अपिलकर्ता यांनी दिनांक २०-०५-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता परीक्षण एम/पूर्व विभाग, चेंबूर,मुंबई यांच्याकडे, वार्ड क्र.१२९,१३० ची नगरसेविका अलिशा शेख, श्री.सुरेश राव यांचा विभाग क्षेत्रात निधी वापरुन लादीकरण, गटारे,शौचालय, समाजसेवा हॉल व जी काही इतर कामे ठेकेदारामार्फत रिपेंरिग व नविनीकरण करुन सुरु आहेत किंवा झाली आहेत त्यासर्व कामाबाबत सविस्तर माहिती मिळण्याकरीता एकूण ६ मुद्दांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती ही व्यक्तिश: घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दिनांक १९-०६-२०१० रोजी मागितलेली माहिती ही विस्तृत स्वरुपाची

असल्याकारणाणे, हवी असलेली माहिती कार्यालयीन दिवशी ३.०० ते ५.०० कालावधीमध्ये पाहण्याकरीता उपलब्ध केले जाईल व हवी असलेल्या माहितीच्या छायांकित प्रती, प्रती प्रत रु.२/- प्रमाणे शुल्काची नागरी सुविधा केंद्रात भरणा केल्यावर आपणांस उपलब्ध केल्या जातील असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दिनांक ०६-०९-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाच्या संदर्भात सुनावणी नोटिस काढण्यात आलेली दिसून येते व दिनांक ११-१०-२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी निरिक्षणासाठी अपिलकारांना हवी असलेली सर्व दस्तऐवज निरिक्षणासाठी द्यावेत. त्यानूसार अपिलकारांना त्यांना हवी असलेली माहिती अधिनियमाप्रमाणे शुल्क भरल्यानंतर घ्यावी असा आदेश पारित करण्यात आले. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, पान निरिक्षण केलेले आहे. कागदपत्रे कोणती पाहीजे ते पान दुमडुन दिलेले आहे व त्याबाबतचे खर्च भरणा कळवावे असे सांगितले असून सुद्धा खर्च भरणा अद्याप पर्यंत कळविलेला नाही. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहे व आयोगाच्या कार्यालयातून दिनांक १०-१२-२०१० रोजी सुनावणीस नोटिस काढण्यात आलेली होती व तरीही जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत हा आयोगाचा अवमान आहे. त्याकरीता ते शास्तीस पात्र आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलाच्या संदर्भामध्ये काय कारवाई केली व त्याबाबतचे कागदपत्रे दाखल केलेले नाही व त्यामुळे त्यांच्या विरुद्ध सुद्धा प्रशासकीय कारवाई करणे आवश्यक आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे **कलम १९(५)** अन्वंये आयोगापुढे माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही याबद्दल सिद्ध करण्याची जबाबदारी ही जन माहिती अधिकारी यांची असल्यामुळे ते व्यक्तिशः हजर राहणे आवश्यक असते अन्यथा त्यांच्या विरुद्ध माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे **कलम २०** प्रमाणे शास्ती लादणे अनिवार्य असते, असे असले तरी त्यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक असल्यामुळे व माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे सदरचे अपिल हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**----आदेश----**

**१) अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांनी कामकाजाची दिवसांची तारीख व वेळ दुपारी ३.०० ते ५.०० यामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपस्थित राहून, नस्तांचे निरिक्षण करावे व त्यांना अपेक्षित असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रतीचा प्रति प्रत रु.२/- प्रमाणे खर्चाचा भरणा केल्यानंतर माहिती उपलब्ध करुन द्यावी.**

**२) जन माहिती अधिकारी हे आयोगा पुढे अपिलाच्या सुनावणीस उपस्थित राहीले नाही, म्हणून त्यांच्या विरुद्ध शास्ती का लादण्यात येवू नये याबद्दलचा खुलासा त्यांनी**

आयोगापुढे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत व्यक्तिशः करावा अन्यथा त्यांच्या विरुद्ध शास्ती लादण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

३) प्रथम अपिलीय अधिकारी हे सुद्धा प्रथम अपिलाच्या माध्यमातुन कोणत्याही प्रकारे सुनावणी व चौकशी करीता निर्णय दिला नसल्यामुळे अधिनियम तरतूदीचे उल्लघंन केले असल्यामुळे त्यांच्या विरुद्ध शासकीय कारवाई करावी.

४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०५-०१-२०११.
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव / कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग , मुंबई

**राज्य मुख्य माहिती आयुक्त,राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणीक्रं./५०२४७/अपील क्रं.७०७१/२०१०**

**श्री.शाहीद व्ही.मन्सुरी**
**प्लॉट क्र.११७, डॉ.अजीम बिल्डींग,**
**तळ मजला,४० वा रस्ता,जुना खार(प)** **...अपीलकर्ता**
**मुंबई-४०००५२.**

**-----*विरुध्द*-----**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी,**
**निवासी उपजिल्हाधिकारी(अति/निष्का)**
**पश्चिम उपनगरे यांचे कार्यालय,**
**प्रशासकीय इमारत,७वा मजला,**
**सहकारी वसाहत,बांद्रा(पू.),मुंबई-४०००५१.**
**जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार(अति/निष्का)** **...उत्तरवादी**
**निवासी उपजिल्हाधिकारी(अति/निष्का)**
**पश्चिम उपनगरे यांचे कार्यालय,**
**प्रशासकीय इमारत,७वा मजला,**
**सहकारी वसाहत,बांद्रा(पू.),मुंबई-४०००५१.**

**-----*निर्णय*-----**

| | |
|---|---|
| **द्वितीय अपीलाचा दिनांक** | **: २६-१०-२०१०** |
| **सुनावणीचा दिनांक** | **: ०५-०१-२०११** |
| **अपिलकर्ता** | **- उपस्थित.** |
| **जन माहिती अधिकारी** | **- उपस्थित.** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | **- उपस्थित.** |

अपिलकर्ता यांनी दिनांक २३-०६-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी (अति/निष्का) यांच्या कार्यालयामध्ये, मौजे बांद्रा (पश्चिम) तालुका-अंधेरी येथील सेंट ॲन्थनी सह. गृहनिर्माण संस्था, जुना खार,मुंबई-४०००५२ च्या संदर्भामध्ये या सोसायटी पात्र/अपात्र करणाऱ्या अधिकांऱ्याची नावे व पद आणि त्या अधिकांऱ्याने इतर कोणत्या सोयायटीस पात्र/अपात्र ठरविलेले त्यांची संपुर्ण माहिती उपलब्ध करुन द्यावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ३०-०६-२०१० रोजीचे पत्रांन्वये, आपण मागितलेली माहिती प्रश्न-उत्तर स्वरुपाची असल्याने माहिती अधिकारी अधिनियम २००५ चे नियम **३(च)** अन्वंये प्रश्पोत्तराच्या स्वरुपातील मागणी देणे अपेक्षित नसल्याने ती पुरविता येत नाही व आपणांस हवी असलेली कागदपत्रांची मागणी करावी असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे

समाधान न झाल्यामुळे दिनांक १७-०८-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले आहे. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक ०७-१०-२०१० रोजी देण्यात आला असून अपिल अंशतः मान्य करण्यात येवून संचिका पडताळणीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातील अर्जदारास आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यामुळे समाधान न झ ाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, सेंट ॲन्थनी सह. गृहनिर्माण संस्था संदर्भात पात्र/अपात्र ठरविण्याच्या संदर्भात बरीच अनियमिता झालेली आहे व त्यामुळे त्यांनी तशी माहिती मागितलेली होती. परंतु ती त्यांना उपलब्ध झालेली नाही. सेंट ॲन्थनी सह. गृहनिर्माण संस्था संदर्भामध्ये कोणत्या अधिकाऱ्याने पात्र/अपात्र ठरविलेले आहे हे उपलब्ध करुन देता येईल. त्यांनी त्यांच्या अधिकाऱ्याने इतर सहकारी गृहनिर्माण संस्था पात्र/अपात्रतेचा निर्णय दिलेला आहे, हे विभाग प्रमाणित असल्यामुळे व ती संकलीत करुन देणे अपेक्षित नसल्यामुळे उपलब्ध करुन देता येत नाही. मात्र जन माहिती अधिकारी यांनी जे उत्तर दिलेले आहे ते उत्तरही माहिती देण्याची टाळाटाळ देण्याचे उत्तर आहे. अपिलकर्ता यांच्या अर्जांचे अवलोकन केले असता त्यांनी कोणत्या प्रकारचा प्रश्न उपस्थित केलेला नाही. **कोणती व किती** अशा प्रकारचे शब्दच्चार म्हणजे ते माहिती अधिकारात प्रश्न होत नाही व त्या संदर्भामध्ये संचिका किंवा कागदपत्र स्वरुपाची माहिती उपलब्ध असल्याने ती उपलब्ध करुन घेणे अपेक्षित असते. अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांच्या प्रथम अपिलांच्या संदर्भामध्ये पत्र व अभिप्राय मागितलेला नाही. जन माहिती अधिकारी हे अनियमित प्रात्र/अपात्र हे प्रकरण गुणवत्तेबाबत अभिप्रेत नाही. त्यामुळे जन माहती अधिकारी यांनी जे उत्तर दिलेले आहे ते सुद्धा माहिती देण्याची टाळाटाळीचे उत्तर आहे. त्यामुळेच मी विभाग प्रमाणित मागितलेली असल्यामुळे व ती संकलीत करुन देता येत नसल्यामुळे मुद्दा क्र. १ मधील माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यात येते.

**----आदेश----**

**१) अपिलकर्ता यांचे अपिल अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत त्यांचे दिनांक २३-०७-२०१० रोजी अर्जातील मुद्दा क्र. १ ची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**
**दिनांक : ०५-०१-२०११.**

**सचिव / कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग , मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त,राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणीक्रं./४९९१०/अपील क्रं.६१९६/२०१०**

**श्री. रमेश झाडे**
**राष्ट्रीय शैक्षणिक गुणवत्ता मंच,**
**२/७०४, श्री. शाश्वत कॉम्पलेक्स प्लेझंट पार्क,** ...**अपीलकर्ता**
**मिरा भाईंदर रोड, मिरा रोड,जिल्हा.ठाणे-४०११०७.**

**-----*विरुध्द*-----**

**प्रथम अपीलीय अधिकारी**
**उच्च शिक्षण संचालनाय,**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत,**
**पुणे-४११००१.**
**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,** ...**उत्तरवादी**
**उच्च शिक्षण संचालनाय,**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत,**
**पुणे-४११००१.**

**-----*निर्णय*-----**

| | |
|---|---|
| **द्वितीय अपीलाचा दिनांक** | **: २२-०९-२०१०** |
| **सुनावणीचा दिनांक** | **: ०७-०१-२०११** |
| **अपिलकर्ता** | **- उपस्थित.** |
| **जन माहिती अधिकारी** | **- उपस्थित.** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | **- उपस्थित.** |

अपिलकर्ता यांनी दिनांक २८-०४-२०१० रोजी जन माहिती अधिकारी उच्च शिक्षण संचालनालय पुणे यांच्याकडे, युजीसी निर्धारित अर्हता धारक अधिव्याख्यात्यांना प्राचार्य पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्याबाबत सन २००० ते आजपावेतो शासनाचे दिनांक १२-०३-२०१० (संकीर्ण क्र.२०१०/(२८/१०) मशि-१) या पत्रानुसार आपण सविस्तर अहवाल शासनाला सादर केला आहे का? असल्यास त्याची प्रत देण्यात यावी, नसल्यास त्यामागील कारणे देण्यात यावी. सोबत महाराष्ट्र शासन यांचे पत्र जोडले आहे. माहिती शीघ्र टपालाने घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दिनांक

२५-०६-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, आतपर्यंत त्यांना काहीही माहिती उपलब्ध झालेली नाही. जन माहिती अधिकारी हे आज प्रत्यक्ष हजर नाही. परंतु त्यांचे प्रतिनिधी यांना अर्जाची माहिती दिसून येत नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अर्ज शोधुन माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल. याचा अर्थ उच्च शिक्षण संचालनालय पुणे यांच्या कार्यालया मध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीबद्दल योग्य अंमलबजावणी होत नाही असे दिसते. माहितीच्या अधिकारातील आलेले अर्ज त्याबाबत कोणतीही कार्यपद्धती माहिती पुरविण्यात आलेली दिसत नाही किंवा पाळताना दिसत नाही. अपिलीय अधिकारी सुद्धा सर्वच्या बाबतीत अनभिज्ञ दिसून येतात. माहिती अर्ज मुळात मिळत नसल्यामुळे पुढिल कार्यवाही करता येत नाही असे असलेतरी संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी यांनी कार्यालयीन प्रमुखांना समज देणे आवश्यक आहे. अर्ज शोधुन माहिती उपलब्ध करुन देवू असे सांगितले असल्यामुळे सदरचे अपिल हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**-----आदेश-----**

**१) अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत त्यांचे दिनांक २८-०४-२०१० रोजीच्या अर्जाचा शोध घेवून, त्या अर्जात मागितलेली माहितीच्या संदर्भात झालेल्या कार्यवाहीची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. संबंधित अर्जामध्ये जर कर्मचाऱ्यांनी गलथान केलेले असले तर, त्यांची जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाही करावी.**

**२) सदरच्या निर्णयाची एक प्रत संचालक, उच्च शिक्षण संचालनाय पुणे, यांच्याकडे पुढिल कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.**

**३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**
**दिनांक : ०७-०१-२०११.**

**सचिव / कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग , मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त,राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणीक्रं./४९९०९/अपील क्रं.६१९९/२०१०**

**श्री. रमेश झाडे**
**राष्ट्रीय शैक्षणिक गुणवत्ता मंच,**
**२/७०४, श्री. शाश्वत कॉम्पलेक्स प्लेझंट पार्क, ...अपीलकर्ता**
**मिरा भाईंदर रोड, मिरा रोड(पूर्व),जिल्हा.ठाणे-४०११०७.**

**-----*विरुध्द*-----**

**प्रथम अपीलीय अधिकारी**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, ...उत्तरवादी**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**

**-----*निर्णय*-----**

| | |
|---|---|
| **द्वितीय अपीलाचा दिनांक** | **: २२-०९-२०१०** |
| **सुनावणीचा दिनांक** | **: ०७-०१-२०११** |
| **अपिलकर्ता** | **- उपस्थित.** |
| **जन माहिती अधिकारी** | **- नंतर उपस्थित.** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | **- अनुपस्थित.** |

अपिलकर्ता यांनी दिनांक ३०-०३-२०१० रोजी याचिका क्र. ५३७५/२००९ मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठामध्ये दिनांक २८-१०-२०१० रोजी दिलेला आदेशावर काय कार्यवाही केली? नसल्यास आपण वरील निर्णया विरोधात सर्वोच्च न्यायालयात अपिल केले आहे का? नसल्यास कोणत्या अधिकाऱ्याच्या किंवा पदधिकाऱ्यांच्या (मंत्री,आमदार इ.) सुचनेनुसार आपण कार्यवाही केली नाही अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहिती शीघ्र टपालाने घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने माहीती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १२-०६-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले व त्यानंतरही माहिती मिळाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले. अर्जाच्या अनुषंगाने आपण विचारलेली माहिती सन २००२ या कालावधीतील असल्यामुळे या संदर्भातील मुळ नस्ती शोधण्यास काही कालावधी लागणार आहे.

त्यावर सदर मुदतीत माहिती आपणांस पुढिल १० दिवसांत उपलब्ध करुन देण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी सांगितले की, त्यांनी पत्र दिलेले आहे व त्यामुळे सदरचे अपिल हे निकाली काढण्यास पात्र आहे.

**----आदेश----**

**१) अपिल निकाली काढण्यात येते.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०७-०१-२०११.**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव / कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग , मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त,राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणीक्रं./४९९११/अपील क्रं.६२००/२०१०**

**श्री. रमेश झाडे**
**राष्ट्रीय शैक्षणिक गुणवत्ता मंच,**
**२/७०४, श्री. शाश्वत कॉम्पलेक्स प्लेझंट पार्क, ...अपीलकर्ता**
**मिरा भाईंदर रोड, मिरा रोड(पूर्व),जिल्हा.ठाणे-४०११०७.**

**-----*विरुध्द*-----**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,**
**शिक्षण संचालनाय, ( उच्च शिक्षण )**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत,**
**पुणे-४११००१.**
**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, ...उत्तरवादी**
**शिक्षण संचालनाय, ( उच्च शिक्षण )**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत,**
**पुणे-४११००१.**

**-----*निर्णय*-----**

| | |
|---|---|
| **द्वितीय अपीलाचा दिनांक** | **: २२-०९-२०१०** |
| **सुनावणीचा दिनांक** | **: ०७-०१-२०११** |
| **अपिलकर्ता** | **- उपस्थित.** |
| **जन माहिती अधिकारी** | **- उपस्थित.** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | **- उपस्थित.** |

अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी उच्च शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) यांच्याकडे, १) राज्यातील पुर्ण वेळ ( Full Time) अधिव्याख्यांताची (अनुदानीत) संख्या किती आहे.(माहिती विषयानुसार देण्यात यावी.), २) राज्यातील किती हजार अधिव्याख्यांताना ६ वा वेतन आयोग लागु झाला आहे किंवा होणार आहे. ३) राज्य मंत्रीमंडळाकडून किती अधिव्याख्यांताना (संख्या) ६ वा वेतन आयोग लागू करावा यांचे काही निर्देश आले आहेत का? असल्यास यांची संबंधित कागदपत्रे देण्यात यावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहिती शीघ्र टपालाने घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दिनांक १२-०५-२०१० रोजी माहिती अधिकारी सर्व विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण,मुंबई,पुणे कोल्हापुर,औरंगाबाद, नांदेड,जळगांव, नागपूर, अमरावती यांनी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे पत्र दिलेले होते. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता

यांनी दिनांक २७-०६-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही त्यामुळे प्रथम अपिल केले होते. प्रथम अपिलाचा मेमो मध्ये कारण दिलेले नाही. त्यामुळे अपिलांच्या सुनावणीस अपिलकर्ता हजर नाही याकारणस्तव अपिल खारीज केलेले आहे. याचा अर्थ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमाच्या तरतूदीची काही माहिती आहे असे दिसून येत नाही. माहिती दिली किंवा नाही हे सिद्ध करण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी यांची आहे व ती त्यांच्या कार्यालयात असल्यावर त्यांनी त्यांना विचारणा करणे आवश्यक आहे. जेणेकरुन अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही यांचे ज्ञान त्यांना झाले असते, मात्र हजर राहीले असते तरी माहिती मिळाली नाही असेच सांगितले असते. ते मी अपिल मध्ये सांगितले आहे व हे सर्व सामान्यज्ञान आहे. त्यावर माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरची माहिती ही एकत्रीरित्या शिक्षण संचालकाकडे उपलब्ध नाही व त्यामुळे सहसंचालक स्तरावरुन उपलब्ध करुन देणे आवश्यक असते परंतु असे असल्यामुळे शिक्षण सहसंचालकाकडून चौकशी करुन माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही याबाबत प्रथम अपिलीय अधिकारी यांना चौकशी करता आली असती. परंतु त्यांनी सोपे व ढोबळ मार्ग स्विकारला व त्यात कोणत्याही बुद्धीची आवश्यकता नाही व प्रथम अपिल हे निकाली काढले. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही याबद्दल मात्र माहिती दिली किंवा नाही. याबद्दल मात्र विषय आहे इथेच राहीला या विरोधात उत्तर दिलेले दिसून येत नाही. त्यामुळे सदरचे अपिल हे मंजूर करण्यास पात्र आहे.

----आदेश----

**१) अपिलकर्ता यांचे दिनांक २९-०४-२०१० अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी मागितलेली माहिती ही या विभागीय सहसंचालक यांच्याकडून उपलब्ध झाली किंवा नाही याबाबतची चौकशी करावी व तसे उपलब्ध करुन दिली नसल्यास संकलीत करुन अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**
**दिनांक : ०७-०१-२०११.**

**सचिव / कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग , मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त,राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणीक्रं./४९२७६/अपील क्रं.६०३५/२०१०**

**श्री.प्रमोद लक्ष्मण कदम ...अपीलकर्ता**
**१६/डी-३, श्री. साई को.ऑ.हौ.सो.लि.**
**एस.व्ही.पी.नगर, म्हाडा,**
**अंधेरी (प.),८२,मुंबई-४०००५३.**

**-----*विरुध्द*-----**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव (नगर रचना )**
**नगर विकास विभाग, मंत्रालय, ...उत्तरवादी**
**मुंबई -४०००३२.**
**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (नगर रचना )**
**नगर विकास विभाग, मंत्रालय,**
**मुंबई -४०००३२.**

**-----*निर्णय*-----**

| | |
|---|---|
| **द्वितीय अपीलाचा दिनांक** | **: २८-०७-२०१०** |
| **सुनावणीचा दिनांक** | **: ०९-१२-२०१०,०७-०१-२०११** |
| **अपिलकर्ता** | **- उपस्थित.** |
| **जन माहिती अधिकारी** | **- उपस्थित.** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | **- उपस्थित.** |

अपिलकर्ता यांनी दिनांक ०८-०४-२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा नगर विकास विभाग यांच्याकडे, राज्यातील नागरी भागात अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणे नियंत्रणासाठी सर्वकक्ष योजनेस मान्यातेची प्रगती व स्थितीच्या सदंर्भामध्ये एकूण ५ मुद्दांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता त्यांनी दिनांक ०१-०४-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिलेला नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले. सदर अपिलाची सुनावणी ही दिनांक ०९-१२-२०१० रोजी देण्यात आली होती परंतु महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिवेशन हे नागपूर येथे असल्यामुळे अधिकारी उपस्थित राहू शकले नाही व त्यामुळे दिनांक ०७-०१-२०११ ही पुढिल तारीख जन माहिती अधिकारी यांनी उपस्थित राहण्याकरीता देण्यात आली होती.

अपिलकर्ता हे दिनांक ०९-१२-२०१० रोजी उपस्थित होते. आज जन माहिती अधिकारी हजर झाले परंतु त्यांनी असे सांगितले की, सदरचा अर्ज हा त्यांच्या कार्यासनाकडे आला असेल तर, त्यानंतर कार्यासन २१ कडे हस्तांतरीत झाला व त्यानंतर कार्यासन ३४ कडे व नंतर कार्यासन २० कडे

पाठविण्यात आला. आज कार्यासन २० चे माहिती अधिकारी यांना हजर राहण्याविषयी कळविण्यात आले होते. परंतु ते आलेले नाहीत असे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. प्रथम अपिल सुद्धा त्यांच्याकडे म्युन्सिपल ॲडमिनिट्रेशनचे उपसचिव दाखल केले होते व त्यांनी सुद्धा उपस्थित राहण्यास सांगितले होते. परंतु ते सुद्धा उपस्थित राहिलेले नाहीत व त्यामुळे अपिलकर्ता यांनी मात्र माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही याबद्दल काहीही आयोगापुढे माहिती सादर करण्यात आलेली नाही. नगर विकास विभागामध्ये माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत फार उदासीनता दिसून येते व हे त्याबाबतचे उत्तम उदाहरण आहे. त्यामुळे नगर विकास विभाग सचिव  यांना त्यांच्या कार्यालयामध्ये माहिती अधिकाऱ्याचे अंमलबजावणी संदर्भामध्ये विशेष लक्ष पुरविणे आवश्यक आहे. जेणेकरुन पारदर्शकता ही अधिक प्रमाणात होईल व त्याकरीता संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याबाबत चौकशी करुन जबाबदारी निश्चित करुन देण्याच्या दृष्टीने योग्य ती कार्यवाही करणे संयुक्तिक राहील. त्याकरीता माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम **२० (२)** अन्वंये शिस्तभंग कारवाईची शिफारस करणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**----आदेश----**

**१) अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यात येत असून संबंधित जन माहिती अधिकारी ( कार्यासन २०) यांनी आयोगापुढे सुनावणीसाठी उपस्थित राहण्याची टाळाटाळ केलेली आहे अशी आयोगाची खात्री झालेली असल्यामुळे त्यांच्या विरुद्ध माहितीचा अधिकार २००५ चे कलम २०(२) शिस्तभंग कारवाईची शिफारस करण्यात येते. सदर शिस्तभंग कारवाई त्यांना लागू असलेले सेवा अधिनियमाप्रमाणे करण्यात यावी.**

**२) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुद्धा माहिती अधिकारातील अपिलाच्या संदर्भामध्ये दक्ष राहुन अर्जदाराला माहिती मिळावी असा निर्णय देणे आवश्यक आहे. परंतु आज प्रथम अपिलाच्या संदर्भात सुद्धा ते हजर नव्हते व त्यामुळे त्यांच्या विरुद्ध सुद्धा प्रशासकीय कारवाई करावी.**

**३) सदरच्या निर्णयाची एक प्रत प्रधान सचिव नगर विकास विभाग, मंत्रालय यांच्याकडे स्वतंत्रपणे पाठविण्यात यावी.**

**४) अपिलकर्ता यांचे दिनांक २९-०४-२००९ अर्जाप्रमाणे माहिती हा निर्णय झाल्यापासून १० दिवसांच्या आत विनामुल्य रजिस्टर पोष्टाने पाठविण्यात यावी.**

**५) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**
**दिनांक : ०७-०१-२०११.**

**सचिव / कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग , मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त,राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणीक्रं./४९९०७/अपील क्रं.६१९७/२०१०**

**श्री. रमेश झाडे**
**राष्ट्रीय शैक्षणिक गुणवत्ता मंच,**
**२/७०४, श्री. शाश्वत कॉम्पलेक्स प्लेझंट पार्क, ...अपीलकर्ता**
**मिरा भाईंदर रोड, मिरा रोड(पूर्व),जिल्हा.ठाणे-४०११०७.**

**-----*विरुध्द*-----**

**प्रथम अपीलीय अधिकारी,**
**सहसंचालक (उच्च शिक्षण ) औरंगाबाद विभाग यांचे कार्यालय,**
**( नविन इमारत ), देवगिरी महाविद्यालयाजवळ,**
**रेल्वेस्टेशन रोड, औरंगाबाद.**
**जन माहिती अधिकारी तथा प्रभारी कनिष्ठ प्रशासन अधिकारी,**
**सहसंचालक (उच्च शिक्षण ) औरंगाबाद विभाग यांचे कार्यालय,**
**( नविन इमारत ), देवगिरी महाविद्यालयाजवळ,**
**रेल्वेस्टेशन रोड, औरंगाबाद. ...उत्तरवादी**

**-----*निर्णय*-----**

| | |
|---|---|
| **द्वितीय अपीलाचा दिनांक** | **: २२-०९-२०१०** |
| **सुनावणीचा दिनांक** | **: ०७-०१-२०११** |
| **अपिलकर्ता** | **- उपस्थित.** |
| **जन माहिती अधिकारी** | **- उपस्थित.** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | **- प्रतिनिधी उपस्थित.** |

अपिलकर्ता यांनी दिनांक २६-०४-२०१० रोजी जन माहिती अधिकारी विभागीय शिक्षण, सहसंचालक कार्यालय, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग यांच्याकडे, १) दिनांक ०६-०७-२००७ नंतर M.PHIL व PHD उमेदवारांची प्रध्यापकपदी नियुक्ती झाल्यामुळे (झाल्या असल्यास ) आपण वेतनपोटी किती रक्कम निर्गमीत केली? माहिती , उमेदवांराचे नाव, महाविद्यालय, नियुक्तीचा दिनांक व दिलेली रक्कम या स्वरुपात द्यावी. २) दिनांक २५-०१-२०१० च्या शासन पत्रानंतर M.PHIL व PHD धारंकाच्या ( १४-०६-२००६ नंतर नियुक्त झालेले ) वेतनापोटी किती रक्कम निर्गमीत करण्यात आली? माहिती, उमेदवांराचे नाव, महाविद्यालय, नियुक्तीचा दिनांक व मासिक वेतन या स्वरुपात द्यावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती शीघ्र टपालाने घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ०५-०६-२०१० रोजी माहिती प्रश्नार्थक स्वरुपातील असल्यामुळे देणे बंधनकारक नाही असे उत्तर दिलेले दिसून येते. त्यामुळे

अपिलकर्ता यांनी दिनांक २६-०६-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. परंतु प्रथम अपिलाचा निर्णय सुद्धा दिलेला नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना अद्यापपर्यंत कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०५-०६-२०१० रोजी जे उत्तर दिलेले आहे ते उत्तर त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीचे काही आकलन झालेले आहे असे दिसून येत नाही. प्रश्न असेल म्हणजे माहिती देता येत नाही असे नाही. प्रश्नांचे स्वरुप हे वेगवेगळे असते. प्रश्नांचे मुद्दे वाचन केल्यावर जी कागदपत्रे उपलब्ध होवू शकतात, त्या प्रश्नांच्या संदर्भामध्ये कागदपत्रांची छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. त्या प्रश्नांचे मुद्दे वाचन केल्यावर जन माहिती अधिकारी यांचा अभिप्राय किंवा मत प्रकरणातील गुणवत्तेबाबत असते ते अपेक्षित नाही व केंद्रीय परिपत्रकांच्या संदर्भात आकलन जन माहिती अधिकारी यांनी करुन घेणे आवश्यक आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाची दखल घेतलेली दिसून येत नाही. त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ प्रमाणे अपिल तरतूद आहे याची माहिती दिसून येत नाही व त्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या तरतुदीचे व शासन निर्णयाचे उल्लघंन केलेले आहे. त्यामुळे त्यांच्याविरुद्ध प्रशासकीय कारवाई करणे आवश्यक आहे. परंतु अपिलकर्ता यांनी विस्तृत व व्यापक प्रमाणांत संपुर्ण महाराष्ट्र महाविद्यालयातील माहिती मागितलेली असल्याने शास्तीचा मुद्दा निकालात निघतो. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यांस पात्र आहे.

**-----आदेश-----**

**१) अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून २ महिन्यांच्या आत त्यांच्या विभागातील महाविद्यालयातून माहिती गोळा किंवा संकलीत करुन अपिलकर्ता यांना विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**
**२) सदर निर्णयांची एक प्रत विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण विभाग, औरंगाबाद यांच्याकडे स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.**
**३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०७-०१-२०११.**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव / कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग , मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त,राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणीक्रं./४९९०८/अपील क्रं.६१९८/२०१०**

**श्री. रमेश झाडे**
**राष्ट्रीय शैक्षणिक गुणवत्ता मंच,**
**२/७०४, श्री. शाश्वत कॉम्पलेक्स प्लेझंट पार्क, ...अपीलकर्ता**
**मिरा भाईंदर रोड, मिरा रोड(पूर्व),जिल्हा.ठाणे-४०११०७.**

**-----*विरुध्द*-----**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षण संचालक (उच्चशिक्षण )**
**उच्च शिक्षण संचालनाय,**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत,**
**पुणे-४११००१.**
**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, ...उत्तरवादी**
**उच्च शिक्षण संचालनाय,**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत,**
**पुणे-४११००१.**

**-----*निर्णय*-----**

| | |
|---|---|
| **द्वितीय अपीलाचा दिनांक** | **: २२-०९-२०१०** |
| **सुनावणीचा दिनांक** | **: ०७-०१-२०११** |
| **अपिलकर्ता** | **- उपस्थित.** |
| **जन माहिती अधिकारी** | **- उपस्थित.** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | **- उपस्थित.** |

अपिलकर्ता यांनी दिनांक १८-०४-२०१० रोजी जन माहिती अधिकारी उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्याकडे दिनांक १३-०४-२०१० रोजीचे अर्जाप्रमाणे, दिनांक ३०-०४-२००२ ला श्री.लाड हेच सेवाजेष्ठ होते, त्याकरीता महाराष्ट्र शासनाच्या सेवाजेष्ठता यादीत त्याचे नाव कोणत्या क्रमांकावर आहे त्याची प्रत देण्यात यावी. शासकीय महाविद्यालयात, गडचिरोली येथील श्री.लाड यांच्या व्यतीरीक्त अजून कोणत्या अधिव्याख्याताचे नाव आज दिनांकाला महाराष्ट्र शासनाच्या सेवाजेष्ठायादीत नाही का? अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती शीघ्र टपालाने घेणार असे नमुद केलेले आहे.

अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १८-०५-२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी UGC राष्ट्रीय शैक्षणिक गुणवत्ता मंच यांच्याकडे माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तरीसुद्धा अपिलकर्ता यांनी दिनांक २६-०७-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय मात्र दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना कोणतीही माहिती अद्यापर्यंत प्राप्त झालेली नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, दिनांक १८-०५-२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यामुळे प्रथम अपिलाची सुनावणी घेण्यात आलेली नाही. त्याकरीता जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १८-०५-२०१० रोजीच्या पत्राची प्रत जोडलेली आहे व त्यामुळे अपिलकर्ता यांनी सदरची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असा निर्णय काढावा लागतो. अपिलकर्ता हे एका संस्थचे पदधिकारी आहे असे दिसते व अनेक माहितीचे अर्ज करीत असतात व ते कधी स्वतःच्या नावाने, कधी संस्थेबाबत देवून अर्ज करतात व कधी उपसदस्य अर्ज करतात व कधी एखाद्या कोणाच्या नावाने संस्थेच्या बाबतीत दिलेले असतात व त्यामुळेच जन माहिती अधिकारी पत्र पाठवितात त्याबद्दल त्यांना काही माहिती असते असे दिसून येत नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी जसे सार्वजनिक प्राधिकरण यांना लागू आहे तसे ते अर्जदारास सुद्धा लागू आहे व अर्जदाराकडून किमान अपेक्षा ही योग्य अर्जदाराचे नाव व पत्ता योग्यरीतीने दिलेले असले पाहिजे व त्यांच्या अर्जामध्ये माहितीचे वर्णन करताना ती स्वच्छ व उचित येईल व जन माहिती अधिकारी यांना समजणे असे वर्णन करणे आवश्यक आहे. परंतु त्यामुळे माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपिल हे निकाली काढण्यास पात्र आहे

**----आदेश----**

**१) अपिल निकाली काढण्यात येते.**
**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०७-०१-२०११.**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव / कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग , मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त,राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणीक्रं./४९५१८/अपील क्रं.६१६९/२०१०**

**श्री.रुपचंद लौगानी,** **...अपीलकर्ता**
**६, फाऊटन हेड को.हौ.सो.लि.,**
**१३३, एस.वी.रोड,खार,**
**मुंबई-४०००५२.**

**-----*विरुध्द*-----**

**प्रथम अपीलीय अधिकारी** **...उत्तरवादी**
**ऑफिस ऑफ द जज को.ऑ.कोर्ट-II,**
**काँट्रक्टर बिल्डींग, दुसरा मजला,**
**निकोल रोड,बॅलार्ड इस्टेट,**
**मुंबई -४०००३८.**
**जन माहिती अधिकारी,**
**ऑफिस ऑफ द जज को.ऑ.कोर्ट-II,**
**काँट्रक्टर बिल्डींग, दुसरा मजला,**
**निकोल रोड,बॅलार्ड इस्टेट,**
**मुंबई -४०००३८.**

**-----*निर्णय*-----**

| | |
|---|---|
| **द्वितीय अपीलाचा दिनांक** | **: २२-०८-२०१०** |
| **सुनावणीचा दिनांक** | **: १४-१२-२०११** |
| **अपिलकर्ता** | **- उपस्थित.** |
| **जन माहिती अधिकारी** | **- उपस्थित.** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | **- अनुपस्थित.** |

अपिलकर्ता यांनी दिनांक १२-०३-२०१० रोजी जन माहिती अधिकारी सहकारी न्यायालय क्रमांक-२ मुंबई यांच्याकडे, च **Case no. CC/II १४ of २००५ and what action taken to served the Contempt notice summons to the Disputant society or his advocate issued by on २०-०२-२०१०.छ** त्याकरीता त्यांनी **(A to I)** या मुद्दामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २५-०३-२०१० रोजी उत्तर देण्यात आलेले आहे. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दिनांक २२-०४-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केलेले आहे. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक ०२-०६-२०१० रोजी दिलेला दिसून येतो. परंतु अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नाही व त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी दिनांक २६-०३-२०१० रोजी U.P.C. ने उत्तर पाठविण्यात आले होते. परंतु अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे आहे की, त्यांना माहिती अपुर्ण मिळाली व त्यावर जन माहिती अधिकारी यांनी युक्तीवाद करताना आयोगा पुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती माहिती अवलोकन केलेले आहे. त्यांनी कागदपत्रे मागितलेली नाही. प्रत्येक मुद्यांमध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांचे अभिमत किंवा अभिप्राय मागितलेला आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे **कलम २ (च )** प्रमाणे माहिती **माहिती** या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्यामध्ये **सार्वजनिक प्राधिकरणामध्ये** साहित्याच्या स्वरुपात उदा. कागदपत्रे, अभिलेख, दस्तऐवज इत्यादीच्या स्वरुपात माहिती उपलब्ध असते व ती माहिती निरिक्षण करुन छांयाकित प्रती घेणे असा **च्माहितीचा अधिकार** या संज्ञेच्या व्याख्येमध्ये समाविष्ठ होते. त्यामुळे जन माहिती अधिकारी प्रकरणात संदर्भामध्ये मागणी अपेक्षित नाही. त्यावर अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला नाही. परंतु प्रथम अपिलाच्या सुनावणीस हजर नसल्यामुळे त्या संदर्भातील निर्णय दिलेला आहे. त्यावर अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना केस नं. CC/II १४ of २००५ ची नस्तीचे निरिक्षण अपेक्षित आहे व त्यांनी प्रथम अपिलाच्या वेळेस मागितलेली होती. तसे असल्यास अपिलकर्ता यांना माहिती जर उपलब्ध करुन दिली असेल तर संबंधीत नस्तीचे निरिक्षण देणे संयुक्तिक राहील. तसेच प्रथम अपिलाची प्रत सुद्धा देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

**----आदेश----**

**१) अपिलकर्ता यांचे अपिल अंशतः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत संबंधित नस्ती निरिक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावी. त्याकरीता अपिलकर्ता यांनी कामकाजाची दिवसांची तारीख व वेळ जन माहिती अधिकारी यांना लेखी कळवून त्या दिवशी उपस्थित राहून, संबंधित नस्तीचे निरिक्षण करावे व आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी.**

**२) प्रथम अपिलाचा निर्णयाची प्रत अपिलकर्ता यांना विनामुल्य करुन देण्यात यावी.**

**३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १४-१२-२०११.**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव / कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग , मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त,राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणीक्रं./४९५१७/अपील क्रं.६१७०/२०१०**

**श्री.रुपचंद लौगानी,** **...अपीलकर्ता**
**६, फाऊटन हेड को.हौ.सो.लि.,**
**१३३, एस.वी.रोड,खार,**
**मुंबई-४०००५२.**

**-----*<u>विरुध्द</u>*-----**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा डेप्युटी लॉ ऑफीसर,** **...उत्तरवादी**
**लिगल डिपार्टमेट, बृहन्मुंबई महानगरपालिका (मुख्यालय )**
**अनेक्स बिल्डींग महानगर पालिका मार्ग,**
**मुंबई -४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा लॉ ऑफीसर,**
**लिगल डिपार्टमेट, बृहन्मुंबई महानगरपालिका (मुख्यालय )**
**अनेक्स बिल्डींग महानगर पालिका मार्ग,**
**मुंबई -४००००१.**

**-----*<u>निर्णय</u>*-----**

| | |
|---|---|
| **द्वितीयअपीलाचा दिनांक** | **: २५-०८-२०१०** |
| **सुनावणीचा दिनांक** | **: १४-१२-२०११** |
| **अपिलकर्ता** | **- उपस्थित.** |
| **जन माहिती अधिकारी** | **- उपस्थित.** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | **- अनुपस्थित.** |

अपिलकर्ता यांनी दिनांक १८-०५-२०१० रोजी जन माहिती अधिकारी विधी विभाग बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या कडे, **च Filing of Appeal on urgent basis against improper, wrong and incorrect order passed by Metropolitan Magistrate of ३९th Court under case No.९२४५/Ss of २००६.छ** च्या संदर्भात त्यांनी **( A to I )** या मुद्दांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झााल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक १२-०७-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम

अपिलाचा निर्णय हा दिनांक २७-०७-२०१० रोजी दिलेला दिसून येतो. परंतु त्यामुळे समाधान न झ ाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना अपुर्ण माहिती मिळालेली आहे परंतु अपुर्ण माहिती काय मिळाली याबद्दल समाधानकारक खुलासा करुन सांगितले नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जे मुद्देनिहाय माहिती मागितलेली आहे त्यामध्ये **मुद्दा कं. १** मध्ये त्यांचे दिनांक २०-०४-२०१० रोजीच्या अर्जाप्रमाणे ३९ व्या न्यायालयाने केस क्र. ९२४५/Ss of २००६ मध्ये अपील का दाखल केले नाही याबद्दलचाी माहिती मागितलेली होती व त्या अर्जावर काय कार्यवाही केली याबद्दलची सुद्धा त्यांनी माहिती मागितलेली होती. तसेच त्यांनी प्रत्येक मुद्दांमध्ये मत विचारलेले होते. ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे **कलम २ (च)** मधील **च्माहितीछ** या संज्ञेची तसेच **(त्र )** मधील **च्माहितीचा अधिकारछ** या संज्ञेची व्याख्या प्रमाणे **च्सार्वजनिक प्राधिकरणामध्येछ** घ्साहित्यांच्या स्वरुपात उदा. कागदपत्रे, दस्तऐवज, अभिलेखे, अभिप्राय इत्यांदीच्या स्वरुपात जी माहिती उपलब्ध असते तीचे निरीक्षण करुन छांयाकित प्रती उपलब्ध करुन घेणे असे आहे.ङ जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध असलेली माहिती पुरविण्याचा अधिकार आहे. कोणत्याही प्रकरणातील निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये मत व्यक्त करुन जन माहिती अधिकारी यांचे मत व्यक्त करणे हे अपेक्षित नाही किंवा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी एखादी विशिष्ट कृती करावी अशी ही मागणी करता येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, ३९ व्या न्यायालयाने जो निर्णय दिलेला आहे त्या निर्णया विरुद्ध अपिलकर्ता यांनी वरीष्ठ न्यायालयामध्ये अपिल करणे आवश्यक आहे. परंतु ते स्वतः हे अपिल न करता महानगरपालिकेस अपिल करण्याकरीता माहिती अधिकार अधिनियम २००५ चे तरतूदीप्रमाणे मागणी करीत आहेत व त्यामुळे त्यांना त्याप्रमाणे उत्तर सुद्धा दिलेले आहे व प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये सविस्तरपणे विवचन केलेले आहे.

प्रथम अपिलाचा निर्णयाचे अवलोकन केले असता निर्णय स्वयं स्पष्ट आहे व त्यामुळे प्रथम अपिल हे फेटाळले आहे ते योग्य आहे. परंतु अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना कागदपत्राची छांयाकित प्रती हव्या आहेत. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले अपिलकर्ता यांना सर्व कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली आहे त्याची पोच सुद्धा आहे. त्यावर अपिलकर्ता यांचे पुन्हा असे म्हणणे आहे की, त्यांचे केस न. ९२४५/SS/२००६ च्या निर्णयानंतर ती कागदपत्रे पुन्हा हवी आहे. परंतु त्याही बाबत जन माहिती अधिकारी यांनी योग्यरीत्या अपिलकर्ता यांना कळविलेले आहे. तसेच कागदपत्राची निरीक्षण करावे असे ही कळविलेले आहे व त्यामुळे अपिलकर्ता यांनी कागदपत्रांचे पुन्हा निरीक्षण करावे. परंतु महानगरपालिकेने अपील दाखल करावे किंवा चुकीची कारवाई केली याबाबत आग्रह किंवा

तक्रार माहितीचा अधिकार अधिनियमाप्रमाणे करता येणार नाही व आवश्यक वाटल्यास उपलब्ध असलेल्या कागदपत्रांची छांयाकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.

**----आदेश----**

**१) अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत कामकाजच्या दिवसाची तारीख व वेळ जन माहिती अधिकारी यांना दुपारी २.०० ते ५.०० त्याप्रमाणे लेखी कळवून उपस्थित राहून संबंधित नस्तीचे निरीक्षण करुन कागदपत्रांची छांयाकित प्रती खर्चाचा भरणा करुन ( नवी मागणी असल्यामुळे ) उपलब्ध करुन घ्यावी.**

**२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना नस्ती निरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावी व प्रती प्रत रु.२/- चा भरणा केल्यानंतर त्यांना छांयाकित प्रती उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १४-०१-२०११.**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव / कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग , मुंबई**

**¸ाज्य मुख्य माहिती आयुक्त,राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणीक्रं./४९२५२/अपील क्रं.५९९९/२०१०**
**क्रमांक:मुमाआ/नोंदणीक्रं./४९२५३/अपील क्रं.६०००/२०१०**

**श्री. अब्राहम पझहुर,** **...अपीलकर्ता**
**ए १/५, इंद्रयुध्द को.हौ.सो., एम.जी.रोड,**
**गोरेगाव ( प. ), मुंबई-४०० ०९०.**

**-----*विरुध्द*-----**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य अधिकारी (मि.व्य.२),** **...उत्तरवादी**
**मुंबई गृहनिर्माण व क्षे.वि.मंडळ (म्हाडा),**
**वांद्र (पूर्व), मुंबई -४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक (२),**
**मुंबई गृहनिर्माण व क्षे.वि.मंडळ (म्हाडा),**
**वांद्र (पूर्व), मुंबई -४०० ०५१.**

**-----*निर्णय*-----**

| | |
|---|---|
| **द्वितीय अपीलाचा दिनांक** | **: ०२-०८-२०१०** |
| **सुनावणीचा दिनांक** | **: ०६-०१-२०११** |
| **अपिलकर्ता** | **- उपस्थित.** |
| **जन माहिती अधिकारी** | **- उपस्थित.** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | **- उपस्थित.** |

अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी मिळकत व्यवस्थापक-२, म्हाडा, मुंबई यांच्याकडे, च Copy of any circular/order issued by M.H.A.D.A. not to permit change of user at Adarsh Nagar, Oshiwara, Jogeshwari (W), Mumbai.छ अशी माहिती व्यक्तिशः मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना विहीत मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दिनांक ०८-०४-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक २६-०५-२०१० रोजी देण्यात आला असून मिळकत व्यवस्थापक -२ यांनी **३०** दिवसांमध्ये माहिती उपलब्ध करुन द्यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ०२-०८-२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले दिसून येते. द्वितीय अपिलाच्या सुनावणीस अपिलकर्ता व जन माहिती अधिकारी हजर आहे. प्रथम अपिलीय अधिकारी सुद्धा हजर आहे. अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना **Change of user** च्या संदर्भात एखादी

**circular/order** ची प्रत मागितलेली होती. परंतु त्यांना विहित मुदतीत मिळाली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे खुलासा करताना असे सांगितले की, तत्कालिन मिळकत व्यवस्थापक-२,मुंबई मंडळ यांचेकडून प्रलंबित राहिल्यामुळे अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देता आलेली नव्हती. परंतु या कार्यालयातील दिनांक १६-०७-२०१० रोजीच्या पत्रान्वये निवासी गाळयाच्या अनिवासी वापराबाबतचा प्राधिकरणाचा ठराव क्र. ६४६१ दिनांक ०४-०२-२०१० ची प्रत देणे बाकी होते. आता या कार्यालयाचे पत्र क्र.मि.व्य२/मुं.मं./५४६३ दिनांक ३०-१२-२०१० अन्वये माहिती देण्यात आलेली आहे त्याची प्रत सोबत जोडलेली आहे. मिळकत व्यवस्थापक म्हणून त्यांनी या पदाचा कार्यभार दिनांक २८-०८-२०१० रोजी घेतलेला आहे. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नव्हती. मात्र आता उपलब्ध करुन दिलेली आहे.

अपिल क्र. ६०००/२०१० मध्ये सुद्धा अपिलकर्ता यांनी दिनांक २३-०३-२०१० रोजी घ**N.O.C. for Commercial use.**ङ च्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. त्या संदर्भात सुद्धा जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, निवासी गाळयाच्या अनिवासी वापराबाबत प्राधिकरणाचा ठराव क्र. ६४६१ दिनांक ०४-०२-२०१० ची प्रत अपिलकर्ता यांना देण्यात आलेली आहे. त्यांच्या ठरावामध्ये निवासी गाळयाच्या अनिवासी वापराबाबत विशिष्ट शुल्क भरल्यास परवानगी मिळते असे असल्यामुळे त्यांच्या दोन्ही अपिलांच्या संदर्भात मागितलेली माहिती ही एकच असल्यामुळे व दिलेली असल्यामुळे सदरचे अपिल हे निकाली काढण्यात यावे अशी विनंती केली आहे. अपिलकर्ता यांना सुद्धा संबंधित ठरावाच्या संदर्भामध्ये विश्लेषण करुन सांगितले. सदरचे दोन्ही अपिले हे निकाली काढण्यास पात्र आहेत.

**-----आदेश-----**

१) **अपिल क्र. ५९९९/२०१० व अपिल क्र. ६०००/२०१० ही दोन्ही अपिले निकाली काढण्यात येत आहे.**
२) **अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण** ोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जे मुद्देनिहाय माहिती मागितलेली आहे त्यामध्ये **मुद्दा कं. १** मध्ये त्यांचे दिनांक २०-०४-२०१० रोजीच्या अर्जाप्रमाणे ३९ व्या **यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १४-०१-२०११.**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव / कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग , मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त,राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणीक्रं./४९५१८/अपील क्रं.६१६९/२०१०**

**श्री.रुपचंद लौगानी, ...अपीलकर्ता**
**६, फाऊटन हेड को.हौ.सो.लि.,**
**१३३, एस.वी.रोड,खार,**
**मुंबई-४०००५२.**

**-----*विरुध्द*-----**

**प्रथम अपीलीय अधिकारी ...उत्तरवादी**
**ऑफिस ऑफ द जज को.ऑ.कोर्ट-II,**
**काँट्रक्टर बिल्डींग, दुसरा मजला,**
**निकोल रोड,बॅलार्ड इस्टेट,**
**मुंबई -४०००३८.**
**जन माहिती अधिकारी,**
**ऑफिस ऑफ द जज को.ऑ.कोर्ट-II,**
**काँट्रक्टर बिल्डींग, दुसरा मजला,**
**निकोल रोड,बॅलार्ड इस्टेट,**
**मुंबई -४०००३८.**

**-----*निर्णय*-----**

| | |
|---|---|
| **द्वितीय अपीलाचा दिनांक** | **: २२-०८-२०१०** |
| **सुनावणीचा दिनांक** | **: १४-०१-२०११** |
| **अपिलकर्ता** | **- उपस्थित.** |
| **जन माहिती अधिकारी** | **- उपस्थित.** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | **- अनुपस्थित.** |

अपिलकर्ता यांनी दिनांक १२-०३-२०१० रोजी जन माहिती अधिकारी सहकारी न्यायालय क्रमांक-२ मुंबई यांच्याकडे, **च Case no. CC/II १४ of २००५ and what action taken to served the Contempt notice summons to the Disputant society or his advocate issued by on २०-०२-२०१०.छ** त्याकरीता त्यांनी **(A to I)** या मुद्दामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २५-०३-२०१० रोजी उत्तर देण्यात आलेले आहे. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दिनांक २२-०४-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केलेले आहे. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक ०२-०६-२०१० रोजी दिलेला दिसून येतो. परंतु अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नाही व त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, अपिलकर्ता यांना दिनांक २६-०३-२०१० रोजी U.P.C. ने उत्तर पाठविण्यात आले होते. परंतु अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे आहे की, त्यांना माहिती अपुर्ण मिळाली व त्यावर जन माहिती अधिकारी यांनी युक्तीवाद करताना आयोगा पुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती माहिती अभिप्राय/स्पष्टीकरणाच्या स्वरुपात मागितलेली आहे. त्यांनी कागदपत्रे मागितलेली नाहीत. प्रत्येक मुद्यांमध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांचे अभिमत किंवा अभिप्राय मागितलेला आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे **कलम २ (च )** प्रमाणे माहिती **च्माहितीछ** या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्यामध्ये **च्सार्वजनिक प्राधिकरणामध्येछ** साहित्याच्या स्वरुपात उदा. कागदपत्रे, अभिलेख, दस्तऐवज इत्यादीच्या स्वरुपात माहिती उपलब्ध असते व ती माहिती निरिक्षण करुन छांयाकित प्रती घेणे असा अर्थ **च्माहितीचा अधिकारछ** या संज्ञेच्या व्याख्येमध्ये समाविष्ठ होता. त्यावर अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला नाही. परंतु प्रथम अपिलाच्या सुनावणीस हजर नसल्यामुळे त्या संदर्भातील निर्णय दिलेला आहे. त्यावर अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना केस नं. CC/II १४ of २००५ च्या नस्तीचे निरिक्षण अपेक्षित आहे व त्यांनी प्रथम अपिलाच्या वेळेस निरिक्षणाची मागणी केली होती. तसे असल्यास अपिलकर्ता यांना माहिती जर उपलब्ध करुन दिली नसेल तर संबंधीत नस्तीचे निरिक्षण देणे संयुक्तिक राहील. तसेच प्रथम अपिलाची प्रत सुद्धा देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

**----आदेश----**

**१) अपिलकर्ता यांचे अपिल अंशतः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत संबंधित नस्ती निरिक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावी. त्याकरीता अपिलकर्ता यांनी कामकाजाची दिवसांची तारीख व वेळ जन माहिती अधिकारी यांना लेखी कळवून त्या दिवशी उपस्थित राहून, संबंधित नस्तीचे निरिक्षण करावे व आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी.**

**२) प्रथम अपिलाच्या निर्णयाची प्रत अपिलकर्ता यांना विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १४-०१-२०११.**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव / कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग , मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त,राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणीक्रं./४९५१७/अपील क्रं.६१७०/२०१०**

**श्री.रुपचंद लौगानी,** **...अपीलकर्ता**
**६, फाऊटन हेड को.हौ.सो.लि.,**
**१३३, एस.वी.रोड,खार,**
**मुंबई-४०००५२.**

**-----*<u>विरुध्द</u>*-----**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा डेप्युटी लॉ ऑफीसर,** **...उत्तरवादी**
**लिगल डिपार्टमेट, बृहन्मुंबई महानगरपालिका (मुख्यालय )**
**अनेक्स बिल्डींग महानगर पालिका मार्ग,**
**मुंबई -४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा लॉ ऑफीसर,**
**लिगल डिपार्टमेट, बृहन्मुंबई महानगरपालिका (मुख्यालय )**
**अनेक्स बिल्डींग महानगर पालिका मार्ग,**
**मुंबई -४००००१.**

**-----*निर्णय*-----**

| | |
|---|---|
| **द्वितीयी अपीलाचा दिनांक** | **: २५-०८-२०१०** |
| **सुनावणीचा दिनांक** | **: १४-१२-२०११** |
| **अपिलकर्ता** | **- उपस्थित.** |
| **जन माहिती अधिकारी** | **- उपस्थित.** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | **- अनुपस्थित.** |

अपिलकर्ता यांनी दिनांक १८-०५-२०१० रोजी जन माहिती अधिकारी विधी विभाग बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या कडे, च **Filing of Appeal on urgent basis against improper, wrong and incorrect order passed by Metropolitan Magistrate of ३९th Court under case No.९२४५/Ss of २००६.**छ च्या संदर्भात त्यांनी **( A to I )** या मुद्दांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झ

ााल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक १२-०७-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक २७-०७-२०१० रोजी दिलेला दिसून येतो. परंतु त्यामुळे समाधान न झ ााल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना अपुर्ण माहिती मिळालेली आहे परंतु अपुर्ण माहिती काय मिळाली याबद्दल समाधानकारक खुलासा करुन सांगितले नाही. जन माहिती अधिकारी यांनी आय्-यायालयाने केस क्र. ९२४५/Ss of २००६ मध्ये अपील का दाखल केले नाही याबद्दलचाी माहिती मागितलेली होती व त्या अर्जावर काय कार्यवाही केली याबद्दलची सुद्धा त्यांनी माहिती मागितलेली होती. तसेच त्यांनी प्रत्येक मुद्दामध्ये मत विचारलेले होते. ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे **कलम २ (च)** मधील **च्माहितीछ** या संज्ञेची तसेच **(त्र )** मधील **च्माहितीचा अधिकारछ** या संज्ञेची व्याख्या प्रमाणे **च्सार्वजनिक प्राधिकरणामध्येछ** घ्साहित्यांच्या स्वरुपात उदा. कागदपत्रे, दस्तऐवज, अभिलेखे, अभिप्राय इत्यांदीच्या स्वरुपात जी माहिती उपलब्ध असते तीचे निरीक्षण करुन छांयाकित प्रती उपलब्ध करुन घेणे असे आहे.ङ जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध असलेली माहिती पुरविण्याचा अधिकार आहे. कोणत्याही प्रकरणातील निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये मत व्यक्त करुन जन माहिती अधिकारी यांचे मत व्यक्त करणे हे अपेक्षित नाही किंवा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी एखादी विशिष्ट कृती करावी अशी ही मागणी करता येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, ३९ व्या न्यायालयाने जो निर्णय दिलेला आहे त्या निर्णया विरुद्ध अपिलकर्ता यांनी वरीष्ठ न्यायालयामध्ये अपिल करणे आवश्यक आहे. परंतु ते स्वत: हे अपिल न करता महानगरपालिकेस अपिल करण्याकरीता माहिती अधिकार अधिनियम २००५ चे तरतूदीप्रमाणे मागणी करीत आहेत व त्यामुळे त्यांना त्याप्रमाणे उत्तर सुद्धा दिलेले आहे व प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये सविस्तरपणे विवचन केलेले आहे.

प्रथम अपिलाचा निर्णयाचे अवलोकन केले असता निर्णय स्वयं स्पष्ट आहे व त्यामुळे प्रथम अपिल हे फेटाळले आहे ते योग्य आहे. परंतु अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना कागदपत्राची छांयाकित प्रती हव्या आहेत. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले अपिलकर्ता यांना सर्व कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली आहे त्याची पोच सुद्धा आहे. त्यावर अपिलकर्ता यांचे पुन्हा असे म्हणणे आहे की, त्यांचे केस न. ९२४५/SS/२००६ च्या निर्णयानंतर ती कागदपत्रे पुन्हा हवी आहे. परंतु त्याही बाबत जन माहिती अधिकारी यांनी योग्यरीत्या अपिलकर्ता यांना कळविलेले आहे. तसेच कागदपत्राची निरीक्षण करावे असे ही कळविलेले आहे व त्यामुळे अपिलकर्ता यांनी कागदपत्रांचे पुन्हा निरीक्षण करावे. परंतु महानगरपालिकेने अपील दाखल करावे किंवा चुकीची कारवाई केली याबाबत आग्रह किंवा तक्रार माहितीचा अधिकार अधिनियमाप्रमाणे करता येणार नाही व आवश्यक वाटल्यास उपलब्ध असलेल्या कागदपत्रांची छांयाकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.

**----आदेश----**

**४) अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत कामकाजच्या दिवसाची तारीख व वेळ जन माहिती अधिकारी यांना दुपारी २.०० ते ५.०० त्याप्रमाणे लेखी कळवून उपस्थित राहून संबंधित नस्तीचे निरीक्षण करुन कागदपत्रांची छांयाकित प्रती खर्चाचा भरणा करुन ( नवी मागणी असल्यामुळे ) उपलब्ध करुन घ्यावी.**

**५) जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना नस्ती निरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावी व प्रती प्रत रु.२/- चा भरणा केल्यानंतर त्यांना छांयाकित प्रती उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**६) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १४-०१-२०११.**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव / कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग , मुंबइ**

**तक्रार क्रमांकः मुमाआ २०१०/४४७८८/त.क्र.१२२५/का.०१**

**श्री. नारायणदास एच.सुखेचा,**
**ब्लॉक नं. सी-८,रुम नं. ४४/४७,** **-----तक्रारदार**
**प्रभात टॉकिज शेजारी, उल्हासनगर-५.**

**-----*विरुद्ध*-----**

**जन माहिती अधिकारी तथा आयुक्त,**
**उल्हासनगर महानगरपालिका,**
**उल्हासनगर-३.** **-----गैरतक्रारदार**

**----*निर्णय*----**

**सुनावणीचा दिनांक : १४-०१-२०११.**
**तक्रारदार - अनुपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - अनुपस्थित.**

तक्रारदार यांनी दिनांक १६-१०-२००९ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) प्रमाणे त्यांचे दिनांक ०३-१०-२०१० रोजी जन माहिती अधिकारी उल्हासनगर महानगरपालिका यांच्याकडे, माहिताचा अधिकार अधिनियम २००५ वे कलम ६(१) प्रमाणे केलेल्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे.

तक्रारदार व गैरतक्रारदार गैरहजर आहेत. तक्रारदार यांनी त्यांचे दिनांक २१-०५-२००९, २१-०६-२००९, ०६-०७-२००९, २८-०७-२००९ तसेच दिनांक १०-०८-२००९ (१७-०८-२००९) रोजीच्या संदर्भामध्ये काय कार्यवाही केली व विलंब का लागत आहे? याबद्दलची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे.

जन माहिती अधिकारी महानगरपालिका हे गैरहजर असल्यामुळे त्याबाबत त्यांनी काय कार्यवाही केली हे आयोगाचे समोर नाही व त्याबद्दल त्या संदर्भात त्यांनी स्वतः सुद्धा कागदपत्रे दाखल केलेले नाही.

आयोगाच्या कार्यालयातून दिनांक ०३-११-२०१० रोजी सुनावणीची नोटीस काढण्यात आली होती. दिनांक १४-१२-२०१० रोजी समक्ष येवून खुलासा सादर करावा असे कळविण्यात आले होते तरी सुद्धा जन माहिती अधिकारी हे आयोगापुढे हजर झालेले नाहीत व त्यामुळे त्यांनी आयोगाचा अवमान केलेला आहे व ते शास्तीस पात्र आहे. तक्रारदार यांच्या माहितीच्या अर्जाप्रमाणे सुद्धा माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) अन्वंये त्यांच्या विरुद्ध शास्ती लादणे आवश्यक आहे व त्याकरीता त्यांना

दोन वेळा संधी देवूनही त्यांनी त्यांचे म्हणणे आयोगापुढे मांडले नाही व त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

**----आदेश----**

**१) तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांचे दिनांक ०३-१०-२००९ रोजीच्या माहिती अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे, तसेच आयोगापुढे सुद्धा तक्रार सुनावणीस जन माहिती अधिकारी हे उपस्थित न राहिल्यामुळे त्यांच्या विरुद्ध माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) अन्वये रु.२५,०००/- शास्ती लादण्यात येते. सदरची शास्तीची वसूली ही त्यांच्या दरमाहच्या वेतनातुन करण्यात येते. याची लेखाशीर्ष च००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा,(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)छ या अर्थसंकल्पीय लेखाशिर्षाखाली जमा करण्यात यावी.**

**२) सदर शास्तीची वसूली ही आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांना करावयाची असल्यामुळे सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे आयुक्त महानगरपालिका यांच्या पुढिल कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.**

**३) तक्रारदार यांचे दिनांक ०३-१०-२००९ रोजी अर्जात मागितलेली माहिती कागदपत्रे छांयाकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य व्यक्तिशः उपलब्ध करुन घेण्यात यावी. त्याकरीता हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत तक्रादार यांनी व्यक्तिशः जन माहिती अधिकारी यांच्याशी संर्पक साधुन माहितीच्या कागदपत्रांची छांयाकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन घेण्यात यावी.**

**४) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयांची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १४-०१-२०११.**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**( सचिव / कक्ष अधिकारी )**
**राज्य माहिती आयोग , मुंबई**

# माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार

**तक्रार क्रमांक: मुमाआ २००७/२७७८७/त.क्र.१७३/का.०१**

**श्री. मोनिष किशोर गंगर,**
**६,भवनेश्वरी, राम नगर,** **-----तक्रारदार**
**बोरीवली (पश्चिम ), मुंबई ४०० ०९२.**

**-----*विरुद्ध*-----**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
**( बिल्डींग व फॅक्टरीज् ), आर/सेंट्रल वॉर्ड,** **-----गैरतक्रारदार**
**म्युनिसिपल मार्केट बिल्डींग, दुसरा मजला,**
**एस.व्ही.रोड, बोरीवली ( प.), मुंबई ४०० ०९०.**

**----*निर्णय*----**

**सुनावणीचा दिनांक : १४-०१-२०११.**
**तक्रारदार - अनुपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - अनुपस्थित.**

तक्रारदार यांनी दिनांक २६-११-२००७ रोजी त्यांचे दिनांक १८-०९-२००७ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून आयोगाकडे माहितीचा अधिकार २००५ चे **कलम १८(१)** प्रमाणे तक्रार केलेली आहे. तक्रारदार यांनी दिनांक १५-०७-२००७ रोजी जन माहिती अधिकारी आर/सेंट्रल वॉर्ड, एम.जी.एम, बोरीवली वेस्ट, मुंबई यांच्याकडे दिनांक ०२-०८-२००७ रोजी, च Garden Reserve plot vide C.T.S.No.२८७, village Borivali Taluka Borivali at Jairaj Nagar,Vazira Naka, Borivali (W), Mumbai.छ च्या संदर्भामध्ये दिलेले चौकशी अहवाल व त्या संदर्भातील तपशीलवार माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या तक्रारी संदर्भामध्ये तक्रारदार व गैरतक्रारदार गैरहजर आहेत. परंतु दाखल केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते, तक्रारदार यांना दिनांक २३-१०-२००७ रोजी तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तक्रारदार यांनी जो निरीक्षण अहवाल मागितलेला आहे तो कार्यालयात उपलब्ध नाही व जे निरीक्षण केले आहे त्या संदर्भामध्ये तोंडी सुचना दिलेल्या आहे व त्यामुळेच निरीक्षण अहवाल उपलब्ध नाही असे म्हटले आहे. परंतु तरीही पहिली तक्रार असल्यास तक्रार म्हणून सहाय्यक अभियंता ( इमारत आणि कारखाने ) यांना पाठविण्यात यावी असे त्यांनी कळविलेले होते. यावरुन तक्रारदार यांनी जी माहिती मागितलेली आहे ती माहिती उपलब्ध करुन घेण्यापेक्षा त्यांनी महानगरपालिकाकडे तक्रार केलेली दिसून येते. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी जे पत्र दिलेले आहे ते योग्य आहे. सदरची तक्रार ही निकाली काढण्यात येते.

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १४-०१-२०११.**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**( सचिव / कक्ष अधिकारी )**
**राज्य माहिती आयोग , मुंबई**

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

**तक्रार क्रमांकः मुमाआ २०१०/६०५/त.क्र.१६४४/२०१०**

**श्री. नैनेश सुरेश डोळस, -----तक्रारदार**
**जी-२, अंजली को-ऑप.हौसिंग सोसायटी,**
**रवी इंडस्ट्रीयल कंपाऊंड, पांचपाखाडी,**
**ठाणे (पश्चिम), पिन - ४०० ६०३ जिल्हा ठाणे.**

**-----*विरुद्ध*-----**

**जन माहिती अधिकारी, -----गैरतक्रारदार**
**महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळ,**
**कल्पतरु पॉईट, २/३/४ था मजला,**
**सायन माटुंगा स्कीम, रोड नं. ८,**
**सायन सर्कल समोर, सायन (पूर्व), मुंबई ४०० ०२२.**

**----*निर्णय*----**

**सुनावणीचा दिनांक : ३१-०१-२०११.**
**तक्रारदार - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी - उपस्थित.**

तक्रारदार यांनी दिनांक २९-०३-२०१० रोजी त्यांचे दिनांक ०६-०२-२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) प्रमाणे तक्रार दाखल केलेली आहे.

तक्रारदार यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी प्रदुषण नियंत्रण महामंडळाच्या संदर्भामध्ये एकूण ८ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तक्रारदार यांचा अर्ज दिनांक ०८-०२-२०१० रोजी प्राप्त झाल्यानंतर त्याच दिवशी वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी म्हणून पत्र दिले होते व त्या पत्राची प्रत ही तक्रारदार यांना सुद्धा उपलब्ध करुन दिलेली होती. परंतु संबंधित वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांच्याकडून माहिती ही दिनांक १६-०४-२०१० रोजी प्राप्त झाली व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १९-०४-२०१० रोजी तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन दिली. त्यावर तक्रारदार यांचे पुन्हा म्हणणे असे आहे की, मुद्दा क्रमांक ८ च्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, मुद्दा क्रमांक ८ हा स्पष्ट नाही व त्यातुन कोणताही अर्थ बोध होत नाही व त्यामुळे त्यांना तसे कळविलेले आहे. आयोगापुढे सुनावणीच्या वेळेस सुद्धा तक्रारदार यांनी मुद्दा क्रमांक ८ च्या संदर्भामध्ये स्पष्टिकरण केलेले नाही व त्याबाबत त्यांना काय माहिती अपेक्षित आहे हे समजून आलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तक्रारदार यांनी मागितलेली बहुतांश माहिती ही प्रदुषण नियंत्रण महामंडळाच्या संकेतस्थळावर दिलेली आहे व त्यामुळे पुन्हा तीच सर्व माहिती मागणे व ती उपलब्ध करुन देणे म्हणजे कार्यालयातील कामकाज बाजूला ठेवून कालापव्यय होतो. मुळातच अधिकारी वर्ग व कर्मचारी वर्ग हा पुरेसा नाही व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ४ प्रमाणे संकतेस्थळावर माहिती उपलब्ध करुन देण्याचा उद्देश मुळातच अर्जदारास माहिती मागण्याची आवश्यकता वाटू नये असा आहे व त्यामुळे

अर्जदाराने सुद्धा संकतेस्थळावरील माहिती वगळून माहिती मागितल्यास ती त्यास मुदतीत उपलब्ध होऊ शकेल. असे असले तरी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ५ च्या तरतुदीप्रमाणे सहाय्यक माहिती अधिकारी यांनी माहितीचा अर्ज संकलीत करुन जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर करावयाची व जन माहिती अधिकारी यांनी सर्व प्रक्रीया पूर्ण करावयाची आहे व माहिती उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे. असे असले तरी आस्थापना विभागाकडुन माहिती ही विलंबाने उपलब्ध झालेली आहे हे स्पष्टपणे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झाल्यास जन माहिती अधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियामाचे कलम २० (१) प्रमाणे जबाबदार असतात. परंतु सर्वच माहिती ही माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असेल असे नाही व त्यामुळे ज्या कर्मचारी व अधिकारी यांच्याकडे माहिती उपलब्ध असेल ती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सेवा अधिनियम कलम ५(४) प्रमाणे सहाय्य घ्यावे लागते व असे सहाय्य घेतले असल्यास अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे अशा अधिकाऱ्यांस किंवा कर्मचाऱ्यास माहिती अधिकारी समजण्यात येते व त्यामुळे अधिकारी किंवा कर्मचारी यांची जबाबदारी ही ३० दिवसामध्ये माहिती उपलब्ध होईल अशी असते व एकदा माहिती अधिकारी समजण्यात आल्यावर माहितीचा अधिकार अधिनियमाचे कलम २० अन्वये सदरचे माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र असतात. सदर प्रकरणी वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांचे जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता साहाय्य घेतलेले आहे व त्यामुळे ते जन माहिती अधिकारी समजण्यात येतात व होणाऱ्या विलंबाबद्दल ते शास्तीस पात्र आहेत अशी आयोगाची खात्री झालेली आहे. त्यामुळे तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

**----आदेश----**

**१) तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून अर्जदाराच्या दिनांक ०६-०२-२०१० च्या अर्जाप्रमाणे तसेच जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक ०८-०२-२०१० च्या पत्राप्रमाणे माहिती पुरविण्यासाठी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जे विलंबास जबाबदार आहे त्यांच्या विरुद्ध माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(२) अन्वये त्यांना लागू असलेल्या सेवा शर्तीच्या नियमाप्रमाणे शिस्तभंगाची कारवाईची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कारवाई महाराष्ट्र प्रदुषण महामंडळ यांचे वरिष्ठ सक्षम अधिकारी यांनी करावयाची आहे व त्यामुळे सदरच्या निर्णयाची एक प्रत व्यवथापकीय संचालक महाराष्ट्र प्रदुषण नियत्रंण महामंडळ यांना स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.**

**२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयांची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ३१-०१-२०११.**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**( सचिव / कक्ष अधिकारी )**
**राज्य माहिती आयोग , मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणीक्रं./५०१०३/अपील क्रं.६२४९/२०१०**
**क्रमांक:मुमाआ/नोंदणीक्रं./५०१०१/अपील क्रं.६२५०/२०१०**

**श्री. रणजित जगदंबा सिंग, ...अपीलकर्ता**
**फ्लॅट नं.२, किंग्ज वे, बेस्ट ऑफिसर्स क्वार्टर्स,**
**दादर ( पूर्व. ), मुंबई-४०० ०१४.**

**-----*विरुध्द*-----**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा चीफ मॅनेजर ( वर्क्स ), ...उत्तरवादी**
**बी.ई.एस.टी. अंडरटेकिंग, इलेक्ट्रिक हाऊस,**
**मुंबई -४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा वरीष्ठ प्रशासकीय अधिकारी,**
**बी.ई.एस.टी. अंडरटेकिंग, लोकमान्य टिळक मार्ग,**
**दादर, मुंबई -४०० ०१४.**

**-----*निर्णय*-----**

| | |
|---|---|
| **द्वितीयी अपीलाचा दिनांक** | **: १३-१०-२०१०** |
| **सुनावणीचा दिनांक** | **: १७-०१-२०११** |
| **अपिलकर्ता** | **- उपस्थित.** |
| **जन माहिती अधिकारी** | **- उपस्थित.** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | **- उपस्थित.** |

अपिलकर्ता यांनी अपिल क्र. ६२४९/२०१० मध्ये जन माहिती अधिकारी श्री.एस.एम.कार्लेकर चीफ मॅनेजर (वर्क्स ) यांच्याकडे, जन माहिती अधिकारी यांचा अभिप्राय एकूण १७ मुद्दांमध्ये मागितलेला दिसून येतो. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ०३-०८-२०१० रोजी अपिलकर्ता यांनी प्रश्नार्थक मुद्दांमधुन जन माहिती अधिकारी यांचे मत मागितलेले असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीप्रमाणे का, केव्हा, काय व कसे ? या संदर्भामध्ये उत्तर अपेक्षित नसल्यामुळे अर्ज फेटाळण्यात आलेले आहे असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे दिनांक ०४-०८-२०१० प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय

हा दिलेला नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, सदरच्या अर्जामध्ये प्रश्नांच्या माध्यमातुन जन माहिती अधिकारी यांचा अभिप्राय मागितलेला असल्यामुळे व तो माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नसल्यामुळे दिनांक ०४-०८-२०१० रोजी स्वतंत्र अर्जाच्या माध्यामातुन त्यांच्या विरुद्ध असलेले आरोपपत्रामुळे या ४ दिवसाची मुदत केली ती कोणत्या कागदपत्रावरुन घेतलेली आहे. त्या कागदपत्रांच्या छांयाकित प्रती मागितलेल्या आहे व अशारीतीने त्यांनी एकूण १८ मुद्दांमध्ये कागदपत्राची मागणी केलेली आहे. सदर अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दिनांक १४-०९-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले व त्यानंतर दिनांक २१-०९-२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी उत्तर/माहिती ही A.O.E.S/S.P.I.O (आस्थापना) यांच्याकडे संदर्भाधिन विचारण्यात आली व त्यांच्याकडे माहिती उपलब्ध नाही असे त्यांनी कळविल्यामुळे अपिलकर्ता यांना कपोलकल्पी माहिती विचारली या कारणास्तव माहिती दिलेली दिसुन येते. ती त्यांच्या विरुद्ध असलेले आरोपपत्राची चौकशी वेळेस उपस्थित करणे आवश्यक आहे असे त्यांना कळविण्यात आले व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना ४७ दिवसांनी उत्तर विलंबाने उपलब्ध करुन दिले. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगपुढे असे सांगितले की, त्यांनी अर्ज हा मुळात मुख्य व्यवस्थापक (कार्य ) यांच्याकडे केला होता. तो माहिती अधिकार म्हणून केलेला नव्हता. त्यामुळे सदरचे अर्ज हा माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०८-२०१० रोजी प्राप्त झाला व त्यामुळे त्यांना दिनांक २१-०९-२०१० रोजी उत्तर दिलेले आहे. आयोगापुढे खुलासा करताना जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती माहिती विद्युत पुरवठा विभागाकडुन न मिळाल्यामुळे त्यांना उपलब्ध करुन देता आलेली नाही. परंतु विद्युत पुरवठा विभाग हा सुद्धा बेस्टचा एक विभाग असल्यामुळे त्यांच्याकडून माहिती उपलब्ध करुन घेवून जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देण्याचे आवश्यक होते. अपिलकर्ता यांचे म्हणणे आहे की आरोपपत्रामध्ये त्यांच्या विरुद्ध जे आरोप करण्यात आलेले आहे ते आरोप हे कागदपत्रांच्या आधाराशिवाय करता येत नाही व त्यामुळे त्या संदर्भातील कागदपत्रे त्यांना उपलब्ध करुन देणे अपेक्षित होते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, सदरची विभागीय चौकशीची नस्ती त्यांच्याकडे नाही. परंतु ज्या विभागाकडे ती आहे त्या विभागाने नस्तीचे अवलोकन करुन अपिलकर्ता यांचे दिनांक ०४-०८-२०१० च्या अर्जात त्या एकूण १८ मुद्दामध्ये माहिती मागितलेली आहे. त्या मुद्देनिहाय कागदपत्रे उपलब्ध असल्यास त्यांच्या छांयाकित प्रती माहिती अधिकाऱ्यास पुरविणे आवश्यक होते. त्या मुद्दांच्या संदर्भामध्ये चौकशी नस्तीमध्ये कागदपत्रे उपलब्ध नाही तसे त्यांना मुद्देनिहाय माहिती

कळविणे आवश्यक होते. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी त्यांचे दिनांक ०४-०८-२०१० रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता यांचे अपिल क्र. ६२५०/२०१० हे मंजूर करण्यास पात्र आहे. मात्र अपिल क्र. ६२४९-२०१० हे वर नमुद केल्याप्रमाणे निकाली काढण्यास पात्र आहे.

**----आदेश----**

**१) अपिल क्र. ६२४९/२०१० हे निकाली काढण्यात येत आहे.**

**२) अपिल क्र. ६२५०-२०१० हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत अपिलकर्ता यांचे दिनांक ०४-०८-२०१० च्या अर्जामध्ये मागितलेली माहिती एकूण १८ मुद्दांच्या संदर्भात जे कागदपत्रे उपलब्ध असतील ते मुद्देनिहाय संबंधित विद्युत पुरवठा विभागाकडून उपलब्ध करुन घेवून अपिलकर्ता यांना विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.**

**३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १७-०१-२०११.**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव / कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग , मुंबई**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक:मुमाआ/नोंदणीक्रं./४८९१६/अपील क्रं.६२५१/२०१०**

**श्री.ओनियल अँन्थोनी किनी, ...अपीलकर्ता**
**५३, कलिना, कोलिव्हरी व्हिलेज,**
**सांताक्रुझ ( पूर्व. ), मुंबई-४०० ०९८.**

**-----*विरुध्द*-----**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, ...उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/पूर्व विभाग,**
**१३७, टी.पी.एस. v, रोड नं.२, प्रभात कॉलनी,**
**सांताक्रुझ (पूर्व),मुंबई -४०० ०५५.**
**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (मेंटेनन्स ),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/पूर्व विभाग,**
**१३७, टी.पी.एस. ५, रोड नं.२, प्रभात कॉलनी,**
**सांताक्रुझ (पूर्व),मुंबई -४०० ०५५.**

**-----*निर्णय*-----**

| | |
|---|---|
| **द्वितीयी अपीलाचा दिनांक** | **: २३-०७-२०१०** |
| **सुनावणीचा दिनांक** | **: १७-०७-२०११** |
| **अपिलकर्ता** | **- उपस्थित.** |
| **जन माहिती अधिकारी** | **- उपस्थित.** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | **- अनुपस्थित.** |

अपिलकर्ता यांनी दिनांक २३-०३-२०१० रोजी जन माहिती अधिकारी महानगरपालिका बृन्हमुंबई मुख्य कार्यालय यांच्याकडे कलिना, सांताक्रुज (पूर्व), एच/पूर्व विभाग C.T.S. No.६५४४ त्या ठिकाणी तलाव होता. त्या जागेवर महानगरपालिकेने शाळेची इमारत बांधुन तयार केलेली आहे व त्यामुळे नैसर्गिक पाण्याचा स्त्रोताच्या संदर्भात नुकसान झालेले आहे व संरक्षण दिलेले नाही. सदरची माहिती ही सन १९८० च्या संदर्भात आहे. तसेच कलिना, सांताक्रुझ येथील महानगरपालिका यांनी वार्ड नं. ८४ च्या संदर्भात मध्ये जे Handbill वाटले त्या संदर्भात माहिती मागितलेली आहे. सदर अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दिनांक ( निरंक ) रोजी सदर नस्तीचे निरीक्षण करुन घेणे व मागितलेली माहिती या कार्यालयात कश्याप्रकारे जतन केलेले नाही असे कळवून जर त्यात माहिती मिळाली तर योग्य तीचे शुल्क भरणा करुन माहिती उपलब्ध करुन देता येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक ०५-०५-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक १०-०६-२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी शाळेच्या संदर्भात १५ दिवसात माहिती उपलब्ध असल्यास पुरविण्यात यावी व तसेच माहिती उपलब्ध नसल्यास ती A.O. (School) यांच्याकडे व्यक्तिशः संर्पक साधुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. सदरचा आदेशाप्रमाणे दिनांक ०९-०८-२०१० रोजी इमारतीची स्थापना दिनांक १४-०७-१९७९ ची आहे असे मुख्यध्यापक यांनी अपिलकर्ता यांना कळविण्यात आले होते.

त्यामुळे अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्या ठिकाणी शाळा सुरु करण्यात आली आहे त्या ठिकाणी पुर्वी तलाव होता, तलाव ही सार्वजनिक जागा आहे असे असताना त्या ठिकाणी परिसरात शाळा सुरु केल्यामुळे मूळ रहिवाशांच्या संदर्भामध्ये विचार न करता तलावाची भरणी केली व त्यामुळे इमारतीचे पाणी किंवा पावसाळ्याचे पाणी सर्व घरामध्ये शिरते व २६-०७-२०१० रोजी १२ फुट पाणी त्या ठिकाणी होते असा प्रकार सार्वजनिक मालमत्ता असताना व रहिवाशांच्या विचार न करता शाळा सुरु केल्यामुळे सदरची माहिती मागितलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, शहर विकास आराखडा असतो व त्या शहर विकास आराखडयामध्ये ठिकठिकाणी आरक्षण दाखविले असतात, त्यात आरक्षण म्हणून शाळेकरीता किंवा इतर सार्वजनिक कामाकरीत सुद्धा दाखविण्यात आलेले असते व त्याप्रमाणे **D.P.Plan** मध्ये संबंधित जागेवर शाळेचे आरक्षण दाखविले असल्यामुळे महानगरपालिकेने शाळा सुरु केले व त्यामुळे अपिलकर्ता यांनी **D.P.Plan** ची कागदपत्रे किंवा शाळा सुरु करण्याच्या संदर्भात महानगरपालिकामध्ये जे काही कागदपत्रे असतील ती उपलब्ध करुन देता येतील. मात्र ती का सुरु करण्यात आली त्याबाबतचे उत्तर माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही. तसेच त्यांची ही तक्रार आहे ती तक्रार सोडविणे सुद्धा राज्य माहिती आयोगाच्या अधिकारात येत नाही असे असलेतरी अपिलकर्ता यांनी **D.P.Plan** ची प्रत तसेच शाळा सुरु करण्याकरीता महानगरपालिकेचा जो प्रस्ताव असले त्या प्रस्तावाची छांयाकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.

**----आदेश---**

**१) अपिलकर्ता यांचे अपिल अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना D.P.Plan ची छांयाकित प्रती तसेच शास्त्रीनगर, सांताक्रुझ (पूर्व) येथील म.न.पा. शाळा सुरु करण्याच्या संदर्भामध्ये जी कागदपत्रे उपलब्ध असतील ती छांयाकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील यांची नोंद घ्यावी.**

**२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १७-०१-२०११.**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव / कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग , मुंबई**

# माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार

**तक्रार क्रमांकः मुमाआ २०१०/१०१३/त.क्र.१६४३/२०१०**

**श्री. नैनेश सुरेश डोळस,** **-----तक्रारदार**
**जी-२, अंजली को-ऑप.हौसिंग सोसायटी,**
**रवी इंडस्ट्रीयल कंपाऊंड, पांचपाखाडी,**
**ठाणे (पश्चिम), पिन - ४०० ६०३ जिल्हा ठाणे.**

**-----*विरुद्ध*-----**

**जन माहिती अधिकारी तथा (महसूल शाखा)** **-----गैरतक्रारदार**
**जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे,**
**पहिला माळा, कोर्टनाका, ठाणे, (पश्चिम)**

**----*निर्णय*----**

**सुनावणीचा दिनांक : ३१-०१-२०११.**
**तक्रारदार - उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी / (तत्कालीन) - उपस्थित.**

तक्रारदार यांनी दिनांक २२-०४-२०१० रोजी त्यांचे दिनांक २७-०१-२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) प्रमाणे तक्रार दाखल केलेली आहे.

तक्रारदार यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना माहिती उपलब्ध झाली ती विलंबाने उपलब्ध झालेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तक्रारदार यांचे दिनांक २७-०१-२०१० च्या अर्जातील मुद्दा क्र.४ च्या अनुषंगाने दिनांक ०८-०२-२०१० रोजी **महसूल शाखा मेज क्र. १,३,४,५,६,७,८,९,१०,११,१२,१३ व १४** यांच्याकडे माहिती उपलब्ध असल्यामुळे त्यांना परस्पर माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळविण्यात आले होते. तसेच माहिती संकलित करणेची असल्याने त्यास अवधी लागणार आहे असेही कळविण्यात आलेले होते. त्यावर तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, दिनांक ०८-०२-२०१० ची माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येते ती प्रत्यक्षामध्ये दिनांक **२६-०४-२०१०** रोजी त्यांना प्राप्त झालेली आहे. मुद्दा क्र. २,३,५ व ६ च्या संदर्भामध्ये प्रश्नार्थक माहिती असल्याचे कारणास्तव त्याबाबत उत्तर देण्याची तरतूद नाही असे कळविलेले आहे. वास्तविक तक्रारदार यांनी जी माहिती मागितलेली आहे त्यामध्ये जन माहिती अधिकाऱ्यांचे अभिमत किंवा मत मागितलेले नाही. किती व कोणते या शब्दांनी माहिती विचारलेली असल्याने तो प्रश्न होत नाही त्यातुन ती सांख्यिकी माहिती किंवा कागदपत्रांच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य नाही. दिनांक ०८-०२-२०१० च्या पत्राप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली नाही व त्यामुळे तत्कालिन जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे तसेच मुद्दा क्र. ४ च्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे ज्यांना सदरचे हस्तांतरण झालेले आहे, त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ५(४) प्रमाणे (५) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजण्यात येते. माहिती ही एकाच

सार्वजनिक प्राधिकरणात वेगवेगळया शाखांमध्ये उपलब्ध असल्यास व त्या शाखांनी जन माहिती अधिकारी नियुक्त केलेले नसल्यास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती परस्पर उपलब्ध करुन द्यावी असे संबंधित शाखांना कळविणे अपेक्षित नाही व त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी वेगवेगळया शाखाकडून माहिती संकलित करुन अर्जदार यांना उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. सदरच्या प्रकरणी तक्रारदारास माहिती उपलब्ध झालेली दिसून येत नाही. आयोगाकडे खुलासा करताना अर्जदार यांना माहिती न देण्याचा कोणताही उद्देश नसून त्यांनी उपलब्ध असलेली संचिका पाहून त्यांना हवी असलेली माहितीची मागणी केल्यास त्यांना केव्हाही देता येईल अशाप्रकारचा खुलासा आयोगापुढे सादर केलेला आहे. असे जर आयोगापुढे सादर केले जाते तर अर्जदारास का कळविलेले नाही हे समजून येत नाही व अर्जदाराने माहिती मागितल्यानंतर ६-८ महिन्यांचा कालावधी हा माहिती उपलब्ध करुन देण्यात जातो हे अधिनियमाच्या तरतूदीच्या विरुद्ध आहे व त्यामुळे संबंधित तत्कालिन जन माहिती अधिकारी किंवा त्यांच्याकडे माहिती परस्पर उपलब्ध करुन देणे असे जे कळविलेले आहे ते सर्व अधिकारी व कर्मचारी हे दोषी आढळून येतात व त्यामुळे सदरची तक्रार ही मंजूर करण्यास पात्र आहे.

**---आदेश----**

१) **तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत संबंधित जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना मुद्देनिहाय माहिती कागदपत्रांच्या छांयाकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. तसे न केल्यास विद्यमान जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.**

२) **तत्कालिन जन माहिती अधिकारी यांच्या विरुद्ध तसेच ज्यांचेकडून माहिती उपलब्ध करुन देण्यास सहाय्य घेतलेले आहे असे कर्मचारी किंवा अधिकारी यांना अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजण्यात येऊन त्यांच्या विरुद्ध शिस्तभंगाची कारवाईची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कारवाई ही सक्षम अधिकारी यांनी करावयाची आहे व त्यामुळे सदरच्या निर्णयाची एक प्रत जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.**

३) **तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ३१-०१-२०११.**
**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**( सचिव / कक्ष अधिकारी )**
**राज्य माहिती आयोग , मुंबई**